स्वयंसेवी चळवळ विशेषांक/एप्रिल ८८/आठ रुपये

# माणूस

## परिवर्तन घडविणारा धर्मप्रवाह-स्वाध्याय

## आंबेडकरवादी चळवळीचे नवे विधायक पाऊल-बुकोई

## आपल्याकडील राजकीय पक्षांची बांधणी कशी असावी?



With Best Compliments From

**APTE AMALGAMATIONS LIMITED**

**(Fine Chemicals Division)**

199, Churchgate Reclamation, Bombay 400 020.

Tel. : 2049389
2873196-97-98
Telex : 011-2891-PSW IN

●

Manufacturers & Exporters of

**SULPHAMETHOXAZOLE I. P. / B. P.**

**TRIMETHOPRIM I. P. / B. P.**

●

WORKS

J / 7 & J / 8 M. I. D. C. Industrial Area,
Taloja. Tal. Panvel, Dist. Raigad
MAHARASHTRA

☎ : 226 & 536

# माणूस

स्वयंसेवी चळवळ विशेषांक–१

एप्रिल १९८८


अनुक्रम


- परिवर्तन घडवणारा धर्मप्रवाह / ६
  निरंजन आगाशे
- ' स्वाध्याय ' ते गृहनिर्माण-मुक्काम संगमनेर / १७
  विनय गुणे
- राजमाची ग्रामसहाय्य योजनेचे एक तप / २२
  छाया राजे
- बांधिलकी : अवघी सहा वर्षांची, फक्त स्त्रियांची / २९
  शीला बक्षी
- गेल्या महाशिवरात्रीला / ३६
  फिरोझ रानडे
- स्वयंसेवी चळवळीतील दोन प्रवाह – निम-राजकीय, अ-राजकीय / ४३
  विनय सहस्रबुद्धे
- शांतिवन – एक बिकट वाट / ४९
  विनया खडपेकर
- बुकोई – आंबेडकरवादी चळवळीचे नवे विधायक पाऊल / ५७
  गिरीश प्रभुणे
- गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानचा कोकण विकासामधील सहभाग / ७६
  संजय कोचरेकर
  तिसऱ्या जगतातील भारतासारख्या देशात राजकीय पक्षांची
- बांधणी कशी हवी ? / ८०
  प्रा. आशा राजवाडे





वर्ष : सत्ताविसावे

अंक : चौथा

किंमत : आठ रुपये

पत्ता : १०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

फोन : ४४३४५९

व्यंगचित्रे
**प्रशांत कुलकर्णी**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**

या अंकाचे संपादन सहाय्य
**अविनाश कोल्हे**

मुखपृष्ठ व आतील चित्रे
**श्याम देशपांडे**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे नियतकालिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

# नववैभवयात्रा

## श्री. ग. मा.

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यावर ध्येयवादी-आदर्शवादी वृत्तीच्या तरुणाना-प्रौढाना देशसेवेचे क्षेत्रच काही काळ उपलब्ध नव्हते. गांधीजींच्या कल्पनेप्रमाणे कॉंग्रेसचे लोकसेवक संघात रुपांतर झाले असते तर ही पोकळी जाणवली नसती. जातपात, प्रांतभेद विसरून सगळ्या थरातील तरुण-प्रौढ स्वातंत्र्यलढ्यात जसे ओढले गेले तसे दारिद्र्य-निर्मूलनाच्या नव्या लढाईतही, असा संघ आघाडीवर राहिला असता तर घडून आले असते व आज दिसते आहे त्यापेक्षा वेगळे व अधिक सुसह्य चित्र आपल्याला दिसू शकले असते पण तसे घडायचे नव्हते; गांधीजींचा खून झाला. विनोबांनी सर्व सेवा संघाची योजना केली तरी गांधीजींचे नेतृत्वगुण त्यांच्याजवळ नसल्याने हा संघ तसा नाममात्र कागदोपत्रीच राहिला; भूदान चळवळ सोडली तर या संघाकडून दृश्य अशी कामगिरी फारच थोडी घडली दुसरी अशी एखादी संघटनाही पुढे आली नाही. रा. स्व. संघाजवळ ही कुवत होती. पण गांधी खुनानंतर लोकमत इतके संघविरोधी बनले की, आपले अस्तित्व टिकवून ठेवणे एवढाच कार्यक्रम काही काळ डोळ्यासमोर ठेवून संघाला वाटचाल करावी लागली. लोक सेवक संघाऐवजी कॉंग्रेस एक राजकीय पक्ष बनल्यामुळे देशात सत्तास्पर्धेचे युग सुरू झाले व इतरही ध्येयवादी चळवळी या स्पर्धेत ओढल्या गेल्या. ध्येयवादी वृत्तीच्या परिपोषाला हे वातावरण फारसे मानवणारे नव्हते. त्यातून समाजवादी समाजरचना हे आपले राजकीय-आर्थिक उद्दिष्ट म्हणून घोषित झाले. देशाचे जे काही भलं व्हायच ते राजकीय पक्ष किंवा सरकारी नोकरशाही करणार अशी सर्वत्र हवा पसरली व थोडीफार धुगधुग असलेली ध्येयवादी वृत्तीही पूर्णपणे मावळली. भूदान चळवळीची शोकांतिकाच केवढी दारूण झाली पहा ! येलवाल येथे परिषद भरली. या परिषदेला नेहरू स्वत: उपस्थित होते. या परिषदेत ठरले काय ? तर भूदानाचे काम सरकारी ब्लॉक डेव्हलपमेंटशी जोडून द्यायचे. विनोबांनी याला मान्यता दिली. म्हणजे नेमके घडले काय ? तर एक थोडीफार स्वतंत्र – स्वायत्त असलेली चळवळ नोकरशाहीत विलीन करून टाकण्यात आली. सब कुछ सरकारवादाचा हा केवढा प्रभाव म्हटला पाहिजे ! काम अ-सरकारी असावे, म्हणजे दोन अर्थाने – शक्यतो सरकारच्या मदतीशिवाय, जनाधाराने ते उभे करावे हा एक अर्थ आणि हिंदीत 'असर' म्हणजे परिणाम. ते परिणामकारकही असावे हा विचार नेहमी मांडणाऱ्या विनोबांनी आपली चळवळ शेवटी सरकाराश्रयी करून टाकणे यात फार मोठी विसंगती होती पण कोणी ती त्यावेळी ध्यानात घेतली नाही; त्याविषयी फारसे मतप्रदर्शनही झाले नाही – इतका सब कुछ सरकारवाद त्यावेळी प्रभावी होता. अजूनही हा प्रभाव चालूच आहे यातून वैफल्यवाद सरळ जन्माला येतो. सगळं काही सरकार करणार आहे, राजकीय पक्ष करणार आहेत, मोठ्या यंत्रणेकडून सगळं भलं साधलं जाणार आहे तर,मग आपल्यासारख्या एखाद-दुसऱ्या व्यक्तीला, एखाद्या लहानशा गटाला कामच काय उरलं ? मुख्य काम येन केन प्रकारेण सत्ता हस्तगत करणे. लोकसेवेची, लोकाना शिक्षित, जागृत करण्याची आवश्यकताच काय ? सत्ता एकदा हाती आली की देशाचं भलं करून टाकू. किंबहुना सत्तेशिवाय असं भलं होऊच शकणार नाही, हा विचार मान्यता पावला व ध्येयवादी वृत्ती हे वेडगळपणाचे दुसरे नाव ठरू लागले. सत्ता हस्तगत करण्यासाठी, ती टिकवून धरण्यासाठी, वेगळ्या प्रकारची माणसे, मनोवृत्ती लागते. अशी माणसे पुढे आली, त्यांनी समाजजीवन व्यापले, व या स्पर्धेत जे सामील झाले नाहीत, किंवा सामील होण्याची ज्यांच्या जवळ पात्रताही नव्हती असेही आपण म्हणू शकू, त्यांनी आपल्यासाठी एक वेगळीच वाट हळूहळू शोधून काढली. या वाटेचे नाव स्वयंसेवी चळवळ.

□

तशी ही वाट आपल्याकडे अगदीच नवीन व अपरिचित नव्हती. या शतकाच्या सुरूवातीपासूनच या वाटेने काही मंडळींचा प्रवास सुरू होता. गोपाळ कृष्ण गोखले यांनी स्थापन केलेला भारत सेवक समाज ही अशा वेगळ्या प्रवासाची पहिली खूण म्हणायला हरकत नाही. म्हणजे मठ, मंदिरे पूर्वीही होती. त्यांच्यामार्फत समाजविकासाचे कार्यही होत असे. पण देशाभिमानाच्या पायावर स्वयंसेवी संस्था पूर्वी निर्माण झालेल्या दिसत नाहीत. भारत सेवक समाजाची उद्दिष्टे पाहिली तर स्वातंत्र्यानंतर निघालेल्या स्वयंसेवी संस्थांच्या उद्दिष्टात व या समाजाच्या उद्दिष्टात फारसा फरक असल्याचे जाणवत नाही. अगदी सेक्युलर पद्धतीची भारत सेवक समाजाची घटना आहे. डाव्या मंडळींना आजही ती मान्य व्हायला हरकत नसावी. तरीपण सुरुवातीच्या दोन पिढ्या सोडल्या तर पुढे या समाजाचे कार्य थंडावलेले दिसते. आपल्याकडील बहुतेक संस्थाजीवन १/२ पिढ्यानंतर कोमेजते तसे याही संस्थेचे झाले. या संस्थेद्वारा गोदावरीबाई परुळेकर पुढे आल्या; ठक्कर बाप्पा, श्रीनिवास शास्त्री यांनी संस्था वाढवली. पण गांधीजींच्या उदयानंतर संस्थेची वाढ खुंटत गेली. जोम कमीकमीच होत गेला; फार तर असेही म्हणता येईल की, गांधीजी गोखल्यांना गुरुस्थानी मानत. गोखल्यांची संस्था वाढवत राहण्यापेक्षा गांधीजींनी या संस्थेची उद्दिष्टे स्वीकारली व स्वातंत्र्य लढ्याला विधायक कार्याची जोड देऊन या उद्दिष्टांची परिपूर्तीही केली. गांधीजींच्या विधायक कार्याचे मूळ गोखल्यांचा भारत सेवक समाज हेही असू शकेल. असे जर असेल तर भारत सेवक समाज ते लोक सेवक संघ अशी एक सरळ वाटही आखता येण्यासारखी आहे. महाराष्ट्रात व गुजरायेत स्वयंसेवी चळवळीचे जाळे इतर प्रांतापेक्षा आजही अधिक पसरलेले दिसते. हा फरक एरवी पडायचे कारण नव्हते. महाराष्ट्र-गुजराथमध्ये ही वाट गोखले-गांधीजींमुळे इतकी अपरिचित व नवीन वाटली नाही हे या फरकामागचे कारण असावे. पुढे रा. स्व संघही वर्ध्याजवळच्या नागपूरलाच निघावा, हाही केवळ एक योगायोगच नसावा.

□

तरी पण हे नक्की की अगदी महाराष्ट्र गुजराथ विचारात घेतला तरी ही स्वयंसेवी वाट फारशी प्रशस्त, लांबरुंद नव्हती. एकी-

कडे नेहरूप्रणीत काँग्रेसचा व इतर राजकीय पक्षाचा सब कुछ सरकारवाद आणि दुसरीकडे या निमुळत्या वाटेवरून चालू असलेला काही तुरळक मंडळीचा–संस्थाचा प्रवास अशी स्वयसेवी चळवळीची स्थिती बराच काळ होती. अगदी इंदिरा गांधीची आणीबाणी लागू होईपर्यंत म्हटले तरी चालेल आणीबाणीत व नंतरच्या आणीबाणीविरोधी लढ्यात प्रथमच हे विखुरलेले लहान लहान गट, कार्यकर्ते एकत्र आले व जयप्रकाशाचे सर्वसमावेशक नेतृत्व लाभल्याने, एक मोठी ताकद यातून उभी राहिली. आणीबाणीविरोधी लढा उभा करताना जयप्रकाशाना मुख्यत: दोन प्रवाहाचे साहाय्य झाले. ठिकठिकाणी असलेल्या विधायक कार्यकर्त्यांचे-संस्थाचे बळ व रा. स्व. संघ. संघावर बंदी आली म्हणून संघ या आंदोलनात ओढला गेला हा आक्षेप जरी काही प्रमाणात खरा असला तरी संघाच्या सहभागाचे महत्त्व त्यामुळे कमी होत नाही आणि तसे पाहिले तर बंदी येण्यापूर्वी बिहारातील जयप्रकाश चळवळीत संघाने भाग घेतला होताच की ? जयप्रकाशाना वाचवण्यासाठी नानाजी देशमुखानी पोलिसांच्या लाठ्या झेलल्या होत्या. आणि बिहारातील एका संघ कार्यक्रमाला उपस्थित राहून जयप्रकाशानी संघाचा प्रकट गौरवही केल्याची नोंद आहे. ते काहीही असो. स्वयसेवी चळवळीला एक जोरदार भरती त्याकाळी आली होती हे निर्विवाद आहे. गुजराथ-महाराष्ट्र, खुद्द राजधानी दिल्ली इत्यादी ठिकाणाहून तरुणाचे, प्रौढ कार्यकर्त्यांचे छोटे, मोठे गट जयप्रकाशाची संपूर्ण क्रांती यशस्वी करण्यासाठी खेडोपाडी गेले व आपापले छोटे-मोठे तळ तेथे उभे करायला त्यानी सुरुवात केली. जनता पक्ष, म्हणजे जयप्रकाशाचे नेतृत्व मानणारे लोकच सत्तास्थानी असल्याने असे तळ जागोजागी लवकर उभे करता येतील, त्याना शासनाचे सहकार्य वेळेवर पुरेशा प्रमाणात लाभू शकेल व जयप्रकाशाचे नवा भारत घडवण्याचे स्वप्न, काही प्रमाणात तरी वास्तवात उतरवता येईल, असा एक थोर आशावाद त्याकाळी सर्वांनी बाळगला होता. स्वातंत्र्यलढ्याच्यावेळी होते तसे वातावरण ध्येयवादाने भारलेले जाणवत होते. ग्रामीण भागात विकास कार्य किंवा संघर्ष करणारे तरुण-प्रौढाचे आज दिसणारे बरेचसे लहान मोठे गट या काळातच उदयास आलेले आहेत. नानाजी देशमुखाचा गोंडा प्रकल्प या काळातच सुरू झाला. बौद्धगयेचे महंतविरोधी आंदोलन या काळात अधिक तीव्र झाले होते. या गटाना विचार पुरवणारी बुद्धिवंत मंडळीही या काळात विशेष कृतिशील झालेली आपल्याला दिसतील. रजनी कोठारी, रमेश थापर अरूण शौरी ही नावे या काळात विशेष पुढे आली. भूदान चळवळीची जशी एक लाट आली होती तशी ही संपूर्ण क्रांतीची लाट उसळली होती दुर्दैवाने जयप्रकाशांच्या डोळ्यासमोरच ती ओसरलीही. पण ओसरली तरी ती काही वारसा ठेवून गेली. किंवा मागचा होता तो तिने आणखी थोडा समृद्ध केला. स्वयसेवी गट पूर्वी एकत्र येत नसत; त्याच्यात परस्परसह कार्य नसे. आता असे एकत्रीकरण अधुनमधून का होईना, घडताना दिसते हा वारसा संपूर्ण क्राती चळवळीचा नाही तर कोणाचा ? तो यापुढेही जपला पाहिजे. अधिक समृद्ध केला पाहिजे. शेवटी कुठलाही विचार, कुठलीही चळवळ अशी टप्याटप्यानेच पुढे सरकत असते मागचे अनुभव जमेस धरून पुढची वाटचाल करायची असते. स्वयसेवी चळवळ तरी याला अपवाद कशी ठरेल ?

□

यापुढील वाटचालीसबधी दोन प्रकारचे विचार मांडले जातात. एक जनआंदोलनवादी, राजकीय परिवर्तनावर, व्यवस्था बदलावर मुख्य भर देणारा; दुसरा प्रकल्पवादी. संघर्षवादी व रचनावादी असेही या दोन प्रवाहाचे वर्णन करता येईल. खरी गरज या दोन्ही प्रवाहाच्या समन्वयाची आहे व असा जेव्हा मेळ घातला जातो, समन्वय घडून येतो तेव्हा या चळवळीची खरी ताकद दिसून येते सागली-मिरजेजवळच्या बळीराजा धरणाचे आंदोलन हे अशा समन्वयाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. पुण्याच्या ज्ञान-प्रबोधिनी संस्थेने खेड-शिवापूर भागात लढवलेले दारूबंदी आंदोलन हे आणखी एक उदाहरण. प्रबोधिनी या ग्रामीण भागात आर्थिक विकासाचे काही कार्यक्रम राबवत होती. आर्थिक विकास साधला पण त्याबरोबर गावात दारूही आली. संसार उध्वस्त होऊ लागले. ज्ञान प्रबोधिनीचे तरुण-तरुणी व गावकरी याची मिळून संयुक्त आघाडी उभी राहिली आणि शासनाला जे जमले नाही, राजकीय पक्ष जे करू शकले नाहीत ते परिवर्तन या तरुणांनी व गावकऱ्यांनी घडवून आणले. दर ठिकाणी असा समन्वय जमतो असे नाही स्थानिक परिस्थिती, नेतृत्वगुण असे इतरही बरेच घटक ध्यानात घ्यावे लागतात. पण असा समन्वय घडला नाही आणि हे दोन्ही प्रवाह काही काळ वेगवेगळे वाहत राहिले तरी फारसे बिघडत नाही. वेळ प्रसगी हे दोन्ही प्रवाह एकत्र येऊ शकतात. आले नाहीत तर ते जागच्या जागी जिरून-आटून जाण्याची शक्यता अधिक. केवळ संघर्षवादातून वैफल्य येते आणि रचनावादावर फाजील भर देणे म्हणजे चळवळीचे रूपातर दुकानदारीत करणे. अशी दुकाने सध्या खूप निघालेली आहेत व खऱ्या लोकाश्रयी स्वयसेवी चळवळीने यापासून सावध राहण्याचीही आवश्यकता आहे ही दुकाने कशी ओळखायची? एक खूण ध्यानात ठेवायची. जे का रंजले गांजले त्यांना अमुक एक प्रकल्प, अमुक एक चळवळ वर येण्यास कितपत सहाय्यभूत ठरत आहे ? म्हणजे लोकाश्रयी स्वयसेवी चळवळीचे मुख्य कार्यक्षेत्र समाजातील दुर्बल घटक हे असले पाहिजे. या घटकाना संघटित करणे, त्याना अधिक चागल्या जीवनमानाचा लाभ मिळवून देणे. त्याना देशाच्या मुख्य सांस्कृतिक प्रवाहात समाविष्ट करून घेणे, हे राष्ट्रीय बाण्याच्या लोकाश्रयी स्वयसेवी चळवळीचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. रोटरी-लायन्सची मंडळीही सेवाकार्य करतात. पण त्यातील बरेचसे वरवरचे व दिखाऊ असते. अशा कार्याला स्वयसेवी चळवळीत जागा नाही. पण काही चागले अपवादही असू शकतात. पुण्यातील स्नेहसेवा संस्थेचे काम यादृष्टीने अनुकरणीय आहे. दुष्काळ आला की आपण पाण्यासाठी आरडाओरडा सुरू करतो. पण अनेक खेडी अशी आहेत की, मागील दुष्काळात सरकारी योजनेद्वारा बसवले गेलेले नळ, पंप्स दुरुस्ती व देखभाल नसल्यामुळे जेथे बंद पडलेले आहेत. हे नळ, पम्प्स चालू स्थितीत ठेवणे ही या खेड्यातील लोकाना आपली जबाबदारी वाटू नये का ? ही जबाबदारीची जाणीव उत्पन्न करावी, नवीन हाकाटी करण्याऐवजी बंद पडलेले पम्प्स-नळ पुन्हा

गावकऱ्यांच्या मदतीनेच सुरू करावे अशी खटपट स्नेहसेवेचे कार्यकर्ते करीत आहेत व गावकरीही हळूहळू साथ देत आहेत, शासनाची मदतही *या उपक्रमाला लाभली आहे.* काम कोणीही सुरू करो; सध्याचे सामाजिक आर्थिक संदर्भ पाहता ते मुख्यतः मागास प्रदेशाना, उपेक्षित-असघटित गरीब लोकसमूहाना वर उचलणारे असले पाहिजे. एवढा आग्रह स्वयसेवी चळवळीने सध्या काही काळ तरी धरला पाहिजे. श्रीमंताचे प्रश्न असतात. त्याच्यावरही कधी कधी अन्याय होतो. पण *सगळ्याचे सगळे प्रश्न सोडवण्याची जबाब*दारी घेणे म्हणजे चळवळ दिशाहीन करणे. राष्ट्रवादी स्वयसेवी चळवळीने तरीही कार्यक्षेत्रनिश्चिती करून ठेवायला हवी. शेवटी राष्ट्रवाद म्हणजे परपरेचे केवळ गौरवीकरण नाही. ते हवे; कारण त्याशिवाय राष्ट्रवादाला उठावच घेता येणार नाही. पण ही परपरा सर्वांना आपलीशी वाटायला हवी यासाठी जे *या परंपरेच्या बाहेर फेकले गेले असतील त्याना* प्रथम जवळ आणले पाहिजे, आपलेसे केले पाहिजे. सध्याची सामाजिक-आर्थिक विषमता कमी केल्याशिवाय हे साध्य होणे कसे शक्य आहे? जे मुख्य राष्ट्रीय प्रवाहाच्या बाहेर राहिले आहेत त्याना या प्रवाहात सामील करून घेणे हाच तिसऱ्या जगातील समर्थ राष्ट्रवादाचा कणा असतो–असायला हवा. उगाच *नाही मधुकरराव देवल मिरज-म्हैसाळला* दलितांच्या सहकारी शेतीकडे वळले व नानाजी देशमुखानी उत्तर प्रदेशातील सर्वात मागासलेला गोंडा जिल्हा व महाराष्ट्रातला बीड जिल्हा आपले कार्यक्षेत्र म्हणून निवडला. ज्याना तूप रोटी मिळते आहे त्याना श्रीखंडपुरी देण्याची सध्यातरी काही आवश्यकता नाही

▭

असा राष्ट्रवाद मानवताकदवार आधारलेला असतो हे उघडच आहे. मानवतावादावर म्हणजे भोगळ परोपकारबुद्धी किंवा भूतदया नव्हे. सत्य एक असले तरी ते जाणण्याचे मार्ग अनेक असू शकतात. असे मानणारी जीवनदृष्टी म्हणजे भारतीय मानववाद. यातून *विविधतेवर आधारलेली एक जीवनशैली* निर्माण होते. या जीवनशैलीचे रक्षण व पोषण करण्याची जबाबदारी मग ओघानेच येते. धर्म, जातपात वर्ग कोणताही असो. या जीवनशैलीचे, तीर मारणाऱ्यापासून रक्षण सर्वांनीच केले पाहिजे. उदारता व सहिष्णुता ही भारतीय संस्कृतीची मूल्ये या जीवनविषयक दृष्टिकोनातून निर्माण झालेली आहेत. तिचा *आजवर एकतर्फीच प्रयोग झाला.*, जो कत्तल करायला आला, आपल्याला लुटून फस्त करायला आला, त्यालाही आपण दूध पाजत राहिलो. आपली शत्रू-मित्र पारख चुकली म्हणून इतके सहिष्णु आणि उदारमतवादी *तत्त्वज्ञान असूनही आपले राष्ट्रजीवन कमजोर,* पराभूत राहिले. सुप्रसिद्ध इतिहासकार कै. शेजवलकर यानी या आपल्या कमजोरीवर फार नेमके बोट ठेवले आहे ते म्हणतात 'हिंदूचा सर्व इतिहास म्हणजे काल्पनिक-वैयक्तिक ध्येये आचरणात आणण्याचा अट्टहास धरून, स्वतःच्या घरात गुलाम होऊन बसलेल्या, दुबळ्या, फसलेल्या लोकाचा *इतिहास आहे.*' हेच ऐतिहासिक *सत्य* '*सद्गुणविकृती*' हा नवीन शब्द योजून सावरकरानीही व्यक्त केलेले आहे. उदार, सहिष्णु संस्कृती हवी असेल तर अनुदार, असहिष्णु विचारापासून तिचे रक्षण करण्याची जागरूकताही आपण बाळगली पाहिजे. आपण म्हणजे सर्वांनी. या सांस्कृतिक प्रवाहाचा वारसा सांगणाऱ्यानी. नाहीतर *विकास साधेल पण विकासाची फळे आक्रम*कच चाखत राहतील. हा देश एकेकाळी विकसित होता, प्रगत होता म्हणूनच ना येथील संपत्ती, वैभव लुटून नेण्यासाठी परकीय येथे आले? आज आहे असाच पूर्वीही हा देश मागासलेला व गरीब असता तर कोण वाळवटे पार करून किंवा समुद्राला लावचा वळसा घालून येथे धडपडायला आला असता? *आपण केवळ विकसित, प्रगत नव्हतो तर* वैभवशालीही होतो. पण वैभव टिकवण्याची अक्कल मात्र गमावून बसलो होतो. पुन्हा आपली वैभवयात्रा सुरू झाली आहे. मागचा इतिहास अशावेळी न विसरलेला बरा. नाहीतर पुन्हा शेजवलकर म्हणतात तसे व्हायचे.

▭

या नववैभवयात्रेचे अंतिम उद्दिष्ट कोणते? नेहरूनी फार सुंदर शब्दात हे उद्दिष्ट आपल्यासमोर ठेवलेले आहे. त्यानी म्हटले आहे "परंतु मला जी चिंता आहे ती केवळ आमच्या भौतिक प्रगतीविषयीच नव्हे. तर आमच्या लोकाचे शील आणि त्याच्या मनाची सखोलता याविषयी आहे. औद्योगिक प्रगतीने *सामर्थ्य प्राप्त झाल्यामुळे वैयक्तिक* संपत्ती आणि सुखी जीवन साध्य करुन घेण्याच्या प्रयत्नात आम्ही आमचे व्यक्तिमत्व तर गमावणार नाही ना? तसे झाले तर ती एक शोकांतिका ठरेल ......

आज आपण सर्वजण अधिकाराची आणि खास हक्काची भाषा बोलतो आणि त्याची मागणी करतो. परंतु आमचा जुना धर्म *आमच्या कर्तव्याविषयी आणि जबाबदाऱ्यां*विषयी आम्हाला सागतो. कर्तव्ये पार पाडल्यानंतरच अधिकार येतात.

विज्ञानाच्या आणि तंत्रशास्त्राच्या प्रगतीची मानसिक आणि आत्मिक प्रगतीशी सांगड घालणे आपल्याला शक्य आहे का? हाच मुख्य प्रश्न आहे विज्ञानाशी आपण प्रतारणा करू शकणार नाही कारण ते आजच्या जीवनाचे मूलभूत तत्त्व आहे. परंतु ज्या आवश्यक तत्त्वाचा आम्ही गतकाळात शेकडो वर्षे पुरस्कार करीत आलो, त्याच्याशी प्रतारणा करणे त्याहूनही शक्य नाही तेव्हा आपले सर्व शक्तीसामर्थ्य एकवटून आपण औद्योगिक प्रगतीच्या मार्गाने गेले पाहिजे आणि त्याचबरोबर सहिष्णुता, दया आणि सुज्ञपणा याच्या शिवाय भौतिक संपत्ती मातिमोल ठरेल, हेही आपण ध्यानात ठेवले पाहिजे' ('भारत आज आणि उद्या' 'आझाद व्याख्यानमाला १९५९ पृष्ठ. ४९)

▭

मुख्य प्रश्न केवळ भौतिक प्रगतीचा नाही. मुख्य प्रश्न आत्मिकतेची आणि भौतिकतेची सांगड कशी घालायची हा आहे. सरकाराला किंवा केवळ सत्ताकरण करणाऱ्या राजकीय गटाना, पक्षाना हे कार्य करण्यास वेळ नाही. स्वयसेवी चळवळ हे कार्य काही प्रमाणात करू शकेल. जर ती पुरेशी स्वायत्त आणि कर्तव्यभावनेवर अधिष्ठित राहिली तर. ही तिची दोन आद्य वैशिष्टये आहेत. ही टिकवून जर तिने यापुढची वाटचाल केली तर जे आपले सांस्कृतिक व्यक्तिमत्व अतिभौतिकतेच्या गदारोळात गमावून बसण्याचा धोका प. नेहरूनी वर व्यक्त केला आहे, तो काही प्रमाणात तरी टळू शकेल. स्वयसेवी चळवळ व तत्सम इतर सांस्कृतिक सामाजिक चळवळीसमोरील सध्याचे सर्वात मोठे सकट देशाची गरिबी–*मागासलेपण हे नाही. यावर प्रयत्नाने मात* करता येते. या चळवळीसमोरील या काळातले खरे सकट पश्चिमेकडून, विशेषतः अमेरिकेकडून येणाऱ्या उपभोगवादाचे आहे. नवी गुलामगिरी आपले संस्कृतिक व्यक्तिमत्वच गमावून बसवण्याचा धोका यातून उद्भवणार आहे. स्वयसेवी चळवळीची यापुढील वाटचाल ठरवताना, बांधणी करताना हे *बदललेले सदर्भही ध्यानात घेणे आवश्यक* आहे. नाहीतर उपभोगवादाच्या आयातीच्या या नव्या लाटेत ही चळवळ बुडून जाईल. केवळ संख्यात्मकदृष्टया तिची वाढ होऊ नये. हा सांस्कृतिक आशयही तिने प्रकट केला पाहिजे. नाहीतर गोखले, गांधी, –विनोबा जयप्रकाश, रा. स्व. संघ ही परंपरा तरी सांगायची कशासाठी?

▭



# परिवर्तन घडवणारा धर्मप्रवाह

## निरंजन आगाशे

खळाळत्या, उसळत्या सागराचे आणि ध्येयवादी पुरुषांचे काहीतरी नाते असावे. सागर किनाऱ्यावर जाऊन उभे राहिले की, चैतन्य आणि उत्साहाची भरती आल्यासारख्या लाटा नाचत असतात. या लाटांचा आवेग एवढा असतो की, तो थोपविण्याची छाती होणे शक्य नाही. पण तरीही केवळ उसळणाऱ्या लाटा म्हणजे सागर नसतो. त्याच्या अंतरंगात सखोलता, गंभीरताही दडलेली असते. प्रचंड खळबळ माजलेली दिसते आणि आत कुठेतरी प्रगाढ शांतताही नांदत असते. माथ्यावरचा सूर्य या प्रवाहाला उजळून टाकत असतो. कदाचित गुणमाहत्म्यांमुळेच महापुरुषांना सागराचे आकर्षण वाटत असावे. अलाहाबादच्या प्रयागतीर्थावर दोन वर्षांपूर्वी झालेला विराट मेळावा अनुभवल्यानंतर हाच विचार माझ्या मनात आला होता. हा मेळावा होता पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय-परिवाराचा. आदिवासी, मच्छिमार, कोळी हे 'जय योगेश्वर' च्या निनादात गंगा-यमुनांच्या संगमावर धर्मध्वज फडकावतात आणि जणू धर्माचा ताम्रपट कोणाच्या नावे लिहून दिलेला नाही, मानवी जीवनाला आवश्यक असणारा धर्म पुन्हा शुद्ध स्वरूपात उभा करण्याचे काम आम्ही आमच्या हाती आता घेतले आहे असे सांगतात. स्वाध्याय म्हटले की, या अभिनव धर्मजागरणाचे दृश्य डोळ्यांपुढे येते. मुंबई-करांनी, जुहू–गिरगाव या चौपाट्यांनी गेल्या काही वर्षांत अनेक वेळा हे दृश्य अनुभवले आहे. गेल्याच महिन्यात गिरगाव-चौपाटीवर पांडुरंग-शास्त्रींनी निर्माण केलेल्या शक्तीचा आविष्कार पाहायला मिळाला. अक्षरशः भाजून काढणाऱ्या उन्हात पांडुरंगशास्त्री काय सांगताहेत हे ऐकण्यासाठी लाखोंचा जनसमुदाय येथे एकत्र जमला होता. या समुदायामध्ये कोणा एका प्रांताचे, भाषेचे, जातीचे किंवा धर्माचे लोक नव्हते. त्यामध्ये मच्छिमार होते, भिल्ल होते, हरिजन होते. जसे गुर्जर-भाषिक होते तसे मराठी-हिंदी बोलणारेही होते. पुरुषांच्या इतक्याच स्त्रियाही उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. त्यांना कोणतीही मागणी करायची नव्हती, कोणाला इशारे द्यायचे नव्हते



तरीही एवढ्या मोठ्या संस्थेने ते तेथे उपस्थित होते. हे सगळे पाहून या चळवळीशी अनभिज्ञ असणारे अवाक्‌च झाले. वृत्तपत्रात मथळे झळकले – The Silent Revolution.

'शास्त्री' आणि 'क्रांती'? या दोन शब्दांमध्ये साधर्म्य शोधणे अनेकांना जड जाते हे खरे आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, गेल्या २५–३० वर्षांत शास्त्रीजींनी आणि त्यांच्या स्वाध्याय-चळवळीने खरोखरच या शांततामय क्रांतीच्या महाकार्याला हात घातलेला आहे. शास्त्रीजींना सारे स्वाध्यायी प्रेमाने दादा म्हणतात. तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि गीतेचा प्रसार हे दादांचे सुरुवातीचे कार्यक्षेत्र. त्यांचे वडील वैजनाथशास्त्री यांनी गीतेच्या प्रसारासाठी गिरगावात भगवद्‌गीता-पाठशाळा स्थापन केली. दादांनी वडिलांच्या कार्याची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. पण गीतेच्या आणि संस्कृतीच्या प्रसाराचे काम करीत असताना त्यांच्या दृष्टीला, पुढे झेप घेऊ पाहणाऱ्या आकांक्षांना गीता-पाठशाळेची चौकट अपुरी वाटू लागली. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या तुलनेत भारतीय विचारदर्शन एवढ समृद्ध, संपन्न आहे पण त्याचे आजचे वारसदार (त्यांच्याच शब्दांत) असे लेचेपेचे का? दीनदुबळे का? यांचे चेहेरे पडलेले का? हे प्रश्न त्यांना भेडसावू लागले. या दोन्हीमधली विसंगती जसजशी तीव्रतेने त्यांच्या डोळ्यांत खुपू लागली तसतशी त्यांची अस्वस्थता वाढली. प्राचीन वैदिक विचारांनी भारावणारे मन आणि दुसऱ्या बाजूला आजच्या आर्थिक–सामाजिक परिस्थितीचा वेध घेणारी त्यांची दृष्टी या दोन्हींची सांगड बसत नव्हती.

आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान-परिषदेतील त्यांच्या एका व्याख्याना-नंतर अमेरिकेतर्फे तत्त्वज्ञानाच्या अध्यापनासाठी कायम वास्तव्याचे आमंत्रण दादांना आले होते. ते त्यांनी नाकारले आणि भारत हीच कर्मभूमी म्हणून निवडली. देशाची सध्याची परिस्थिती बदलायची तर खेड्यात गेले पाहिजे असे त्यांना वाटले. नुसता समृद्ध विचार असून काय उपयोग? ज्याच्यासाठी हा विचार आहे तो बहुजनसमाजच जर कर्मकांडात रुतलेला, खोट्या आचारधर्मालाच धर्म म्हणून स्वीकारणारा असेल तर समाजात परिवर्तन होणे शक्य नाही हे त्यांनी जाणले.

गीता-पाठशाला आणि इतर माध्यमांतून सुशिक्षित तरुणांशी यासंबंधी दादांची चर्चा होत असे. अशा २०–२५ तरुणांना एक दिवस जुहू-किनाऱ्यावर दादांनी बोलविले. १९५४ सालच्या त्या प्रसंगाची आठवण सर्व स्वाध्यायींना आजही प्रेरणादायी वाटते. या कार्याची विस्तारलेली महानदी हे जे आजचे स्वरूप आहे त्याचा उगम जुहूच्या किनाऱ्यावरील छोट्याशा मेळाव्यामध्ये आहे.

सुशिक्षित–व्यावसायिक असे २०–२५ तरुण त्या ठिकाणी जमले होते. सूर्यास्ताच्या वेळी हे सर्वजण 'दादा' कधी येतात याची वाट पाहात होते. मनात काहीतरी भयंकर वादळ घेऊन दादा आले आहेत असे त्या वेळी त्यांना वाटले. अस्वस्थ अंतःकरणाने दादांनी या तरुणांना जे सांगितले तीच 'स्वाध्याय'ची सुरुवात. दादांनी या

तरुणाना जे आवाहन केले त्याचा आशय असा – मानवी मूल्याना पुनर्जीवित करणे, ऱ्हास पावणाऱ्या सास्कृतिक मूल्याचा जीर्णोद्धार करणे हेच खरे प्रभुकार्य आहे, त्यातच खरी भक्ती आहे. केवळ टाळ-मृदुग वाजवीत रात्रभर गात बसणे एवढीच भक्ती नाही. पण अशी 'बावळट' भक्ती सगळीकडे दिसते आहे. अशा स्थितीत जडवादाच्या प्रवाहात ही भक्ती आणि हे भक्त वाहून जायला वेळ लागणार नाही. साम्यवाद आज देशावा ताबा घेण्याचा प्रयत्न करतो आहे पण त्याला यश लाभत नाही याचे कारण भारतवासीयात राम-कृष्णावरील श्रद्धा थोडीशी का होईना पण शिल्लक आहे. पगु भक्तीला उबगलेले व जड बनलेल्या धर्मबधनापासून मुक्ती इच्छिणारे तरुण जर साम्यवादाच्या–जडवादाच्या आहारी जाऊ लागले तर वेद, उपनिषदे व गीता समजून घेणाऱ्या तरुणाची जबाबदारी आणखीन वाढते. म्हणून तुम्ही सगळ्यांनी खेड्यात गेले पाहिजे, तीच खरी भक्ती आहे.

## गावागावात भक्तिफेरी

१९५४ साली दादानी केलेल्या या आवाहनाचा त्या २५ तरुणावर विलक्षण परिणाम झाला. मुबईतील आपल्या नोकरी-धद्यातून वेळ काढून खेड्यापाड्यात 'भक्तिफेरी' काढण्यास त्यानी सुरुवात केली. कोणतीही अपेक्षा न बाळगता खेड्यात जायचे हा पहिल्यापासून त्याचा कटाक्ष राजकीय पक्ष मतासाठी खेड्यात जातात तर तथाकथित समाजसुधारक प्रसिद्धीवर डोळा ठेवून असतात. पण स्वाध्यायीना दादाची अशी शिकवण होती की, भक्तीचा स्वतःचा पाठ पक्का करण्यासाठी आपण खेड्यात जात आहोत.

'भक्तिफेरी' ची ही तपश्चर्या गेली ३४ वर्षे अव्याहतपणे सुरू आहे, आणि त्यातूनच भारतातील व भारताबाहेरील आजचा स्वाध्याय-परिवार आकाराला आला आहे. महाराष्ट्रात पुणे, मुबई, ठाणे, नाशिक, जळगाव, औरगाबाद, नादेड, जवळजवळ सर्व गुजरात त्याशिवाय आंध्र, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश इथपर्यंत स्वाध्यायचा वटवृक्ष विस्तारला आहे.

भक्तिफेरीतून 'स्वाध्याय' चा कार्यविस्तार होतो. पण म्हणून केवळ धर्मप्रचारक सस्था असे 'स्वाध्याय' चे स्वरूप नाही. समाजाला भेडसावणाऱ्या ऐहिक प्रश्नाचीही जाण आहे अभ्युदय आणि नि.श्रेयस ही धर्माची दोन अगे आहेत याचे पुरेपूर भान या चळवळीला आहे हे त्याच्या योगेश्वर कृषि, मत्स्यगधा, वृक्षमदिर, गोरस केंद्र, लोकनाथ अमृतालयम् या प्रयोगावरून लक्षात येते. धर्मप्रेरणेशी हे प्रयोग दादांनी जोडून टाकले आहेत आणि हे प्रयोग माणसे बदलण्याचे, विषमता नष्ट करण्याचे ध्येय बाळगूनच चालविले जातात. ती देशाच्या सामाजिक-आर्थिक परिवर्तनाची केंद्रेच आहेत असे स्वाध्यायीना वाटते.

'स्वाध्यायी' कार्याची ही कहाणी मी ऐकून-वाचून होतो. अलाहाबादच्या प्रयागभूमीवर तीन दिवस झालेले देशव्यापी संमेलनही पाहिले होते. कार्याला उठाव यावा, कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने असे कार्यक्रम आयोजिले जातात. त्यामुळे हे कार्य नेमके चालते कसे ? ज्या खेड्यामध्ये हे विविध प्रयोग चालले आहेत तिथल्या स्वाध्यायींच्या प्रेरणा काय आहेत ? यामधून परिवर्तनाची-विकासाची काही दिशा सापडते का ? असे अनेक प्रश्न मनात होते. दादाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलही कुतूहल होते. हा माणूस एकीकडे प्राचीन धर्मविचाराचे, गीता, वेद, उपनिषदे याचे समर्थन करतो तर दुसऱ्या बाजूला आजच्या आधुनिक युगातले प्रश्न सोडविण्याची आकाक्षा बाळगतो, जीवनात काहीतरी 'करार', 'व्रत', 'आग्रह' असला पाहिजे असे तरुणाना सागतो, रामरक्षा नाही तर नाही रोज 'टाईम्स' वाचण्याचा 'करार' केलात तरी चालेल, असा उपदेश करतो. हा माणूस नेमक काय घडवू इच्छितो आहे, अशीही जिज्ञासा निर्माण झाली गिरगाव-चौपाटीवर झालेल्या भव्य कार्यक्रमानतर वृत्तपत्रानी शाततामय क्राती सुरू असल्याचे घोषित करून टाकले होते, पण त्या लिखाणामधूनही या प्रश्नावर प्रकाश पडण्याची अपेक्षा नव्हतीच, कारण लाख – दोन लाखाच्या गर्दीचा हिशेब करून ते लिहिलेले होते. त्यामुळे ज्या ज्या खेड्यात प्रत्यक्ष प्रयोग चालू आहेत ते पाहावेत आणि या सगळ्याचे प्रेरणास्थान असलेल्या दादाची भेट घ्यावी असे मी ठरविले.

स्वाध्याय परिवार इतका प्रचड वाढला आहे आणि प्रत्येक स्वाध्यायीला दादाना भेटण्याची इतकी आस असते की त्याची भेट होणे हे अगदीच कठीण. शनिवार, रविवार वगळता ते महाराष्ट्राबाहेरच असतात, पत्रव्यवहार आणि फोन याच्याद्वारे अक्षरश. त्याच्याकडे 'हट्टच' धरावा लागला तेव्हा त्याचा एक शनिवार मला मिळाला.

मुबईतील विमल ज्योती ट्रस्ट हे स्वाध्यायाचे प्रमुख कार्यालय. तिथे गेलो तेव्हा प्रथम तेथील कार्यकर्ते व मराठी प्रकाशन-विभागाचे प्रमुख ग. वि. जोशी याच्याशी भेट झाली. दादाचे स्वीय सचिव म्हणून अनेक वर्षे त्यानी काम केले आहे. दादाच्या सपर्कात आपण कसे आलात असे विचारले की कोणताही स्वाध्यायी बोलता होतो. हाच प्रश्न मी ग. वि. ना विचारला, तेव्हा त्यानी त्याच्या गतकालाचा थोडक्यात आलेखच डोळ्यापुढे उभा केला. ते म्हणाले, मुबईतील 'बेस्ट' मध्ये मी कामाला होतो. तेथे बरीच वर्षे कामगार-सघटनेचे नेतृत्व वगैरे केले. पण हे करीत असताना बऱ्याचदा संघटनेतील सहकाऱ्याशी माझे वाद-विवाद, भाडणे होत असत. कारण केवळ वेतनाविषयक लढे देण्याने माझे समाधान होत नव्हते. याच काळात ब्राह्मणेतर चळवळीशी माझा सबध आला. भास्करराव जाधव याच्या सहवासात असताना हिंदू सस्कृतीत शिरलेले प्रचड दोष यामुळे एकूणच या समाजाविषयी, सस्कृतीविषयी असलेला राग आणखी तीव्र झाला. नंतर काही काळ सर्वोदय चळवळीचेही आकर्षण वाटू लागले. पण तरीही आपल्या अतःकरणातल्या ध्येयवादाशी तार जुळेल असा विचार सागणारे कोणी भेटत नव्हते. दादाच्या संपर्कात मी आलो आणि माझी ही इच्छा पूर्ण झाली

जातीयतेच्या उतरडीवर अस्पृश्यतेवर व विषमतेवर असलेल्या रागामुळे हिंदू सस्कृतीवर आम्ही प्रहार करीत असू. या विषयावर दादाशी अनेकवेळा चर्चा झाल्या या चर्चांमधून धर्म-सस्कृतीविषयी दादानी किती साक्षेपाने अभ्यास केला आहे

हे जाणवले. ते आम्हाला विचारत की, 'प्रत्येक माणसात भगवत आहे असे सांगणारे वैदिक तत्त्वज्ञान अस्पृश्यता मानेल काय ?' दादांचे विचार व तळमळ पाहून मी या कार्याशी समरस झालो. ग वि. जोशींशी गप्पा सुरू असतानाच शेजारी बसलेल्या एका कार्यकर्त्याने सांगितले की, "एकदा एका गृहस्थाने दादांना कुचेष्टेने म्हटले की, 'आठवले' यांचा खाजगी सचिव 'जोशी 'च असणार तेव्हा दादा उत्तरले, "तुमच्या डोक्यात जातीची काय समीकरणे आहेत हे मला माहीत नाही. पण आधी नीट माहिती घेतली असती तर समजले असते की ग वि. जोशी हे कोळी समाजातले आहेत."

## सर्वस्य चाहं.

बरोब्बर ठरलेल्या वेळेनुसार ९-३० वाजता दादांनी बोलाविले. 'विमल ज्योती 'मधील दादांचे केबिन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच आधुनिकता आणि पारंपरिकता यांची सांगड घालणारे. भिंतीवर योगेश्वर कृष्णाची प्रतिमा, बाकीचे वातावरण मात्र एखाद्या एक्झिक्युटिव्हच्या मीटिंगसारखे. माझ्याबरोबर ७ – ८ कार्यकर्तेही या निमित्ताने दादांचे विचार ऐकायला मिळावे म्हणून आले होते. हजारो माणसे दादांच्या भोवती गोळा कशी होतात याचे रहस्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. डोळ्यात वेगळेच तेज आहे. मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, संस्कृत या भाषा आपल्या 'मातृभाषा' असल्यासारख्या ते वापरतात भारतीय तत्त्वज्ञान हा त्यांच्या खास जिव्हाळ्याचा विषय स्वाध्याय कार्याची सगळी इमारत या विचारावरच आधारलेली आहे असे दिसते. म्हणून सुरुवातीलाच दादांना मी विचारले की, **"या तत्त्वज्ञानाचे मर्म कशात आहे ? त्यातील कोणत्या विचारांनी आपल्याला एवढे प्रभावित केले ?"**

दादा म्हणाले, "आपण जगतो कसे ? आपल्या भोवतालच्या सृष्टीचे स्वरूप काय ? ती कोणी बनविली ? ज्याने ती बनविली असेल त्याचा आणि आपला संबंध काय ? तसाच या सृष्टीचा आणि आपला संबंध काय ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञानात होत असतो. प्रत्येक अणु-रेणूत चैतन्य असते हे भौतिक विज्ञानानेच सिद्ध केले असल्यामुळे सृष्टी जड आहे हा सिद्धांत चुकीचा ठरला आहे. मग हे संबंध कशा स्वरूपाचे असतात ? गीतेत भगवान सांगतात की, 'सर्वस्य चाहं हृदिसन्निविष्टः' – मी प्रत्येकाच्या हृदयात वास करतो. भारतीय तत्त्वज्ञानाने सेल्फ, नॉन सेल्फ याबरोबरच सुपरसेल्फ – उत्तमपुरुष ही कल्पना स्वीकारली आहे. आणि या उत्तम पुरुषाशी व्यक्तीचा संबंध काय याचे उत्तर त्या चैतन्याचा अंश प्रत्येक व्यक्तीमध्ये आहे असे दिले आहे. हा विचार मला अत्यंत प्रभावी वाटतो व त्यातूनच भक्तिभावना ही समाजातली एक मोठी शक्ती आहे हे तीव्रतेने जाणवले.

भक्तीच्या बैठकीतूनच नीती रुजविली पाहिजे या जाणिवेने आम्ही काम करतो."

**हे तत्त्वज्ञान घेऊन सामाजिक क्षेत्रात काम करायचे असे तुम्ही ठरविलेत, त्याचे स्वरूप काय होते ?**

समाजाला धर्मसुधारणेच्या कार्याची गरज आहे हे समोर दिसत होते, तेच 'लक्ष्य' डोळ्यासमोर ठेवून या बाबतीत काय करता येईल, याचा सतत विचार चालू होता. संस्कृतीचा संपन्न वारसा ज्या भारताला लाभला आहे त्या भारतातूनच धर्मसुधारणेची, 'माणूस' बदलण्याची चळवळ सुरू होऊ शकेल व ती जगाला मार्गदर्शक ठरू शकेल सुरुवातीला काही धर्मोपदेशक, सन्यासी यांची भेट घेतली. त्यांच्याशी बोलताना असे लक्षात आले की शुष्क कर्मकांडाचाच यांच्यावर जास्त प्रभाव आहे. या मंडळींच्या माध्यमातून धार्मिक क्रांती होणे शक्य नाही असे वाटले. खरं म्हणजे ज्यांना क्रांती हवी असते ते क्रांती करीत नाहीत असा इतिहास आहे. मार्क्स मजूर नव्हता पण मजुरांची क्रांती त्यानेच घडवून आणली, स्त्री-मुक्तीचा क्रांतिकारक विचार मांडणारा मिल स्त्री नव्हता किंवा विधवांचे प्रश्न सोडविणारे सुद्धा महर्षी कर्वे होते. म्हणून आज कुटुंबसंस्था, शिक्षण, संस्था व धर्म-परंपरा यांच्याबद्दल चिडून बोलणाऱ्या तरुणांनाच जर आपला विचार पटवून दिला तर तेच धर्मसुधारणेच्या या कार्यात हिरीरीने पडतील असे वाटले. 'स्वाध्याय' च्या कार्याची धुरा तरुणांच्याच खांद्यावर आहे

**धर्मसुधारणेच्या या कार्यात 'योगेश्वर कृषि', मत्स्यगंधा, वृक्षमंदिर, लोकनाथ अमृतालयम् यांसारखे ऐहिक जीवनाशीही निगडित असणारे प्रयोग सुरू करावे असे का वाटले ?**

आम्ही जो धर्मविचार खेड्यापाड्यांत घेऊन जात आहोत तो जीवनस्पर्शी असाच आहे. हा विचार ऐहिक जीवन आणि धार्मिक जीवन असे कप्पे मानत नाही. धर्मसुधारणा हे माणसाच्या सर्वांगीण परिवर्तनाचेच कार्य आहे मंदिरात कशाच्या तरी भीतीने किंवा काहीतरी याचना करण्यासाठी जाणारी व्यक्ती धार्मिक नसते असे आम्ही सांगतो. आमच्या प्रयोगामध्ये शेतकरी शेतीलाच मंदिर मानतो, शेतीवर काम करणारी व्यक्ती ही त्या मंदिराची पुजारी असते. वृक्षाची जोपासना करणाराही वृक्षाला मंदिर मानतो आणि

---

## पत्रकार–असेही

वृत्तपत्र ही समाजातील एक गुरुसंस्था आहे असे शास्त्रीजींचे मत आहे या संस्थेकडून त्यांना आलेला हा एक अनुभव. इंग्रजी पत्रातील एक पत्रकार गिरगावात चित्रपट पहाण्यासाठी सपत्नीक आला होता. काही कारणाने एक तास आधीच तो गिरगावात आला, हा वेळ कुठे काढायचा असा त्याच्यासमोर प्रश्न होता तो पत्नीला म्हणाला,' इथ एक 'इंटरेस्टिंग पर्सनॅलिटी' आहे, त्यांच्याकडे आपण जाऊ त्यानुसार हे दोघे पांडुरंगशास्त्रीकडे आले. कामाची घाई असूनही आपले तत्त्वज्ञान ऐकण्यात कोणीतरी स्वारस्य दाखवतो आहे हे पाहून त्यांनी वेळ काढला आणि वेद, उपनिषदे, गीता यांच्याबद्दल माहिती सांगण्यात ते रंगून गेले. परंतु पाऊणतास झाला आणि हे दोघे चुळबुळ करू लागले. ही अस्वस्थता शास्त्रीजींच्या लक्षात येईना. शेवटी अस्वस्थ होऊन त्याने पत्रकाराने सांगितले की, तुम्ही जे सांगत आहात ते फार चांगले वाटतेय पण आत्ता आम्हाला चित्रपटाला जायचे आहे आम्ही पुन्हा कधीतरी येऊ.

---

मत्स्यगधा ' (मच्छिमाराची बोट) हे सुद्धा ' तरते मंदिर 'च आहे असे शिकविले जाते. भगवान आपले शरीर चालवितो, सकाळी न चुकता आपल्याला उठवितो, शरीरातले अन्न पचवितो, त्याचे रक्तात रूपांतर करतो मग त्याचे आपण काही देणे लागत नाही का ?' हे देणे देण्यासाठीच शेतकरी आपली निपुणता एक दिवस योगेश्वराच्या चरणी अर्पण करतो. त्याचेच नाव योगेश्वर कृषि.

**पण या प्रयोगांमधून विषमता कशी घालविली जाते ? आर्थिक-सामाजिक दृष्टचा असलेला माणूस वर उचलण्याची काही तरतूद या प्रयोगांमध्ये नाही का ?**

Have not मधील अस्मिता जागृत करणे हे या प्रयोगाचे उद्दिष्ट आहे लाचारी करणार नाही अशी एकदा जाणीव निर्माण झाली की त्याची प्रगती कोणी रोखू शकत नाही असा आमचा अनुभव आहे.

विषमता नष्ट करावयाची तर सधन वर्गाकडून पैसा काढायचा, त्यासाठी कर लादायचे हा सध्याचा रूढ मार्ग. राज्यसंस्था सक्तीने कर वसूल करते. पण त्यामुळे अस्वस्थता आणि संतापच निर्माण होतो. मी माझ्या खिशातले पैसे दुसऱ्याला का म्हणून द्यायचे ? असे प्रत्येकाला वाटते, अशी माणसे शक्यतो कर चुकविण्याच्या मागे असतात. कर देणाऱ्याला दिल्याचे समाधान देण्याची व्यवस्था यात नसल्याने 'करचोरी' वाढते. दुसरा मार्ग असतो दानधर्माचा. दर ५० वर्षांनी एक संत उठतो आणि दया, परोपकार, करुणा असे शब्द उच्चारतो. शब्द वेगळे असले तरी भावना तीच. यामध्ये दान देणारा श्रेष्ठ ठरतो आणि जो ज्याला दान करतो तो कनिष्ठ–दीनदुबळा ठरतो, त्याच्यात लाचारी निर्माण होते. पण आम्ही असे सांगतो की, प्रत्येकाच्या हृदयात बसलेला 'राम' हा त्या व्यक्तीचा 'पार्टनर' आहे. त्या पार्टनरचा वाटा प्रत्येकाने दिलाच पाहिजे. शेती असो, सागर असो किंवा वृक्ष असो, या ठिकाणी श्रम करणारा काही काळ स्वेच्छेने या 'पार्टनर' साठी काम करतो. लाभाच्या अपेक्षेने केलेल्या श्रमातून निर्माण होतो तो पैसा आणि या मार्गाने जी निर्माण होते ती 'लक्ष्मी'. तिच्यावर कोणाचाच एकाचा हक्क नसतो. समाजातील Have nots ना त्याचा उपयोग होतो. ज्यामुळे त्याच्यात लाचारीची, कनिष्ठतेची भावना निर्माण होत नाही.

## एलिअेनेशन/परात्मभाव

**याच संदर्भात अनेक प्रवचनांमधून तुम्ही उच्चारलेले एक विधान मला महत्त्वपूर्ण वाटते 'मी मार्क्सवादाची उत्तरमीमांसा सांगतो आहे' हे ते विधान. ही उत्तरमीमांसा काय आहे ?**

वयाच्या २७ व्या वर्षी मी मार्क्स वाचला. कोणताही माणूस माणसाचा गुलाम असू नये हा मार्क्सचा विचार मला अतिशय आवडला म्हणून मी गुलामीची व्याख्या काय आहे हे तपासले स्वत:च्या इच्छा दुसऱ्याच्या शरीरावर लादणे म्हणजे गुलामी या व्याख्येच्या दृष्टिकोणातून पाहिले तर कुटुंबापासून राज्यसंस्थेपर्यंत सर्वत्र गुलामगिरीच आढळून येते. कामावरून दमून, कटाळून पती घरी येतो. त्याला कुठे जाण्याची इच्छा नसताना पत्नीने आपली इच्छा त्याच्यावर लादली, पण म्हणजे ती पतीची गुलामी आहे असे म्हणता येईल का ? म्हणूनच Accepted slavery आणि forced slavery असे गुलामगिरीचे दोन प्रकार मानावे लागतात. समाजातील Accepted slavery चे प्रमाण वाढवायचे आणि forced slavery कमी करायचे हीच कार्याचा दिशा असली पाहिजे. हाच फरक लक्षात न आल्यामुळे युरोपमधले संसारच्या संसार आज उद्ध्वस्त झालेले दिसताहेत.

मार्क्सचा आणखी एक मुद्दा मला महत्त्वाचा वाटला तो म्हणजे त्याने मांडलेली Alienation ची कल्पना, ज्याला मी परात्मभाव असे म्हणतो. माणूस स्वत: बनविलेल्या वस्तूपासून किंबहुना स्वत:पासून 'परका' होतो, त्याचे स्वत्वच नाहीसे होते, शोषणाचा हा सर्वांत वाईट असा परिणाम आहे. पण त्यावर उपाय सांगताना मार्क्सने केवळ आर्थिक अंगानेच मानवी जीवनाचा विचार केला त्याने सरकारकडे सगळी शक्ती दिली पण समाजातला 'माणूस' उठविला नाही. साम्यवादात व्यक्तीचे 'मूल्य' पूर्णपणे उडवून लावण्यात आले आहे. व्यक्तीला काही अक्कल नाही असे सांगून त्याची किंमत कमी करून टाकली त्यामुळेच तेथे व्यक्तीला भाषा, विचार किंवा वाणीच्या स्वातंत्र्यापैकी काहीच स्वातंत्र्य नाही. समाजालाही काही स्वातंत्र्य नाही. त्याच्या मते समाज म्हणजे कम्युनिस्ट पार्टी. सर्व सत्ता या पार्टीच्या हातात असते. म्हणून Have not मधील अस्मिता जागृत करणे महत्त्वाचे आहे असे आम्ही मानतो त्यामध्ये माणसाला एक व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा असली पाहिजे असा आग्रह आहे. समाजात मी कोणीतरी आहे अशी भावना निर्माण केली, तुझ्यात जो भगवत आहे तोच माझ्यात आहे असे म्हटले की, त्याच्यातले स्वत्व जागृत होते, हाच आमच्या दृष्टीने विकास.

मार्क्सकडे लोक आकृष्ट झाले याचे कारण तो त्यांना तत्त्वत: मान्य होता म्हणून नव्हे तर त्यात त्याचे हितसंबध गुंतलेले होते असे, खुद्द लेनिननेच एके ठिकाणी म्हटले आहे. आम्हाला अशी व्यवस्था अभिप्रेत आहे की, ज्यामध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींनी स्वबुद्धीने त्यातील तत्त्वे स्वीकारली असतील. क्रांतीतून अशी जीवनव्यवस्था प्रस्थापित झाली पाहिजे की ज्यामध्ये मन, बुद्धी व भौतिक आवश्यकता याचा सम्यक् विचार केला असेल.

**Have not चे Have मध्ये रूपांतर करणे अशी आपली अपेक्षा असते का ?**


: ही एक कविकल्पनाच आहे उदाहरणच द्यायचे तर साम्यवाद आणायचा म्हणून चौघांना १०० रु वाटले आणि मानले की साम्यवाद आला तर ते समाधान भ्रामक ठरेल. कारण मिळालेल्या पैशाचा विनियोग कसा करायचा हे प्रत्येकजण आपापल्या प्रवृत्तीनुसार ठरवेल. अंगात फारसे धाडस नसलेली व्यक्ती १०० रु. तसेच ठेवून देईल, दुसरा मात्र हे पैसे कोणत्यातरी धंद्यात गुंतवील. तिसरा कदाचित ज्ञानेश्वरी विकत घेईल आणि चौथा हे पैसे दारूत उडवून टाकील. म्हणूनच सुधारणा समतेच्या कोणत्याही प्रयत्नात मानसिक परिवर्तन अपरिहार्य ठरते

**स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही भारतीय नेत्यांनी साम्यवाद आणि भांडवलशाही या दोन पर्यायांचाच विचार केला होता आणि त्यांनी लोकशाही समाजवादाचा मार्ग स्वीकारला; परंतु याशिवाय विकासाचा कोणता मार्ग असू शकतो ?**

: ' दुसऱ्याचे संकट तीच माझी संधी ' ही भांडवलशाहीतील प्रवृत्ती असते. प्रत्येक गोष्टीत माझा फायदा काय हाच प्रत्येकाचा प्रश्न. म्हणून भांडवलशाहीत वैयक्तिक स्वार्थ शिरतो तर दुसऱ्या बाजूला समाजवादामध्ये ' संघटित स्वार्थ ' असतो. स्वातंत्र्यानंतर आपण कल्याणकारी राज्याची (Welfare state) कल्पना स्वीकारली. त्यामुळे साहजिकच कायदा व सुव्यवस्थेशिवाय आरोग्य, शिक्षण, महसूल, नागरी व्यवस्था, विकास योजना, वाहतूक हे सर्व काही, राज्याच्या अखत्यारीत आले. त्यासाठी येणाऱ्या खर्चाकरता कर लादणे अपरिहार्य ठरले. सरकारचे कार्यक्षेत्र वाढले की सत्ता व संपत्तीचे अतिरिक्त केंद्रीकरण होते आणि जेथे सत्ता, संपत्ती केंद्रित होतात तेथे राक्षसी वृत्ती तयार होणारच असे आमच्या ऋषींनी सांगितले आहे. त्यामुळे लोकशाही तत्वानुसार तुम्ही आम्ही नावाला जरी ' राजा ' असलो तरी प्रत्यक्षात ' Purchasable goods ' आहोत. सत्ता, संपत्ती आणि विद्या यांच्या अभावामुळे हा तथाकथित ' राजा ' स्वतःला दीन दुबळाच समजत असतो. अशा या सामान्य व्यक्तीत स्वाभिमान जागृत करणे हेच विकासाचे उद्दिष्ट असू शकते. ' अहं ब्रह्मास्मि ' असे सांगणाऱ्या भारतीय धर्मविचाराच्या सहाय्यानेच ते साध्य होऊ शकते.

**परिवर्तन, विकास, क्रांती या सगळ्यांच्या विरोधात धर्म उभा असतो तो समाजाला मागे खेचतो असे म्हटले जाते. तुम्ही मात्र तुमच्या परिवर्तनाच्या प्रयोगांना धर्माचेच अधिष्ठान दिले आहे. यामागे कोणता विचार आहे ?**

: धर्म घरातच ठेवा, रस्त्यावर, सार्वजनिक जीवनात आणू



' सामान्य व्यक्तीत स्वाभिमान जागृत करणे हेच विकासाचे उद्दिष्ट ' — पांडुरंगशास्त्री

नका या सध्याच्या घोषणा आहेत. यापेक्षा भोंगळ तत्त्वज्ञान दुसरे कोणते असू शकते ? प्रत्येकामध्ये भगवंत आहे असे सांगितल्यानंतर जी बंधने व्यक्ती स्वीकारते ती हे धर्मविरोधक कशाच्या आधारे निर्माण करणार आहेत ? मी लाच का खाऊ नये ? माझ्यापुरते का पाहू नये ? मी कर का भरावा ? ही उत्तरे धर्मभावनेतूनच मिळू शकतात. अमृतालयम्सारख्या प्रयोगांमधून आम्ही तीच भावना जागवतो. कायद्याची सत्ता शरीरावर चालते तर धर्माची मनावर.

सध्या अशी स्थिती आहे की, समाजवादी, राष्ट्रवादी, साम्यवादी अशा बिरुदावल्या अभिमानानेच लावल्या जातात. पण स्वतःला धार्मिक म्हणवून घ्यायला कोणी तयार नसतो. वास्तविक धर्माचे मानवी जीवनात स्थान काय याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

धर्माची शक्ती अतुलनीय आहे हे इतिहाससिद्ध आहे. युरोपात अनेक महासत्ता आल्या आणि विलय पावल्या, अनेक कायदे आले आणि गेले, राष्ट्रेच्या राष्ट्रे नकाशावरून पुसली गेली पण रोमन कॅथोलिक संस्कृतीचा प्रभाव थोडा का होईना शिल्लक आहे. भारताचाही तोच दाखला आहे. धर्मशक्ती जर अस्तित्वात आहे तर तिच्याकडे पाठ फिरवून कसे चालेल ? असे करणाऱ्यांना समाजाशी काही घेणे देणे नसते असा माझा आरोप आहे.

या धर्मविरोधकांनी माणसाचे भावजीवनच नष्ट करून टाकले आहे. अर्थात अशी स्थिती येण्याचे कारण धर्माने बुद्धिवादाशी घटस्फोट घेतला हे आहे. बुद्धिवाद पुन्हा प्रस्थापित करून धर्म शुद्ध स्वरूपात उभा केला की, या सर्व अर्थकारण आणि राजकारणवाल्यांना (डावे, समाजवादी आदींना दादा अर्थकारण आणि राजकारणवाले असे म्हणतात.) धर्माकडे वळावेच लागेल यात मला काहीच शंका वाटत नाही.

## भुईगावमधील योगेश्वरकृषी

जवळजवळ तासभर झालेल्या या मुलाखतीत दादांनी ' स्वाध्याय 'च्या कार्याची भूमिका विस्ताराने विशद केली. या मुलाखतीमुळे माझे पुढचे काम फारच सोपे झाले होते. मुंबईच्या जवळपास सुरू असलेले स्वाध्यायचे प्रयोग पाहाण्याच्या दृष्टीने तेथील कार्यकर्त्यांनी सर्व ते सहकार्य देऊ केले. कारण दादांशी बोलल्याचे ' अॅडेड क्वालिफिकेशन 'च जणू मला मिळाले होते. एक ज्येष्ठ स्वाध्यायी स. बा. जोशी यांच्याबरोबर नाला सोपारा भागात जायचे ठरले. स. बा. जोशी मालेगावमध्ये ब्रुक बाँड कंपनीत नोकरीस होते. परंतु मुदतीपूर्वी ३ वर्षे आधीच त्यांनी ' स्वेच्छा निवृत्ती ' पत्करली आणि ' स्वाध्याय 'च्या पूर्ण वेळ कामाची जबाबदारी स्वीकारली.

विरारच्या अलीकडे नाला सोपारा हे मुंबईचे उपनगरीय रेल्वे स्थानक लागते. नाला आणि सोपारा ही दोन गावे मिळून हे नाव देण्यात आले आहे. स्टेशनवर उतरून मोटारसायकलने प्रथम आम्ही भुईगावकडे निघालो. हा सगळा पश्चिम किनाऱ्यालगतचा भाग असल्याने भरपूर नारळाची झाडे डोळे सुखावतात. एकंदर परिसर

मुंबईचा बकालपणा विसरायला लावणारा असा आहे उपनगरीय रेल्वेचे स्टेशन सोडले तर या भागात 'मुंबईपण' असे काही नाही, सारे खेडेगावासारखे वातावरण. भुईगावमध्ये शिरतानाच वाटेत 'क्रॉस' धारण करणाऱ्या इमारती दिसू लागतात, या कॉन्व्हेंट शाळा पाहिल्यानंतर मिशनऱ्यांच्या कार्याची थोडीफार कल्पना येते. आणखी थोडे पुढे गेल्यावर बैठी घरे लागतात. काही घरावरही येशू ख्रिस्ताचे फोटो लावलेले. जसजशी लोकवस्ती दाट होत जाते तसतसे घराघरात योगेश्वर कृष्णाच्या प्रतिमा नजरेत भरतात आणि स्वाध्यायी या गावात पोहोचल्याची खूण पटते.

'भक्तीफेरी'च्या माध्यमातून, इतर कार्यक्रमाच्या निमित्ताने स. वा. जोशींनी या गावात 'स्वाध्याय'चे बरेच काम केले असल्याने रस्त्यात दर दहा पावलाच्या अंतरावर त्यांना 'जय योगेश्वर'ची हाळी मिळते आणि तेही तेवढ्याच उत्साहाने त्याला प्रतिसाद देतात. काही वेळाने एका घरापाशी आम्ही थांबलो आणि बरेच गावकरी आमच्याभोवती गोळा झाले. "पुण्याहून 'स्वाध्याय' ची माहिती घेण्यासाठी हे आले आहेत, आज सकाळीच दादाची ते भेट घेऊन आले." अशी जोशींनी माझी ओळख करून दिल्यावर सगळ्यानाच फार आनंद झाला. पंढरपूरहून आलेल्या एखाद्या नास्तिकाकडेही आदराने, भक्तिभावाने पाहिले जाते, माझेही तसेच काहीसे झाले.

दादाचे कार्य या गावात सुरू झाल्यानंतर कोणते प्रश्न सुटले, नेमके परिवर्तन काय झाले ही उत्सुकता होती म्हणून गावात सुरू असलेल्या योगेश्वर कृषि किंवा भावकृषीच्या शेतीच्या ठिकाणी जायची इच्छा मी प्रदर्शित केली आणि सगळेच उत्साहाने या शेतीकडे आमच्याबरोबर निघाले. वस्तीपासून साधारण दीड कि मी. अंतरावर ही शेती आहे. जाताना लागणाऱ्या वाटेवर जणू नारळाचे आच्छादन घातलेले. मध्येच थोडेसे माळरान, पुन्हा नारळाची सावली आणि अशी आमची पदयात्रा चालू असताना माझ्याबरोबर आलेली तरुण शेतकरी पोरे अखंड दादाचे गुणवर्णन करण्यात रंगून गेली होती. मी त्यांना पुन्हापुन्हा गावातल्या योगेश्वर कृषीच्या प्रयोगाकडे वळवीत होतो. सगळी माहिती सांगण्यात त्यांच्यामधील मोहन पुढाकार घेत होता. 'स्वाध्याय'चा या गावात प्रवेश कसा झाला? असे मी त्याला विचारले तेव्हा तो म्हणाला, 'मुंबईहून भक्तीफेरीसाठी सातत्याने ३ वर्षे लोक येत होते. आम्ही फक्त भेटायला आलो आहोत असे ते सांगत असत. गीतेचे श्लोक शिकवत. हे लोक सातत्याने, कोणतीही अपेक्षा न ठेवता एवढ्या लांब आपल्या गावात येतात याचा हळूहळू परिणाम जाणवू लागला, लोक 'स्वाध्याय'कडे आकृष्ट होऊ लागले. स्वाध्याय केंद्रात जमून एकत्रितरीत्या गीतेचे अध्याय आणि श्लोक म्हणण्यात लोकाना गोडी वाटू लागली या केंद्रात सगळे गावकरी बैठकीवर एकत्र येतात-बोलतात आणि हाच एक 'स्वाध्याय' आहे असे दादा म्हणतात.

गावाची लोकसंख्या किती? असे विचारले तेव्हा तो म्हणाला, 'अंदाजे ५ हजार लोकवस्ती आहे. त्यापैकी २ हजार ख्रिश्चन धर्मीय आहेत. बाकी सगळे हिंदू आहेत. त्यामध्ये आदिवासींची १०० कुटुंबे आहेत.' मोहनने दिलेले हे उत्तर ऐकून मला आश्चर्य वाटले. कारण आपल्याकडे विभागणी सांगण्याची पद्धत किती मराठा, किती ब्राह्मण, किती दलित वगैरे अशी असते. अगदी शहरात सुशिक्षितांच्या वस्तीतही घरच्या गप्पांमध्ये केली जाणारी 'जनगणना' अशाच प्रकारची असते. मग एवढ्याशा छोट्या खेडेगावात गावाची विभागणी सांगताना मोहन सहजपणे सगळ्यानाच एका नावाने ओळखतो हा केवळ योगायोग नव्हता. चार-पाच वर्षे स्वाध्यायींनी गावात निर्माण केलेल्या वातावरणाचा तो परिणाम आहे. पण या गोष्टीचे आश्चर्य वाटले याचे आणखी एक कारण म्हणजे दादा आपल्या प्रवचनामधून नेहमी वैदिक तत्त्वज्ञान आणि भारतीय परंपरा हे शब्द वापरतात. सर्वधर्मस्वीकार वाद ही दादांनी दिलेली नवी संकल्पना आहे त्यानुसार येशू ख्रिस्ताला ११ वा अवतार मानण्यात येते. पण शेवटी कोणत्याही वैश्विक स्वरुपाच्या कार्याला सुद्धा स्थानिक समाजकारण-राजकारण याची चौकट पडतेच. मिशनरी ज्या धर्मप्रसाराच्या हेतूने येथे काम करीत आहेत तो हेतूच या विलिनीकरण प्रक्रियेमध्ये नष्ट होतो हे उघड आहे. त्यामुळे सध्या तरी गावात ही विभागणी राहणे अटळ आहे हे जाणवले फार तर त्याला 'स्वाध्यायी-बिगर स्वाध्यायी' असे नाव देता येईल.

ही चर्चा चालू असतानाच एका शेतजमिनीपाशी आम्ही थांबलो. इथली शेती होती योगेश्वर कृषि प्रयोगाची. स्वाध्यायी भूमिपुत्रांच्या दृष्टीने ते मंदिरच होते; आणि माझ्याबरोबर आलेले सगळे पुजारी. त्यापैकी एकाने एक फाईलच काढून दाखविली. त्यावर २०० पुजाऱ्यांची नावे लिहिलेली होती. म्हात्रे, नाईक, जोशी, वझे, वावरे ही कुटुंबे या शेतीवर काम करतात. दहा-दहा जणांचा एक गट याप्रमाणे कामाची वाटणी करण्यात येते. आणि या आधुनिक मंदिरातील फावडी, नांगर, बैलगाडी ही सगळी पूजेची साधने या शेतकऱ्यांनीच खरेदी केलेली. आपापल्या ठरलेल्या दिवशी प्रत्येक पुजाऱ्याने त्या दिवसापुरते आपले श्रम प्रभूच्या चरणी अर्पण करायचे. दर २० दिवसानी एका गटाला या पूजेची संधी मिळते. शेती म्हणजे मंदिर, शेतकरी म्हणजे पुजारी ही काय भानगड आहे? यातून नेमके काय अभिप्रेत आहे? असे प्रश्न मनात आले. योगेश्वर कृषीच्या या प्रयोगामध्ये दादाचा असलेला विचार या स्वाध्यायींनी सांगितला तो असा की, शिक्षण, संस्कार आणि अनुभवाने प्रत्येक व्यक्ती आपापल्या क्षेत्रात काही ना काही निपुणता प्राप्त करीत असते. उदाहरणार्थ शेतकरी शेतीवर काम करतो व या कामातच त्याची निपुणता असते आणि त्याच्या चरितार्थाचे साधनही तेच असते. दादाचे म्हणणे असे की, शेतकऱ्याच्या चरितार्थाचे जे शेती हे साधन आहे तेच त्याच्या विकासाचे, मुक्तीचे साधन बनू शकते. आपले कला-कौशल्य भगवंताच्या चरणी अर्पण करणे हीच खरी भक्ती, म्हणून प्रत्येकाच्या नावाची जशी शेती असते तशी 'गावाची' शेती असावी.

अशा शेतीतून मिळालेले उत्पन्न कोणा एका व्यक्तीचे नसते, तसेच ही सहकारी शेतीही नाही, कारण सहकारी शेतीत सामील होणाऱ्या प्रत्येकाचा स्वार्थ त्यात अंतर्भूत असतो. याला श्रमदान असेही म्हणता येणार नाही या कामाला श्रमभक्ती असेच म्हटले जाते.

यातून जे उत्पन्न तयार होते आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्यांना प्रसाद म्हणून वाटण्यात येते. 'भक्तीतून दुर्बळाला सबळ बनविणे'

हे योगेश्वर कृषीचे तत्त्व आहे.

योगेश्वर कृषीचा गावाला लाभ काय झाला असे विचारले तेव्हा एकाने अगदी ' अनुभवाचे बोल ' सांगितले. तो म्हणाला, दादांच्या या नव्या कार्यामुळे जर काही झाले असेल तर ते हे की गावकरी एकमेकांच्या अधिक जवळ आले आहेत. कित्येक प्रश्न असे असतात की जे एकमेकांविषयी मनात अढी असल्यामुळे तसेच राहतात. 'स्वाध्याय' मुळे प्रश्न संपतात असे नाही पण आपले म्हणणे मोकळेपणाने दुसऱ्याला सांगण्याची संधी मिळते.

इथल्या शेतकऱ्यांना भेडसावणारा मुख्य प्रश्न म्हणजे शेतमजूर मिळण्याचा. हा प्रश्न निर्माण होण्याचे कारण म्हणजे बिल्डर मंडळीचे डोळे या भागावर खिळून राहिले आहेत. इमारतींशिवाय राहणारी पोकळी ताबडतोब भरून काढायची असा चंगच या मंडळींनी बांधला आहे. परिणामतः सगळे शेतमजूर या इमारतींच्या बांधकामावर जातात. परंतु योगेश्वर कृषि सुरू झाल्यानंतर बऱ्याच प्रमाणात ही समस्या सुटली. एकतर या प्रयोगामध्ये एकत्र काम करण्याऱ्या पुजाऱ्यांनी असे ठरविले की एकमेकांच्या शेतावर आळीपाळीने काम करायचे आणि दुसरे म्हणजे भूमिहीन असा जो आदिवासी शेतमजूर आहे तोही आता या प्रयोगात सामील होऊ लागला आहे.

खरं म्हणजे आर्थिक दृष्टया गावातील सर्वात दुर्बल घटक हा आदिवासीच आहे. दारिद्र्याचे चटके जर कोणाला बसत असतील तर ते यांनाच. कारण गावात त्यांची स्वतःची अशी जमीन नाही. योगेश्वर कृषि प्रयोगात त्याला जमीन देण्याची आणि त्याचे 'झटपट' पुनर्वसन करण्याची तरतूद नाही हे खरे, पण गावाशी सांस्कृतिकदृष्टया तो एकरूप होतो आहे, दादांविषयी अपार निष्ठा त्याच्या मनात आहे. पोटासाठी मजुरी करणारा आदिवासी हा एक दिवस आपले श्रम या 'योगेश्वर कृषि' मंदिराच्या चरणी वाहतो आहे आणि संकटकाळी हे मंदिरच त्याच्या पाठीशी उभे राहते. तो जमीनमालक होऊ शकत नाही पण त्याचे आता कोणी शोषणही करू शकत नाही.

ब्रह्मेश्वरी पाडा आणि सोळेश्वरी पाडा या दुर्गम भागातील आदिवासींच्या गावातही स्वाध्यायी पोहोचले आहेत. शरद पाठारे हा कार्यकर्ता सांगत होता की, त्या भागातील बाबू भोर हा २०–२२ वर्षांचा आदिवासी तरुण स्वाध्याय केंद्र चालवितो. कोणत्याही प्रकारचे औपचारिक शिक्षण त्याच्याकडे नाही. बी. एस्सी., एम. एस्सी. झालेल्या सुशिक्षितांपासून गावातल्या सामान्य खेडुतांपर्यंत सगळ्या थरातले श्रोते समोर बसलेले, आणि हा बाबू भोर त्यांच्यापुढे भारतीय तत्त्वज्ञानावर प्रवचन करतो, आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठी गीतेतील, उपनिषदातील उदाहरणे सांगतो, धर्म म्हणजे काय? या प्रश्नाचे विवेचन करतो. दादांनी विकासाच्या सगळ्या संकल्पनाच बदलून टाकल्या आहेत.

### मुक्काम अर्नाळा

भुईगावकरांना 'जय योगेश्वर' असा निरोप देऊन आम्ही थेट समुद्र किनाऱ्याला लागून असलेल्या 'अर्नाळा' गावाकडे निघालो. गावापासून थोडे अंतर बाहेर पडले की पुन्हा दाट झाडीतून वाट काढत जाणारे अरुंद डांबरी रस्ते लागतात. असाच एक सरळ रस्ता पकडून आम्ही 'अर्नाळा' गावापाशी येऊन थांबलो. मच्छिमार, कोळी यांच्या वस्तीचे हे गाव. तेथील काही लोकांकडे आम्ही चौकशी केली. पाडुरंगभाऊ मंगेला कोठे राहातात?' तेव्हा त्यांनी विचारले 'स्वाध्यायी पांडुरंगभाऊ ना?' आम्ही 'हो' म्हटले तेव्हा त्यांनी सरळ जाण्यास सांगितले. सगळी घरे दाटीवाटीने बसलेली, त्यामधून वाट काढत पुढे जायचे म्हणजे जणू प्रत्येक घराचा उंबरठा ओलाडूनच पुढे जायचे. मच्छीचा उग्र वास थोड्याच वेळात सवयीचा होतो. संपन्नता नाही पण दारिद्र्यही नाही असे एकंदर चित्र. स्वस्तिक, ओम् यासारखी संस्कृतीची चिन्हे ही घरे अभिमानाने मिरवताहेत हेही दिसते.

हे वातावरण निर्माण करण्याचे श्रेय पांडुरंगभाऊ मंगेला (उडवादकर) यांच्याकडे जाते. या सगळ्याचे उगमस्थान त्यांच्या घरातच असल्याने त्यांच्याच तोंडून ही सगळी कथा ऐकण्याची इच्छा होती. सुदैवाने ते घरी भेटले, ओळखपाळख झाल्यावर आम्हाला ते समुद्रावरच घेऊन गेले. 'स्वाध्याय' या गावात कसा पोहोचला हे सांगताना दादांविषयी अपार प्रेम व निष्ठा त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. ते सांगत होते – साधारण १५ वर्षांपूर्वी आमच्या घरातच घडलेला प्रसंग आहे. माझी पत्नी दीव-दमण भागात काही दिवस जाऊन आली होती. तिथला दादांचा एक कार्यक्रम तिने पाहिला, ऐकला आणि ती भारावून गेली. तेथून आल्यानंतर श्लोक म्हणण्याचीही गोडी तिला लागली होती. दादांच्या विचारांचे माझ्याजवळ खूप वर्णन केले. पण मी तिला समजावले की, असले


॥ तेज-शक्तीची जेथ प्रचीती
गाऊ तयाची आज आरती ॥



● ११.२० लाख कृषि पंपांना वीज पुरवठा करून मंडळ देशात अग्रेसर.
● ३४५१७ गावांचे विद्युतीकरण पूर्ण.
● ९८.५७ टक्के जनतेला विजेचा लाभ
● दुष्काळावर मात करण्यासाठी एकूण २०,००० पिण्याच्या पाण्याच्या योजनांना विक्रमी वीज पुरवठा.
● विद्युत निर्मितीबाबत मानाच्या राष्ट्रीय पातळीवरील पारितोषिके प्राप्त.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

R.A. Advtg.

गुरू किंवा बुवा समाजात जिकडे तिकडे दिसतात. ज्याना काही उद्योग नसतो ते त्याच्या नादी लागतात पण तरी तिच्या हट्टापायी मुंबईतील दादाच्या एका कार्यक्रमाला मी गेलो. धर्म आणि संस्कृती याच्याबद्दल तासभर दादानी जे सांगितले ते ऐकल्यानतर माझे सगळे गैरसमज दूर झाले.

आम्ही दोघांनी 'स्वाध्याय' चा विचार मच्छिमाराच्या घराघरात पोहोचविण्याचा खूप प्रयत्न केला. तिसरी शिकलेली माझी पत्नी गीतेचा १५ – १६ वा अध्याय पाठ करून इतराना शिकविण्याचा प्रयत्न करीत होती. परतु लोक काही उत्साहाने या कामात येत नव्हते श्लोक वगैरे हे प्रकार लहान मुलासाठी आहेत असे समजून मोठी माणसे त्याकडे दुर्लक्षच करायची शेवटी खेळासाठी दर आठवड्याला एकत्र जमणाऱ्या इथल्या तरुणाच्या 'ग्रूप' मध्ये मी सामील झालो खेळाच्या पलीकडे त्याच्या कधी गप्पा होत नसत. मी 'स्वाध्याय' चा विषय त्याच्याजवळ वारवार काढीत असे. याचा एक परिणाम असा झाला की गावात याविषयी चर्चा सुरू झाली. मग आम्ही या 'ग्रूप' साठी एक स्वतत्र बोट बाधायचे ठरविले. बोट बाधण्याच्या कामाच्या निमित्ताने अनेक मच्छिमार एकत्र आले आणि त्याचा आम्हाला खूपच फायदा झाला. या बोटीची जेव्हा दादाना माहिती दिली तेव्हा त्याना एक अतिशय चागली कल्पना स्फुरली. 'सर्व मच्छिमारासाठी अशीच स्वतत्र बोट बाधायची. जिच्याकडे सगळे मच्छिमार 'तरते मदिर' म्हणून पाहातील. या बोटीवर सगळे 'भक्ती' भावाने काम करतील पण ही बोट कुणाचीच नसेल.' असे दादानी सागितल्यावर आम्ही आणखी एक बोट बाधली दादाच्या या अभिनव कल्पनेतून 'मत्स्यगधा' अवतरली. मत्स्यगधेतून येणारे उत्पन्न समाजासाठी वापरायचे असे ठरले. एकावर आलेले सकट हे गावावर – स्वाध्याय परिवारावर – आलेले सकट आहे अशी भावना 'मत्स्यगधे'मुळे निर्माण झाली.

याच ओघात पाडुरंगभाऊ बरेच काही सागत होते. मत्स्यगधेने गावाला काय दिले ? असे मी विचारले तेव्हा त्यानी दिलेले उत्तर मार्मिक होते. ते म्हणाले की, "कुटुबातलं सुख म्हणजे काय हे मच्छिमाराना समजले, ते स्वाध्याय आणि मत्स्यगधेमुळे. दिवसभर समुद्रावर मच्छिमारी करून आल्यावर रात्री दारू प्यायची, शिव्या द्यायच्या, बायकाना मारायचे हा इथला दिनक्रमाचाच एक भाग होता; तोच मच्छिमार आज घरी आल्यावर गीतेचे श्लोक म्हणतो, एकटा नव्हे तर सगळेजण एकत्र बसून म्हणतात. या एकत्र बसण्यात, एकमेकाची सुखदुःखे ऐकण्यात घराला 'घर' पण येते हे त्याला समजले आहे."

जस कुटुबाच चित्र बदललं तस समाजाचंही. जुनाट रूढी, मानापानाच्या कल्पना, खोट्या प्रतिष्ठेपायी कर्ज काढून प्रचड पैसा खर्च करण्याची प्रवृत्ती, यामुळे लग्न हा येथे एक डोकेदुखीचाच विषय असतो. ही जी जुनाट तत्त्वे धर्म म्हणून लोक स्वीकारतात, त्यातील फोलपण या मच्छिमाराना दाखवून दिले जातेच पण 'मत्स्यगधे'च्या उत्पन्नातून आम्ही अनेक 'सामूहिक विवाह' घडवून आणले. आता तर धर्माविषयी इतकी ओढ लोकामध्ये निर्माण झाली आहे की शुद्ध सस्कृत वाणी बोलण्याचा प्रयत्न घरोघर होऊ लागला आहे."

पाडुरगभाऊ मगेला, महादेवभाऊ मगेला यानी या भागात स्वाध्यायासाठी केलेले काम खरोखरच 'अफाट' म्हणावे असे आहे. चार-चार वर्षे प्रयत्न करावे तेव्हा कोठे लोक विचार स्वीकारायला, आचरणात आणायला तयार होतात पण न कटाळता अशा भक्तीफेऱ्या काढून नाला सोपाऱ्यापासून विरार-डहाणूपर्यंत हा विचार त्यानी पोहोचविला. नाला सोपारा भागात १४५ गावे स्वाध्यायी बनली ती अशा परिश्रमामुळेच.

डहाणू, गोवा, दीव, दमण, पोरबदर, ओरखा हे सगळे समुद्रकिनारे मत्स्यगधेने व्यापून टाकले आहेत. मच्छिमाराचे नाते दादानी थेट व्यास-वाल्मिकीपर्यंत नेऊन भिडविले आहे दादा जेव्हा असं काही सागतात तेव्हा त्याची छाती अभिमानाने फुगते. व्यास-वाल्मिकीनी महान जीवनदर्शी ग्रंथ लिहिले, आता पुन्हा एकदा माणूस दिशाहीन झालाय तेव्हा नवा धर्मविचार तुम्हीच समाजाला द्यायचा आहे असे दादानी वारवार या लोकाना सागितले आहे पोरबंदर किनाऱ्यावरील माखा आणि खेर या मच्छिमाराच्या दोन जमातीमध्ये पिढ्यान्-पिढ्या चालत असलेले वैर, त्यापायी एकमेकाचे खून आणि त्यातून निर्माण झालेले सूडचक्र हे सगळे दादानीच थाबविले. पोरबदर किनाऱ्यावर वाढलेली तस्करी हा गुजरात सरकारच्या डोकेदुखीचा विषय झाला होता पण सतत ४ वर्षे भक्तीफेरीसाठी गेलेल्या स्वाध्यायीनी या किनाऱ्याचा चेहेरामोहराच बदलून टाकला.

गुजरात, महाराष्ट्र, सौराष्ट्र, दीव, दमण, गोवा येथील कोळी, *खारवा, माछी, मागेला, मितना, वैती, बारी आणि आगरी या जातीच्या* मच्छिमाराच्या सास्कृतिक मीलनाचा एक भव्य कार्यक्रम १५ ऑगस्ट ८१ ला मुबईत चौपाटीवर झाला. त्याला १ लाख सागरपुत्र उपस्थित होते. मत्स्यगधेद्वारे या समाजाच्या सास्कृतिक-सामाजिक पुनर्घटनेची सुरुवात दादानी केली आहे.

## गिरगावातील गगोत्री

मत्स्यगधा आणि योगेश्वर कृषीचे हे प्रयोग पाहिल्यानतर साधारण रात्रीचे ८.३० वाजले होते पण मला अगदी 'स्वाध्यायमय' बनविण्याचेच जणू काही जोशीबुवांनी ठरविले होते. मुक्काम पाडा या आणखी एका गावात त्यानी नेले. तेथे श्रमभक्तीने गावकऱ्यानी पर्णकुटी मदिर बाधले आहे. या मदिरात सगळे गावकरी सकाळी आणि रात्री एकत्र येतात आणि श्लोक म्हणतात, अनुभवाची देवाण-घेवाण करतात. त्यामध्ये सहभागी होण्याची सधी आम्ही साधली. हे एकेक प्रयोग पाहत असताना सारखी त्यामागची दादाची दृष्टी दिसते. समाजमनाचा केवढा सूक्ष्म अभ्यास या माणसाने केला असेल असे वाटून जाते

या सगळ्या कार्याच्या मागे जे भक्कम वैचारिक अधिष्ठान आहे त्याचे केंद्र म्हणजे गिरगावातील माधवबाग. स्वाध्याय कार्यकर्त्यांसाठी ते एक power station आहे असे विनोदाने म्हटले जाते तर काहीजण याला स्वाध्याय कार्याची 'गंगोत्री' असेही म्हणतात. त्यामुळे माधवबागेतील रविवारी होणारे प्रवचन ऐकायचे ठरविले

सकाळी ९.३० ला हे प्रवचन सुरू होते त्यामुळ नाला सोपारा, विरार, डहाणू, दुसऱ्या बाजूला ठाणे, भिवंडी, कर्जत, कल्याण येथून सकाळी ६ ते ७ च्या दरम्यान लोक गिरगावकडे निघतात. पुन्हा लोकलमध्ये 'अनौपचारिक स्वाध्याय केंद्रेच' सुरू होतात. वर्तमानपत्रे, सोनेरी-चंदेरी मासिके याच्या गर्दीत एखादा 'तत्त्वज्ञान' वाला डब्यात हमखास आढळतो. आम्हालाही 'प्रमोदभाई' हा गुजराती तरुण भेटलाच. तत्वज्ञान विद्यापीठातून २ वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून आता तो 'चिंतनिका' देतो, नोकरी साभाळून इतर वेळ तो हे काम करतो. माझी ओळख झाल्यावर बोलता बोलता त्याने दीड तासाच्या प्रवासात आम्हालाही एक 'चिंतनिका' दिली. तो म्हणाला," आत्ता-पर्यंतच्या विचारवंतानी 'काय करा' हे सागितले पण दादा ही एकमेव अशी व्यक्ती की जिने 'कसे करा' हे शिकविले. मला त्याने कांट, प्लेटो, ॲरिस्टॉटल, मार्क्स, शकराचार्य, वल्लभाचार्य असे दूरवर हिंडवून आणले. तो म्हणाला, पाश्चात्य तत्त्वज्ञान सरळ, साधे प्रश्न उपस्थित करते आणि त्याची सरळ साधी उत्तरे देते पण भारतीय तत्वज्ञानाला 'दर्शन' असे म्हणतात समग्र जीवनाचा विचार यामध्ये होतो आणि दादानी नेमका तोच विचार उचलला आहे "

या छोटया 'चिंतनिके' मुळे माधवबागेतील प्रवचनाबद्दल आणखीनच उत्सुकता वाढली. पावणेनऊ वाजता आम्ही माधवबागेत पोहोचलो. त्यावेळी हॉल जवळजवळ पूर्ण भरत आला होता, म्हणजे पाऊणतास हा जनसमुदाय दादाची वाट पाहाणार होता. नऊच्या पुढे जे येतात त्याना हॉलच्या बाहेर बसून क्लोज सर्किट टीव्हीवर दिसणारे दादा पाहून समाधान मानावे लागते.

वेदातल्या एकेका श्लोकावर दादा प्रवचन देतात. दर महिन्याला या प्रवचनाचे 'तत्त्वज्ञान' हे मासिक छापून ते जगभरच्या स्वाध्यायीं-पर्यंत पोहोचवले जाते. साडेनऊ वाजता दादा बैठकीवर आसनस्थ झाले आणि अक्षरश. तासभर जणू ग्रथातील विचाराशी त्याची जुगलबदीच चालली होती. प्रवचन ऐकताना पुन्हापुन्हा गायनाच्या मैफलीची आठवण येत होती. वेदातील विचारावर भाष्य करताना कधी त्याला पुरक तर कधी समातर अशी माडणी ते करत होते, एखादा वादकाने गायकाला साथ द्यावी तशी वेदातील एका श्लोकाची एक ओळ घेतली की त्याच्या खोलात शिरून, त्यातल्या विविध अर्थछटा सागत सागत विविध उदाहरणे देत विषयाच्या खोलात अवगाहन करून पुन्हा ते समेवर येतात तेव्हा काहीतरी आपल्याला मिळाले असल्याचा श्रोत्याला आनंद होतो, आणि दादानी नव्या श्लोकाला सुरुवातही केलेली असते.

त्या दिवसाचा त्यांचा प्रतिपाद्य विषय होता 'अहकार'. 'इगो' किंवा अहंकार हे वास्तव आहे पण तो वस्तुनिष्ठ असला तर आपल्यावरच स्वार होतो. अहकार पूर्णपणे टाळता येत नाही. तो कपडयासारखा वापरावा लागतो. पाहिजे तेव्हा घालायचा आणि नको तेव्हा काढून बाजूला ठेवायचा पण हा आशय सुद्धा रूक्षपणे नाही तर गायकाच्या तल्लीनतेने तो सागतात. सारे शरीर जणू हा आशय समोरच्यापर्यंत सक्रमित करण्याच्या पवित्र्यात असते. प्रत्येकाला वाटते दादा फक्त आपल्याशीच बोलताहेत. हा प्रभावी सवाद अनुभवल्यानतर दूरदर्शनवरील रामायणाचा मोह टाळून ५-६ हजार स्वाध्यायी इतक्या दूर हे प्रवचन ऐकायला का येत असावेत हे समजले त्याना तरी रविवारचा हा गिरगावातील 'आनदोत्सव' वाटतो.

प्रवचन सपल्यानंतर एक परदेशी व्यक्ती दादाना म्हणाली की, प्रवचन फार आनददायी वाटले परतु ते संपल्यानतर हॉलमध्ये हजारो लोकाचा जो गलका होतो तो शेअर बाजारातील गोंगाटासारखा वाटतो. तेव्हा दादानी त्याला उत्तर दिले, 'स्वाध्यायचे खरे कार्य या प्रवचनानंतरच सुरू होते...'

□

दादा केवळ 'प्रवचनकार शास्त्री' नाहीत तर आधुनिक इतिहास विचार जाणणारे, आजच्या प्रश्नाचे विश्लेषण करणारे 'विचारवंतही' आहेत. पण तेवढयानेही त्याचे वर्णन पूर्ण होत नाही, कारण ते कृतिशूर समाजसुधारकही आहेत तसे नसते तर माणसाच्या ऐहिक जीवनाला भिडणारी योगेश्वर कृषि, लोकनाथ अमृतालयम्, गोरस केंद्र, वृक्षमदिर, मत्स्यगधा, तत्त्वज्ञान विद्यापीठ यासारखी कार्ये त्यानी उभी केली नसती. मच्छिमाराना एकत्र आणण्याचा खटाटोप केला नसता किंवा महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्ताकडे मदत घेऊन धावूनही ते गेले नसते.

शास्त्रीजी ज्याना भूमिपुत्र आणि सागरपुत्र म्हणतात त्या शेतकरी आणि मच्छिमारावर त्यानी केलेले योगेश्वर कृषि आणि मत्स्यगंधा हे प्रयोग पाहण्याची सधी मला मिळाली. त्याचा विचार स्वाध्यायी कसा स्वीकारतात, आचरणात आणतात हे पाहायला मिळावे या भूमिकेतूनच मी तेथे गेलो होतो मला असे दिसले की धर्मकारण-अर्थकारण हातात हात घालून जातात असे वैचारिक पातळीवर मानले तरी प्रत्यक्षात या प्रयोगामध्ये धर्मकारणाच्या बाबतीत क्रातिकारक बदल जाणवतात तर अर्थकारणाच्या बाबतीत उत्क्रातीची प्रक्रिया आहे.

## चैतन्याचा पुरावा

सौराष्ट्रातील एका लहानशा खेडयातील प्रसंग. काही परदेशी लोक येथील वृक्षमदिराचा प्रयोग पाहण्यास आले होते. गावकऱ्याना वेगवेगळे प्रश्न विचारून माहिती घेत होते या वृक्षमदिराचा एक 'पुजारी' साधा अशिक्षित खेडूत. दादाच्या शिकवणीप्रमाणे भक्ती-भावाने झाडाचे सगोपन, सवर्धन करणारा. पाहुण्यापैकी एकाने या खेडुताला विचारले, " या झाडात चैतन्य आहे असे तुम्ही म्हणता. पण त्याला पुरावा काय ? ते तर झाडासारखे झाड आहे." सभोवताली जमलेल्या सगळयानाच असे वाटले की, 'दादा आम्हाला सागतात ते आम्ही ऐकतो' असे काहीतरी उत्तर तो देईल. पण क्षणाचाही विलब न लावता त्याने पाहुण्यालाच प्रश्न केला-" ढगातले वरचे पाणी कोठे जाते ?", पाहुणा उत्तरला, " पाणी नेहेमी वरून खाली येते. गुरुत्वा-कर्षणाचाच तो नियम आहे "

" मग जमिनीतले पाणी झाड वरती-वरती कसे शोषून घेते ? त्यामध्ये चैतन्य असल्याशिवाय हे घडते का ? "

त्या प्रश्नावर मात्र तो पाहुणा काही बोलला नाही.

कोणत्याही खेड्यात गेले की पहिल्या प्रथम दिसतात ते उभे-आडवे सामाजिक भेद, जाती-प्रांत-भाषावार विभागण्या. एखाद्या समूहाला कामाला लावायचे तर सगळ्यांना एकत्र आणण्यामध्येच सगळा उत्साह मावळण्याची भीती असते. स्वाध्यायींनी अगदी कमी कालावधीत हे सामाजिक भेद धार्मिक प्रबोधनाच्या मार्गाने नष्ट केले आहेत पोरबंदर किनाऱ्यावरील खारवा व मेर या जातीमधले पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले वैर, सूड व खुनाचे दुष्टचक्र थांबविण्याचा चमत्कार स्वाध्यायींनी केवळ चार वर्षांत करून दाखविला. अंधश्रद्धा, जातिव्यवस्था यामुळे असाध्य वाटणाऱ्या सामाजिक रोगावर स्वाध्यायींनी मात केली आहे. आर्थिक पातळीवर हा बदल त्यामानाने सावकाश पण निश्चितपणे होतो आहे. भुईगाव मधील आदिवासी 'शेतमजूर' योगेश्वर कृषीच्या शेतीवर 'शेतकरी' होतो. सामूहिक श्रमाने निर्माण झालेल्या उत्पन्नाचा लाभ त्याच्या विकासाला गती देतो; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तो आता स्वत:ला हलका समजत नाही.

या मानसिक परिवर्तनालाच 'स्वाध्याय' मध्ये अग्रक्रम आहे. विकासाच्या दृष्टीने अनुकूल मनोभूमिका तयार करणे आणि यामार्गात येणारे आर्थिक सामाजिक अडथळे दूर करणे ही या कार्याची दिशा आहे. इतिहासात असे दिसते की राजकीय, सामाजिक, आर्थिक क्रांतीची पूर्वपीठिका धार्मिक प्रबोधनानेच तयार झाली आहे. मानसिक परिवर्तनाचा जो पहिला टप्पा, त्यामध्ये धर्माला शास्त्रीजींच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे.

पण त्यामुळेच 'आधुनिक' म्हणणारे याला समाज सुधारणेचे कार्य म्हणून स्वीकारायला तयार होत नाहीत एक दृष्टिकोण असा, की, जो धर्म ही अफूची गोळी मानतो. शोषिताना कायम त्याच अवस्थेत ठेवण्यासाठी शोषक 'धर्माचा' उपयोग करून घेतात हा त्याचा सिद्धांत त्यामुळे जिथे धर्मप्रेरणा दिसेल तिथे आघात करायचा त्याचा प्रयत्न असतो. तर दुसरा प्रवाह असतो निवड-पाखडवाद्यांचा. त्यांच्या मते अशा प्रयोगामधून आर्थिक, सामाजिक उन्नतीचे जे प्रयत्न होतात ते स्वागतार्ह असतात पण त्यामध्ये धर्माबद्दल चार चांगल्या गोष्टी सांगितल्या जातात, गीतापठण केले जाते, संस्कृत श्लोक शिकविले जातात हे त्यांना रुचत नाही. त्यापासून चार हात दूर राहण्याचा त्यांचा खटाटोप असतो.

दुर्बलांना दडपण्यासाठी धर्माचा उपयोग केला जातो हा आक्षेप शास्त्रीजींनी गैरलागूच ठरविला आहे. कारण धर्म-पुनरुत्थानाची ध्वजा मागास समजल्या जाणाऱ्या जातींकडेच त्यांनी सोपविली आहे. आदिवासी, मच्छिमार यांना संस्कृतीबद्दल आस्था आहे, एवढेच नव्हे तर तिचा प्रसार करण्यास ते हिरीरीने पुढे येताहेत हेही 'स्वाध्याय' ने दाखवून दिले आहे. धार्मिक आवाहनावर अशी कामे उभी करणे विचारवंताना जुनाटपणाचे वाटत असले तरी सामान्य लोक तसे मानत नाहीत.

आज अशी स्थिती आहे की, 'आयात उसनवारी' हे जणू भारताचे बोधवाक्यच बनले आहे. प्रत्येक क्षेत्रात पाश्चात्त्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती शिरली आहे. दैनंदिन वापरातल्या वस्तूपासून राज्यव्यवस्थेपर्यंत सगळे काही वेस्टर्नाईज्ड ! स्वातंत्र्या-नंतर भारत ही तिसरी महाशक्ती, अलिप्त गटाचा नेता एवढेच नव्हे तर 'जगद्‌गुरू' असल्याच्याही वढाया मारण्यात आल्या आणि प्रत्यक्ष व्यवहारात मात्र भारत कायम 'याचकाच्या' भूमिकेतच राहिला. उत्पादनाच्या बाबतीत जसे आपण स्वयपूर्ण झालो नाही तसे विचार आणि प्रेरणा शोधण्यासाठीही परकीयांचे इतिहास धुंडाळत राहिलो. इथले आर्थिक-सामाजिक प्रश्न सोडवायचे तर पाश्चात्त्य विचारसरणीची चौकट आपल्याला स्वीकारावीशी वाटते.


पांडुरंगशास्त्रीच्या स्वाध्याय कार्याचे वैशिष्ट्य जर काही असेल तर ते हे की त्यामध्ये अस्सल भारतीयत्व आहे लोकांना त्यांच्या मातीशी नाते सांगणारा विचार दिला तर चळवळी उभ्या राहतात, रुजतात. सामान्य माणसाला लंब्याचवड्या भाषणाची, उपदेशाची भाषा कळत नाही, भक्तीचा संदेश मात्र त्याच्या हृदया-पर्यंत पोहोचतो. मच्छिमाराचे नाते व्यास-वाल्मिकींशी जोडले की त्याच्या अंगावर रोमांच उभे राहतात

होय, आमच्याजवळ विचार आहेत असे शास्त्रीजी तेजस्वीपणे सांगतात तेव्हा न्यूनगंडाची बाधा न झालेला तरुण चटकन्‌ त्याच्या-कडे आकर्षित होतो. समर्थ राष्ट्राची उभारणी अशा स्वयंभू चळवळी-तूनच होत असते. अर्थात या चळवळीला एखाद्या चौकटीत बसविणेही चूक ठरेल. कारण तो नुसता एखादा उपक्रम नाही, तर जीवनविषयक दृष्टिकोण आहे क्षेत्र कोणतेही असो त्यामध्ये जगण्याची विशिष्ट शैली म्हणजे स्वाध्याय. गमत अशी की वर्षानुवर्षे या आध्यात्मिक विचारापासून ज्यांना दूर ठेवले गेले त्या सागरपुत्रांनीच (मच्छिमारे) ही शैली प्रथम आत्मसात केली आहे. पांडुरंगशास्त्रींना सागराविषयी वाटणारी ओढ हे त्याचे एक कारण असू शकेल.

खरं म्हणजे ज्या भारतीय परंपरेवर त्यांचा विचार अधिष्ठित आहे ती परंपरासुद्धा सागरासारखीच आहे. दिशा शोधत निघालेले अनेक छोटे छोटे प्रवाह अलगदपणे हा सागर आपल्यात सामावून घेतो, त्याला आपलेच एक रूप बनवून टाकतो. किनाऱ्यावर एका-मागून एक येऊन धडकणाऱ्या लाटा म्हणजे सागराने या प्रवाहांना दिलेले चैतन्यच. ते उसळी मारून जसे वर येते तसेच पुन्हा त्या अथांग अस्तित्वात विरून-मिसळूनही जाते. कालाच्या ओघात या सागरामध्ये दूषित पाणीही शिरते, पण ते पाणी म्हणजे सागर नसतो. खरा सागर ज्याला कळतो, त्याचे खोल समृद्ध, सपन्न, अतरंग जो जाणतो तो फक्त हे दोष दूर करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी त्याला समुद्रमथनही करावे लागते. पांडुरंगशास्त्री आठवले यांनी हेच जीवनकार्य म्हणून स्वीकारले आहे. आणि सागरपुत्र या नात्याने भारतीय लोक मोठ्या सख्येने त्यामध्ये सहभागी होत आहेत. □

---

नाशिक येथे गीताप्रवचनाचा कार्यक्रम आटोपून परतणाऱ्या स्वाध्या-यींच्या बसला कसारा घाटात २८ मार्चला अपघात झाला. या दुर्घटनेत २७ जण मृत्युमुखी पडले त्यामध्ये नाला सोपारा व भुईगाव येथील मला भेटलेले अनेक स्वाध्यायी होते स्वाध्याय परिवारावरच हा दु:खाचा आघात बसला आहे, या दु:खात आम्ही सहभागी आहोत.




# 'स्वाध्याय' ते गृहनिर्माण

## मुक्काम संगमनेर

**विनय गुणे**

पाच-सहा वर्षापूर्वी, व्याख्यानमालेसाठी श्री बाबासाहेब पुरंदरे संगमनेरात होते. संगमनेरातील एक स्वाध्यायी व्याख्यानमालेच्या संयोजकांकडे आग्रह धरून बसले. त्यांना बाबासाहेबांना एका स्वाध्यायकेंद्रावर न्यायचं होतं. संयोजकांनी विचारल्यानंतरही बाबासाहेबांनी पटकन् होकार भरला नाही. केंद्र कुठे ? कोण चालवतो ? कोण सहभागी ? असल्या तपशिलातल्या माहितीनंतर ते लगेच तयार झाले.

त्यांच्याबरोबर मीही त्या स्वाध्याय-केंद्रावर गेलो होतो. एका चारफुटी बोळातल्या दुमजली बिल्डिंगमध्ये अंधाऱ्या जिन्यानं चाचपडत आम्ही वर पोहोचलो.

समोर चाळीस पन्नास स्त्रिया आपल्या मांडीवर सुपं घेऊन हातानं विड्या वळताहेत-तोंडानं स्वाध्याय चालू. त्या विडी कामगार स्त्रियांच्या तोंडून आपल्याच लेखनातील उतारे ऐकून बाबासाहेब भारावले.

"अशिक्षित विडी-कामगार स्त्रियांच्या तोंडून माझं शिवचरित्र ऐकायला मिळेल अशी मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. आजचा हा क्षण मी कधीच विसरणार नाही." बाबासाहेब म्हणाले.

तोच अंधारा जिना आज चढून जाताना माझी त्या प्रसंगाची आठवण पुन्हा ताजी झाली. विडी-कामगार स्त्रियांच्या इंद्रायणी गृहनिर्माण संस्थेच्या चेअरमन आणि पदाधिकाऱ्यांना भेटायला मी गेलो होतो.

शैक्षणिक संस्थांतून चालणाऱ्या सेवायोजनांमध्ये 'प्रौढ-शिक्षण-केंद्राचा' उपक्रम सर्वच संस्थांतून राबविला जातो. या योजनेसाठी अनुदान मिळते. वर्ग चालविणाऱ्यांना त्यातून मानधन दिले जाते. हे वर्ग महाविद्यालयांतून शिकणारे विद्यार्थीच चालवितात. शिकायचं असेल तर कमवायची गरज असलेले विद्यार्थी यात सहभागी होतात. गावातून, वाडी-वस्त्यांवरून प्रौढ लोक एकत्र करून वर्ग चालवणं कठीणच. त्यामुळे अशा योजना पार पाडण्यासाठी कुठं एकत्र असलेली माणसं सापडली तर हवीच असतात. हातातल्या कामाकडं दुर्लक्ष न करता, वेगळा वेळ न द्यावा लागता शिकता येतं, वर्ग चालविता येतो. त्यामुळे सहज तयार होणाऱ्या म्हणून 'प्रौढ-शिक्षण-केंद्र' चालविणाऱ्या

अनेकाच लक्ष अशा विडी-कारखान्याकडे असत. त्यामुळे प्रत्येक शैक्षणिक वर्षात योजना सुरू झाली की हमखास अशा केंद्राची निवड केली जाते. एकाच ठिकाणी, त्याच त्या प्रौढांसाठी सातत्यान चार-सहा वर्षं अस केंद्र चालविल्याची उदाहरण आहेत. ठरवून दिलेला तासाचा कोटा पूर्ण करण्याकड सर्वांच लक्ष शिकणारे प्रौढ विद्यार्थीही या सर्वच गोष्टीकडे फारसं गांभीर्यान कधीच पहात नाहीत. आणि योजना राबविणारे महाविद्यालयातील सचालकही अनुदान मिळविण्यापुरता कोटा पूर्ण करण्याचे मर्यादित ध्येय डोळ्यासमोर ठेवून असतात.

थोड्याबहुत फरकान सर्वच शैक्षणिक संस्थातून अशीच स्थिती आढळते.

१९८४.

*दरवर्षीप्रमाणे सुरू झालेल शैक्षणिक वर्ष.*

शैक्षणिक वर्षातल्या सेवायोजना, प्रकल्प, प्रौढ-शिक्षण-वर्ग – सगमनेर महाविद्यालयाचा एक विद्यार्थी या विडी-कारखान्यात वर्ग चालवायला आला. इथल्या कामगाराना असा वर्ग नवीन नव्हताच. आजपर्यंत किती तरी आले–गेले. त्यातलाच हा एक. पण हळू हळू या वर्गाचं वेगळेपण त्याना जाणवायला लागल.

या वर्गात 'अक्षर' शिकवायची घाई नव्हती. वर्गाच्या तासाला वेळेचं बधन नव्हत. तास भरवण असला प्रकार कधीच नव्हता. या वर्गावर देखरेख करण्याच्या निमित्तान महाविद्यालयाचा एक विद्यार्थी गणपत कासार यायचा. आल्यावर प्रत्येकाची विचारपूस करायचा. रोज किती काम करतात ? त्याना मोबदला किती मिळतो ? घरी आणखी कमावते कोण आहे ? मुल शाळेत जातात का ? नवरा दारू पितो का ?– एक दोन का असे किती तरी प्रश्न –चौकश्या –चौकशीत आपुलकी होती.

हळू हळू या स्त्रियाही बोलत्या झाल्या. आपली अड–नड सांगू लागल्या. सल्ला विचारू लागल्या. सागितलेलं ऐकू. मानू लागल्या.

रोज सात-आठशे विडी बाधायची दिवसात आठ–दहा रुपये कमाई. काम अस-दिवसभरात मान-पाठ एक होऊन जायची. रोजच हाता-तोंडाशी गाठ. आला दिवस साजरा करायचा.

नवरा कमावता असला तरी खाणाऱ्या सहा तोंडासाठी चार हातांनी केलेल कामही अपुर पडायच. 'आगड आहे तर चोळी नाही' अशी स्थिती. त्यात एखादीचा नवरा दारूबाज असला तर विचारायलाच नको. ससाराचा सगळाच भार तिच्या खाद्यावर त्यामुळ मुलाच्या शिक्षणाच काय ? मुलीच लग्न कसं करणार ? अचानक आजारपण उद्भवल तर काय ? असल्या कोणत्याच प्रश्नाची त्याच्याकडं उत्तरं नसायची. मग त्या गप्प व्हायच्या.

गणपत कासारच्या ही गोष्ट लक्षात आली. त्यान सर्वांना 'बचतीची गोष्ट' सागितली. थेंबाथेंबान साचलेल्या तळ्यातल पाणी आपल्याला दुर्भिक्ष्य असेल तेव्हा कामाला येईल, हे प्रत्येकीच्या लक्षात आलं. सगमनेर महाविद्यालयातील 'बँक ऑफ बडोदा'च्या शाखेत त्यान या वर्गातल्या सर्वच स्त्रियाची बचत खाती उघडली आठवड्याला दहा रुपयाप्रमाणे प्रत्येकीचे पैसे खात्यात जमा होऊ लागले.

*रोजच्या अभ्यासाबरोबर त्याच्यात गप्पा* चालत बोलताना विषय नेहमीचाच ठराविक-आर्थिक विवचनेचा – खर्चाच्या तोंडमिळवणीचा.

*त्यातल्या बहुसख्यांची घरं भाड्याची.* जुने भाडेकरू, त्यांची भाडी कमी. नवीन असलेल्याना मात्र तीन-चार खणी जागेसाठी साठ सत्तर रुपये मोजायला लागायचे मिळणाऱ्या कमाईतला मोठ्ठा हिस्सा या भाडेखर्चाचा. मग उरलेल्यात महिन्याचे दिवस ढकलायचे.

बोलता बोलता कासार म्हणाला, 'तुम्ही घर का नाही बाधत ?' हातातल काम थाबवून सगळ्या बघतच राहिल्या.

घर ? आणि आपण ? – कस शक्य आहे ? इथ तर दोन वेळची भ्रात.

पण या विषयान सगळ्याच्याच मनात घर केलं. कासारही बोलून थांबला नव्हताच. त्यानं जागा शोधायला सुरुवात केली गावच्या फार जवळ शोधली तर पैसे जास्त मोजायला लागतील आणि जागेसाठीच कर्ज काढायला लागलं तर पुढची सगळी योजनाच बारगळेल म्हणून लाब असली तरी चालेल. चार सहा जागा बघितल्या या स्त्रियाना दाखवल्या. जवळ लाब, पाणी, रस्ता, किंमत असल्या सगळ्या समस्या. शेवटी एक चाळीस गुठ्याची जागा सर्वांना पसत पडली. जागा खरेदी करायची पण पैसे – ? बचत होती पण ती फारच तुटपुजी. त्यातून तीनशे रुपये काढले. उरलेले अगावरचे किडूमिडूक मोडून जमा केले. घरातली किंमत येईल अशी वस्तू विकली आणि पैसे उभे केले. चाळीस जणींची प्रत्येकी १ गुठा जागा – किंमत प्रत्येकी रु. २२५०.

कासार संगमनेर महाविद्यालयाच्या प्रौढ शिक्षण प्रकल्पाचे प्रमुख प्रा. माळवदकर आणि प्राचार्य कौंडिण्य यांच्याशी नियमित सपर्क राखून होताच.

आजपर्यंत झालेली ही प्रगती आणि या स्त्री –कामगारांचा ठाम निश्चय, त्याची चिकाटी बघून या प्रकल्पाच्या माध्यमातून या गृहबांधणी योजनेला महाविद्यालयाने चालना द्यायच ठरवल. ज्याच्यासाठी प्रकल्प राबवायचा त्यांची वृत्ती 'असेल हरि तर' अशी असू नये, लाभ मिळणाऱ्या सर्वांचाच या योजनेत मानसिक आणि सक्रिय सहभाग हवा– जागा घेण्यापर्यंतचा पल्ला गाठल्यावर *प्राचार्यांना खात्री पटली.*

तालुका पचायत समितीच्या कार्यालयात कामानिमित्त गेलेल्या गणपत कासारला तिथल्या क्लार्कने एक योजना दाखवली ... भारत सरकारच्या श्रममत्रालयाची कामगार कल्याणासाठी गृहबांधणीच्या योजनेस आर्थिक सहाय्याची ती योजना होती. खाण कामगार, आणि विडी कामगार याच्या पुरत्याच प्रामुख्याने राबविल्या जाणाऱ्या या योजनेचा पूर्ण अभ्यास करून कासारने रिपोर्ट तयार केला. 'प्रकल्प अहवाल' पाठविण्यापूर्वी श्रम मत्रालयाच्या सर्व अटी पूर्ण करणे आवश्यक होते .. जागा बिगर शेती असणे, प्लॉट प्रत्येक कामगाराच्या नावावर असणे आवश्यक होते. कर्ज गृहनिर्माण सस्था म्हणून न देता प्रत्येक कामगाराच्या वैयक्तिक नावावर मिळणार होते.

खऱ्या किचकट आणि वेळखाऊ कामाला आता सुरुवात झाली. सरकारी सर्व्हेअरकडून जागा मोजून घेणे गरजेचे होते. नगरला जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या सर्व्हेअरला अर्ज आणि आवश्यक ती फी भरूनही

संगमनेरला मोजणीसाठी यायला वेळ काढता येईना. त्यासाठी कासारही चार सहा वेळा नगरला जाऊन आला.

तरीही तो सर्व्हेअर ढिम्मच. शेवटी एका भेटीत प्रत्येक स्त्री कामगाराचे दहा असे चारशे रुपये आणून द्या, लगेच मोजणीला येतो असे सर्व्हेअरने सांगितले. गरीब विडी कामगार आहेत म्हणून हा 'सवलतीचा दर' आहे म्हणाला – कासारला तसेच हात हलवत परत यावे लागलें.

शेवटी त्यानं आमदार बाळासाहेब थोरात यांना गाठलं. त्यांच्या कानावर आजवरची प्रगती आणि सर्व्हेअरची 'अडचण' घातली. त्या दिवशी बाळासाहेब थोरात नगरला जायला निघाले होते. नगरला जाऊन सर्व्हेअरच्या ऑफिसमधे सरळ त्याच्या टेबलासमोर जाऊन उभे राहिले.

'किती पैसे हवेत !' – विचारलं.

शरमिंद्या झालेल्या सर्व्हेअरने दुसऱ्या दिवशी संगमनेर गाठले – मोजणी झाली.

बिगर शेतीचा परवाना मिळविण्याचे प्रकरणही असेच – वेळ खाणारे. पण स्वत: प्राचार्य कौंडिण्य यांनी चार चार वेळा प्रांत ऑफिसमधे जाऊन प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला. आणि प्रकरण मार्गी लावले. श्रममंत्रालयाच्या अटीप्रमाणे जागा प्रत्येकीच्या नावावर व्हायला हवी. त्यासाठी पुन्हा फेऱ्या मारणं आलं. ज्यावेळेला आपण हमखास ऑफिसमधे नसणार अशी वेळ तलाठी कासारना भेटीसाठी द्यायचा. सतत दोन वर्षे अक्षरशः शेकडो वेळा कासार तलाठ्याच्या कार्यालयात चार चार तास बसून राहिले. प्राचार्य कौंडिण्य यांच्या सारख्यांनाही तलाठ्याच्या दारात ताटकळणं चुकलं नाही.

सर्व्हेअर, प्रांत ऑफिस, सिटी सर्व्हे, तलाठी असले सगळे सरकारी अडथळे पार करताना दमछाक झाली तरी कासारचा उत्साह कायम होता.–

संगमनेर तालुक्यातील संगमनेर शहरापासून आठ कि. मी. वर असलेलं निमज गाव. गणपत रंगनाथ कासार हा या निमज गावचा. भूगोल हा विशेष विषय घेऊन पदवीधर झालाय. घरी चार-पाच एकर शेती. त्यातल्या दोन एकरांपुरतंच पाणी, बाकीची पावसावर अवलंबून. दुधाचा जोडधंदा. वडील गवंडी काम करतात. थोरला मानसिकदृष्ट्या कमकुवत. गणपत दोन नंबरचा. धाकटे दोन नासिकात नोकरी करतात. घरी वीस माणसांचं कुटुंब. त्यामुळं शिक्षण घ्यायचं असेल तर कमवायला हवं. कुटुंबाची जबाबदारीही पहायला हवी. संगमनेर महाविद्यालयात दाखल झाला.

'प्रौढशिक्षण योजने'द्वारे चालविल्या जाणाऱ्या वर्गाचा संघटक म्हणून काम स्वीकारलं. तेवढाच महिन्याला पन्नास-साठ रुपयांचा आधार. इतर ठिकाणच्या 'प्रौढ शिक्षण योजनेचं' स्वरूप आणि संगमनेर महाविद्यालयातील या योजनेचं स्वरूप पूर्ण भिन्न आहे. 'अहवालापुरता प्रकल्प' असं या महाविद्यालयातील या योजनेचं स्वरूप नाही. 'सामाजिक जाणीव प्रकल्प' म्हणून ही योजना राबवली जाते. प्रौढांना फक्त अक्षर-ओळख करून देण्यापेक्षा सामाजिक प्रश्नांसंबंधीची त्यांची जाणीव वाढावी, अंधश्रद्धा जावी, विज्ञान-निष्ठा जोपासावी, आपल्या दैनंदिन प्रश्नांचा, समस्यांचा त्यांना सांगोपांग विचार करता यावा अशा तऱ्हेनं या शिक्षणवर्गातील तासांची रचना केलेली आहे. त्यासाठी विविध विषयांची चर्चा अशा केंद्रावर घडवून आणण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात.

संगमनेर महाविद्यालय तालुक्यातील आठ दहा कि. मी. परिसरात असे चाळीस चाळीस वर्ग चालविते.

त्यांतील एका वर्गाचा संघटक कासार. कासारची अभ्यासू, जिज्ञासू, कष्टाळू वृत्ती आणि प्रत्येक काम मन लावून करण्याचा त्याचा स्वभाव केंद्राचे प्रमुख प्रा. माळवदकर यांनी हेरला आणि चाळीस संघटकांवर असलेल्या तीन सुपरवायझरच्या पदांपैकी एका पदावर कासारला बढती मिळाली.

कासारचा उत्साह दुणावला.

प्राचार्य कौंडिण्य यांच्या मार्गदर्शनाने, वर्ग-संघटकांच्या मार्फत त्यानं विविध योजना कार्यान्वित केल्या. त्याच्या कार्यक्षेत्रातील वर्गांवर असंख्य चर्चा घडवून आणल्या. गरजूंना उपजीविकेची साधने उपलब्ध करून दिली. शिवणयंत्रे, इतर छोटे-मोठे उद्योग, त्यासाठी कर्ज प्रकरणे, कर्ज पुरवठा, असली सगळी व्यवधानं त्यानं सांभाळली. व्यक्तिगत अडीअडचणी सोडविताना सामूहिक प्रश्नांचाही विचार केला. एखाद्या वस्तीत सार्वजनिक नळ मिळवून देण्यापासून प्रत्येक प्रश्नात लक्ष घातलं. संगमनेर महाविद्यालयात वडार समाजातील लोकांसाठी राबविलेल्या त्यांच्या गावाशेजारच्या घरकुल योजनेवरही त्यानं काम केलं होतं.

गप्पांच्या ओघात त्या योजनेची माहिती विडीकामगार स्त्रियांना एके दिवशी वर्गातल्या तासाला सांगत असताना तो त्यांना अचानक म्हणाला–'तुम्ही घर का नाही बांधत ?

हातातलं काम थांबवून त्याच्याकडं बघत राहिलेल्या त्या स्त्रियांना त्यानं स्वप्न दिलं. त्यांना विश्वास दिला. हुरूप आलेल्या त्या स्त्रियांनी आपलं घराचं स्वप्न साकार करण्याचा निश्चय केला.


गृहनिर्माण संस्था स्थापन करायचं ठरलं. पदाधिकारी म्हणून सगळ्या स्त्रियाच काम करणार होत्या. संस्थेचं नाव ठेवलं इंद्रायणी सहकारी गृहनिर्माण संस्था. सर्व व्यवहार



श्रीमती कमल अरगडे
चेअरमन



श्रीमती सीताबाई सांगळे
खजिनदार



गणपत रंगनाथ कासार
प्रकल्पासाठी विशेष प्रयत्न

चेकने करायचे भारावलेल्या स्त्रिया उत्साहान कामाला लागल्या. पैसा जमवला... जागा खरेदी केली. संस्थेची नोंदणी केली.

'वंदना कन्स्ट्रक्शन्स्'च्या पवार यानी रात्र रात्र जागून प्रकरणासाठी आवश्यक तेवढे प्लॅन्स काढून दिले. या योजनेची आवश्यक ती सर्व कागदपत्रे पूर्ण करून कासारनं नागपूर गाठल. श्रममंत्रालयाच्या महाराष्ट्र–गोव्याचे केंद्रीय कामगार आयुक्त श्री. जी. एस. असनानी याना भेटला. असनानी यानी सगळी योजना समजावून घेतली. कागदपत्रे तपासली. कासारचं कौतुक करून कर्ज उपलब्ध करून द्यायचं आश्वासन दिलं. दुसऱ्या भेटीत कासारवर खूष झालेल्या असनानी यानी त्याला शासनाच्या कामगारासाठीच्या विविध योजना सागितल्या. नागपूर-रामटेक परिसरातील अशा काही योजना स्वत नेऊन दाखवल्या. खाण कामगारासाठी राबविले जाणारे प्रकल्प दाखवले. योजनेला मान्यता मिळून कर्ज मजूर होईपर्यंतच्या विविध पातळीवर आमदार बाळासाहेब थोरात, विडीमजदूर सभेचे सगमनेर येथील कार्यकर्ते, आणि विडी कामगार कल्याण योजनेच्या शासकीय समितीचे सभासद श्री. सायन्ना एनगदुल याच वेळोवेळी सहाय्य झाल. सायन्ना एनगदूल तर कासार याच्याबरोबर नागपूरलाही जाऊन आले.

विडी कामगार स्त्रियाच्या या घरकुल योजनेची चर्चा युनियनच्या मीटिंगमधे वेळोवेळी व्हायची. प्रत्येक वेळेला सायन्नानी या योजनेचा कामगारांच्यात पाठपुरावा केला. उशीर लागतोय म्हणून, घरं खरोखर होतील का ? पैसा उपलब्ध होईल का ? पैशाचा वापर व्यवस्थित होईल का ? आपली सगळी कमाई, आजवरची पुजी आपण खर्च करतोय म्हणून त्या धास्तावलेल्या असायच्या. अशा प्रत्येक वेळेला सायन्नानी त्याच्या शकाच निरसन करून त्याच्यातला हुरूप टिकवला. त्याच्या पै-पैशाच्या विश्वासू विनियोगाची खात्री दिली.

इंद्रायणी गृहनिर्माण सस्थेच्या चेअरमन कमल अरगळे, या जिद्दीच्या कामगार स्त्रीची त्याना मोलाची मदत झाली.

रोज कारखान्यात बसून आठ तास विड्या करताना कमलबाईला घराचा विषय पुरायचा. सभासद नसलेल्या स्त्रिया सभासद स्त्रियाना सारख काहीबाही सागायच्या, अशा सर्वांना सारखं रोजचं समजावून सागाव लागायच. विडी कामगारांत ज्या स्त्रिया भिशी चालवत फंड चालवत अशाचा या योजनेत फार विरोध झाला.बचतीची खाती बँकेत उघडल्यापासून त्याचा विरोध सुरू झाला. त्यांनी या योजनेला किती तरी वेळा खो घालण्याचा प्रयत्न केला. अनेकदा भाडणापर्यंत वेळ आली. अशा स्थितीत सर्वांना एकत्र टिकवून ठेवण्याची अवघड कसरत कमल अरगडे आणि खजिनदार सीताबाई सागळे यानी पार पाडली

बचतीची खाती सुरू करणाऱ्या आणि या योजनेत सहभागी झालेल्या पहिल्या चाळीस स्त्रियापैकी फक्त दहा जणी आजपर्यंत टिकून आहेत. पैशाची निकड भासली, कसली गरज निर्माण झाली की सरळ जमा केलेल्या पैशाची तात्पुरती मागणी करीत...पुन्हा जमा करण्याचे नाव नसे. काही जणींनी विरोध करणाऱ्याच्या प्रचारामुळं आपले पैसे काढून घेतले मग अशा रिकाम्या जागेवर दुसऱ्या स्त्रीला सभासद करून घेतल जाई

प्लॉट नावावर होईपर्यंत असे बदल सत्तर वेळा करावे लागले.

काही स्त्रियांची चागली घर होती. एक आणखी जागा...स्वस्तात आहे, बिनव्याजी कर्ज आहे. म्हणून योजनेत सहभागी झालेल्या स्त्रिया जेव्हा लक्षात आल्या तेव्हा या संचालक महिलानी त्यांचे पैसे त्याना घरी जाऊन परत केले.

या सगळ्या प्रकल्पासाठी प्राचार्य कौंडिण्य व प्रा. माळवदकर याचे मार्गदर्शक असले तरी सुपरवायझर या नात्याने सपर्काची आणि पाठपुराव्याची खरी जबाबदारी होती कासारची. त्याचा धाकटा भाऊ कॅन्सरनं आजारी होता. केस फार पुढ गेलेली म्हणून टाटामधे त्याला अॅडमिट करून घेतले नाही. तो वर्षभर पुण्याच्या 'ससून'मधे होता. या वर्षभरात कासार आठवड्यातून एक दिवस सातत्यानं फक्त याच कामासाठी सगमनेरला यायचा.

भारत सरकारच्या श्रममंत्रालयाकडून प्रत्येकी चार हजार रुपये बिनव्याजी कर्ज मजूर झालं. एक हजार सबसिडी मिळाली. आणि मग कामाला गती आली. संगमनेर साखर कारखान्याच्या 'अमृत वाहिनी सरकारी बँकेने' प्रत्येकी तीन हजार रुपयाचे कर्ज मंजूर केले. सगमनेर कॉलेजच्या ग्रामीण विकास केंद्रात सगळ्या योजनेसाठी वीस हजार रुपयांचे अनुदान दिले. कमी पडलेली रक्कम या स्त्रियानी उभी केली. वसाहतीच्या शेजारी राहाणाऱ्या काठे गुरुजी यानी बाधकामाला मोफत पाणी दिल. संगमनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी श्रमदान प्लॉट व्यवस्थित केला ... वसाहतीमधे रस्ते तयार केले. आणि ही दोनशेनव्वद चौ. फूट बाधकाम आणि दोनशे पन्नास फुटाचा परिसर, दोन खोल्या, न्हाणी सडास, बाधकाम, अशी सुसज्ज सोय असलेली चाळीस घराची टुमदार वसाहत आकारात आली प्रत्येकी खर्च आला फक्त चौदा हजार दोनशे पन्नास रुपये.

अनसूया दत्तात्रय आनद नावाची एक विडी कामगार स्त्री या संस्थेची सदस्य झाली चार छोटी छोटी मुल. नवरा दारूबाज होता. दोन वर्षांपूर्वी वारला. घरात एकटी कमावती. कोणाचा आधार नाही. दरमहा चाळीस रुपये घरभाड्यात. शिवाय इतर आवश्यक खर्च आहेच रोजच कारखान्यातल आठ तास काम करून, विडीच एक घरखेप माप करून अक्षरश सतरा-अठरा तास सलग दोन-तीन वर्ष काम करून तिन घर चालवल. बांधकामाला पैसा उभा केला. या प्रकल्पात पहिल्यापासून शेवटपर्यंत टिकून राहिली. आता ती या नव्या घरात गेली. तिला वाटणार समाधान शब्दात कस सागाव ?

मे. विश्वनाथ बळवत वैद्य या कपनीच्या 'हत्ती छाप विडी' कारखान्यातील तेहतीस, ठाकुर सावदेकर आणि कपनी मधील पाच आणि सिन्नर विडी उद्योगाच्या 'उट छाप विडी' कारखान्यातील दोन अशा चाळीस विडी कामगार स्त्रियाचा या घरकुल योजनेत सहभाग आहे जेमतेम मिळविणाऱ्या या अशिक्षित स्त्रीकामगारानी एक स्वप्न बघितल ते वास्तवात आणल. तीन-चार वर्षं सातत्याने या योजनेचा पाठपुरावा करत असताना या विडी मालकाच मिळालेल सहाय्य अगदीच नगण्य आहे.

वसाहतीपर्यंत जाण्याचा रस्ता ठाकूर सावदेकर आणि कपनी या पुण्याच्या प्रसिद्ध

विडी उत्पादकांच्या जागेतून जातो. हा रस्ता मिळावा म्हणून खुद्द प्राचार्य कौंडिण्य, एकदा तर या सभासद स्त्रियापैकी सहा-सात जणी दोन-तीनदा पुण्याला मालकाना प्रत्यक्ष भेटायला गेल्या.

मालक या स्त्रियाशी व्यवस्थित वागले तरी प्रतिसाद फारसा उत्साहवर्धक नव्हता. मालकानी रस्ता वापरायला परवानगी दिली असली तरी हा रस्ता गृहनिर्माण संस्थेच्या कायदेशीर मालकीचा होणे गरजेचे आहे.

आर्थिक सहाय्याची या मालकाकडून कामगाराना काहीच अपेक्षा नव्हती कर्जाच्या अर्जावर मालकानी सह्या केल्या ह्याचंच त्याना फार कौतुक.

विडी कामगाराच्यात काम करणाऱ्या आयटक, लालनिशाण, इटक, 'विडी मजदूर सभा' याच्या युनियन्स आहेत 'विडी मजदूर सभेचे' एक मायन्ना सोडले तर इतर कोणी या प्रकल्पाकडे फारस लक्ष पुरवल नाही. साधी चौकशीही केली नाही.

सरकारच्या अनेक योजना आहेत...पण त्या फक्त कागदावर पडून. त्या योजना ज्याच्यासाठी आहेत त्यांच्यापर्यन्त त्या कधी पोचतच नाहीत त्याचा लाभ करून देण्यासाठी कुणी प्रयत्नही करत नाही. फक्त आर्थिक मागण्यांसाठी आदोलन करणाऱ्या कामगार सघटना असंच त्याच्या कामाचं आजच स्वरूप आहे. अशा विधायक आणि कामगार कल्याणाच्या कामगाराच्या मूलभूत गरजा भागविणाऱ्या योजना अग्रहक्कान का राबवू नयेत? किचकट आणि वेळखाऊ कामे करण्यापेक्षा नारा देऊन सप मोर्चे घडवून आपले नेतृत्व अबाधित राखणे सहज शक्य आणि सोपे आहे म्हणून असेल, कामगारात काम करणाऱ्या सगळयाच युनियन राजकीय पक्षांची बांधिल किंवा राजकीय महत्त्वाकांक्षा असणाऱ्या पुढाऱ्याना बाधील आहेत म्हणून ही असे घडत असावे 'वेतन वाढून आर्थिक प्रश्न सुटला म्हणजे इतर सर्वच प्रश्न आपोआप सुटतात' हे याचे तत्त्वज्ञानही किती फसवे आहे.

सगमनेर महाविद्यालयाच्या 'जाणीव जागृती प्रकल्पा'ने खरे तर अशा सगळयाच कामाला एक दिशा दिली आहे.

दि. ७ मार्च, ८८ या घरकुलाच उद्घाटन झालं. कष्टकऱ्याच्या नेत्या कॉम्रेड गोदावरी परुळेकर यांच्या हस्ते. चळवळीतल्या गोदूताई या कष्टकऱ्याच्या रचनात्मक आणि विधायक कार्यात, आशिक्षित स्त्रियाच्यात झालेल्या स्वत्वाच्या जाणीवजागृतीन भारावून गेल्या.

केवळ हातावर पोट असणाऱ्या अशिक्षित स्त्री कामगारांनी एकत्र येऊन निर्माण झालेली ही सरकारी गृहनिर्माण सस्था महाराष्ट्रात एकमेव असावी. याच श्रेय या प्रकल्पात आपला खारीचा वाटा उचलाऱ्या प्रत्येकालाच आहे – कमल अरगडे, सीताबाई सागळे, अनसूया आनद – अशा चाळीस स्त्रियाच्या जिद्दीची ही कथा.

या प्रकल्पाच्या यशस्वितेमुळे आपणही काही करू शकतो असा आत्मविश्वास या अशिक्षित स्त्री कामगाराच्यामध्ये निर्माण झालाय. स्वाध्यायापासून ते महाविद्यालयाच्या प्रौढ शिक्षण केंद्रापर्यंत प्रत्येक घटकाचा या स्त्रियाच्यात झालेल्या जाणीव-जागृतीत सहभाग आहे

शेवटपर्यंत या प्रकल्पाचा पाठपुरावा करणाऱ्या गणपत रगनाथ कासार या विद्यार्थ्यालाही त्याचे श्रेय द्यायला हवे – त्याच्या सक्रिय, मानसिक सहभागामुळेच ही योजना पूर्णत्वाला गेली पैशासाठी काम करताना सामाजिक जाणिवेची दिशा ठेवून आपल्या विद्यार्थ्यांना काम करायला शिकवणाऱ्या प्राचार्य कौंडिण्य याचा सहभागही तितकाच महत्त्वाचा.

महाविद्यालयाचा एक एक विद्यार्थी अशी जाणीव घेऊन जेव्हा जीवनातल्या विविध कार्यक्षेत्रात वादळाला तोड देत ठाम उभ राहून असं समाजपरिवर्तनाचं काम करायला लागेल तेव्हा या राष्ट्राचा उद्याचा दिवस नक्कीच उज्ज्वल असेल !

□


*With Best Compliments*

## Ravi Yantriki Udyog Pvt. Ltd.

## Ravi Engineering Works

**Specialist In : Erection-Fabrication & Construction of Sugar, Chemical & Polyester Film Plants.**

168/9, Mira Society, Shankar Sheth Road, Pune 411 037



# राजमाची ग्रामसहाय्य योजनेचे एक तप



**छाया राजे**

लोणावळ्यासारख्या थंड निसर्गरम्य ठिकाणापासून अवघ्या १५ कि. मी. अंतरावर वायव्य दिशेला भर घाटमाथ्यावरील निसर्गरम्य परिसरात राजमाची या ऐतिहासिक किल्ल्यांच्या पायथ्याशी वसलेलं उढेवाडी हे लहानसं खेडं! १२ वर्षांपूर्वी त्याची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. वास्तविक लोणावळा हे मुंबई-पुणे मार्गावरील एक महत्त्वाचे सर्व सोयींनी युक्त व पर्यटकांचे केंद्रस्थान बनलेले शहर असूनही त्याच्यापासून इतक्या जवळ असलेलं खेडं वाहतुकीयोग्य रस्ता, वीज, पाणी व उपजीविकेची साधनं या दृष्टीनं उपेक्षित राहावं ही आश्चर्याचीच गोष्ट होती. पण या दुर्लक्षित उढेवाडीला राजमाची ग्राम सहाय्य योजनेचा परिसस्पर्श लाभला आणि राजमाचीच्या मनोरंजन बालेकिल्ल्याच्या दक्षिण पायथ्याशी वसलेल्या या खेड्याचा कायापालट झाला.

'राजमाची ग्राम सहाय्य योजना' म्हणजे पदभ्रमण गिरिभ्रमण करणाऱ्या काही उत्साही तरुणांच्या सामाजिक जाणिवेतून व डोळस जीवनदृष्टीतून निर्माण झालेली एक संस्था! डोंगरदऱ्यांत भटकंती करण्याची आवड असणारे व ऐतिहासिक किल्ल्यांवर प्रेम करणारे काही तरुण राजमाचीच्या श्रीवर्धन व मनोरंजन बालेकिल्ल्यांच्या आकर्षणाने प्रथम १९७६ साली तिकडे पदभ्रमणासाठी गेले. पण प्रत्यक्षात मात्र निसर्गाच्या आकर्षणावर व ऐतिहासिक किल्ल्याच्या कुतूहलावर मात केली ती राजमाचीच्या कुशीत दडलेल्या चिमुकल्या उढेवाडी गावाच्या हलाखीच्या स्थितीनं!

उढेवाडी गावाची वसती २० घरांची. लोकसंख्या १५० च्या आसपास. पण सारा गाव खरजेनं ग्रासलेला! तान्ही मुलं सुद्धा या रोगाच्या संसर्गातून सुटली नव्हती. गावकऱ्यांची स्थिती अत्यंत गरिबीची. त्यांचा व्यवसाय म्हणजे पावसाळ्यात डोंगर उतारावरील जमिनीत नाचणी – वरीची थोडी फार शेती, गुरे ढोरे, शेळ्या पाळणे, कोळसा तयार करणे, टोपल्या विणणे व हंगामाप्रमाणे काकड्या, रायवळ आंबे, करवंदं वगैरे विकणे. पण यात पोटभर अन्न व अंगभर कपडा या किमान गरजाही भागणं जिथं शक्य नाही, तिथं औषधपाण्याचा विचारच दूर. औषधोपचारांची सोयही उपलब्ध नाही. कुणी आजारी पडलाच तर रोग्याला १५ कि. मी. चालून लोणावळ्याला आणायला हवा कारण तेच सर्वांत जवळचे ठिकाण. शिवाय वाहतूक व्यवस्था नाही. लोणावळा, तुंगार्ली, फणसराई मार्गातील ओढा पावसाळ्यात आणखीनच अडचणी निर्माण करी. पिण्याच्या पाण्याची सोय नाही. गावातील स्त्रिया मनोरंजन किल्ल्याच्या मध्यावर असलेल्या टाक्यातून पाणी आणत. त्यामुळे साहजिकच पाण्याचा वापर कमी केला जाई. स्वच्छता नाही. त्यामुळे रोगराईला निमंत्रण. हे दुष्टचक्र मोडायचं तर गावात काही मूलभूत सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. या लोकांसाठी काही तरी केलं पाहिजे! या 'काही तरी'-नेच मग आकार घेतला. राजमाची ग्राम सहाय्य योजनेचा. उढेवाडीच्या या हलाखीच्या स्थितीनं अस्वस्थ झालेल्या या तरुणांनी उढेवाडीच्या विकासाचा विडा उचलला.

ज्या गावात एस. टी. बस जाते, जिथे रस्ते आहेत. तिथल्या विकासाचं काम बँका

किंवा इतर सस्था करतात. कारण तिथे जाण्या-येण्याचा प्रश्न नसतो. पण उढेवाडी सारख्या आडबाजूच्या गावाकडे लक्ष वेधल जातं ते पदभ्रमण करणाऱ्याचच! कारण तेच अशा ठिकाणी सहजी पोहोचू शकतात. शिवाय अशी गावच जास्त हाल-अपेष्टा आणि गैरसोयी सोसत असण्याची शक्यता असते. त्या दृष्टीनं या तरुणापुढे हे एक मोठ आव्हानच होत. त्याच्या जिद्दीतूनच १९७६ झाली 'राजमाची ग्राम सहाय्य योजना' ही सस्था अस्तित्वात आली.

सस्था अस्तित्वात आली खरी पण कामाला प्रत्यक्षात सुरुवात करताना अशा ठिकाणी प्रश्न असतो तो गावातल्या लोकाशी जवळीक साधण्याचा त्याचा विश्वास सपादन करण्याचा! कारण त्याच्या सहकार्यावरच आपल्या कार्याचा डोलारा उभा राहणार असतो. आपल्या गावात येऊन काम करणारे हे लोक आपल्या चागल्यासाठीच आलेत याबद्दल त्याची मनोमन खात्री पटल्याशिवाय गावातल्या कोणत्याही गोष्टीत दखल घेण म्हणजे त्याचा रोष ओढवून घेण्यासारखं होत. "घरात रॉकेलचा दिवा पेटवल्यास देवाचा कोप होतो" किंवा "साप चावल्यास त्या माणसाला भैरोबाच्या देवळात नेऊन ठेवले तर माणूस वाचतो" अशासारख्या अध श्रद्धा असणाऱ्या उढेवाडीच्या गावकऱ्याना या अज्ञानापासून वाचवणं व आधुनिक जीवन-दृष्टी देणं सोप नव्हतं. पण राजमाची ग्राम सहाय्य योजनेच्या कार्यकर्त्यांना त्याच्याशी जवळीक साधण सहज जमल! या साठी त्यांनी एकच तत्र अवलबल ते म्हणजे त्याच्या तातडीच्या गरजा ओळखून तिथूनच कामाची सुरुवात करायची त्यामुळे गावकऱ्याकडून या कामाचं स्वागतच झालं.

राजमाची ग्राम सहाय्य योजनेन उढेवाडीत आपल्या कामाची सुरुवात केली ती आरोग्याच्या प्रश्नापासून! खरजेनं ग्रासलेल्या उढेवाडीकराची ती तातडीची गरज होती. तोपर्यंत उढेवाडीत देवीच्या रोगावर लस टोचण्याच्या निमित्तान सुद्धा सरकारचं वैद्यकीय पथक गेलं नव्हतं त्यामुळे सुरुवातीला राजमाची ग्राम सहाय्य योजनेचे कार्यकर्ते आपल्या सोबत आपल्या डॉक्टर मित्राना घेऊन गेले आणि त्यानी औषध–उपचाराला सुरुवात केली.

गावातील अशक्त मुलाना जीवनसत्त्व-युक्त गोळ्या पुरवण, ट्रिपल व्हॅक्सीन व पोलिओ प्रतिबंधक औषध देण, देवी, धनुर्वात प्रतिबधक लसी टोचण, दत आरोग्याची पाहणी करणं असे कार्यक्रम राजमाची ग्राम-सहाय्य योजनेकडून राबवण्यात आले. दर पधरा दिवसानी किंवा महिन्यातून एकदा डॉक्टर कार्यकर्ते उढेवाडीला मोफत औषधोपचारासाठी जाऊ लागले. तिथे खरजेसारख्या त्वचा रोगावर, डोळयाची साथ, सर्दी, ताप खोकला इ वर इलाज केले जातच असत पण गभीर स्वरूपाच्या आजाराने ग्रासलेल्या रोग्याना मुबईत आणून उपचार केले जात. उढेवाडीच्या ठकाबाई उबरे या स्त्रीस फुफ्फुसाचा आजार झाला होता, तिला मुबईत के. ई. एम रुग्णालयात आणून तिच्या वर शस्त्रक्रिया करण्यात आली. आज ती स्त्री एक निरोगी आयुष्य जगत आहे. रामा जानेरे यालाही मूत्राशयाच्या आजाराची तपासणी करण्यासाठी मुबईत के. ई. एम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. साधू उबरे याच्यावर पोटदुखीसाठी गोवडीच्या शताब्दी रुग्णालयातच उपचार करण्यात आले. वैद्यकीय सेवेमध्ये अनेक डॉक्टराच्या सहकार्याप्रमाणेच काही औषध कपन्यानीही सहकार्य दिल.

वैद्यकीय उपचारासोबतच गावकऱ्याना कुटुब नियोजनाच महत्व पटवणंही आवश्यक होतं. कुटुब मर्यादित ठेवण्याची आवश्यकता चर्चेतून त्याना पटत असे पण सततिप्रतिबधक उपायाबाबत, विशेषत: पुरुषावरील शस्त्रक्रियेबाबत गावकऱ्याच्या मनात अनेक गैर-समज होते. शक्ती कमी होते ही गैर-समजूत अजूनही गावकऱ्याच्या मनात आहे. पण वेळोवेळी डॉक्टरानी व कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रयत्नाना हळूहळू यश येत गेल १९६९ मध्ये तीन स्त्रियानी कुटुब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करुन घेतल्या. आज पर्यंत एकूण ८ स्त्रियावर कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

१९७६ ते १९७९ या अल्पावधीतच प्रथमोपचार ते कुटुब नियोजन हा प्रयत्नाचा प्रवास म्हणजे राजमाची ग्रामसहाय्य योजनेच्या कार्यकर्त्यांच्या वैद्यकीय सेवा क्षेत्रातील यशाचा चढता आलेखच होता. पण वैद्यकीय सेवा पुरवण ही आरोग्याच्या प्रश्नाची एक बाजू झाली आरोग्यांचा प्रश्न पूर्णपणे सोडवायचा असेल तर केवळ वैद्यकीय सोयी पुरवून भागणार नव्हत त्वचा रोग, डोळयाची साथ, सर्दी, ताप, खोकला या सारख्या सातत्यान उद्भवणाऱ्या आजारावर, कायम स्वरूपाचा उपाय शोधण भाग होत. त्यासाठी हे आजार होण्याची कारण शोधून तीच नाहीशी करण्याच्या दृष्टीन पावलं उचलण क्रमप्राप्त होत

या सर्व आजाराच मूळ होत अस्वच्छता व पर्यायानं पाण्याचा प्रश्न! गावकरी वर्षानुवर्ष ज्या टाक्यातल पाणी पीत ते मनोरजन गडावरच टाक गाळ साचून अस्वच्छ झाल होत. तेच पाणी गावकरी पीत असत उदय सागर तलाव आणि मनोरजन गडावरची टाकी! उढेवाडीच्या वस्तीच्या मानाने पाणी तस मुबलक होत. पण वस्तीपासून लाब होतं. शिवाय गाळ उपसून त्याची स्वच्छता करण आवश्यक होत उदयसागर तलावात तीन-चार फूट जाडीचा गाळाचा थर साठलेला होता. १९७७ आणि १९७८ च्या मे-जून मध्ये गाळ उपसण्याच काम हाती घेण्यात आल. अपुरं राहिलेल काम तिसऱ्या वर्षी १९७९ च्या मे मध्ये करण्यात याल. याच वेळी गावाशेजारच्या दोन जुन्या विहिरी उकरून स्वच्छ करण्यात आल्या. ही काम उढेवाडीच्या गावकऱ्याकडूनच रोजगारीवर करून घेण्यात आली. कामावर हजर राहणाऱ्याना दरडोई ३ किलो या प्रमाणे ज्वारी देण्यात आली कारण पैशापेक्षाही अन्न-धान्य हीच त्याची मुख्य गरज होती

पिण्याच्या पाण्यासाठी मनोरजन गडाच्या मध्यावर असलेल्या टाक्यातल पाणी वापरल जाई. पण गावात नळाची व्यवस्था नव्हती. राजमाची ग्राम सहाय्य योजनेन मग हेही कामी हाती घेतल. मनोरजन बालेकिल्ल्यावरील तळ्यातील व टाक्यातील पाणी नळाद्वारे वसतीपर्यंत आणण्यात आले. या पाणी पुरवठा योजनेसाठी बेल्जममधील 'ग्रुप एस्पॉयर' सस्थेचे व 'कम्युनिटी एड स्पॉसरशिप प्रोग्राम' या सस्थेचे बहुमोल सहकार्य मिळाले होते १९८१ च्या डिसेंबरात उढेवाडीत जणू गगा जवतरली. गडावरून

लावून पाणी डोक्यावरून वाहून आणण्याच्या कामातून स्त्रियाना सुटका मिळाली. पाण्याचा दैनंदिन जीवनातील वापर वाढला त्यामुळे स्वच्छताही दिसू लागली.

## दारू : गावातील तणाव

गावात दारूच व्यसनही जबरदस्त होत व अद्यापही आहे. गावकऱ्याशी चर्चा करण्याच्या निमित्तान होणाऱ्या बैठकीमध्ये दारूचे दुष्परिणामही त्याना समजावण्यात आले. आरोग्याच्या दृष्टीन हे व्यसन नुकसानकारक असल्याच त्याना पटवून देण्यात काहीसं यश आल. कारण दारूबंदीसाठी गावकऱ्यानी स्वतःच प्रयत्न करायला सुरुवात केली. पुढाकार घेतला. दारू पिणाऱ्याला गाव सभा घेऊन दंड करीत असे. याचा खूपच चागला परिणाम झाला. बऱ्याच अशी व्यसन सुटण्यास मदत झाली. राजमाची ग्राम-सहाय्य योजनेनही दारूबंदी व्हावी यासाठी एक उपाय केला. उढेवाडीत जी कामे गावकऱ्याकडून करवून घेतली जात होती त्या कामावर दारू पिणाऱ्याला न घेण्याचा निर्णय घेण्यात आला. रोजगार न मिळण्याच्या भीतीपोटीही काहीनी व्यसन सोडले. कारण रोजगार ही त्याच्या जीवनातील एक महत्त्वाची बाब होती.

दारु पिणाऱ्याला रोजगारावर न घेण्याच्या आपल्या निर्णयाचा राजमाची ग्राम सहाय्य योजनेला लवकरच पुनर्विचार करावा लागला. दारूबंदीची शिस्त कोणी मोडली यावर लक्ष ठेवणे, साक्षी-पुरावे करणे, खरे-खोटे ठरवणे हे पोलिसी काम कठीण होऊ लागले. असे आढळून आले की अनेकांनी मनापासून दारू सोडलेली नव्हती. 'दारू पिणाऱ्याला' रोजगार नाही या नियमाची अमलबजावणी करण्यात अनेक कटकटी वाढल्या. गावात तट पडले. तणाव वाढला. मुळात हेतू खूप चागला होता. पण कार्यकर्त्यांना त्यापासून एक पाऊल मागे व्हावे लागले. ही अट काढून टाकावी लागली. गावकऱ्याच्या हितासाठी अजून बराच मोठा पल्ला गाठायचा होता. खूप गोष्टी करायच्या होत्या. त्यामुळे राजमाची ग्राम सहाय्य योजनेने माघार घेऊन आपला निर्णय बदलला. त्यामुळे काही गावकऱ्याची अशीही समजूत झाली असावी की आपण अडून राहिल्यास कार्यकर्त्यांकडून आपल्याला हवं ते करून घेता येतं. या प्रसंगामुळे कार्यकर्त्यांनाही एक नवीन अनुभव मिळाला. त्यामुळ कोणतेही निर्णय घेताना ते अधिक काळजीपूर्वक आणि पुढील परिणामाचा विचार करून घेऊ लागले. अर्थातच गावकऱ्यांनी वेळोवेळी दाखवलेल्या समजूतदारपणामुळ कार्यकर्त्यांना पुढे जाणे शक्य झाले.

गावाच्या विकासाची कामे गावकऱ्याकडूनच रोजगारीवर करून घेण्यामागे राजमाची ग्राम सहाय्य योजनेचा मुख्य उद्देश उढेवाडीच्या लोकाना गावातल्या गावातच रोजगार मिळवून देण हा होता. गावकऱ्याच्या रोजगारासाठी शासनाच्या रोजगार हमी योजनेचाही लाभ मिळवण्यात आला. राजमाचीला जाण्यासाठी वाहतुकीयोग्य रस्ता नसल्यामुळ गावकऱ्याची अत्यत गैरसोय होत असे. त्यासाठी राजमाची ते लोणावळा रस्ता शासनान तयार करावा या बाबत राजमाची ग्राम-सहाय्य योजनेचे प्रयत्न चालूच होते. खडाळा-कुणे-राजमाची या मार्गावरील ५ मैलाच्या कामाला रोजगार हमी योजनेची मजुरी मिळाली. काम सुरू करण्यात आले. गावकऱ्याना रोजगार मिळाला पण शेतीची काम सुरू झाल्यावर काम बद पडले.

राजमाची सभोवतालच्या वनातील चोरटी जगलतोड गावकऱ्यानी बद करावी या दृष्टीन गावकऱ्याना काही कायम स्वरूपाचा रोजगार उपलब्ध करून द्यावा या हेतून राजमाची ग्राम सहाय्य योजनेनं केलेल्या प्रयत्नाना तोड नाही. गावातील घरे, रस्ते बाधणं, तळी, टाकी साफ करणं इ. काम श्रमदान आणि रोजगारीवर करून घेतली जातच होती. पण पाण्याची टाकी, तलाव स्वच्छ करताना उपसलेल्या गाळाचा भात-खाचरं बनवण्यासाठी उपयोग केला गेला. डोगर उतारावरील जमिनीवर टेरेसिंग करून शेत जमिनीची सुधारणा करण्यात आली. तलावातील पाण्याचा वापर करून उन्हाळी हगामात भाजीपाला पिकवण्यासाठी गावकऱ्यांना सहाय्य देण्यात आलं मुळा, टोमॅटो, मिरची, वागी, दुधी भोपळा, कलिंगड इ. ची लागवड करण्यात आली. त्यानी पिकवलेली भाजी गावातील लोकाना मिळाली. राजमाची ग्राम सहाय्य योजनेन एक-दोन वर्ष भाजी, कलिंगड याची लागवड केली. त्या नतर गावकऱ्यानी स्वत. होऊन भाजीपाल्याची लागवड करावी अशी अपेक्षा होती. परंतु जमीन आणि पाणी उपलब्ध असूनही गावकऱ्यानी भाजी लागवडीबाबत उत्साह दाखवला नाही

शेती, भाजीपाला ही कामे तशी हगामीच होती. म्हणून उपजीविकेचे आणखी एक साधन या दृष्टीने शेळया पाळण्यासाठी सहाय्य देण्यात आल. शासनाच्या मागे योजनेखाली १० कुटुबांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्यात आल याचा गावकऱ्याना चागला उपयोग झाल्याचं पाहून राजमाची ग्राम-सहाय्य योजनेनेही देणग्या गोळा करून इतर गावकऱ्याना शेळया पाळण्यासाठी कर्जाऊ रक्कम दिली. शेळयाना रोग प्रतिबधक लस टोचण्याचीही व्यवस्था केली. शासनाच्या मागे योजनेखाली मिळालेल्या कर्जाचे हप्तेही गावकऱ्यानी वेळीच भरले. डिसेंबर १९७९ मध्ये मे. इदूरी फार्म लि याच्याकडून एक सकरित वळू देणगीदाखल मिळाला. त्याचे योग्य सगोपन करून गावातील गावठी गायीपासून सुधारित जातीच्या गायीची निपज करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वळूसाठी सकस आहार राजमाची ग्राम सहाय्य योजना देऊ लागली. गावकऱ्यानी त्या वळूचे संगोपन केले. परतु दोन-तीन वर्षांतच तो वळू काही आजाराने गेला त्या वळूपासून निपजलेल्या २-३ सकरित कालवडी आणि १-२ गोऱ्हे सध्या गावात आहेत. आज उढेवाडीत जवळ-जवळ प्रत्येकाकडेच गुर-ढोर आणि शेळया आहेत.

सरकारच्या मत्स्यपालन विभागाच्या मार्गदर्शनाखाली उढेवाडीत मत्स्यपालनाचाही प्रयोग करण्यात आला. उदय सागर तलाव गाळ उपसून साफ केला गेला होता. त्यामध्ये कटला, रोहू, मृगळ या जातीचे मासे सोडण्यात आले. पण अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे त्याच्या पुढच्या वर्षी याच प्रकारचे मासे बोटभर वाढवून मग तलावात सोडण्यात आले. त्याची वाढ चागली झाली. पण मत्स्यसवर्धन हे गावकऱ्याना उत्पन्नाच एक साधन म्हणून उपलब्ध करून देण शक्य झाल नाही. राजमाची ग्राम सहाय्य योजनेचा हा प्रयत्न विफल गेला.

उढेवाडी येथे मधमाशा पाळण्याच्या दृष्टीनही प्रयत्न करण्यात आले. हे शक्य

झाले असते तर मध गोळा करून त्याची विक्री करण्याचा रोजगार गावकऱ्याना उपलब्ध झाला असता. मे १९७८ मध्ये गावातील दोन तरुणाना राजमाची ग्राम सहाय्य योजनेला महाबळेश्वर येथे मधुमक्षिका पालनाच्या प्रशिक्षणासाठी ठेवलं. त्याचा ३ महिन्याचा प्रशिक्षणाचा खर्च सस्थेन केला. या तरुणानी राणी माशी पकडण्याचे प्रशिक्षण घेतले होते. प्रशिक्षण घेऊन आल्यानतर प्रत्यक्षात उढेवाडीला आपल्या प्रशिक्षणाचा, ज्ञानाचा उपयोग करण्याची सधी मात्र त्याना ताबडतोब मिळू शकली नाही. मधुमक्षिकापालनासाठी विशिष्ट प्रकारच्या पेट्याची आवश्यकता होती. त्या मिळवण्याचा प्रयत्नही केला जात होता. खादी ग्रामोद्योग मंडळाने व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थ-सहाय्य दिल पण प्रत्यक्षात पेट्या उपलब्ध होईपर्यंत दोन वर्षांचा कालावधी गेला होता. एवढ्या वेळेत प्रशिक्षित तरुणाचा उत्साहही मावळला आणि मधुमक्षिका पालनाचा व्यवसाय उढेवाडीत सुरूच होऊ शकला नाही. गावातील लोकाना स्वत:च्या पायावर उभ करण्याच्या दृष्टीनं राजमाची ग्राम–सहाय्य योजना सर्वतोपरी प्रयत्नशील होती. पण गावकऱ्याना त्यांच्या प्रयत्नाच्या गतीनं वाटचाल करणं जमत नव्हतं. डोगर-दऱ्यात राहाणारी ही माणस खूप मेहनत, काबाड-कष्ट करतात. परतु परपरागत प्रचलित उत्पादनपद्धती आणि जीवनक्रम सोडून काही नवीन करण्यासाठी, काही नवीन स्वीकारण्या-साठी जो उत्साह पाहिजे, त्या उत्साहाचा अभाव आहे. कदाचित असेही झाले असेल की जे काही नवीन त्याच्यापुढे माडले गेले ते त्याच्या दृष्टीने पुरेसे प्रभावी किंवा आकर्षक नव्हते.

राजमाची परिसरात बाबू उपलब्ध आहे. त्या पासून शोभिवत वस्तू बनवता आल्या तर त्याच्या विक्रीतून गावकरी कमवू शकतील अशा विचाराने ठाणे जिल्ह्यात घसई येथे केंद्र सरकारच्या हस्तकला मडळातर्फे चालवल्या जाणाऱ्या बाबू व वेतकामाच्या प्रशिक्षण वर्गात एका तरुणाला प्रवेश मिळवून देण्यात आला. प्रशिक्षणानंतर त्याने गावात अशा प्रकारचे काम सुरू करावे व इतर उत्साही गावकऱ्यानाही शिकवावे हा हेतू! पण प्रशिक्षण घेऊन आल्यानतर त्या तरुणाने त्याचा फारसा उपयोग करून घेतला नाही.

### रेशीम कोष योजना

उढेवाडीच्या परिसरात रेशीम उद्योगाला चागला वाव मिळेल अशा विचाराने राजमाची ग्राम सहाय्य योजनेने मग त्या दिशेनेही आपले प्रयत्न सुरू केले. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या पुण्यातील रेशीम केन्द्राच्या मार्गदर्शनाखाली तुतीची लागवड करण्यात आली. १९८० साली उदय सागर तलावाजवळ शेताभोवती दगडाचा गडगा बाधून व नवीन जमीन तयार करून सुमारे अर्धा एकर जमिनीत तुतीची लागवड करण्यात आली. त्याची योग्य देखभाल केल्यामुळ वाढही जोमान झाली. रेशीम किड्याचे सगोपन करण्यासाठी तुतीची पाने उपलब्ध झाली. उढेवाडीच्या श्री पाडू उबरे या तरुणाला पुण्यातील रेशीम केंद्रावर रेशीम किड्याच्या संगोपनाचे प्रशिक्षण देण्यात आले. राजमाची येथे आवश्यक साहित्य तयार करून रेशीम किड्यांचे सगोपन करण्यात आल. पाच किलो रेशीम कोष तयार करून ते खादी ग्रामोद्योग मंडळाला विकण्यात आले. प्रायोगिक स्वरूपातील या प्रयत्नाना आलेले यश पाहून राजमाची ग्राम सहाय्य योजनेने उढेवाडी येथे 'रेशीम उद्योग विकास योजना' हाती घेतली. सुमारे ५ एकर जमिनीवर निरगुडी, रामेण, करवदी सारखी झुडुपे तोडून तिथं तुतीची लागवड करण्यात आली. रेशीम किड्याचे सगोपन करण्यासाठी एक स्वतंत्र इमारत बांधण्यात आली. रेशीम किड्याच्या सगोपनासाठी लाकडी रॅक्स, ट्रेज व इतर साहित्यही उढेवाडीत तयार केल गेल. मधुमक्षिकापालनाच्या वेळी आलेल्या अनुभवाची पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी घेण्यात आली. १९८१ – ८२ मध्ये रेशीम कीटक सगोपनासाठी स्वतत्र इमारत (रेशीम घर) बाधून पूर्ण झाली. त्या वर्षी साडेसव्वीस किलो कोष पुण्याच्या रेशीम केंद्राला विकण्यात आले. रेशीम उद्योग विकासासाठी कॉम्प्यूटर मेंटेनन्स कॉर्पोरेशन लि व चर्चेस ऑक्झिलियरी फॉर सोशल ॲक्शन यानी अर्थसहाय्य दिले होते.

रेशीम कोष उद्योग यशस्वी होण्याची आशा होती पण चोरटी लाकूडतोड करणाऱ्यांना रोजगार द्यायचा नाही असं संस्थेनं ठरवल होतं. जे लोक चोरटी लाकूड तोड करत होते त्यानी सस्थेशी सहकार्य करण्याच नाकारल. तुती लागवडीसाठी ज्यान स्वत ची जमीन दिली होती त्यानही सहकार्य नाकारल. त्यामुळ रेशीम कोष योजना कार्यान्वित होऊ शकली नाही.

राजमाचीच्या गावकऱ्यानी सरकारी वनातील किंमती झाडाची चोरटी तोड व विक्री करण्यापासून परावृत्त व्हावे असा प्रयत्न राजमाची ग्राम-सहाय्य योजना सातत्याने करत असे. दारू व चोरटी लाकूडतोड या बाबत शिस्त पाळण्याचे गावकऱ्यानी मान्य केले व याबाबत नियत्रण ठेवण्यासाठी ५ गावकऱ्याची एक समितीही नेमण्यात आली. १९८४ फेब्रुवारीपर्यत या शिस्तीचे पालन सर्वानी काटेकोरपणे केले. पण त्यानतर मात्र काही कुटुबानी 'दारूबदी' व 'चोरटी लाकूडतोड न करणे' ही शिस्त पाळण्याचे नाकारले. त्यामुळे अशा कुटुबातील माणसाना सस्थेने हाती घेतलेल्या कामावर रोजगार देण्याचं बद केल. याचा परिणाम म्हणून तुती लागवड, आबराई यासाठी जमिनीचा वापर वगैरे बाबतीत अशा कुटुबाच सहकार्य मिळणं अवघड झालं. परतु दारू व लाकूडतोड या बाबतची शिस्त न पाळणाऱ्या गावकऱ्याचे सहकार्य मिळाले नाही तरी राजमाचीच्या इतर गावकऱ्यासाठी विविध कार्यक्रम व योजना सुरूच ठेवण्याच सस्थेन ठरवल लाकूडतोड थाबवण्याच्या प्रयत्नात सस्थेला यश न येण्याचं आणखी ही एक कारण आहे. लाकूडतोडीमागे अनेकांचे हितसबध गुतलेले आहेत. त्यामुळे ते पूर्णपणे थाबवण राजमाची ग्राम-सहाय्य योजनेला अनेक प्रयत्न करूनही अजून तरी शक्य झालेलं नाही.

चोरटी लाकूडतोड करणाऱ्याना व दारू-बदीची शिस्त न पाळण्याऱ्याना रोजगार द्यायचा नाही या निर्णयाचा सस्थेने पुनर्विचार केला. गावात सलोख्याच वातावरण रहाव या उद्देशान चोरटी लाकुडतोड व दारू या गोष्टी कडे लक्ष न देता सर्वांनाच रोजदारीच्या कामावर घेण्यात येऊ लागल. दारूच्या व्यसनातून प्रौढ गावकरी जरी अजून व्यसन

मुक्त होऊ शकले नसले तरी तरुण गावकरी या व्यसनाला बळी पडण्याचे थांबले आहे. या प्रकारच्या विचारप्रसारासाठी त्यांना शिक्षण देणं महत्त्वाच आहे कार्यकर्त्यांच्या मत्स्यपालन, मधुमक्षिका पालन, रेशीम विकासयोजना, बांबूकाम प्रशिक्षण यासारख्या विफल गेलेल्या सर्व योजनाबाबत गावकऱ्यांची साधारण प्रतिक्रिया अशीच दिसून येते की इतके सगळे पैसे या कामात वाया घालवले ते तसेच वाटले असते तर? कोणत्याही योजनेतून कायमस्वरूपी रोजगार मिळवण्याचे, स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे विचार अजून त्यांच्यात पूर्णपणे उतरले नाहीत. नवीन काम करायला, विचार करायला लावायचं तर शिक्षण हवंच! प्रत्यक्षात उढेवाडीत विकासकार्य करायच म्हणजे गावकऱ्यांना साक्षर करायच त्याना शिक्षण द्यायच हेही उद्दिष्ट राजमाची ग्राम सहाय्य योजनेच्या डोळ्यासमोर होते. त्यामुळे या संस्थेने इतर सर्व विकास-कार्य पार पडत असतानाच प्रथम शिक्षणावर भर दिलाच होता.

गावाची शैक्षणिक स्थिती यथातथाच होती. जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा होती इयत्ता तिसरीपर्यंत! ही शाळा काळभैरवाच्या देवळात भरत असे. २७ मुल-मुली शाळेत जात पण घरच्यांना शिक्षणाचे महत्त्व वाटत नसे १०–१५ जणाचा अपवाद सोडता बाकी सगळे प्रौढ स्त्री-पुरुष निरक्षरच होते. गावातल्या मुलांनी शाळेत नियमितपणे जाव यासाठी त्यांच्या पालकाना शिक्षणाच महत्त्व पटवण व थोड फार साक्षर करणही जरुरीचं होत. यासाठी उढेवाडीत राजमाची ग्राम-सहाय्य योजनेने प्रौढ साक्षरता वर्ग सुरू केले.

## साक्षरतेच्या पलीकडे

दर शनिवारी रात्री प्रौढ साक्षरता वर्ग भरत असे. त्यासाठी लागणारी पुस्तके लेखन साहित्य, दिवाबत्ती इ. ची सोय राजमाची ग्राम सहाय्य योजनेने केली. या संस्थेचे कार्यकर्तेच या वर्गात शिकवत. निरक्षराना लेखन-वाचन शिकवले जात असे. पण प्रौढ शिक्षण वर्गाचा उद्देश गावकऱ्याना केवळ अक्षर-ओळख करून देणं हा नव्हता. त्या निमित्तानं गावकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत अशा प्रश्नाची चर्चा करण व इतर विषयांबाबत माहिती देणं यावर वर्गात भर दिला जात असे. वर्गात त्यांना वर्तमान पत्रातील काही सामाजिक स्वरूपाच्या बातम्या वाचून दाखवल्या जात असत. त्यातून त्याना बोलत केल जाई. ' साप चावल्यावर काळभैरवाच्या देवळात रोग्याला नेऊन ठेवलं किंवा मंत्रोपचार केले तर माणूस वाचतो ' अशासारख्या अंधश्रद्धेच्या निर्मूलनासाठी त्याना निवडक बातम्या वाचून दाखवून, इंजेक्शन्स व औषध यांच्याशिवाय काही रोगावर कसा दुसरा काहीच इलाज नाही अशा गोष्टी त्यांच्या मनावर ठसवल्या जात असत.

प्रौढसाक्षरता वर्गात उपस्थिती २०-२५ पर्यंत असे. वर्ग रात्री ८ नतर सुरू होत. त्यामुळे स्त्रियाही येत. या वर्गातून काही गावकऱ्याना अक्षरओळख झाली. नवीन शिकलेली अक्षरे पक्की ठसावीत म्हणून गावात अक्षराचे फलक लावण्यात आले नळावर पाणी भरायला येणाऱ्या स्त्रियाची जाता येता त्या फलकावर नजर जाई व रात्री वर्गात शिकवलेल्या अक्षराची उजळणी होई

उढेवाडीत प्रौढ साक्षरता वर्ग जवळ-जवळ २ वर्षे चालले. या वर्गातली उपस्थिती जरी समाधानकारक असली तरी त्यामध्ये स्थिरता नव्हती. आज आलेले लोक पुढच्या वेळी नसत. सख्या जवळ-जवळ तितकीच पण उपस्थितात नवीनच लोक! पुन्हा नवीन मधले २-४ गायब आणि जुन्यांची उपस्थिती. या अनियमिततेमुळे प्रौढ साक्षरता वर्गातून लिहिता-वाचता येण्याइतपत कोणी शिकू शकले नाही. अक्षर ओळख थोडी-फार सर्वांनाच झाली. पण लिहिता-वाचता येण्याइतपत नाही. अर्थातच प्रौढ साक्षरता वर्गांचा उद्देश प्रौढाना केवळ साक्षर करणं हा नव्हताच! गावकरी आणि कार्यकर्ते यामध्ये संवाद साधला जाण, गावकऱ्याना बोलत करण, विचार करायला लावण, त्याना धीट बनवणं आणि आरोग्य, स्वच्छता, व्यसनमुक्ती, शेती, कामधंदा, वृक्षसवर्धन, शिक्षणाचे महत्त्व, महत्त्वाचे सण, राष्ट्रीय महत्त्वाचे दिवस इ. ची थोडी-फार माहिती होण्याच्या दृष्टीने चर्चा घडवून आणणं हाही प्रौढ साक्षरता वर्गाचा उद्देश होता. तो मात्र यशस्वी झाला. प्रौढ साक्षरता वर्गाच्या माध्यमातून सस्थेच्या कार्यकर्त्यांना गावकऱ्यांशी जवळीक साधता आली.

प्रौढ साक्षरता वर्ग साधारणपणे १९८३ पर्यंत चालले. नतर त्यात खंड पडला. गावकऱ्याना लिहिता-वाचता येण्याची आवश्यकता वाटत नसावी. आपल्या मुलानी मात्र शिकावं असं त्याना वाटू लागलं. त्यामुळं मुलांची शाळेतील उपस्थिती वाढली.

पुणे जिल्हा परिषदेन चालवलेल्या उढेवाडीच्या शाळेत १६ मुलाना कम्युनिटी एड अँड स्पाँसरशिप प्रोग्राम ( कास्प ), मुबईया सस्थेकडून १९७८ मध्ये स्पॉन्सरशिप मिळाली. या योजनेमार्फत कपडे, पादत्राणे, पुस्तके व लेखन-साहित्य, शिकवणी इ साठी प्रत्येक विद्यार्थ्याला वार्षिक रु ३६०/– पर्यंत सहाय्य मिळते. उढेवाडी हे गाव मुबईपासून दूर असल्यामुळं स्पॉन्सरशिप योजनेखाली मुलाना साहित्य पुरवणे, अहवाल सादर करणे वगैरे जबाबदारी 'कास्प' ने राजमाची ग्राम-सहाय्य योजनेवर सोपवली. कास्पची स्पॉन्सरशिप मदत राजमाची ग्रामसहाय्य योजनेनेच मिळवून दिली. ही मदत जरी काही थोडक्या मुलासाठीच मंजूर झाली तरीही शाळेतील सर्व मुलाना गणवेश, पुस्तक, पादत्राणे-लेखन साहित्य इ. वस्तू सस्थेकडून पुरवण्यात येतात. १९७९ मध्ये मावळ तालुका पचायत समितीने उढेवाडीच्या प्राथमिक शाळेत चौथीचा वर्ग सुरू करायची परवानगी दिली. राजमाची ग्राम-सहाय्य योजनेने ज्या मुलांना स्पॉन्सरशिप मिळालेली नाही त्यानाही ती मिळवून देण्याचे प्रयत्न केले. तसेच पाचवीचा वर्ग सुरू करण्यासाठी मावळ तालुका पचायत समिती आणि पुणे जिल्हा परिषदेकडे प्रयत्न केले सस्था प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीबर लक्ष ठेवते

१९७९ पर्यंत उढेवाडीतील प्राथमिक शाळा काळभैरवाच्या देवळातच भरत असे. राजमाची ग्राम-सहाय्य योजनेने देऊळ स्वच्छ व नीटनेटके केले होतेच परतु हे मदिर गावापासून दूर अतरावर उच जागी असल्यामुळे पावसाळ्यात मुलाना शाळेत जाणे अडचणीचे होत असे. राजमाची ग्राम-सहाय्य योजनेने उढेवाडीत गावालगत शाळेसाठी इमारत उभी केली. आतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त बालकोपयोगी अशा योजनासाठी कॉम्प्युटर मेन्टेनन्स कॉर्पोरेशन या सार्वजनिक क्षेत्रातील

कंपनीने सहाय्य देण्याचे ठरवले. त्याच्यातर्फे उढेवाडीत शाळेच्या इमारतीसाठी पंधरा हजार रु. ची देणगी मिळाली. उढेवाडीतील जमीन-मालक श्री. भाई देशपांडे यानी गावालगतची जमीन देणगीदाखल दिली. त्याचे बहुमोल सहाय्य, शिबिरार्थींचे श्रमदान, गावकऱ्यांची मेहनत व संस्थेचे अविरत प्रयत्न यातून उढेवाडीत १९८० मध्ये शाळेची इमारत डौलात उभी राहिली. त्याच वेळी इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू करण्याचीही परवानगी मिळाली. शाळेतील मुलांची वाढती उपस्थिती पाहून आणखी एका शिक्षकाची नेमणूक करण्याची विनंती तालुका पंचायतीकडे व जिल्हा परिषदेकडे करण्यात आली. ती मान्य होऊन १९८१ पासून दोन शिक्षकांची नेमणूक झाली. गेली ३-४ वर्षे मात्र या शाळेत एकच शिक्षक आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य शिक्षण अधिकाऱ्यांनी १९८१ मध्ये पूर्वसूचना न देता अचानक शाळेला भेट दिली. शाळेचे कामकाज व प्रगती पाहून त्यानी समाधान व्यक्त केले. प्रगतिपथावरील आदर्श शाळा म्हणून जिल्हा परिषदेने या शाळेची निवड केली त्या वेळचे शिक्षक श्री. गादेकर याना पुरस्कार देऊन गौरव केला.

उढेवाडीला भेट देणारे संस्थेचे कार्यकर्ते दर साप्ताहिक भेटीत मुलाना एकत्र जमवून खेळ, गाणी, गोष्टी वगैरे कार्यक्रम घेतात. त्यांच्या अभ्यासाची विचारपूस करतात. स्वच्छता, टापटीप, आरोग्य वगैरे दृष्टीने मुलांची पाहणी केली जाते.

उढेवाडीतील शाळा सध्या इयत्ता पाचवी-पर्यंतच आहे. पाचवीच्या पुढचे शिक्षण घेण्यासाठी मुलाना बाहेरगावी जावे लागते. राजमाची ग्रामसहाय्य योजनेच्या प्रयत्नाने पाचवीच्या पुढे शिक्षण चालू ठेवण्यासाठी राजमाचीतील काही मुला-मुलींना शहरातील कुटुंबात ठेवण्यात आले. ग्रामीण भागातील गरीब मुलांबद्दल आस्था असलेल्या व्यक्तींनी या मुलाना आपल्या कुटुंबात सामावून घेतले. त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. संस्थेने मुलांच्या शाळा प्रवेशाची व्यवस्था केली.

१९८६ मध्ये रंगनाथ भिकू बरे हा उढेवाडीचा विद्यार्थी ६६ टक्के गुण मिळून व १९८७ मध्ये मधुकर रामभाऊ उबरे ५२ टक्के गुण मिळून शालांत परीक्षा उत्तीर्ण झाले. संस्थेने तसेच रंगनाथ व मधुकरने शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांचे हे फळ होते! आज उढेवाडीतील ५-६ मुलं मुंबई, ठाणे, लोणावळा येथे शिक्षणासाठी राहात आहेत.

राजमाचीसारख्या खेड्यातील प्राथमिक शाळेतून शहरात येणारी मुलं सुरुवाती-सुरुवातीला नव्या शहरी वातावरणाला बुजतात. पण कालांतराने ती जुळवून घेतात. ज्याना वरच्या इयत्तेतील अभ्यासक्रम अवघड वाटतो ती शिक्षण सोडून घरी परतण पसंत करतात. घरी धाकट्या भावंडाना सांभाळण्यासाठी मोठ्या भावंडांचा उपयोग होतो म्हणूनही काही पालक मुलांच्या पुढील शिक्षणासंबंधी अनुत्सुक असतात. शहरात शिकायला ठेवलेली काही मुलं पळून आपल्या गावात गेल्याचीही उदाहरणं आहेत. वातावरणातील बदल, वाढता अभ्यासक्रम न झेपणं अशीही कारण यामागे असू शकतात. काही घरांमध्ये मुलांना घरगड्याची वागणूक दिली गेली अशी मुलानी संस्थेच्या कार्यकर्त्यांकडे तक्रार केल्यावर त्यांना ताबडतोब तिथून दुसरीकडे नेण्यात आलं. संस्था त्यामुळे या बाबतीत खूपच दक्ष आहे. कार्यकर्ते अशा प्रकारे बाहेर राहणाऱ्या मुलाना वेळोवेळी भेटतात व त्यांची चौकशी करतात. त्याना अभ्यासात मदत करतात.

उढेवाडीतील मुलाना बाहेरगावी वाईट वागणूक देणारे पालक क्वचितच भेटले. नीट चौकशी करून व दत्तक मुलगा किंवा मुलगी म्हणूनच त्याना सोपवलं जातंय याची जाणीव ठेवूनच संस्था मुलाना त्यांच्याकडे शिकायला ठेवते. मुलाना मालक नकोत, पालक हवेत. काही पालक या दत्तक मुलांचा सांभाळ तर करतातच पण त्यांच्या अभ्यासाकडेही लक्ष पुरवतात. तरीही त्याना काहीच न सांगता घरी पळून जाणारेही काही विद्यार्थी आहेत. शिक्षणाबद्दल नावड, घरची ओढ, नव्या वातावरणात वाटणारी असुरक्षितता त्याना असं करण्यास उद्युक्त करत असावी. संस्था अशा मुलांवर शिक्षणाची सक्ती करत नाही संस्थेचे कार्यकर्ते वेळोवेळी मुलाना पालक मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असतात. पुढे शिकू इच्छिणाऱ्यांना संधी मिळवून देणं हा हेतू!

उढेवाडीतील शालान्त परीक्षा प्रथम पास झालेल्या विद्यार्थ्यास राजमाची ग्रामसहाय्य योजनेनं ठाण्याच्या महाविद्यालयात दाखल केलं. पण तो पहिल्याच वर्षी नापास झाला. कुवतीबाहेरचा अभ्यासक्रम त्याला पेलला नाही आणि पहिल्याच अपयशान नाउमेद होऊन तो शिक्षण सोडून निघून गेला. रंगनाथ आणि मधुकर सध्या पुण्यात छोटीशी नोकरी करत आहेत. राजमाची येथील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण करावे, त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी स्वतःला मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग, त्यानी त्यांच्याच समाजातील गोरगरीब मागासलेल्या लोकांच्या प्रगतीसाठी करावा असा राजमाची ग्रामसहाय्य योजनेचा प्रयत्न होता व आहे.

पुढील वर्षी दोन मुली शालांत परीक्षेला बसतील. बाहेर गावी शिकणाऱ्यांपैकी मुलींमध्ये डी. एड वगैरे करून गावातच किंवा आजूबाजूच्या परिसरात जाऊन आपल्या शिक्षणाचा उपयोग करायचे विचार अजून तरी दिसताहेत. शाळेत जाणाऱ्यात मुलींची संख्या जास्त आहे. त्यांच्यात शिक्षणाची आवड जास्त आहे. बाहेरगावीही परक्या घरी मुली मुलांच्या मानाने लवकर सामावून जातात घरकामाची सवय असल्याने मुळातच त्यांच्यात आळशी वृत्ती कमी आहे. अभ्यासातही त्याचा मेहनत करण्याकडे कल दिसून येतो.

## अद्याप वीज का नाही ?

संस्थेच्या स्त्री कार्यकर्त्या १५ दिवसातून किंवा महिन्यातून किमान एकदा जाऊन मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवतात. त्या नोकरी करणाऱ्या असल्यामुळं साहजिकच शनिवारी रविवारी उढेवाडीला जातात. रविवारी शाळेचा सुट्टीचा दिवस असूनही मुलं शाळेत येतात. इतर शाळेच्या दिवसासारखाच त्या दिवशीही वर्ग भरतो आणि मुलाना गाणी, गोष्टी शिकवल्या जातात. त्यांचा अभ्यास घेतला जातो. मुलं दात घासतात की नाही, नख कापलेली आहेत की नाहीत हे पाहिले जातं. गावकऱ्यांकडूनही त्याना चांगलं सहकार्य मिळतं. गावकरी स्त्री कार्यकर्ते आणि पुरुष कार्यकर्ते असा भेद करत नाहीत पण नवे कार्यकर्ते आणि जुने

कार्यकर्ते असा भेद करतात. नव्या कार्यकर्त्यांना कोणत्याही अडचणी सागताना ते 'त्या अमुक अमुकना अस सांगा ' अशा स्वरूपात सागतात. जुन्या कार्यकर्त्यांनी संपादन केलेला विश्वास अजून नवीन कार्यकर्त्यांना मिळालेला नाही. नवीन कार्यकर्ते नेमून ठरवून दिलेली कामे जबाबदारीनं पार पाडतात. पण स्वतःच्या जबाबदारीवर एखाद काम सुरू करण्याच्या दृष्टीन स्वत.ला झोकून देणाऱ्या कार्यकर्त्यांचा, सध्या इतर कोणत्याही स्वयसेवी चळवळीना जाणवणारा अभाव राजमाची ग्रामसहाय्य योजनेलाही जाणवतो आहे.

काही गावकऱ्याचा त्यांच्या आपसांतील भाडणामुळे थोडासा छुपा विरोध असतानाही विकासकार्य चालूच ठेवण्याचा निर्णय जरी संस्थेनं घेतला असला तरी कार्यकर्त्यांच्या अभावामुळ व उढेवाडीच्या दुर्गम स्थानामुळं गेल्या ३ वर्षात उढेवाडीत नवीन कोणतीच विकास योजना हाती घेता आलेली नाही. तरीही आतापर्यंत राजमाची भाग सहाय्य योजनेनं हाती घेतलेल्या कार्याची माहिती जास्तीत जास्त लोकांना, विशेषतः तरुण वर्गाला व्हावी आणि त्यानी या कार्यात सहभागी व्हावं या हेतूनं सस्थेने वेळोवेळी श्रम-शिबिरही आयोजित केली. आत्तापर्यंत जवळ जवळ २५-३० श्रम-शिबिरं घेतली गेली. त्यातून अनेकाना राजमाचीच्या कार्याची माहिती मिळाली. उढेवाडीतील विकास-कार्य पाहून त्यातून सामाजिक जाण असणारा एखादा डोळस कार्यकर्ता निर्माण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शिबिरार्थी बरोबर गावकरीही श्रमदानामध्ये सहभागी होतात. त्याच्यातही शिबिरामुळे थोडे उत्साहाचे वातावरण पसरते.

एका तपानतर आज उढेवाडीकडे पाहिलं तर गावाचा सपूर्ण कायापालट झालेला दिसतो. गावातल्या कॅबळी झोपडयांच्या ऐवजी आता पत्र्याची छप्परं असलेली घरं झाली आहेत. सस्थेन घराची रचनाही त्यातल्या त्यात व्यवस्थित रस्ते ठेवून केली आहे. सर्वत्र स्वच्छता व मोकळेपणा दिसतो. हा झाला बाह्य फरक ! पण उढेवाडीचे केवळ बाह्य रगरूप पालटलेले नाही. त्याचे अंतरगही बदलले आहे. कार्यकर्ते बोलायला गेले की मागे-मागे सरकणारे लोक धीटपणे बोलायला शिकलेत. स्वतंत्रपणे विचार करायला लागलेत. इतकेच नव्हे तर सस्थेकडून त्यांच्या अपेक्षाही वाढल्यात् ! " १२ वर्षे काम करून अजून आमच्या गावात वीज का नाही " ? हा गावकऱ्याचा सवाल म्हणजे त्यांच्या अपेक्षा उंचावल्याचेच द्योतक आहे. वळवंडे व उढेवाडी मिळून ५० घरं ! त्यासाठी वीज देण अग्रक्रमाची गोष्ट नसल्यानं राजमाची अजून अंधारातच आहे. पण आता त्यांना प्रश्न पडायला लागलेत. ज्याला प्रश्न पडतात तोच उत्तरं शोधतो आणि त्याला मार्गही सापडतो. फक्त त्यासाठी प्रयत्नाची आणि कष्टाची जोड हवी. जशा संस्थेकडून गावकऱ्याच्या अपेक्षा वाढल्यात त्या प्रमाणेच संस्थाही आता गावकऱ्यांकडून काही अपेक्षा करते. कार्यकर्त्यांना वाटतं आता नवीन कामात पुढाकार गावकऱ्यांनीच घ्यायला हवा सुरुवात त्यानीच करायला हवी तांत्रिक मदत व इतर माहिती, कार्यकर्ते व संस्था देईल पण मुख्य प्रयत्न गावकऱ्यानी करायला हवेत. इतकी वर्षं गावात सहकार्यानं काम केल्यावर साहजिकच संस्थेलाही गावकऱ्यांकडून किमान इतक्या अपेक्षा असणं गैर नाही गोबर गॅस प्लँट राजमाचीत आला पाहिजे ही गावकऱ्याची मागणी आहे, त्यासाठी त्याच्या प्रयत्नाची जोड कितपत मिळते तेही महत्त्वाचं आहे. उढेवाडीच्या पुढच्या विकासाचा वेग गावकऱ्यांच्या प्रयत्नावर व एकजुटीवरही अवलंबून आहे. संस्था, शिक्षण आरोग्य, सामाजिक वनीकरण इ. कार्यक्रम आपल्या शक्तीनुसार राबवण्याचा प्रामाणिक प्रयत्न चालू ठेवणारच आहे. त्यात येणाऱ्या अडचणीवर मात करण्याची उमेद कार्यकर्ते बाळगून आहेत.

राजमाची ग्राम-सहाय्य योजनेनं उढेवाडीत केलेल्या आजवरच्या कामाचं मूल्यमापन त्याच्या विकास-योजनाच्या यशापयशाचं गणित माडून करता येणार नाही. प्रत्यक्ष काम करायचं ठरवताना निश्चित यशाचा कोणताच टप्पा कोणतीही संस्था डोळ्यांसमोर ठेवत नाही. अनेक अडचणी येतात. त्याना तोड देत पुढची वाटचाल सुरूच असते. राजमाची ग्राम-सहाय्य योजनेचे कार्य अजून चालूच आहे. शिकून मोठथा होणाऱ्या उढेवाडीतल्या मुलाकडून आशादायक चित्र डोळ्यासमोर दिसत आहे. आपल्या मातीची ओढ असणाऱ्या आणि त्यामुळंच हलाखीच्या स्थितीतही उढेवाडी सोडून अन्यत्र न गेलेल्या गावकऱ्याना राजमाची ग्राम-सहाय्य योजना वनीकरणाचे महत्व पटवून देण्याच्या प्रयत्नात आहे. झाडाची लागवड आणि त्यातून होणारे फायदे दाखवून देण्याच्या प्रयत्नात आहे. यासाठी फणस, काजू यासारख्या झाडाची लागवड ही केलीय. सामाजिक वनीकरण हे एक साधन व्हाव या दृष्टीन सस्था प्रयत्नशील आहे. यासाठी सस्थेने उढेवाडीत जमीन खरेदी केली आहे गोबर गॅस प्लँट ही सुद्धा भावी काळातील एक योजना उढेवाडीत साकार करायची आहे यशापयशाचा विचार न करता संस्थेच्या प्रयत्नाची मालिका अखडपणे सुरूच आहे. राजमाची ग्राम सहाय्य योजनेच्या सामाजिक वनीकरणाच्या प्रयत्नातून लवकरच उढेवाडीत नदनवन अवतरलेलं पहायला मिळावं ही अपेक्षा !

आजच्या वाढत्या लोकसख्येला अपुऱ्या पडणाऱ्या सरकारी योजना आणि जनसामान्यांचा विश्वास गमावून बसलेले राजकीय पक्ष याकडून सामाजिक विकासाची अपेक्षा करणं व्यर्थ ठरत असताना, राजमाची ग्रामसहाय्य योजनेसारख्या स्वयसेवी सस्थांकडेच समाज मोठ्या आशेने पाहतोय ! उढेवाडी सारखी अनेक गावे आज ठिकठिकाणी प्रकाशाच्या नव्या किरणाची, राजमाची ग्रामसहाय्य योजनेसारख्या एखाद्या संस्थेची, वाट पहात आहेत !

□


**निर्माणपर्व**

**श्री. ग. माजगावकर : ४० रुपये**

या पुस्तकाचा विषय आहे
'विकसनशील भारत.'.
७० ते ८० या खळबळजनक कालखंडातील हे चिंतन. शहादे चळवळ, जेपींचे बिहार आंदोलन, आणीबाणी, जनतापक्षप्रयोग, ग्राहक चळवळ, म्हैसाळप्रयोग.

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे.

# बांधिलकी अवघी सहा वर्षांची... फक्त स्त्रियांची...

## शीला बक्षी

आज जग एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहे. जगात नुसती प्रगतीची घोडदौड चालू आहे. त्यात भारतही आपल्या परीने प्रगतीची वाटचाल करीत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात समाजातील सर्व थरांतील लोकांची उन्नती व्हावी म्हणून तज्ज्ञांनी अनेक योजना आखल्या. अस्पृश्यता, हुंडा, निरक्षरता, बालविवाह, वेश्याव्यवसाय, देवदासी प्रथा, वेठबिगारी या सर्वांचे उच्चाटन व्हावे म्हणून अनेक कायदे केले गेले. या सर्वांचे फलित काय ? याचे उत्तर वर्तमानपत्रांतल्या बातम्याच आपल्याला देतील.

सध्याचे युग हे संगणकाचे युग आहे. नवीन शैक्षणिक धोरणात तर संगणकाचा शिक्षणात वापर व्हावा अशी अपेक्षा आहे. संगणकाचे विविध उपयोग व अध्ययनाचे माध्यम म्हणून त्याची प्रभावी क्षमता यांच्याशी मुलांनी तसेच शिक्षकांनी परिचित व्हावे म्हणून सध्या ७५० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मायक्रो कॉम्प्युटर्स पुरविण्यात आले आहेत. अशा या संगणकाच्या युगात जाऊ इच्छिणाऱ्या या देशातील बरेच आदिवासी लोक अत्यंत हलाखीचे किंवा आदिम अवस्थेतील जीवन जगत आहेत. त्यांच्या मुलांनी पाटी पाहिलेलीच नाही. एकीकडे संगणक हाताळणारी मुले तर दुसरीकडे पाटीही न पाहिलेली मुले ! अत्यंत निराशाजनक चित्र आहे हे! या आदिवासींची उन्नती व्हावी म्हणून वेगवेगळ्या योजनांच्या द्वारे त्यांना सरकारकडून आर्थिक मदत दिली जाते. त्यांच्या उन्नतीसाठी सरकारी यंत्रणा राबत आहेत. तरीही त्यांची म्हणावी तशी म्हणजे नेत्रदीपक प्रगती झालेली नाही. अशा वेळी तुकारामांच्याच शब्दात सांगायचे तर—

" ऐशी कळवळ्याची जाती ।
करी लाभावीण प्रीती । "

अशा वृत्तीने काम करणाऱ्या माणसांचीच आज गरज आहे. एक काळ असा होता की, त्या काळात महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, महर्षी कर्वे, आगरकर यांच्यासारखी मंडळी या महाराष्ट्रात जन्माला आली. या लोकांनी सर्वस्वी समाजकार्याला वाहून घेतले हे सर्वश्रुतच आहे. त्यांच्या तत्त्वापायी त्यांना त्रास सहन करावा लागला. तरी ही मंडळी त्या तत्त्वांपासून दूर गेली नाहीत. आजही या समाजसेवकांच्या पावलांवर पाऊल टाकून काम करणाऱ्या कित्येक व्यक्ती आहेत. त्या आपल्या परीने, आपल्याला झेपेल तसे समाजकार्य करीत आहेत. अशा व्यक्तींनीच अनेक सेवाभावी संस्थांची निर्मिती केली आहे.

' बांधिलकी ' ही सुद्धा अशीच एक संस्था आहे. अवघी सहा वर्षांची ! फक्त स्त्रियांची ! ग्रामीण भागातील स्त्रिया मुले वगैरेंच्या सर्वांगीण उन्नतीसाठी धडपडणारी. या संस्थेचे कार्यालय आहे मुलुंडला, पण कार्यक्षेत्र मात्र कर्जतपासून (जि. रायगड) १० कि. मी. वर असलेल्या राजमाची या ऐतिहासिक किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या परिसरात ! इथे सुमारे ५० टक्के आदिवासी लोक राहतात. या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती, परंतु शेतीपासून मिळणारे उत्पन्न अत्यंत तुटपुंजे. गुरे-ढोरे, शेळ्या, मेंढ्या काही प्रमाणात आहेत. परंतु दूधदुभते फारसे नाही. एकूण आर्थिक स्थिती बिकटच ! अपुरा आहार, अपुरे कपडे, चांगल्या घरांचा अभाव अशी स्थिती अद्यापही या भागात आहे. एकूण काय बहुसंख्य जनता दारिद्र्यरेषेखालीच आहे.

अशा या परिसरात ' बांधिलकी ' ही संस्था सुरू करण्याचे श्रेय आहे स्मितताई जोशी यांनाच. त्या व्यवसायाने शिक्षिका. भांडूपच्या मुंबई महानगरपालिकेच्या ईश्वरनगर शाळेत काम करणाऱ्या स्मितताईंनी सामाजिक कार्यासाठी ग्रामीण भागच का निवडला ? असा प्रश्न निर्माण होणं साहजिकच आहे. स्मितताई या पूर्वाश्रमीच्या कुसुम गोंधळेकर. त्यांचे बालपण रत्नागिरीतील एका खेड्यात व्यतीत झालेले. त्यामुळे खेडेगावातील स्त्रीचे जीवन त्यांनी अगदी जवळून पाहिले होते. चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र. अज्ञान, अनारोग्य, दारिद्र्य यांनी ग्रासलेल्या स्त्रिया त्यांच्या मनात घर करून राहिलेल्या. त्यांच्यासाठी काहीतरी करावे असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यांचे बंधू श्री. गोंधळेकर व त्यांचे सहकारी यांनी ' राजमाची ग्राम-सहाय्य योजना ' सुरू केली होती. त्यांच्याबरोबर त्या उढेवाडीला ( राजमाची ) जात. त्यांच्याबरोबर काम करत. एवढेच नव्हे तर त्यांनी व्याख्याने, योगासनांची शिबिरे या निमित्ताने मिळालेले मानधन संस्थेला देणगी म्हणून दिले. पण एवढ्यावर त्यांचे मन स्वस्थ राहीना. राजमाचीहून डोंगरकपारीतून खाली येताना त्यांनी पायथ्याशी असलेली सांगवी, कोंढवणे, ठाकरवाडी, सालपे, खरवंडी ही खेडी पाहिली. या गावांमध्ये अद्याप कुणी कामाला सुरुवात केली नव्हती. त्यामुळे सामाजिक कार्यासाठी त्यांनी हाच परिसर निवडला.

ग्रामीण स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी काम करायचे म्हणजे ते विविधांगीच ! एकटीला हा कामाचा गोवर्धन उचलणे अशक्य ! यासाठी कुणाचा तरी सहभाग आवश्यक. स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करायचे. स्त्रियांच त्यांची दुःखे, अडचणी जाणू शकतात, म्हणून त्यांना स्त्रियांचा सहभाग आवश्यक वाटला. उढेवाडीतही काम करावे असेही वाटत होते, पण त्या

ठिकाणी शहरी स्त्रियांचे सहकार्य मिळणे त्याना कठीणच वाटले. उढेवाडीला जायचे म्हणजे लोणावळ्याहून १६ कि. मी चालत जायचे. येताना डोंगरकपारीतून कोदिवड्याला कर्जतच्या बाजूने उतरायचे. हे दिव्य करायला कितीजणी तयार होणार? शिबिराच्या आणि पदभ्रमणाच्या हेतूने आलेल्या दहा तरुण मडळीतून एखादा दुसरा कार्यकर्ता राजमाची ग्रामसहाय्य योजनेला मिळायचा हे त्यानी पाहिले होते. त्यामुळे मध्यमवयीन स्त्रियाच्या दृष्टीने पायथ्याजवळचीच खेडी योग्य असे त्यांना वाटले. विशेषतः स्त्री ही चाळिशीच्या दरम्यान कौटुंबिक जबाबदारीतून थोडी मोकळी होते. तिच्या ज्ञानाचा-अनुभवाचा ओघ आपल्याला तिकडे वळवून घेता येईल. डोंगरमाथ्यावरच्या गावात काम केल्यास या मध्यमवयीन स्त्रियाचे सहकार्य मिळणे त्याना कठीण वाटले, म्हणून त्यानी राजमाचीच्या पायथ्याशी असलेली ही खेडी निवडली. या सर्व भगिनींनी १९८० सालापासून कामाला सुरुवात केली आणि १९८४ ला सस्था रजिस्टर होऊन अधिकृतरीत्या कामाला सुरुवात झाली. अशा प्रकारे स्मितातार्इंच्या मनातील कल्पनानी, विचारांनी 'बाधिलकी' *या सस्थेच्या रूपाने आकार घेतला.*

'बाधिलकी' आज नावाप्रमाणे द्वयर्थी आपल नाव सार्थ करीत आहे. ग्रामीण भागातील स्त्रिया असोत किंवा शहरी भागातील स्त्रिया असोत, त्याचे समाजातील स्थान दुय्यमच. फरक एवढाच की ग्रामीण भागातील स्त्रिया या दारिद्र्य-अधश्रद्धा-रूढी याच्या बधनात अडकलेल्या. 'बांधिलकी' म्हणजे बधन. या स्त्रियाना या सर्व बधनातून मुक्त करण्याची 'बाधिलकी' या भगिनींनी स्वीकारली. सस्थेच्या नावातूनच तिचे कार्य लक्षात यावे. आज जवळ जवळ ७० स्त्रिया या सस्थेच्या सभासद आहेत. विशेष म्हणजे या सर्व डोंबिवली, ठाणे ते बोरीवली या परिसरातील नोकरी करणाऱ्या मध्यमवयीन, मध्यमवर्गीय स्त्रिया आहेत. ह्या सस्थेत वेळप्रसगी पुरुषाचे सहकार्य घेतले जाते, पण पुरुष सभासद या सस्थेत नाहीत. हेतू हा की सस्थेत काम करण्याची स्त्रियाना जास्तीत जास्त सधी मिळावी व आपणही कार्य करतो याचा आनंद त्यांना मिळावा.

ग्रामीण भागात कामाला सुरुवात कशी करायची, हा महत्त्वाचा प्रश्न होताच. सस्थेच्या कार्यकर्त्या शहरी, सुशिक्षित स्त्रिया. कार्यक्षेत्र ग्रामीण परिसर. लक्ष्य ग्रामीण स्त्रिया. अशा परिस्थितीत कामाचा 'श्रीगणेशा' करायचा म्हणजे विचारपूर्वकच करायला हवा. सभा घेतली तर तेथील लाजऱ्या-बुजऱ्या भगिनी येणे अशक्य. तिळगूळ समारंभासारखा समारभ ठेवला तर बायका हमखास येणार. त्या बायकाना तो धार्मिक समारभ वाटला तरी तो त्याची शास्त्रीय बाजू व सामाजिक आशय लक्षात घेऊनच भगिनींनी सुरू केला. विशेषत. हे कार्यक्रम शहरातील महिला मडळाच्या सहकार्याने घडवून आणले. साहजिकच शहरी स्त्रियाच्या मनात तेथील स्त्रियाबद्दल जवळीक निर्माण झाली. त्यातून काही कार्यकर्त्याही मिळाल्या. ज्याप्रमाणे 'राजमाची ग्रामसहाय्य योजना' या सस्थेला शिबिरातून, पदभ्रमणातून तरुण कार्यकर्ते मिळाले, त्याप्रमाणेच इथे तिळगूळ समारभासारख्या कार्यक्रमातून कार्यकर्त्या मिळाल्या- केवळ तिळगूळसमारभासारखा कार्यक्रमच नव्हे तर सुरुवातीला गावकऱ्याच्याही काही सभा घेतल्या. कार्याचे स्वरूप समजावून सांगितले. बालवाड्या सुरू केल्या. मुलाना खाऊ दिला जाऊ लागला. त्या मुलाची तसेच गावातील लोकाची वैद्यकीय तपासणी सेवाभावी डॉक्टराच्या मदतीने फुकट करून घेतली. औषधेही विनामूल्य दिली. साहजिकच गावातील लोकाना येणाऱ्या भगिनींबद्दल विश्वास वाटला आणि त्यामुळे 'बाधिलकी'ची गाडी मार्गाला लागली.

ग्रामीण भाग सुधारायचा म्हणजे प्रत्येक घर सुधारायला हव. घर सुधारायच म्हणजे घरातील बाई समजस, शहाणी, सुशिक्षित, सुसस्कृत हवी. इथे तर सगळ्याच बाबतीत ठणठणाट! गावकऱ्याचा विश्वास सपादन केल्यामुळे आता भगिनींचा अगदी चुलीपर्यंत प्रवेश झाला. तिथल्या बायकाशी गप्पा मारून त्याना विश्वासात घेऊन वाडीवाडीत बैठका घ्यायला सुरुवात झाली. अर्थात सुरुवातीला व्याख्यान न देता गप्पाच्या स्वरूपातच या बैठका व्हायच्या. येताना बायका आपली पोरेबाळे घेऊन यायच्या. काही मुले अशक्त व किरकिरी, काही खरजेने ग्रासलेली अशी असायचीच. आलेल्या बायकाशी प्रथम अवांतर गप्पा मरायच्या. गप्पाच्या ओघातच त्याना प्रश्न विचारायचे, 'खायला काय देतेस? आघोळ कधी घालतेस?' वगैरे वगैरे आणि गप्पातूनच त्याना आरोग्याचे, स्वच्छतेचे पाठ द्यायला सुरुवात केली. नेहमी भेटीगाठी होत गेल्यामुळे हळूहळू त्या बायकाची भीती कमी होत गेली. भीड चेपली. त्या बायका अगदी जिवाभावाच्या मैत्रिणी बनल्या. नतर मग मात्र बायकाचा रीतसर सल्ला घ्यायला सुरुवात झाली. सुरुवातीला बैठका घेतल्या खऱ्या पण त्यात वेळेचा अपव्यय अधिक होत असे. या बायका फक्त रविवारी जाणार. प्रत्येक वाडीत जाऊन बैठक घेण्यापेक्षा एखाद्या वाडीत सभा घेणे अधिक सोयीचे होऊ लागले

## मातृप्रबोधन

या सभाचा हेतू मातृप्रबोधन. या भागातील स्त्रियामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक. शिक्षणाच्या अभावामुळे अज्ञान व अधश्रद्धा याचा पगडा त्याच्या मनावर कायम पडलेला. अपुऱ्या आहारामुळे अनारोग्य. स्त्रियाची परिस्थिती ही अशी. त्यामुळे या स्त्रिया शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कमकुवत. आई शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या कमकुवत असली तर त्याचा परिणाम मुलावर होतो. आहार व आरोग्य याचा सबध असतो हे त्याच्या गावीही नसते. कसे असणार? जवळ जवळ बऱ्याच बायका शाळेचा उबरठा न चढलेल्या. अशा स्त्रियाना स्वतःचे व मुलाचे आरोग्य, मुलाचे आजार व त्यावरचे उपाय, मुलाचे सगोपन, सकस आहार, कुटुब नियोजन या विषयावर माहिती देतात. कुटुबनियोजनाची माहिती नसल्यामुळे घरोघरी मुलाची सख्या जास्त त्यामुळे त्याची खाण्यापिण्याची कपड्यालत्त्याची आबाळ हे ओघाने आलेच. हे सर्व त्याना समजावून सागावे लागते.

उपरोक्त गोष्टी जरी बायकांना पटल्या तरी त्या कुटुबनियोजनाच्या शस्त्रक्रियेला तयार नसतात. त्याच्या मनात शस्त्रक्रियेबद्दल भीती असते. एकांमागोमाग होणारी मुल तर

त्यांनाही नको वाटतात, पण त्या शस्त्रक्रियेलाही तयार होत नाहीत. मग व्हायचं कसं ? गोड बोलून त्यांच्या मनातील भीती घालवण्याचा प्रयत्न करायचा.

या बाबतीतला एक अनुभव उल्लेखनीय आहे. एकदा भगिनींनी सहा मुले असलेल्या एका बाईला शस्त्रक्रियेसाठी तयार केले. शस्त्रक्रिया करून घेतल्यावर काही दिवसांनी संस्थेने त्या बाईचा साडी-चोळी देऊन जाहीर सत्कार केला. आणि गंमत अशी की, शस्त्रक्रिया झाल्यावरही ती बाई जिवंत आहे हे पाहिल्यावर गावातल्या बायकांना आश्चर्य वाटले. त्यांची भीतीही कमी झाली. त्यानंतर मात्र दोन दोन मुले असलेल्या पाच-सहा बायका आपण होऊन भेटल्या आणि त्यांनी शस्त्रक्रिया करून घेतली. या भगिनी मनमोकळेपणाने त्यांच्याशी गप्पा करतात म्हणूनच तेथील बायका आपल्या मनातले विचार, भावना त्यांच्याकडे व्यक्त करतात हे खरे ! आज सरकार गेली कित्येक वर्षे कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तीला, तिला शस्त्रक्रियेसाठी तयार करणाऱ्या व्यक्तीला पैसे देते. आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, सार्वजनिक वाहने, इमारतींच्या भिंती अशा अनेक माध्यमांचा वापर करून कुटुंबनियोजनाचा प्रचार जोरदारपणे चालू आहे. तरीही लोकसंख्या वाढतेच आहे. अशा वेळी या प्रसार माध्यमांपेक्षा त्यांच्याजवळ जाऊन, त्यांच्याशी गोडीगुलाबीने वागून त्यांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व समजावून देणे आवश्यक आहे. ' बांधिलकी ' यात यशस्वी झाली आहे यात शंकाच नाही.

बालविवाह ही ग्रामीण भागातील अनुचित रूढी. आजही खेड्यांमध्ये मुलींची लग्ने अठरा वर्षांच्या आधीच केली जातात. त्यात त्यांना काहीच गैर वाटत नाही. अज्ञाना मुळे त्याचे दुष्परिणामही कळत नाहीत व बालविवाह बेकायदेशीर आहे हेही माहीत नाही. आज जिकडे तिकडे –

' १८ वर्षे वयापूर्वी मुलीचा ।
२१ वर्षे वयापूर्वी मुलाचा ।
विचार करू नका विवाहाचा ।
अर्थ ध्यानात घ्या कायद्याचा ।।

ही जाहिरात झळकताना दिसते. पण या जाहिरातीचा उपयोग कुणाला ? ज्यांना वाचता येते त्यांना. अर्थात नुसत्या साक्षरांना वाचता येईल पण पटेलच असे नाही. त्यांना कुणीतरी त्याचे दुष्परिणाम समजावून सांगायला हवेत. कायद्याची माहिती द्यायला हवी. ' बांधिलकी ' हे काम करते. तिने बालविवाहाविरूद्ध मोहीमच सुरू केली आहे. जर एखाद्या अल्पवयीन मुलीचा विवाह ठरत असल्याची बातमी कानावर आली तर त्या मुलीच्या घरी जाऊन, तिच्या आईवडिलांना भेटून त्यांना त्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. काही अपवाद वगळता त्यांना नेहमीच यश मिळालेले आहे असे नाही. पण भगिनींनी एक गोष्ट मात्र ओळखलेली आहे. बालविवाहाला आळा घालायचा तर मुलींना शिक्षण मिळायला हवे. त्या शिकू लागल्या तर त्या स्वतः निश्चितच विरोध करू शकतील. या दृष्टीने त्यांना ' सावित्रीबाई फुले दत्तक पालक ' योजना राबवायला घेतली आहे.

## सावित्रीबाई फुले योजना

माजी शिक्षक संचालक श्री. वि. वि. चिपळूणकर हे या योजनेचे जनक. मुलींच्या शिक्षणाला चालना मिळावी या हेतूने त्यांनी ही योजना सुरू केली. कै. सावित्रीबाई फुले यांची १५० वी जयंती आपण १९८१ मध्ये साजरी केली. या १५० वर्षांच्या कालखंडात स्त्रियांच्या शिक्षणात किती प्रगती झाली याची पाहणी महाराष्ट्र शासनाने या निमित्ताने केली. या पाहणीत असे आढळून आले की, ६ ते १४ या वयोगटातील २१ लाख मुली शाळेबाहेर आहेत व १५ ते ३५ वयोगटातील ५६ लाख स्त्रिया अजूनही निरक्षर आहेत. एकूण काय मुलींच्या शिक्षणाची परिस्थिती निराशाजनकच आहे. अंधश्रद्धा, परंपरागत रूढी, अशा अनेक कारणांमुळे मुलींना शाळेत पाठविले जात नाही. मुलींना शाळेत न पाठविण्याचे किंवा शाळेतून लौकर काढून घेण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांची आर्थिक दुर्बलता. आई कामाला जात असली म्हणजे लहान भावंडांना सांभाळण्यासाठी, स्वयंपाक करण्यासाठी अगर गुरे चारण्यासाठी अशा अनेक निमित्ताने मुलींना शाळेत पाठविले जात नाही.

या योजनेनुसार दत्तक मुलगी घेऊ इच्छिणाऱ्या पालकाने दत्तक मुलीच्या आईवडिलांना किमान २५ रु. ची मदत करावी अशी अपेक्षा आहे. मुलीच्या आईवडिलांनी तिला सातवीपर्यंत तरी शिकविले पाहिजे, याच अटीवर ही मदत दिली जाते. मुलगी ज्या शाळेत जाते त्या शाळेच्या मुख्याध्यापकांना तो मुलगी शाळेत नियमित येते की नाही, अभ्यास करते की नाही यावर लक्ष ठेवावे लागते. संस्थेने आतापर्यंत कुर्ल्यातील महाराष्ट्र विद्या विकास मंडळाच्या वतीने सहा दत्तक पालक मिळवले आहेत. त्यांनी दिलेले पैसे दर महिन्याच्या पहिल्या रविवारी दत्तक मुलींच्या आयांना दिले जातात. दत्तक मुलीला प्रत्यक्ष



' ऐशी कळवळ्याची जाती । करी लाभावीण प्रीती '

भेटून तिला अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले जाते. मुख्याध्यापकही मुलीच्या प्रगतीची माहिती देतात. साहजिकच पालकावर मुलीना शाळेत पाठवण्याचे तसेच मुलीवर शाळेत जाऊन अभ्यास करण्याचे बधन येते. सस्था एवढयावरच सतुष्ट नाही. दत्तक पालकाची सख्या किमान २५ तरी व्हावी अशी संस्थेची अपेक्षा आहे व त्या दृष्टीने संस्था प्रयत्नशील आहे. एका परीने शिक्षणखात्याची ही योजना राबवून सस्था मुलीच्या शिक्षणाला चालना देण्याचे कार्य करीत आहे.

मुलीनी शाळेत यायला हवे तर नुसती आर्थिक मदत देऊन भागणारे नाही. काही मुलीना भावडे साभाळण्यासाठी घरी राहावे लागते. त्या लहान भावडाची सोय तर व्हायला हवी. मोठी भावंडे नसतील तर कित्येक बायका मुलाना अफू देऊन झोपवतात आणि कामाला जातात. मुलाना अफू देण्यामुळे त्याच्या आरोग्याला अपाय होतो याची त्याना जाणीवच नसते. मुलाची सोय न करता अफूचे दुष्परिणाम मुलाच्या आयाना सागितले तर काय उपयोग ? यासाठी संस्थेने बोद्धवाडा व खरवडी या गावी दोन पाळणाघरे सुरू केली आहेत. समाज कल्याण खात्याने अनुदान दिल्यामुळे सस्थेने आवश्यक त्या वस्तू, खेळ वगैरेची खरेदी केली आहे. या पाळणाघरात साधारणपणे महिन्यापासून ते तीन-साडेतीन वर्षापर्यंतच्या मुलाना प्रवेश दिला जातो. तान्ह्या मुलाना दूध, मोठ्या मुलाना खीर अगर इतर पोषक पदार्थ दिले जातात. स्वेच्छेने काम करायला येणारे डॉक्टर्स मुलाच्या प्रकृतीची तपासणी करतात. या पाळणाघरात काम करणाऱ्या बायका स्थानिक आहेत. त्याना सस्थेमार्फत पगार दिला जातो. त्याही निष्ठेने काम करणाऱ्या आहेत. यादृष्टीने येथील एका पाळणाघरातील अनुभव सागण्यासारखा आहे. गावातील एका बाईने मूल जन्मल्यावर पाळणाघरात नाव नोंदवले व ' दोन महिन्यानी मुलाला पाठवीन ' असे सागून ती गेली. त्या मुलाला पाळणाघरात आल्यावर तिथले दूध बाधू नये, त्याला वरच्या दुधाची सवय व्हावी म्हणून पाळणाघराच्या बाईंनी त्या मुलाला पधरा दिवस होताच पाळणाघरातले दूध त्याच्या घरी नेऊन पाजायला सुरुवात केली. विशेष हे की हे कोणीही त्या खेडूत बाईला सागितलेले नाही. हळूहळू अशा जिव्हाळयाच्या स्थानिक कार्यकर्त्या निर्माण होऊ लागल्या तर ' बाधिलकी 'च्या कार्याला अधिक वेग येऊन विस्तार होईल अशी आशा बाळगायला हरकत नाही.

या परिसरात प्राथमिक शाळा आहेत, पण बालवाडया मात्र नव्हत्या. तसे पाहिले तर तीन ते पाच हे सस्कारक्षम वय असते. या वयात चागले सस्कार जर मुलाच्या मनावर झाले तर तो मुलगा उत्तम नागरिक बनू शकतो. सस्थेने एकूण सात बालवाडया सुरू केल्या आहेत. सर्व बालवाडी शिक्षिकाना मार्गदर्शन करता यावे म्हणून सस्थेने एका शिक्षिकेला कोसबाडला प्रशिक्षणासाठीही पाठविले. बालवाडया सुरू करण्यापूर्वी ही मुले इकडे-तिकडे हिंडत असत. आज या मुलावर चागले सस्कार केले जात आहेत. प्राथमिक शिक्षणासाठी योग्य असा पाया तयार करून घेतला जात आहे. या बालवाडयांमुळे प्राथमिक शिक्षकाचे कामही सोपे झाले आहे, असे तेथील मुख्याध्यापक आवर्जून कबूल करतात. तेथील काही शाळा एकशिक्षकी शाळा आहेत. अशा शाळेतील शिक्षक गैरहजर असेल तर मुख्य शाळेतील शिक्षक तेथे पाठवावा लागतो, त्यामुळे मुख्य शाळेत गैरसोय होते. एक शिक्षकी शाळेत तर अनेक अडचणी. अशा परिस्थितीत अजिबात संस्कार न झालेल्या मुलांना शिकवणे म्हणजे शिक्षकाना फार त्रास पडत असे. बालवाडीत विद्यार्थ्यांचा पाया चागला तयार झाल्यामुळे त्याची ग्रहणक्षमता वाढते. तसेच या बालवाडया शाळेबद्दलची आवड निर्माण करायलाही कारणीभूत झाल्या आहेत. अर्थात आधी बालवाडया आणि नंतर पाळणाघरे असा हा उलटा प्रवास आहे. बालवाडयापेक्षा पाळणाघरासाठी साहित्यही पुष्कळ लागते. त्यामुळे समाज कल्याण खात्याची मंजुरी व अनुदान मिळेपर्यंत थाबावे लागले.

## इंग्रजीचे अध्यापन

शालात परीक्षेचा निकाल पाहिला तर आपल्याला काय दिसते ? ग्रामीण भागात इग्रजी विषयात सर्वात जास्त विद्यार्थी नापास होतात. ग्रामीण भागातील ही अडचण लक्षात घेऊन सस्थेने तेथील ५ वी ते ७ वी च्या मुलांना इग्रजी शिकवायला सुरुवात केली आहे. सस्थेच्या संस्थापिका स्मितादाई या उत्कृष्ट शिक्षिका आहेत. पाच सप्टेंबर रोजी राष्ट्रपतीच्या हस्ते मिळणाऱ्या ' उत्कृष्ट शिक्षक ' या पुरस्काराच्या त्या मानकरी ठरल्या आहेत. त्या इग्रजी विषय उत्कृष्टपणे शिकवतात. मुबई महानगरपालिकेच्या शिक्षकाना आदर्श पाठ घेऊन दाखवून मार्गदर्शन करणाऱ्यापैकी त्या आहेत. इंग्रजी अध्यापनाचे महानगरपालिकेने जे विविध अभ्यासक्रम चालवले ते सर्व त्यानी केलेले आहेत. त्याशिवाय स्वत.ची अशी काही विशिष्ट पद्धत वापरून त्या मुलाना विषय सोपा करून शिकवतात अशा स्मितादाईंचे तसेच इतरही अनेक भगिनीचे मार्गदर्शन या खेडेगावातील मुलाना मिळते. ती मुले भाग्यवानच म्हणायला हवीत.

गावातील मुलाचा सर्वांगीण विकास करायला हवा, हे ध्येय सस्थेने डोळ्यासमोर ठेवलेले आहे. राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने गावातील मुलाच्या वक्तृत्वस्पर्धा घेतल्या जातात. परिसरात सुमारे १५ शाळा आहेत. या शाळातील विद्यार्थी बहुसख्येने वक्तृत्वस्पर्धेत सहभागी होतात. यशस्वी विद्यार्थ्यांना दर्जेदार बक्षिसे दिली जातात. यामुळे मुलाना प्रोत्साहन मिळते, सभाधीटपणा तसेच आपले विचार स्पष्ट, मुद्देसूद व योग्य भाषेत माडण्याची क्षमता त्याच्यात निर्माण होते.

याशिवाय जी मुले शालात परीक्षेत गावातून सर्वप्रथम येतात अगर एखाद्या विषयात प्रावीण्य मिळवतात अशा मुलाना सस्था बक्षिसे देते. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ व परिसरातील विद्यार्थ्यांना निमत्रित केले जाते. मध्यतरी सागवी येथील संजय महादू पालकर ( शाळा कोदिवडे ) या विद्यार्थ्याचा जिल्हा पातळीवर निबध स्पर्धेत पहिला क्रमांक आला. त्याचा सत्कार सस्थेने केला. अशा प्रकारे ही सस्था या गावामधून विविध प्रकारे शैक्षणिक कार्य करीत आहे.

या परिसरातील काही भागात सरकारी वैद्यकीय सेवा नाही. खाजगी दवाखानेही नाहीत. संस्थेने लोकाची ही गरज लक्षात घेऊन सागवी, कातरवाडी, खरवडी, कोळावणे व मुद्रा ठाकरवाडी येथील लोकासाठी विनामूल्य औषधोपचाराची सोय केली आहे.

गावातील बालकांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येते व त्यांना विनामूल्य औषधें, टॉनिक्स व जीवनसत्त्वांच्या गोळ्या दिल्या जातात. दर दोन-तीन आठवड्यांच्या अंतराने या संस्थेशी निगडित असलेले डॉक्टर्स या परिसरास भेट देतात व आजारी व्यक्तींना तपासून औषधोपचार करतात. खोकला, थंडीताप, डोळे येणे, त्वचारोग अशा प्रकारचे आजार या भागात आढळतात. सुविधांचा अभाव व कुपोषण यामुळे उद्‌भवणाऱ्या आजारांसाठी औषधे दिली जातात. वेळोवेळी संस्था औषधांची खरेदी करतेच. पण संस्थेच्या कित्येक सभासद ओळखीच्या लोकांकडून देणगीदाखल औषधे मिळवतात. मध्यंतरी एका दंतवैद्यांना बोलावून तपासणी केली. कित्येकांनी यावेळी दातही काढून घेतले. अशावेळी डॉक्टरांना मदत म्हणून परिचारिकेचे काम संस्थेच्या सभासद भगिनीच करतात.

या परिसरातील जवळ जवळ सर्वच आदिवासी हे दारिद्ररेषेखालीलच आहेत असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. अर्धपोटी, अर्धवस्त्र अशी ही माणसे. यांच्यासाठी संस्थेचे सभासद स्वतःच्या घरातील जुने पण वापरण्यायोग्य कपडे देतातच, पण शहरातील इतर लोकांकडून देणगीरूपाने जुने कपडे या भगिनी घेतात, आवश्यक ती दुरुस्ती करतात आणि नंतर गरजूंना ते कपडे देतात. मध्यंतरी फायझर कंपनीने इतके कपडे देणगीदाखल दिले होते की ते नेण्यासाठी एक टेंपोच भाड्याने घ्यावा लागला. त्या परिसरातील पाच-सहा गावांमध्ये ते कपडे वाटण्यात आले. खरोखरीच सर्व गावकरी खूष झाले. काही अतिउत्साही ते कपडे घालून अगदी दाखवायलाही आले. गणेशोत्सवाच्या वेळी तर, डोंबिवली, ठाणे याठिकाणच्या बायकांनी देवापुढचे तांदूळ दिले होते. तेही तिथल्या लोकांना दिले. या शिवाय लोकांनी दिलेली जुनी भांडीही गरजूंना दिली जातात. पण असे दयेवर जगणे किती दिवस चालायचे? रोजगार नाही त्यामुळे दारिद्रच त्यांनी स्वतःच्या पायावर उभे रहायला हवे, स्वाभिमानी बनायला हवे. यादृष्टीने संस्थेने काही उपक्रम राबवायला सुरुवात केली आहे, की ज्यामुळे त्यांना उत्पन्नाचे साधन मिळेल.

## वृक्षारोपण – वृक्षसंगोपन

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' हे जरी खरे असले तरी आज ग्रामीण भागात वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर चालू आहे त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच माहीत आहेत, म्हणून विविध संस्था जुलै महिन्यात वनमहोत्सव साजरा करतात. 'बांधिलकी' ही त्याला अपवाद नाही. या वर्षी भा. वि. लोक महाराष्ट्र (महाराष्ट्र शासन) या संस्थेकडून आंब्याची ३०० कलमे मिळवली. भगिनी गावातील लोकांच्या घरी गेल्या. त्यांच्या जमिनी पाहून त्याप्रमाणे कलमांचे वाटप केले. कलमे लावताना, तसेच लावलेली कलमे जगविण्याच्या दृष्टीने त्यांची निगा कशी राखावी यांचे मार्गदर्शन केले. आंब्याची कलमे देण्याचा हेतू हा की त्या बायकांना पुढे उत्पन्नाचे साधन मिळावे.

वृक्षापासून होणारे विविध फायदे व झाडांची आवश्यकता, जमिनीची धूप थांबविणे, प्रदूषण कमी करणे, पर्जन्याच्या विपुलतेकरिता महापुराला प्रतिबंध, तसेच पालापाचोळ्यामुळे शेतीवर होणारा अनुकूल परिणाम अशा विविध गोष्टींचा विचार करता वृक्षतोड थांबविणे किती आवश्यक आहे व वृक्षसंगोपनाचो किती जरुरी आहे हे परिसरातील लोकांना त्यांच्या सभा घेऊन समजावून सांगितले. वृक्षसंगोपनाचे महत्त्व



स्मितातांईचे तसेच इतरही भगिनींचे मार्गदर्शन.

कळले आणि त्यासाठी त्यानी कष्ट घेतले तर झाड तोडण्यासाठी कुऱ्हाड उचलताना ते निश्चितच विचार करतील.

गावातील मुलीना नवीन काहोतरी शिकायला मिळावे, नवीन पहायला मिळावे या दृष्टीने सस्थेने गेल्या वर्षी चेंबूर येथील 'आमची शाळा' या शाळेत एक सस्कार शिबिर घेतले होते. एकूण तीस मुली या शिबिराला आल्या होत्या. शिबिरात त्यांना *विविध कला शिकविण्यात आल्या.* खास बसने त्याना मुबईतील ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे दाखवली मान्यवराची व्याख्याने ठेवून ज्ञानात भर घालण्याचा प्रयत्न केला. मुलीही अगदी वेगळयाच वातावरणात रहायला मिळाल्यामुळे खूष होत्या या शिबिराला समाजकल्याण खात्याने ९० टक्के आर्थिक मदत केली होती.

'बाधिलकी' चे जास्तीत जास्त कार्य स्त्रिया व मुले याच्यासाठी चालते पण त्याच्या यशस्वितेसाठी सर्वांचे सहकार्य हवे. यासाठी समाजप्रबोधन होणे तितकेच आवश्यक. यासाठी सस्था विविध विषयातील *तज्ज्ञ कार्यकर्त्यांना बोलावते ते गावकऱ्याशी* त्या विषयावर चर्चा गप्पा करून त्याना मार्गदर्शन करतात. आतापर्यंत लोकसख्या शिक्षण, अधश्रद्धा व गैरसमजुती, व्यसनाचे दुष्परिणाम, दूषित पाण्याचे, अनारोग्यकारक सवयीचे दुष्परिणाम या विषयावर चर्चा करून त्याना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे त्याशिवाय योगाभ्यासाचे महत्त्व समजावून सांगून लहान मुलाना काही आसने व दीर्घ श्वसन याचे मार्गदर्शन करण्यात येते. विशेष म्हणजे *अशा सभाना गावकऱ्याचे* सहकार्य लाभते ही समाधानाची गोष्ट आहे.

अशा प्रकारे या सस्थेचे कार्य अनेक अगानी बहरत चाललेले आहे. 'इवलेसे रोप लावियेले द्वारी। तयाचा वेलु गेला गगनावरी'। असे या सस्थेचे झाले आहे. याला कारण सस्थेतील जास्तीत जास्त भगिनीच्या सहकार्याचे खतपाणी मिळते. सस्थेतील जवळ जवळ सर्वच स्त्रिया नोकरी करणाऱ्या. रविवारचा एकच सुटीचा दिवस तोही *कर्जतला समाजकार्यात* घालवायचा. एका वाडीतून दुसऱ्या वाडीत जाण्यासाठी चार-पाच मैल चालायचे व्यवहारी लोकाच्या दृष्टीने निष्पन्न काय ? वेळेचा आणि पैशाचा अपव्यय ! साहजिकच काहीना पुरुषाचा थोडाफार विरोध झाला. 'लष्करच्या भाकरी भाजून काय निष्पन्न होणार ?' असले प्रश्नही ऐकावे लागले. तरीसुद्धा आपण चागल्या कामासाठी जात आहोत, हे पक्के मनावर ठसलेले, त्यामुळे ह्या टीकेकडे दुर्लक्ष केले तसेच या मिळवत्या स्त्रिया असल्यामुळे जोरदार विरोध करणे अशक्य हेही ते जाणून असावे. काही बायकाची शाळेत जाणारी मुले आहेत. त्याना आईचा सपूर्ण दिवस सहवास रविवारीच. कधी कधी बालहट्ट पुरवावाच *लागतो. त्या शिवाय* इतर घरगुती अडचणी असतातच त्यामुळे एखाद्या रविवारी कुणीच न येण्याची शक्यता यामुळे कोणत्या रविवारी कोणी कोणी जायचे हे पूर्वनियोजित असते. दर महिन्याला एखाद्या भगिनीच्या घरी सभा घेतली जाते. त्या सभेत कोणत्या रविवारी कोण जाणार ? जाणाऱ्या बाईने कोणत्या वाडीवर जायचे, कोणते काम करायचे हे सर्व ठरवले जाते. अशा प्रकारे कामाची आखणी आणि वाटप शिस्तबद्धतेने केल्यामुळे सर्व कामे व्यवस्थित, कोणत्याही प्रकारचा गोंधळ न होता पार पडतात.

सस्था म्हटली म्हणजे ती काही एक खाबी तबू नव्हे, त्यात अनेक व्यक्ती असतात. आणि जर काही मडळी भिन्न विचाराची, भिन्न पक्षाची असली तर अतर्गत तणाव निर्माण होण्याची शक्यता असते. या सस्थेत येणाऱ्या बायका भिन्न पक्षाच्या असल्या तरी सस्थेत येताना त्या आपली विचारसरणी बाजूला ठेवून येतात तेव्हा धर्म, पक्ष यामुळे भाडणे निर्माण होण्याचा प्रश्नच येत नाही. दुसरे म्हणजे सस्थेने हे गृहीत धरलेले आहे की सगळयाच बायकाना समाजकार्यासाठी सर्वस्वी वाहून घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे एखादी सभासद भगिनी ठरवूनही आकस्मिक कारणामुळे येऊ शकली नाही तर तिला कोणी जाब विचारीत नाही. त्यामुळे एखाद-दुसरा अपवाद *वगळता अतर्गत तणाव निर्माण झालेले नाहीत.* त्यामुळेच 'बाधिलकी'ची गाडी न कुरकुरता सुरळीत चाललेली आहे.

*सस्थेने आतापर्यंत स्त्रियाच्या उन्नतीसाठी* विविध प्रकारचे कार्य केलेले आहे पण या स्त्रियाची खरीखुरी प्रगती व्हायला हवी असेल त्या स्वावलंबी व्हायला हव्या. तसे पाहिले तर या भागातील स्त्रियाना कोणत्याही प्रकारचा रोजगार उपलब्ध नाही. त्याना रोजगार मिळवून देण्यासाठी सस्था प्रयत्नशील आहे. त्या सस्थेने काही प्रकल्पाच्या योजना आखलेल्या आहेत.

**उदबत्त्यांचा कारखाना** – कपार्ट (Council For Advancement of People's Action and Rural Technology) या सस्थेच्या मदतीने उदबत्त्याचा कारखाना सुरू करण्यात येणार आहे. हा प्रकल्प जवळ जवळ चार लाखाचा आहे या कारखान्यामुळे सुमारे पन्नास स्त्रियाना काम मिळणार आहे. या कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल परिसरातच उपलब्ध असल्यामुळे काही लोकाना पूरक उद्योगही करता येईल

**शेळी विकासप्रकल्प** – 'भारतीय लोक विकास कार्यक्रम' या सस्थेच्या मदतीने सकरित शेळी पैदास केंद्र सुरू करण्यात येणार आहे हाही प्रकल्प जवळ जवळ एक लाखाचा आहे यामुळे येथील लोक आधुनिक पद्धतीने पशुपालन कसे करावे हे निश्चितच शिकतील.

**मत्स्योत्पादन** :– या भागात काही गोड्या पाण्याची तळी आहेत. कपार्टच्या मदतीने माशाची पैदास कशी करावी हेही येथील लोकाना शिकवले जाईल.

आज कित्येक आदिवासी अबाडीचा पाला, कदमुळे यावर गुजराण करीत आहेत. अपुऱ्या आहारामुळे प्रकृती सुदृढ नाही. जर वरील तिन्ही प्रयोग यशस्वी झाले तर त्याचा आहारात जो प्रथिनांचा अभाव आहे तो भरून काढता येईल. तसेच इथे जी साधनसामग्री आहे तिचा वापर करून लोकाना रोजगार मिळवून देता येईल.

विविध योजना आखायच्या, राबवायच्या पण त्यासबधी काहीच तात्रिक माहिती नसेल तर काय उपयोग ? कदाचित अपयश येण्याची शक्यता यासाठी सस्थेमार्फत काही भगिनीनी विविध ठिकाणी जाऊन प्रशिक्षण घेतले आहे

'भारतीय लोक विकास कार्यक्रम' या सस्थेने सामाजिक सस्थाच्या प्रतिनिधीना ग्रामीण भागाच्या प्रगतीच्या दृष्टीने विविध *योजनाची माहिती देण्यासाठी एक वर्ग घेतला* होता. त्या वर्गाला प्रतिनिधी पाठवून विविध

योजनाची माहिती मिळवली. ' कपार्ट ' तर्फे पुण्याला एक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला होता. ग्रामीण भागात शेतीला पूरक असे कोणते उद्योगधंदे सुरू करता येतील याची माहिती या प्रशिक्षणात देण्यात आली. *संस्थेच्या एका प्रतिनिधीने महाबळेश्वरला* जाऊन ' मधुमक्षिका पालना'चे प्रशिक्षण घेतले आता पेट्या मिळाल्यावर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.

आज संस्था जे कार्य करीत आहे त्याची सरकार दरबारी निश्चितच दखल घेतली गेली आहे किंबहुना त्याच्या मदतीमुळेच संस्थेला सुकरपणे कार्य करता येत आहे. समाजकल्याण खात्याकडून अनुदान मिळाल्यामुळेच पाळणाघरे सुरू करता आली. सरकारने ग्रामीण भागासाठी अनेक योजना आखल्या, पण त्यात फारसे यश आलेले नाही. यासाठी स्वयसेवी संस्थाना मदत देऊन विविध योजना राबवाव्या असे सरकारने ठरवले आहे. यासाठीच ' कपार्ट ' ने स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण दिले, यात 'बांधिलकी' चा समावेश आहे

## काही समस्या

सरकारकडून मदत मिळत असली तरी कधी कधी नियमातील विशिष्ट वादग्रस्त शब्दामुळे अडचणही निर्माण होते विशेषत अशी अडचण मुढा गावातील बालवाडीच्या बाबतीत निर्माण झाली या गावात ठाकर जातीचे लोक राहतात सतत पाच वर्षे अनुदानासाठी अर्ज करूनही मदत नाही त्याचे उत्तर हे की ' या बालवाडीत दहा सवर्ण सामील करून घ्यावेत. ' कसे शक्य आहे ? ' या गावापासून, दोन किलोमीटरच्या परिसरात सवर्ण राहात नाहीत, असे कळवूनही अजून मदत मिळालेली नाही. मुळात आदिवासींना मदत करण्याच्या हेतूने जास्तीत जास्त म्हणजे ९० टक्के आदिवासी हवेत अशी अट आहे त्यामुळे दहा टक्के सवर्ण हवेत असा नियम लावला गेला. म्हणजे आदिवासींसाठी योजना आखायच्या आणि १०० टक्के आदिवासी आहेत म्हणून मदत नाकारायची हा विरोधाभास आहे *या विविध योजना* राबवताना ग्रामपचायतीचे दाखले लागतात. ते वेळच्या वेळी मिळत नाहीत, त्यामुळे शक्ती आणि वेळ वाया जातो. तसेच कामही लांबणीवर पडते. मध्यतरी दोन बालवाड्या जिल्हा परिषदेने ताब्यात घेतल्या पण संस्थेला साधे पत्रही पाठविले नाही. तसेच एका बालवाडीवर कोसबाडहून प्रशिक्षित होऊन आलेली शिक्षिका होती. तिची तिथे नेमणूक न करता *तिला काढून दुसरीच शिक्षिका नेमली. अशा* काही अडचणी वगळता सरकारकडून मदतच झाली

' बांधिलकी ' ने राजमाचीच्या पायथ्याशी असलेला परिसर कार्यक्षेत्र म्हणून निवडला. खरा पण बोरीवलीला राहणाऱ्या भगिनीच्या दृष्टीने दूरच काम करायची इच्छा असली तरी तिथे पोचायला कमीतकमी अडीच ते तीन तास. सहा तास प्रवासात आठवड्यातून एक दिवस *जाणार. बोरिवलीच्या* भगिनी प्रथम निराश झाल्या पण म्हणतात ना ' इच्छा आहे तिथे मार्ग आहे ' तसेच झाले पश्चिम रेल्वेजवळील उपनगरात राहणाऱ्या बायकाना काम करता यावे म्हणून सफाळ्याच्या परिसरात त्यांनी कामाला नुकतीच सुरुवात केली आहे

' या संस्थेने केवळ स्वतःचाच विचार केलेला नाही. इतर संस्थाना मार्गदर्शनही केलेले आहे *काही नवोदित संस्थांच्या* सभासदाना कामाची माहिती नसते, ग्रामीण भागातील लोकाचा विश्वास त्याना सपादन करायचा असतो यासाठी डोंबिवलीच्या Classic Group या संस्थेच्या सभासदानी दोन वर्षे या संस्थेबरोबर काम केले आता त्यांनी कळकराई या गावात कामाला सुरुवात केली आहे. ठाण्याच्या विवेकानद केंद्रानेही ' बांधिलकी ' बरोबर पाचसहा महिने काम करून त्याच परि*सरातील माणगावला काम करायला* सुरुवात केली आहे. अजूनही अडचण आली तर ते मार्गदर्शनासाठी येतात तसेच ' क्षितिज ' ही डोंबिवलीची आणखी एक संस्था या संस्थेचे सभासद गेले वर्षभर ' बांधिलकी ' बरोबर काम करीत आहेत. आता तेही स्वतंत्रपणे कामाला सुरुवात करतील थोडक्यात बांधिलकी प्रकाशाचे बेट न बनता दुसरे दीप प्रज्ज्वलित करणारी ज्योत बनली आहे

*अशा या 'बांधिलकीच्या* यशाचे रहस्य कोणते ? सर्व सभासद भगिनींची सेवाभावी आणि नि स्वार्थी वृत्ती. हे सर्व काम करायचे तर पैसा हवाच सरकारी अनुदान तर थोड्या फार प्रमाणात मिळतेच, पण ते पुरेसे नसल्यामुळे पैसाही गोळा करावा लागतो. स्वतः स्मितताई योगाभ्यास शिबिरे, व्याख्याने या निमित्ताने मिळालेले पैसे संस्थेला देतात. त्याशिवाय काही सभासद भगिनी देणग्या देतात, *काही दानशूर लोकाकडून देणग्या* मिळवतात. त्याशिवाय सभासदाची वर्गणी. 'बांधिलकी'च्या भगिनींची एकजूट वाखाणण्यासारखी आहे. आपल्याला त्याना भेटायचे असेल तर त्या हमखास भेटतील. कोणत्याही रविवारी सकाळी ठाणे स्टेशनवरील पाच क्रमांकाच्या फलाटावर, आठ पाचच्या कर्जत लोकलची वाट पहात असलेल्या या भगिनी स्त्रियांचा डबा जिथे थांबतो तिथे उभ्या असलेल्या दिसतील.

आजपर्यंत ' बांधिलकी ' ने जी प्रगती केली आहे ती सातत्य आणि शिस्तप्रियता यामुळे गोदावरी परुळेकर वगैरेंनी जो आदिवासी समाज जागा केला त्याला आता सुशिक्षित, सुसंस्कृत करण्याची गरज आहे. हे काम काही एका व्यक्तीचे नाही. यासाठी सातत्याने, शिस्तीने नि.स्वार्थी वृत्तीने काम करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्था निर्माण व्हायला हव्यात अशा हजारो संस्था जेव्हा निर्माण होतील तेव्हाच या देशाची खरी प्रगती होईल

□

**बखर राजधानीची**

**डॉ दत्तप्रसाद दाभोळकर** : २५ रुपये

दिल्ली – भारताची राजधानी; आजच नाही, गेली कैक शतक. या राजधानीत या दशकात चार महत्त्वपूर्ण घटना घडल्या.

– शरद जोशींचे आव्हान

– सात आंधळे आणि अेक अप्पू (एशियाड)

– ३१ ऑक्टोबरची कत्ले आम

– बाबा आमटे यांची दिल्ली भेट

या घटनांचा संवेदनाक्षम मनाने जवळून घेतलेला वेध.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे.

# गेल्या महाशिवरात्रीला

## फिरोझ रानडे

'वा, वा, सकाळी सकाळी इतके झाक-पाक कपडे करून अगदी तय्यार ?' कुठे बाहेर-बिहेर जायचा विचार आहे की काय ?' दार उघडून समोर उभ्या असलेल्या 'झाक पाक' श्याम-कडे विस्कारलेल्या नजरेन पाहात बर्वे गुरुजींनी विचारले. 'छे छे, मी निवृत्त झालेला माणूस कुठं जायला न यायला बसलोय ?' श्याम उत्तरला. खरं म्हणजे निवृत्त झाल्यानंतर त्याच्या चळवळी वाढल्या होत्या. निवृत्त झाला होता तो फक्त सरकारी नोकरीतून. बाकी उचापती पूर्वी होत्या तशाच चालू होत्या. राजीवजींच्या इंडियात काय किंवा शरदजी जोशींच्या भारतात काय, निवृत्त म्हणून कधी कुणी होतच नाही. 'मग इतका जामानिमा ?' बर्वे अजुनी दारात उभे राहूनच विचारत होते.

'अहो, ते दांडेकर यायचे आहेत ना ? आपले हरिभाऊ दांडेकर हो.' नुस्तं दांडेकर म्हटल्यावर बर्वे गुरुजींच्या डोक्यात काहीही प्रकाश पडला नाही, हे बघून श्यामनं कोण दांडेकर ते सांगितलं.

हरिभाऊंचं नाव ऐकताक्षणी बर्वे गुरुजींचं तोंड आंबट झालं. हरिभाऊ दांडेकर म्हणजे ह्या भागातले भाजपचे कार्यकर्ते. सध्याचे भाजपचे म्हणजे अतिपूर्वीचे संघाचे, नंतर जनसंघाचे व आता भाजपचे. जशी कैरी पिकली की तिचा आंबा होतो पण मूळ फळ मात्र तेच राहाते त्यातला हा प्रकार होता.

दांडेकरांचा जरी आंबा झाला होता तरी त्यांचं नाव काढताच बर्वे गुरुजींचं तोंड आंबट होणं साहजिकच होतं. दांडेकर हे तसे, तर बर्वे गुरुजी म्हणजे हातसडीचे गांधीवादी. 'मग मी निघतो.' बर्वे गुरुजी निघण्याच्या तयारीत म्हणाले, 'तुमची काही बोलणी होणार असतील तर उगाच त्यात...' 'छे, हो, आमची कसली बोलणी आलीयेत. ? काल रात्री त्यांचा फोन आला, की उद्या भेटायला येऊ का म्हणून ? तर म्हटलं या. तुम्ही बसा ना. वाटल्यास ते आल्यावर जा.'

गुरुजी 'हुश्श' करत सोफ्यावर बसले. 'हा काय फेब्रुवारी महिना म्हणायचा ? पूर्वी फेब्रुवारी महिन्यात कोण थंडी वाजायची. आता बाराही महिने उकडतं.' 'हो, ना,' श्याम ह्याशिवाय दुसरं काय उत्तर देणार ? बरं गुरुजींना काही थंड वा गरम घेणार का म्हणून विचारण्याचा प्रश्नच नव्हता. ते लोकांकडलं साधं पाणी सुद्धा पीत नसत. तेव्हा आता पुढं काय बोलावं असा प्रश्न श्यामला पडला- सुदैवानं तो राधानं सोडवला.

'हे बघा जेवायचं सगळं तयार करून ठेवलंय.' राधा आपला नेहमीचा खणखणीत आवाज काढत बाहेरच्या खोलीत येत म्हणाली. तेवढ्यात तिचं लक्ष बर्वे गुरुजीं-कडे गेलं. तेव्हा आवाज शक्य होईल तेवढा मृदू करीत ती त्यांना म्हणाली, 'अरे, तुम्ही कधी आलात ?'

'हा आत्ता येतोच आहे. श्यामरावांकडे कुणी येणार आहे तोपर्यन्त बसा म्हणाले, म्हटलं बसतो बापडा.'

'हे बघा, कुकरमधे भात आहे,' राधाच्या बोलण्यातला मृदूपणा अजूनही चालूच होता. 'उगाच उशीर करू नका जेवणाला. मला यायला दोन-अडीच तरी होतील.'

'तू महिला आघाडीच्या मीटिंगला जाते आहेस ना ?' श्यामनं उगाचच म्हणून चौकशी केली. पण त्या उगाचचपणामुळं राधा जाम भडकली.

'किती वेळा सांगितलं आहे तुम्हाला की आमची महिला आघाडी नाहीये, अखिल भारतीय महिला आघाडी आहे.' 'अगं मला तेच म्हणायचं होतं.' श्याम चाचरत म्हणाला. निवृत्त झाला असला तरी त्याच्या बोलण्यातला चाचरेपणा काही कमी झाला नव्हता.

'तेच म्हणायचं होतं तर तसं म्हणा की स्पष्टपणे.' राधाचा राग अजूनही अखिल भारतीय स्तरावरच होता.

'अहो, राधाताई, अखिल भारतीय काय अन् साध्या काय, दोन्ही महिला आघाड्याच आहेत ना ?' बर्वे गुरुजींना वादाचं कारणच कळत नव्हतं.

'बर्वे गुरुजी, फार फरक आहे बरं त्यात महिला आघाडीच्या बायका डाव्या विचाराच्या आहेत ...'

'नुसतं डाव्या विचाराच्या का म्हणतेस ? चक्क कम्युनिस्ट आहेत असं म्हण की.' आता श्यामला जोर चढला होता.

'हो, हो, चक्क कम्युनिस्ट आहेत. मी भिते की काय कुणाला ? त्यांचं आमचं कसं जमावं ?' राधाचा स्वर अजुनी काही खाली आला नव्हता.

'अग, हुंड्याला तुमचा विरोध आहे, त्यांचा पण आहे. जसा तुमचा तोंडी तलाक देण्याला विरोध आहे, त्यांचा पण आहे. थोडक्यात म्हणजे बेसिक गोष्टीबाबत तुमचं एकमत आहे. अखिल भारतीय महिलांचं भलं व्हावं अशी तुम्हा सर्वांची इच्छा आहे. मग त्यांचा कम्युनिस्टपणा तुम्हाला बोचतो कुठं ?' श्याम एकदा बोलायला लागला म्हणजे हटत नसे.' आणि तसा बोचत नसेल तर प्रत्येकीच्या वेगळ्या वेगळ्या गॅसच्या शेगड्या कशा-साठी ?' आपण विनोद केला आहे ह्या समजुतीनं श्याम मोठ्यानं हसला. पण त्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. बर्वे गुरुजी कुठल्याही विनोदाला हसणं हे कमी-

पणाच समजत व राधाच्या गॅसच्या शेगडीच प्रेशर इतकं वर गेल होत की ती हसण्याचा प्रश्नच नव्हता.

'कुठं काय बोचतं ते तुम्हाला नाही कळायचं.' राधान चर्चेचा समारोप करत म्हटलं व पायात चपला जेमतेम अडकवून बाहेर पडली.

नाटकात कसं एक पात्र गेल की लगोलग दुसर पात्र येत तसच आत्ता पण झालं. राधा तिरीमिरीन गेली तसल्याच तिरीमिरीन खालच्या मजल्यावरचा कामत आला.

'च्यायला, बायको आहे की पायजमा?' कामतने त्या तिरीमिरीतच प्रश्न कम् उद्‌गार काढला.

'का? पायजमा असायला काय झाल?' बर्वे गुरुजींनी आपली शाती न ढळू देता विचारलं.

'चागला सुट्टीचा दिवस आहे, तर म्हणे देवळात जाऊ या.'

'अरे पण सुट्टीच मुळी शिवरात्रीच लोकांना देवळात जायला मिळाव म्हणून दिली आहे ना?' श्यामन विचारल.

म्हणून काय देवळात जायच? अस सगळ्या सुट्टीच्या दिवशी केलं तर मग सुट्ट्या एजॉय कश्या करायला मिळणार?' कामतन कुणाही नोकरदाराच्या मनात येईल तो विचार सागितला.

'हे बघ कामत, एक तर तू देवळात तरी जा, नाहीतर नेहमीप्रमाणे कचेरीत तरी जा.' गुरुजींनी आपण चागला तोडगा सुचवतो आहोत ह्या आवाजात तोडगा सुचवला.

आता ह्यावर कामत काय बोलणार? तो शामकडे तिरीमिरीनं आला होता व बायकोला पायजमा म्हणाव की काय हा प्रश्न विचारला होता तेव्हा त्याच्या मनात आपल्याला सहानुभूती मिळेल असे होते. पण बर्वे गुरुजींनी वेगळाच तोडगा सुचवल्याचे बघून कामत शामच्या तोंडाकडे अपेक्षेने पाहू लागला.

पण निवृत्त झाल्यापासून आमचा सुट्याबाबतचा दृष्टिकोण अगदी साफ बदलला होता हे कामतच्या लक्षात आल नव्हत. कामतला सहानुभूती दाखवण्याऐवजी तो म्हणाला, 'गुरुजी, ह्या नोकरदाराना सुट्टीच्या दिवशी कचेरीत जायला सांगू नका-'

'अहो पण सुट्टी महाशिवरात्रीनिमित्त आहे, तेव्हा एक तर कामतानी देवळात जाव नाहीतर सरळ कचेरीत जावं.'

'ते कुठल व्हायला ह्याच्या हातून? ह्याना फक्त सुट्टीशी कर्तव्य. आता हा सण तरी साऱ्या हिंदू समाजाचा आहे. पण श्रावणी सोमवार तर फक्त साडे-तीन टक्के वाल्याचा आहे ना? म्हणजे साडेतीन टक्केवाले त्या दिवशी आपली जानवी बदलतात ना? तरी पण दर श्रावणी सोमवाराला महापालिका, मंत्रालय, सगळ्या सरकारी कचेऱ्याना सुट्टी. बाकी सर्व गोष्टीत साडेतीन टक्क्यावर जीव पाखडणारेही साडेतीन टक्के सुट्टी आम्ही देणार नाही अस काही सरकारला छातीठोकपणे सागत नाहीत. हे साडेशहाण्णव टक्के वाले तर घेतातच पण अल्पसख्याकसुद्धा घेतात' आपल्याकडे मुसलमानाचं नाव टाकून त्याना अल्पसख्याक म्हणण्याची पद्धत आहे. त्या पद्धतीला अनुसरून श्याम म्हणाला होता. हो, थोडक्याकरता भानगड नको.

आता ह्यावर कामत काय बोलणार? श्रावणी सोमवारला अशी काही भानगड असते हे त्याला प्रथमच कळल होतं. तेवढ्यात बर्वे गुरुजी म्हणाले,

'त्याच अस आहे श्यामराव, हे साडे तीन टक्के वगैरे आता जाती – जमातीवर अवलबून नाही आहे. सगळ्या सरकारी नोकराची एक जात, व्यापाऱ्याची एक जात, कामगाराची एक जात, मिलमालकाची एक जात, कुठल्याही पक्षाचे पुढारी असोत त्याची आपली एक जात...'

बर्वे गुरुजींनी हे जातीवरच दळण आणखी अर्धातास तरी चालवल असतं पण तेवढ्यात महादेवाच्या कृपेनं हरिभाऊ दाडेकर आले व मगराच्या तावडीतून हत्तीला जस विष्णून वाचवल होत तस श्याम व कामतला वाचवते झाले

'या, या, या.' श्यामने उठून दाडेकराचं मोठ्या उत्साहान व आनदान स्वागत केलं. त्या आनदाच्या भावनेत सुटकेची भावना पण मिसळली होती हे दाडेकराच्या लक्षात आले नाही. त्याच्या भोळ्या जीवाला श्यामला खरच खूप आनद झाला आहे अस वाटल. पण श्यामच्या जोडीला कामत आणि बर्वे गुरुजीना बघून ते थोडे उदास झाले. त्याचा प्रचार नेहमी 'एका वेळी एक' ह्या तत्त्वावर चालत असे. एकदम तीन चार मडळी पाहिली की त्यांना अस्वस्थ व्हायला होत असे. पण आता काही इलाज नव्हता.

'पाणी आणू का प्रथम?' त्याच्या अस्वस्थ चेहऱ्याकडे पाहून श्यामनं विचारल.

'हो, आणा बुवा. पण फिजच नको, साध आणा.' दाडेकर सोफ्यावर बसत व कपाळावरचा घाम पुसत म्हणाले, 'हा काय फेब्रुवारी महिना म्हणायचा? काय उकडतय.'

'मघा मी श्यामरावाना तेच सागत होतो. जून काय अन् जानेवारी काय, हल्ली कायम उकडत असत.' कायम उकडण हा एकच विषय असा होता की ज्यावर दाडेकराच व बर्वे गुरुजीच एकमत होण्याची शक्यता होती.

तेवढ्यात श्यामन तांब्या-भाड्यात पाणी आणल. दाडेकर फुलपात्र तोंडाला न लावता वरूनच गटागटा पाणी प्याले यावर एक मोठी ढेकर पण दिली. आधीच कामतला दाडेकराचा राग येत असे. त्यात ह्या ढेकरीन भर पडली पाणी प्यायल्यावर ढेकर काय द्यायची? पण तो काही बोलला नाही.

पाणी पिऊन झाल्यावर हरिभाऊंनी तांब्याभाडं व्यवस्थितपणे टेबलावर ठेवून दिल व म्हणाले, 'परवा आळदीला जाऊन आलो.'

आळदीला जाऊन आलो असं दाडेकरानी सागितल्याबरोबर श्याम, बर्वे गुरुजी, कामत ह्या तिघांच्याही ते कोणत्या विषयावर बोलताहेत हे लक्षात आले.

महाराष्ट्राची ही एक खुबी आहे 'त' वरून 'ताक भात' ओळखावा तो मराठी लोकानीच. बाबासाहेब म्हटले की पुरदरे व आबासाहेब म्हटल की छत्रपती शिवाजी महाराज हे कुणाही मराठी माणसाला सांगायला लागत नाही. आता जीवनात कितीतरी रिडल्स् आहेत; पण रिडल्स् म्हटल की आठवतात ती फक्त डॉ. आबेडकराचीच. त्याच धर्तीवर आता आळदी म्हटल की कुणाला तुकाराम-ज्ञानेश्वर आठवत नाहीत. डोळ्यासमोर येते ती प्रचड हिंदु-परिषद. त्या तिघाचही तसच झाल पण ह्या विषयावर पुढं काय बोलायच ते कुणाला कळेना. तेव्हा ते तिघं चूप राहिले.

पण घराचा यजमान म्हणून सवाद मालिका चालू ठेवण हे श्यामच कर्तव्य होतं तेव्हा तो

म्हणाला, 'बर जमत बुवा तुम्हाला या वयात.'

ह्या स्तुतीमुळे दाडेकरबुवा एकदम खूष झाले जाता जाता बर्वे गुरुजीना चिमटा काढावा ह्या हेतून ते म्हणाले, 'मनात असल म्हणजे सगळ जमत प्रकृतीच कौतुक कराव तेवढ कमीच' महात्माजी गेल्यावर काही करायच प्रकृतीच्या कारणाकरता जवळ जवळ सगळ्या गाधीवाद्यानी थाबवल होत. गुरुजी त्यातलेच एक होते. त्याना चिमटा चागला जाणवला होता. आता काही अनवस्था प्रसग येणार हे बघून श्याम घाईघाईन म्हणाला, 'वा! फार मोठ्ठा मेळावा जमला होता म्हणे तिथ?'

'मोठ्ठा?' दाडेकर मोठ्ठ्या आनदानं व अभिमानान म्हणाले,' नुसता मोठा नाही प्रचड म्हणा, प्रचड! जवळ जवळ पाच लाख तरी जमले होते'.

'पाच लाख? पण पेपरवाल्यानी तर तीन एक लाख होते म्हणून म्हटलय' बर्वे गुरुजीनी मधाच उट्ट काढल.

'बर, तीन लाख तर तीन लाख, मग तर झाल?' हरिभाऊच हे फार चागल होत की ते वाद फार वाढवत नसत. 'पण तीन लाख म्हणजे सुद्धा काही कमी नाही'

'अहो, लोकसख्याच इतकी वाढलीय की अगदी साध्या कार्यक्रमालाही लाख दीड लाख लोक जमतात.' परत गुरुजीनी उट्ट काढल. कामतचे ओठ काहीतरी बोलण्याकरता अगदी सळसळत होते पण त्याला सधीच मिळत नव्हती.

'बर, लाख-दीड लाख कुठेही जमतात हे जरी मानल तरी इथ तीन लाख जमले होते ना? इतका मोठा समुदाय आजकाल कुठे पहायला मिळतो?'

श्यामला हरिभाऊच्या शात वृत्तीच कौतुक वाटल.

'का? व्ही टी. वर किंवा चर्चगेटला जा दहा लाख लोक तुम्हाला दहा मिनिटात दिसतील' कुणी काही बोलण्याआधी घाईघाईन कामत म्हणाला.

'पण आळदीला जमलेले एका हेतूनं जमले होते व्ही. टी. ला वा चर्चगेटला तस होत नाही.' शात हरिभाऊ उत्तरले.

'का? व्ही टी., चर्चगेटला पण एकाच हेतून येतात की, म्हणजे आपआपल्या घरी जाण्याच्या हेतून' परत उतावळा कामत

'पण आळदीला जमलेल्याचा हेतू तसा घरगुती नव्हता.'

'मग काय होता त्याचा हेतू?' श्याम मघापासून काहीतरी बोलण्याची वाट पाहात होता.

, वा! पेपर्समधे बाकी सगळ वाचता आणि फक्त समेलनाचा हेतू काय होता ह्याबद्दलच काही वाचल नाहीत, श्यामराव?'

'पेपरमधे वाचलं होत म्हणूनच तर ते विचारताहेत पेपरमधे दिल होतं की कुणी संत साधुमडळी येणार आहेत अस सागितलं होतं म्हणून भाबडी जनता त्याच्या दर्शनाला आली होती' परत कामत.

'हा सगळा विरोधी पक्षाचा प्रचार' दाडेकरानी थोड्या जिद्दीन कॉंग्रेस बाण काढला काही टीका झाली व त्याला उत्तर देता आल नाही की, 'हा सगळा विरोधी पक्षाचा प्रचार' अस अगदी आय् टू ब्रेड् कॉंग्रेसवाले उत्तर देतात. त्यालाच 'कॉंग्रेस बाण' म्हणतात. दाडेकरानी तोच बाण काढला होता.

'कामत, प्रथम हरिभाऊना काय सागायच आहे ते तर सागू दे. फार भव्य मेळावा होता नाही दाडेकर? काय काय ठरल समेलनात?' श्याम कामतला दटावत म्हणाला

'बऱ्याच गोष्टी ठरल्या' हरिभाऊ मोठ मन लावून व तळमळीन सागू लागले 'मुख्य म्हणजे साऱ्या हिंदूची सघटना करायची'

'श्यामराव, मी निघतो, माझी दूध पिण्याची वेळ झाली' बर्वे ताडकन उठून दाराकडे जात म्हणाले गुरुजीची दूध पिण्याची वेळ झाली म्हणजे मग प्रत्यक्ष ब्रह्मदेव जरी आडवा आला तरी ते थाबत नसत तेव्हा श्याम त्याना थाबवण्याच्या भानगडीत पडला नाही

'बर झाल, सुठीवाचून खोकला गेला' बर्वे दरवाज्यापलीकडे गेले आहेत असे बघून दाडेकर आनदाने म्हणाले.

', बरोबर आहे, तुम्हा लोकाना खोकला जाण्यापेक्षा सुठ वाचल्याचाच जास्त आनद होणार.' कामत हळू आवाजात म्हणाला श्यामला ह्या एका बाबतीत कामतचा फार राग येत असे. त्याच्या 'ह्या लोकाना' म्हणजे 'चित्पावनाना' हे स्पष्ट होते. जग अगदा २१ व्या नाही तर ३१ व्या शतकात जरी गेलं तरी ह्या कामत सारख्या सारस्वताचं चित्पावनाना चिमटे काढण काही कमी होणार नाही आता थोडी सूठ वाचल्याबद्दल दाडेकरांना खूप आनद झाला असला तरी कामतनं लगेच त्या जातीच वैगुण्य काढायची काही गरज होती का? ही सारस्वत मंडळी अशीच असे विचार श्यामच्या मनात आले तेवढ्यात त्याचं लक्ष हरिभाऊकडे गेल. 'अरे, इकडे हा गृहस्थ समस्त हिंदूची एकी करायच म्हणतोय आणि आपण कामतन साधा चिमटा काढला तर साऱ्या सारस्वताना नाव ठेवायला लागलो आहोत.'

सुदैवान हरिभाऊंच कामतच्या बोलण्याकडे लक्ष नव्हत. ते अजुनी बर्वे गेले त्या दाराकडेच पाहात होते 'हिंदूची संघटना करायची म्हटली की ह्या कॉंग्रेसवाल्याचा, त्यातल्या त्यात ह्या गाधीवाल्याचा पोटशूळ का उठतो ते कळत नाही.'

'त्याचा पोटशूळ राहू द्या हो, त्याच्यापाशी. तुम्ही समस्त हिंदूच काय करायच म्हणत होतात?' श्यामने विचारल. त्या 'सुठ प्रकरणा'पासून तो थोडा अस्वस्थ झाला होता

'अहो काय करायच म्हणून काय विचारता श्यामराव? सगळ्या हिंदूची भक्कम पायावर सघटना करायची.'

'पण गेली साठ-सत्तर वर्षं तुम्ही तेच तर करताहात ना?' श्यामने अगदी अभावितपणे विचारलं पण त्यामुळे कामतला जोर चढला.

'कॉंग्रेसन साठ वर्षांत देशाच स्वातंत्र्य मिळवल, लीगन त्यापेक्षा कमी वर्षांत पाकिस्तान पदरात पाडून घेतल आणि तुम्ही सत्तर वर्षं झाली तरी अजुनी सघटनेचा पहिला पाढा गिरवताहात? तुमच्यासारख दुसर जगात कुणी नसेल.'

हरिभाऊ काही निर्ढावलेले पुढारी नव्हते. साधे तळमळीचे कार्यकर्ते होते. अशा लोकाचीच नेहमी, पंचाईत होते. हरिभाऊचा चेहरा चागलाच पडला. त्याला उचकवण्याकरता म्हणून श्याम म्हणाला,

'जगात कुणी नसेल अस कसं म्हणतोस कामत? अगदी आपल्या भारतातच आहे की दुसर उदाहरण ते म्हणजे कम्युनिस्ट पक्षाच.

'जगातल्या सान्या कामगारानो एक व्हा' अशी ललकारी ह्यांची पण आता प्रत्यक्षात त्याचे मागे मुबईचे कामगार पण आता राहिले नाही आहेत. ह्याच्या इदिरा डागे सपशेल पडल्या की ह्यांच्या मुबईतच.' श्याम नुसता म्हणालाच नाही तर मनसोक्त हसला सुद्धा.

'काका, कम्युनिस्टाना नाव ठेवण्यात तुम्हाला नेहमी आसुरी आनद मिळतो, हे बघितलंय मी. पण त्या समाजवादी पक्षा-विषयी कधी बोलत नाहीत ते?'

'बोलतो तर, पण आता आपण पक्षाविषयी बोलतो आहोत. समाजवादी पुढारी हे एका पक्षाचे नाहीत, ते एक एक वेगवेगळे पक्षी आहेत. प्रत्येक पक्षी आकाराने वेगळा, रगान वेगळा. प्रत्येकाची चिव चिव करण्याची पद्धत वेगळी! त्याच्याबद्दल काय बोलाव?' एवढ बोलून श्याम परत गडगडून हसला.

ह्या सगळ्याचा दाडेकरावर अपेक्षेप्रमाण परिणाम झाला. त्याचा चेहरा उजळला. तरी आपल्या नेहमीच्या स्वभावाला धरून ते म्हणाले, 'आपण दुसऱ्याना कशाला नाव ठेवायची? आपण आपल कार्य करत राहाव.'

'कसलं कार्य?' पक्षापक्षांच्या गडबडीत श्याम हे कार्याच विसरूनचं गेला होता

'हिंदू सघटनेच हो' हरिभाऊ समजु-तीच्या स्वरात म्हणाले, 'आळदीला जमलेल्या सगळ्या पुढाऱ्यानी समस्त हिंदूची एकी होण्यावर फार भर दिला. व त्याची फार गरज आहे, म्हणून सागितल जातिभेदातील, पथ व सप्रदायभेदातील सगळ्या हिंदूची एकी करायची असं आम्ही ठरवल आहे. तुम्ही आता निवृत्त आहात तर तुम्हाला ह्या बाबतीत काय करता येईल?'

'पण हिंदूची एकी करून तुम्ही करणार काय?' श्यामन विचारल. आता कामत नुसताच ऐकत होता

ह्या प्रश्नानं दाडेकर चांगलेच गोधळून गेले. एखाद्यान महाराष्ट्र लॉटरीच दहा लाखाच तिकिट घेतल्याचं सागाव व त्या दहा लाखाचं तू काय करणार? अस विचारल्या-वर तो गृहस्थ गोधळून जावा तस हरिभाऊच झाल. त्या तिकिट घेणाऱ्याला आपल्याला बक्षिस मिळणार नाही ह्याची अगदी खात्री असते म्हणून तो त्या दहा लाखाच काय करायच ह्याचा विचारसुद्धा करत नाही. तसच आळदीला जमलेल्या पुढाऱ्याच झाल होतं खरच सगळा हिंदू समाज एकत्र झाला तर काय करायच हे त्यानी ठरवलच नव्हत. तशी एकी कधी होणार नाही ह्याची त्याना खात्री असावी. कदाचित काय करायचं हे आधी ठरवल तर एकी होण्याचा संभव जास्त होता. .

पण त्या प्रश्नामुळे दाडेकरासारख्या सामान्य कार्यकर्त्याची फार पचाईत झाली. काही वेळ ते काही बोललेच नाहीत. पण नंतर स्वत ला सावरत म्हणाले, 'वा काय करायच म्हणून काय विचारता श्यामराव? हिंदूच्या हिताचं रक्षण करायच!'

'उत्तम पण आता सागा, कर्नाटक सीमे-वरचा प्रश्न तुम्ही कसा सोडवाल?'

'अगदी सोपं आहे ते.' हरिभाऊ हसत हसत म्हणाले.' 'ती सगळी गाव न् खेडी महाराष्ट्राला देऊन टाकायची'

'पण कर्नाटकचे लोक बरे तयार होतील?'

'मग त्याच्याशी लढा द्यायला लागेल.' दाडेकर मोठ्या ठामपणे म्हणाले.

'पण ते सगळे हिंदू! त्यात अल्पसख्या-काचा काही संबध नाही तुम्ही त्याच्याशी लढणार तर ते तुमच्या संघटनेत कसे सामील होतील?'

दाडेकर थोडे निरुत्तर झाले. तरी सवाद चालू ठेवण्याकरिता म्हणाले, 'कर्नाटक सीमेचा प्रश्न कांग्रेसनं फार दिवस कुजत ठेवलाय. तो जरा बाजूला राहू दे. पण निवडणुकीत हिंदूनी हिंदुना मत द्यायला काय हरकत आहे?'

'अहो जिथ हिंदू बहुसख्येत आहेत, तिथ अल्पसख्याक कशाला उभ राहतोय पडून जायला? तिथ सगळे उमेदवार हिंदूच असणार.'

'मग मत कुणा हिंदूला देणार?' बराच वेळ शात बसलेल्या कामतनं निवडणुकीचा विषय निघताच बोलायला सुरुवात केली 'आता परवाची विलेपार्ले पोटनिवडणूकच पाहा ना. तिन्ही पक्षाचे उमेदवार चक्क हिंदू होते गुजराथी वस्ती जास्त आहे म्हणून एका पक्षानं गुजराथी उभा केला होता. आता गुजराथी हिंदू आहे म्हणून त्याला मत द्यायची की मराठी नाही म्हणून द्यायची नाहीत असा प्रश्न कित्येक मतदाराना पडला.'

'बर निवडणुकीवरून आठवलं.' श्याम म्हणाला, 'आता ग्वाल्हेरच उदाहरण घ्या. माधवराव शिंदे व बाजपायी दोघे हिंदू उमेद-वार माधवराव कांग्रेस 'आय' चे व बाजपायी भाजपचे. तरी तिथल्या मराठी व संघाच्या लोकानी शिंदे 'आय' चे असले तरी 'आपले' मानले व त्याना निवडून दिले. आणि बाजपायी अगदी त्याच्या बालेकिल्ल्यात हरले अशा तऱ्हेन तर आपले लोक विचार करतात.'

'बघा ना. एकदा पतप्रधान होऊ घातलेले बाजपाई साधे पत सुद्धा राहिले नाहीत.' कामत आसुरी आनदात म्हणाला व श्याम व कामत आसुरी पद्धतीन हसले

ह्या सगळ्यामुळे कधीही न चिडणारे हरिभाऊ थोडे चिडीन म्हणाले, 'म्हणजे तुम्हाला हिंदूची सघटना होऊ नये अस वाटत का?'

श्यामला आपली चूक लक्षात आली तो तातडीन म्हणाला, 'नाही हो हरिभाऊ, आम्ही पण अभिमानान म्हणतो की आम्ही हिंदू आहोत म्हणून आपल्या समाजाची सघटना होऊ नये अस कुणाला वाटेल?'

'मग आम्ही तशी सघटना करावी म्हटल की तुम्ही आमची टिंगल-टवाळी का करता-आमच्या हेतूविषयी तुम्हाला सशय आहे का?'

'नाही हो, तुमच्यासारख्या कार्यकर्त्या-विषयी कोण सशय घेईल? पण स्पष्टपणा-बद्दल माफ करा; पण तुमची पुढारी मंडळी याच योग्य मार्गदर्शन करत नाहीत अस वाटतं.'

'पण का? हिंदूची सघटना व्हावी अस ते म्हणतात त्यात अयोग्य काय आहे?'

'त्यात अयोग्य काही नाही. पण हे सगळ सागण्याची व करण्याची वेळ मात्र अयोग्य आहे हिंदूची सघटना करायची खरी वेळ होती ती स्वातत्र्य मिळण्याआधी! त्यावेळी ही कर-कर मडळी एकत्र आली असती तर?'

कर-कर मडळी हे प्रकरण दाडेकराना कळल नाही अन् कामतलाही. 'काका, हे कर-कर मडळी काय प्रकरण आहे?'

'प्रकरण वगैरे काही नाही. कर-कर मडळी म्हणजे सावरकर, गोळवलकर व आबेडकर मडळी.'

'पण ते कस शक्य होत?' कामतन शंका व्यक्त केली. 'वेगवेगळ्या विचारांची माणस. होती ती.'

'मग कॉंग्रेसमधे कशी वेगवेगळ्या विचाराची माणस एकत्र आली ? गोविंद वल्लभ पंत होते, सरदार पटेल होते, सुभाष बोस होते तर आचार्य कृपलानी होते. मौलाना आझाद होते तर पंडित मालवीय होते पश्चिमेचे गफारखान होते तर आसामचा बार्डोलाय होता. गांधीवादी शंकरराव देव होते तर समाजवादी नरेंद्र देव पण होते ...'

'पुरे, पुरे एवढी मोठी यादी कशासाठी ?' कामतने अगदी न राहावून विचारले.

"हेच दाखवण्याकरता की, कॉंग्रेसमधे भारताच्या ह्या टोकापासून तर त्या टोकापर्यंतची बुद्धिमान व देशप्रेमाने भारलेली माणस होती. ती एकत्र आली. पण त्याच्या इतकीच बुद्धिमान व देशप्रेमी आंबेडकर, सावरकर व गोळवलकर ही मंडळी काही एकत्र येऊ शकली नाहीत. तसं झाल असत तर भारताचा इतिहास बदलला असता.'

काही वेळ कुणी काहीच बोलल नाही. थोडया वेळानंदांडेकर म्हणाले, 'बरं, झाल, गेलं ते गंगेला मिळाल. आता काय करायच?'

'ह्राच धडा घ्यायचा की तुमच्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांची एकवेळ एकी होईल, पण ह्या पुढारी मंडळीची होण शक्य नाही, तेव्हा ह्या पुढारी मंडळीपासून सावध राहायच.'

हा धडा ऐकून हरिभाऊ अन् कामत दोघंही श्यामकडे पाहातच राहिली.

□

श्याम दुपारच्या वामकुक्षीतून जागा झाला तो मुळी राधाच्या तावातावानं बोलण्यामुळे. जाण्याआधी राधान तयार करून ठेवलेल्या जेवणावर श्यामन ताव मारला होता. त्यामुळे पडल्यापडल्या वर्तमानपत्रातला वाचकाचा पत्रव्यवहार वाचता वाचता त्याचा डोळयाला डोळा लागला होता. अगदी गडद झोप लागली होती.

वाचकाचा पत्रव्यवहार हे श्यामच फार आवडत सदर होत. अगदी बातम्या आणि अग्रलेखापेक्षा सुद्धा जास्त आवडत. बातम्या म्हणजे आज पंजाबात किती मारले गेले किंवा राजीवजी आता पंजाबबाबत खूप कडक धोरण अवलंबणार किंवा विरोधी पक्षाने आज सुद्धा सभात्याग केला हेच वाचायच ना ? अग्रलेख काय असणार ह्याचा संपादक मंडळी माहीत असल्यामुळे सहज अंदाज करता येतो. पण पत्रव्यवहार करणारे समाजाच्या वेगवेगळया थरातून आलेले असतात. त्यामुळे समाज कोणत्या थराला पोहोचला आहे हे झटकन कळत.

सध्या पत्रव्यवहाऱ्याना फक्त एकच प्रश्न बोचत होता. तो म्हणजे राजीवजीनी शंकररावजीची भेट घेतली नाही, हा. इकडे दुधाचे भाव वाढताहेत, दुष्काळाची परिस्थिती होती तशीच आहे तरी पण पत्रलेखकाना त्याच काही नव्हत. त्याना फक्त शंकर-राजीव भेट कधी होईल ह्याचा ध्यास लागला होता. त्याना तशी भेट मिळाली नाही त्याचा पत्रलेखकाना फार राग आला होता. त्याना साऱ्या महाराष्ट्राचा अपमान झाल्यासारखा वाटत होता, खंत वाटत होती. दिल्ली दरबार महाराष्ट्राला असच वागवत असे ह्याचे ऐतिहासिक पुरावे दिले जात होते.

बर ही भेट काही महाराष्ट्राच भल होण्याकरता होणार होती, कर्नाटक सीमेचा प्रश्न सोडवण्याकरता होणार होती असही नव्हत. मंत्रि-मंडळात वाढ करण्याबाबत पंतप्रधान हिरवा झेंडा दाखवण्याबाबत ही भेट होणार होती; म्हणजे एखाद्या १०-१२ वाती असणाऱ्या समईत आठच वाती जळताहेत हे बघून एखाद्या बाईनं फार कासावीस व्हाव व बाकीच्या वाती लावण्याकरता त्या बाईनं धावपळ करावी असच होत आहे त्या वातीचा सगळया महाराष्ट्रात लख्ख प्रकाश पडला असता ह्या पत्रलेखकानी इतक उतावीळ का व्हाव हे श्यामला काही कळत नसे.

चव्हाणानी महाराष्ट्राची अस्मिता डागाळली, वगैरे रागाचा नुसता डोंब उसळला होता व त्यात वर्तमानपत्राचे दिल्लीतले खास बातमीदार तेल टाकत होते.

कॉंग्रेसची शंभरी भरली असता राजीव गांधीनी मुंबईकरता शंभर कोटी देऊ म्हणून घोषणा केली होती. त्यातले शंभर पैसे सुद्धा मिळाले नव्हते, पण त्याच जनतेला नाही, पत्रलेखकाना नाही अगदी मुंबईला महापौराना सुद्धा काही वाटत नव्हत राजीवजीवर बहिष्कार तर सोडूनच द्या, त्याना हार घालायला महापौर पुढे सरसावत होते.

ह्या गोष्टीबाबत एक चकार शब्द नव्हता. सगळयाना फिकीर पडली होती मंत्रि-मंडळात वाढ होण्याची व त्याबद्दलच पत्रलेखक तावातावाने लिहीत होते. ह्याच श्यामला फार कौतुक वाटत असे. त्या कौतुकातच त्याला झोप लागून गेली होती.

ह्यातून तो जागा झाला तो राधा कुणाशी तरी तावातावान बोलतेय हे ऐकून. 'म्हणजे राधाच्या कुणी मैत्रिणी वगैरे आलेल्या दिसताहेत ' श्याम आनंदित होऊन मनाशीच म्हणाला, 'म्हणजे आता दीड-दोन तास चांगले गप्पा-टप्पात जाणार तर '

श्यामन तोंड धुतल. कारळयाच्या चटणीसारख्या झालेल्या केसावरून कंगवा फिरवला. अशा वेळी आपण निवृत्त झालो तरी आपले केस निवृत्त झाले नाहीत ह्याचा त्याला आनंद होत असे. आरशात पाहून झाल्यावर श्यामने हॉलमध्ये प्रवेश करता करता विचारल, 'म्हणजे केव्हा आलीस तू ?' आणि राधा समोर बसलेल्या दोन तरुणीकडे बघून त्यान स्मित केल.

'चांगला पाऊण एक तास झाला' राधाने त्या तरुणीशी चाललेल आपल बोलण थांबवत म्हटलं,

'आमची जेवण सुद्धा झाली. आणि आता विचारताय ?'

'पाऊण एक तास झाला ? जेवणं झाली? आणि मला कळलं सुद्धा नाही ?' श्यामने सोफ्यावर जागा होती तिथ बसत विचारलं.

'तुम्ही झोपला होतात कुंभकर्णासारखे, तुम्हाला कसे कळणार?' राधाने कौतुकमिश्र रागात विचारले.

पण श्यामचे त्या कौतुक मिश्राकडे लक्ष नव्हत. कुंभकर्णाच नाव ऐकून त्याच्या मनात आल. एवढ रिडल्स प्रकरण झालं. जगाचा उद्धार करणाऱ्या प्रभू रामचंद्राचा उद्धार झाला त्याचबरोबर सीतेचा झाला. महाबळी रावणाचा झाला पण ह्या कुंभकर्णावर वा त्याच्या झोपेबाबत कस काही लिहिलं गेलं नाही ? तो असा झोपाळू नव्हता त्याला झोपाळू ठरवण्यामागे ब्राह्मण जातीचा दुष्ट हेतू आहे वगैरे संशोधन कस कुणी केल नाही. एकाही तज्ञाला कुंभकर्णावर झालेल्या ह्या महान अन्यायाबाबत काही वाटू नये ? का हा स्वतः रामायण रचणाऱ्या वाल्मिकींचाच काही डाव असावा ? कारण त्याना माहीत होत की आपण काही लिहिल तरी राग निघणार आहे ब्राह्मणावर ! बाकी कुणी लिहिलं नाही तर

नाही, आपण तरी लिहावं असं श्यामच्या मनात आलं. पण ह्या लिहिण्याच्या हौशीपायी कित्येकांचे काय हाल झाले हे त्याला माहीत होतं. तेव्हा तो मनात आलेला विचार त्याने मनातच झटकला व ' ह्या मुली कोण गं राधा !' म्हणून विचारलं.

राधानं त्यांची नावं व गावं सांगितली. पण आजकाल अवघडात अवघड नावं ठेवायची नुसती स्पर्धा लागली असल्याकारणानं श्याम ती नावं तात्काळ विसरला. पण गावांची नावं सोपी असल्यामुळं त्याच्या लक्षात आली.

' बापरे ! ' श्यामनं दोघीतल्या जास्त भोळ्या मुलीकडे पाहात आश्चर्य दाखवत म्हटलं ' म्हणजे ही वसईहून येते ? '

आतापर्यंत श्यामला वसई तिथल्या केळ्यांकरता व चिमाजीअप्पांकरता माहीत होती. तिथं इतकी सुधारणा झाली असेल ह्याची त्याला कल्पना नव्हती. तेव्हा त्याला आश्चर्य वाटणं साहजिकच होतं. पण आश्चर्य वाटायची हीच कारणं नव्हती. तो आत्तापर्यंत फक्त एकदाच वसईला गेला होता. व त्या एका भेटीतच त्याला वसई भारताच्या अगदी एका टोकाला आहे असं वाटलं होतं.

' म्हणजे ? इतक्या दुरून दुरून येतात मुली ? ' श्यामचं आश्चर्य अजुनी कमी झालं नव्हतं. पण नंतर आपल्याच प्रश्नाचं उत्तर देत तो म्हणाला, ' साहजिकच आहे, अखिल भारतीय आघाडी आहे तुमची. '

' ही काही अखिल भारतीय आघाडीची नाहीये. ' राधा म्हणाली, ' नुसती महिला आघाडीची आहे.'

नुसती महिला आघाडीची म्हणजे डाव्या विचाराची आहे, हे श्यामच्या लक्षात आले.

' आणि ही ?' श्यामनं त्या दुसऱ्या गोऱ्या अन् घाऱ्या मुलीकडे बघत विचारलं.' ही तर ' निष्ठा ' पैकी वाटते. '

'हो ! ' त्या गोऱ्या अन् घाऱ्या मुलीनं ठसक्यात उत्तर दिलं, ' मी आहेच मुळी हिंदू महिला समितीची.'

आता मात्र श्यामच्या आश्चर्याच्या पारावार राहिला नाही. ही वसईवाली अशी डावी, राधा मधली व ही घारी व गोरी ' निष्ठा ' पैकी एक. पूर्वीच्या काळी ह्याला आवळ्या-भोपळ्याची मोट म्हटलं असतं. आता ह्या सुधारलेल्या जगात काय म्हणतात बुवा ? पण त्याला पडलेल्या आश्चर्यानं त्याला ह्या आवळ्या-भोपळ्यांत जास्त वेळ अडकवू दिलं नाही.

' पण तुम्ही तिघी तीन रंगांच्या तिरंगी झेंड्यासारख्या एकत्र कशा ? ' नेहमीप्रमाणे त्याच्या एकट्याशिवाय कुणी हसलं नाही.

' मग त्याला काय झालं ?' भोळ्या दिसणाऱ्या त्या वसईकरणीनं उलट श्यामलाच विचारलं.

' मला काही झालं नाही, पण तुमच्यातल्या बाकीच्यांना चालतं का ?' श्याम तसा सोडणारा नव्हता.

ह्या प्रश्नानं त्या तिघीहीजणी एकदम चूप झाल्या. हा प्रश्न त्यांनाही पडला असावा. स्वतः प्रश्न पडलेली माणसं काय बोलणार ?

शेवटी त्या वसईवालीनंच नारळ फोडला. ' काका म्हणतात ते खरं आहे. आपल्यातल्यांनाच चालत नाही. आता हिची माझी मैत्री जमलीय व आम्ही बरोबर असतो ते होळकरबाईंना आवडत नाही. '

' कुणाला ? ' श्यामला ' होळकरबाई ' हे स्पष्ट नीट ऐकू आलं नव्हतं म्हणून त्यानं विचारलं.

' होळकरबाई हो ' वसई म्हणाली, ' होळकरबाई माहीत नाहीत तुम्हाला ? '

' छे, छे, होळकर माहीत नाहीत असं सगळ्या संयुक्त महाराष्ट्रात कुणी असेल का? ' श्याम म्हणाला.

श्याम म्हणाला होता ते अगदी खरं होतं. होळकरबाई डाव्या विचारांच्या प्रमुख कार्यकर्त्या होत्या. त्या दोन मुलींचं एकत्र मिळून जेवढं वय असेल त्याहूनही जास्त काळ त्या राजकीय कार्य करत होत्या. एकही अशी चळवळ झाली नव्हती की त्यात होळकरबाईंनी भाग घेतला नव्हता. ह्याला अपवाद म्हणजे १९४२ सालची चळवळ. पण त्याला बाईंचा काही इलाज नव्हता.' वरून ' म्हणजे वरच्या पुढाऱ्यांकडून जसा हुकूम आला होता तसं वागणं त्यांना भागच होत.

हे सगळं जरी खरं असलं तरी त्या एक फार मोठ्या तळमळीच्या कार्यकर्त्या होत्या ह्यात शंका नव्हती.

' का ? साधं मैत्री ठेवलेलं वा बरोबर फिरलेलं सुद्धा आवडत नाही, तुझ्या त्या होळकर बाईंना ? पण का ? ' श्यामने प्रश्न विचारला होता तरी ह्या ' मुक्ती ' चळवळीतल्या वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्या एकमेकांशी फटकून वागतात हे त्याला माहीत


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

लेक वालेसा
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

काही दिवस श्यामचे काही राधाचे
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

होत. पण प्रकरण इतक्या थराला गल असेल ह्याची त्याला कल्पना नव्हती.

'अहो, ही हिंदुत्वनिष्ठ आहे ना ? मग तिच्याबरोबर सबध ठेवलेला कसा चालेल ?'

'पण आपण एकमेकींवर आपली राजकीय मत थोडीच लादतो आहोत? स्त्रियाचे म्हणून प्रश्न आहेत त्यावर आपण सगळयानी एकत्र यायला ह्या वडया वायकाची का हरकत असावी हे मला कळतच नाही.' गोरी व घारी थोडी उत्तेजित होऊनच म्हणाली, 'निष्ठा' वाल्याची हीच मोठी पचाईत आहे. त्याना पुष्कळ गोष्टी कळतच नाहीत.'

'बऱ्याच आहेत की तुझ्या होळकर बाई.' श्याम अस म्हणताच वसईवाली तडकली. 'होळकरबाईंनाच नावं ठेवू नका. ह्या राधाताईंच्या पक्षाच्या पुढारणी पण तसल्याच आहेत सगळया गोष्टी त्या सुद्धा पक्षीय राजकारणातूनच पहातात.'

'खर आहे तुझ म्हणण.' राधा थोड कान-कोंडेपणान म्हणाली 'ह्यावरून मधुवती-बाईंशी माझा चागला वाद पण झाला होता'

'प्रत्यक्ष मधुवतीबाईंशी ?' श्याम, वसई व घारी, तिघानी एकदम व एकाच आश्चर्यान विचारल.

त्यानी तस आश्चर्यान विचारण अगदी साहजिकच होतं. मधुवतीबाई म्हणजे काही साध्या, सामान्य महिला नव्हत्या. त्या त्याचे मिस्टर किंवा जीवनसाथी दोघं एकाच वेळी लोकसभेचे सदस्य होते. बाई नतरची निवडणूक हरल्या तरी त्याचे जीवनसाथी अजूनही सदस्य होते व बैठका गाजवत होते.

'मधुवतीबाईंशी वाद घातलास तू ?' श्यामच आश्चर्य अजूनी कमी झाल नव्हत. 'पण कशावरून ?'

'मग सोडते की काय ?' राधाला सगळ सागून टाकण्याची उबळ आली होती. 'त्या मुस्लिम बायकाच्या विलावरून हो मी त्याना म्हटलं की त्या शहाबुद्दीनला पक्षातून काढून का टाकल जात नाही ?'

'मग त्या काय म्हणाल्या ?' वसईन रस घेत विचारलं

'तस करण पक्षाच्या दृष्टीन योग्य होणार नाही हे त्याच उत्तर!' मग मी म्हटल की, 'अहो, हा साधासुधा प्रश्न नाही. अगदी बेसिक प्रश्न आहे. ह्याबद्दल असा समझोता करून कसा चालेल ?'

'आम्हाला सगळे जुन्या धार्मिक विचाराचे मानतात' अर्थात हे गोरी व घारी म्हणत होती, 'पण ह्याच्या पक्षाच्या प्राताध्यक्षानी सतीला जाहीर पाठिंबा दिला, त्याला तरी ह्यानी कुठ काढलं ?'

'तिथही पक्षाचं हित आड आल.' उदास राधा

'मग मी बाईंना म्हटल की निदान तुम्ही बायकानी तरी पक्षाच्या बाहेर पडायचं. त्या-वर त्या एक शब्द बोलल्या नाहीत.'

'खर सागू का राधाताई' वसईवाली खिन्नपणे म्हणाली, 'आपली स्त्री-मुक्ती चळवळ म्हणज ह्या राजकीय पुढाऱ्याच एक तोंडी लावण आहे. चटण्या-कोशिंबिरीला जेवणात महत्त्व किती ? तस महत्त्व देतात ह्या पुढारी बायका.'

'तरी अजून खरी मजा यायचीच आहे.' इतक्या वेळ शात असलेल्या श्यामला अचानक कठ फुटला. आता आणखी काय मजा यायची आहे ? असा प्रश्न त्या तिघीना पडला व त्या दृष्टीनं त्या श्यामकडे पाहू लागल्या.

'आता दीड-पावणे दोन वर्षांत निवडणुकी होणार आहेत त्यावेळी बघा सगळयाजणी स्त्री-मुक्ती वगैरे विसरतील. आणि ह्याच शहाबुद्दीन का महाबुद्दीनला निवडून द्या म्हणून प्रचार करतील एकतरी स्त्री-मुक्ती उमेदवार उभा रहातोय का बघा. निवडून येण तर दूरच.'

आता तिघीही जणी गभीर झाल्या. श्याम जरी जास्त जहाल बोलला होता तरी त्यात तथ्य असल्याच त्याना जाणवत होत.

'मग काय करायच हो आपण सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी ?' त्या दोघींपैकी एकीन विचारल

'मी सागतो उपाय, पटतो का पहा. ह्या पुढारीमडळीपासून सावध रहायच.' श्यामन उपाय सुचवला.

तो उपाय ऐकून त्या तिघीजणी श्यामकडे पहातच राहिल्या.

□


## जमिनीवर व विहिरीमध्ये ६" व ४ ½" बोअरिंगसाठी

बोअरवेलच का करून घ्यावी ?

(१) बोअरवेल एक दिवसात खोदता येते.

(२) बोअरवेलचा खर्च अगदी कमी.

(३) बोअरवेलसाठी लहान जागा पुरते.

(४) बोअरवेलचे पाणी खोल, खडकातील. म्हणूनच शुद्ध आणि प्रकृतीस उत्तम.

(५) बोअरवेलवर अपघात होऊ शकत नाही.

**गणेश बोअरवेल्स**
१००२ राजेंद्रनगर
पुणे – ४११०३०
दूरध्वनी – ३७३७७

**गणेश बोअरवेल्स**
एफ्–५, एम्. आय्. डी. सी.
अहमदनगर – ४१४१११
दूरध्वनी – २१७

# स्वयंसेवी चळवळीतील दोन प्रवाह : निम-राजकीय, अ-राजकीय



## विनय सहस्रबुद्धे

विद्यार्थी परिषदेच पूर्ण वेळ काम करण्यासाठी मी ठाण्यातून मुंबईत दाखल झालो तेव्हा माझ्याकडे संघटनात्मक जबाबदारी आली ती मध्यमुंबईची ! त्यावेळच्या आमच्या रचनेत धारावी उपनगर हा मध्य मुंबईचा भाग समजला जायचा. आशिया खंडातल्या सर्वात मोठ्या अशा या गलिच्छ वस्तीचा आणि माझा जवळचा संबंध यायला, किंवा खरं तर गलिच्छ वस्तीचं जवळून – डोळे आणि कानाबरोबरच नाकही उघड ठेवून – दर्शन घेण्याची संधी मिळायला हेच निमित्त झालं.

धारावीतली वस्ती मुख्यतः दलित आणि मुसलमानांची. त्यातही अर्धेअधिक दक्षिण भारतातले. माहीम स्टेशनवर उतरून पूर्वेला मुख्य रस्त्यानं वस्तीच्या आत आत जायचं म्हणजे माझ्या अगदी जीवावर यायचं. त्यातच पावसाचे दिवस असतील तेव्हा तर अगदी नको व्हायचं. शबनम, असेल तेव्हा छत्री सांभाळीत, चिखल तुडवीत जावं लागायचं. दुतर्फा कचऱ्यांचे ढीग लहान मुलांच्या विष्ठेचे इतस्ततः सांडलेले ठिपके, मधूनच मेंढ्या किंवा इतर प्राण्यांचे केस हे सगळं चुकवीत मोठ्या निर्धारानं पुढं जावं लागत असे. शुक्रवार असेल तेव्हा मशिदी आणि मदरशाच्या पुढे फडकी पसरून मुसलमानांचा नमाज चालायचा, पोलिस स्टेशनाच्या थोडं पुढं गेल्यावर डावीकडे धारावी कोळीवाडा सोडायचा नि उजवीकडे गल्लीत आत वळल्यावर आपण जनता विद्यामंदिराकडे जातो. भाजी मासळीचा बाजार ओलांडून पुढे जाताच एखादा जुना पुराणा ऐतिहासिक वाडा असावा तसं एक घर लागायचं. ती निर्मनुष्य वास्तू मला खूप आवडायची. आणखी पुढे गेल्यावर आमच्या सगळ्या कार्यकर्त्यांची घरं एकगट्टा हाती यायची. अशोक पोळ, शिवाजी नारायणे, सुरेश गजाकोश, अरुण सकपाळ ... सगळे !

पण धारावीत काम करणं खूप कठीण आणि कंटाळवाणं होतं. सुरुवाती. सुरुवातीला तिथल्या गलिच्छपणाचा खूप त्रास व्हायचा. पावसाच्या वाहत्या पाण्यात कुठल्याशा गटारातनं वाहात आलेली, कोथळा बाहेर निघालेली भली मोठी घूस एकदा माझ्या डोळ्यांदेखत पायावरून वाहात गेली त्यावेळी इतकं मळमळून आलं की ओकारीच

झाली असती ! कुठले कुठले वास यायचे ... धारावीच्या तोंडाशीच चामडयावर प्रक्रिया करणारे कारखाने आहेत, तिथ वासानं डोक भणभणून जायच. हातभर लाबीच्या पापडयाच्या तळणीचा, मेलेल्या कुत्र्याचा, माशाचा, मटणाचा, टिपिकल मद्राशी उदाचा ... सगळघा वासाच एक अजब मिश्रण ... त्यात पाऊस पडल्यानतर तर हे वास आणखीच गडद व्हायचे. गल्लीमोहल्ल्याच्या अतर्भागातून येणारा हातभट्टीचा दर्प तर खूपच असह्य व्हायचा

वाचनालय किंवा संस्कार केंद्रासारखा काहीबाही उपक्रम चालू ठेवायचा असा आमचा निर्धार होता. त्यासाठी आठवडयातून एकदा धारावीत बैठक व्हायची. पण धारावीतली पोर बैठकीला येण्यात एकदम नाठाळ. वारवारदा बजावून, निरोप सागूनसुद्धा बैठकीत येतील याची खात्री नाही. अशोक पोळ, त्यातल्या त्यात जास्त तळमळीचा. स्वच्छ कपडयातले ब्लॉकमध्ये राहणारे आमच्या सारखे लोक आपल्या सहा बाय सहाच्या कोपटात येतात, याच अशोकच्या आईला खूप अप्रूप वाटायचं. ढोर समाजातली ही निरक्षर बाई दोन मुल, तीन मुली आणि शिवाय नवऱ्यान टाकून दिलेली मोठी मुलगी नि तिची तीन कच्ची-बच्ची, असं मोठ खटल मोठघा हिंमतीनं चालवायची. कचऱ्यातून गोळा केलेल्या चिंध्या आणि चामडयाचे तुकडे जमा करून त्याच्या चाटघा बनवून विकण्याचा धदा त्यानी मोठघा मेहनतीनं उभा केला होता. पुढे गर्भाशयाच्या कर्करोगानं शाताबाई पोळ गेल्या. त्या ससाराचा डाव अर्ध्यावरच सोडून !

हा अशोक आणि मी हे साप्ताहिक बैठकीतले नेहमी हजर असणारे दोघेच. शिवाजी आणि सुरेश हजर असेल तर अरुण, मधू राजकुमार असे नसायचे थोडक्यात म्हणजे इतका सगळा बेभरव-शाचा प्रकार होता की आमची एकही बैठक कधी पूर्ण कोरमची झाली नाही. एकदा व्यवसाय मार्गदर्शन वर्ग, आंबेडकर जयती आणि एकदा दिवाळीच्या निमित्ताने फराळाचा कार्यक्रम असे दोन-तीन उपक्रम सोडले तर धारावीत नाव घेण्यासारखं आणि काही झाल नाही.

धारावीतल्या कामाचा मग कटाळा यायला सुरुवात झाली. कामाला प्रतिसाद नाही. कार्यकर्त्यांचं सातत्य नाही, सगळेजण दहावी-बारावीच्या उबऱ्यावरच अडलेले, त्यामुळे कोणाचा खास उत्साह नाही. त्यात जो तो छोटघा मोठघा नोकरीच्या शोधात. मग वेळ कोणाला ? परिषद कार्याचा असा कदमताल सुरू असताना त्यामुळे आणि तिथल्या एकूण वातावरणामुळे धारावीत जायची वेळ आली की मोठं सकट वाटायच. पण लगेच मनात यायच की आपणच जायच थाबवल तर तिथले विद्यार्थी आपल्या कामात कसे येतील ?

पुढे पुढे, कार्यकर्ते विद्यार्थी भेटोत, न भेटोत आपण घरी गेल्यानं त्याचे पालक भेटतात; त्याना त्याच्या अडचणी, वेदना माडायला एक श्रोता मिळतो, त्याना बरं वाटत हे लक्षात आल्यावर मी पुन. पुन्हा जात राहिलो. पण विद्यार्थी परिषदेच्या धारावीतल्या कामान बाळस असं कधी धरलं नाही !

☐

नायगावातल्या झोपडपट्टीत जनता परिषदेच्या कार्यालयात वामनराव परबाना भेटायला गेलो तेव्हा धारावीतल्या जाण्या-येण्याच्या दिवसाचा असा एक दृश्यपट डोळघापुढून सरकत गेला. या कामाची कठीणता आणि आवश्यकता, दोन्ही किती तीव्र आहेत याची एकाच-वेळी जाणीव करून देणारे ते दिवस विसरण तस कठीण आहे.

त्यामुळेच वामनराव परबाच्या कार्यनिष्ठेबद्दल विलक्षण आदर निर्माण होतो. साठी ओलाडलेले वामनराव झोपडपट्टी वासीयाना न्याय्य हक्क मिळावेत यासाठीच्या सघर्षाच्या आघाडीवर अजूनही बुलद उभे आहेत.

स्वयसेवी सघटनासाठी मुबईतल्या झोपडपट्टया हे फार प्रचड क्षेत्र आहे. काही हजार झोपडपट्टयामधून आजमितीस एकूण १३ लाख झोपडघा आहेत व शहराच्या एकूण सुमारे ९० लाख लोक-सख्येपैकी निम्म्याहून अधिक म्हणजे सुमारे ५५ लाख जनता आज झोपडपट्टयामधून राहात आहे. या झोपडपट्टयामधून किंवा तत्सम गलिच्छ वस्त्यामधून राहणाऱ्या लोकसख्येच स्वरूप समिश्र प्रकारच आहे. यात सगळघा प्रकारचे भाषिक आणि आर्थिक गट आहेत. फूटपाथवरच्या झोपडघापासून ते खाजगी, महापालिकेच्या, राज्य सरकारच्या व केंद्राच्या जमिनीवरच्या झोपडपट्टघा असे सगळे प्रकार आहेत. इथे राहणारे कोण आहेत ? मुख्यत: दलित वा तत्सम, आणि ते ही देशभरातल्या जवळ जवळ सगळघा ठिकाणाहून आलेले. तामिळी, तेलगू, उत्तर भारतीय, बिहारी पुरभय्ये, राजस्थानातील दलित वर्गीय, आणि चक्क बांगलादेशी मुसलमान असा सगळा अठरा पगड मामला ! अर्थात झोपडपट्टयामधून राहणारा सर्वांत मोठा भाषिक गट आहे तो मराठा मडळीचाच !

झोपडपट्टघातून राहणाऱ्या लोकाच्या समस्या भिन्न भिन्न प्रकारच्या आहेत सामान्यतः आश्चर्यकारक वाटावी अशी एक नोद-णीय गोष्ट म्हणजे दारिद्र्य किंवा आर्थिक मागासलेपणा ही काही झोपडपट्टघाची आजची मुख्य समस्या नाही. लोक झोपडघामधून का राहतात ? मुख्यत नव्यानं महानगरीत आलेले लोक इथे राहतात आणि तेही चागल्या वस्तीत (म्हणजे 'ब्लॉक' मध्ये, अशी सर्व साधारण समजूत) जागेसाठी एकदम दीड दोन लाख रुपये भरण्याची क्षमता नसल्यामुळे. साहजिकच, कित्येक झोपडपट्टघामधून घराघरात टी. व्ही. क्वचित व्ही. सी. आर सुद्धा असल्याची उदाहरण आढळतात. अर्थात, यातही वेगवेगळे प्रकार आहेत. फूटपाथवरच्या झोपडपट्टघा-तून राहणारे लोक आर्थिकदृष्टघा निम्नतम स्तरातले आढळतात व त्याच्यापुरती आर्थिक समस्या खूपच गभीर असते यात शका नाही

आर्थिक मिळकतीचा प्रश्न फारसा गंभीर नाही हेच एका अर्थान झोपडपट्टघाच्या प्रश्नाच उगमस्थान आहे देशातील चारही महानगरापैकी रोजगार, आणि तो ही चांगल्या रोजदारीवर मिळण्याची शक्यता मुबईतच सर्वाधिक. एका पोलिस अधिकाऱ्यानंच मला ही माहिती सागितली तो पुढं जे म्हणाला ते एका वेगळघा कारणासाठी आणखीनच महत्त्वाच आहे. तो अधिकारी म्हणाला, 'रोजगार मिळण्याच्या शक्यतेबरोबरच मिसळून जाण्याची शक्यता ही मुबईच्या सदर्भात सर्वांत जास्त आहे. दिल्ली, कलकत्ता, मद्रास या तिन्ही ठिकाणी स्थानिक भाषेचा प्रभाव जबरदस्त असल्यामुळे हे थोडं कठीण जात. मुबईत आलेला माणूस या बिनचेहऱ्याच्या शहरात कसाही खपून जातो मुबईत बागलादेशी घुसखोर यायला लागले ते

नेमक्या याच कारणामुळे.'

मिळतील त्या रोजगाराच्या संधी स्वीकारण्याची झोपडपट्टी-वाल्यांची तयारी असल्यामुळे काही ना काही मिळकतीची सोय लागते. पण तेवढचान सगळे प्रश्न सुटत नाहीत 'वातावरण' हा सगळ्यांत कठीण असा प्रश्न उरतोच. यात मग बरेच विषय येतात. आरोग्याचे प्रश्न येतात, शिक्षणाचे, सस्काराचे, साक्षरता, व्यसनमुक्ती, परित्यक्त महिला, शिवाय झोपडी दादा व त्याच्यामुळे निर्माण झालेला टोळी-सघर्ष. अशी एक अखड प्रश्नमालिका निर्माण होते, जिचा केंद्र बिंदू आहे 'वातावरण.'

## झोपडवासियांची मानसिकता

वातावरणाचा प्रश्न हा मानसिक आणि व्यावहारिक असा दोन्ही स्वरूपाचा आहे त्यामुळेच झोपडपट्टयांच्या क्षेत्रात स्वयसेवी कामाला जसा वाव आहे, तशाच त्याच्यावर बऱ्याच मर्यादाही आहेत. मुबईत विद्यार्थी परिषदेच्या, रा. स्व सघाच्या कार्यकर्त्यांनी चालाविलेली काही सस्कार केंद्र आहेत. या कार्यकर्त्यांपैकी एकानं सागितल, 'इथल्या लोकामध्ये मुळात, चागल्या, अधिक चागल्या जीवन शैलीची एक आस निर्माण करावी लागते. आहे ते सगळ बरच आहे अशी मानसिकता असणाऱ्या या मडळीच्या मनात तुम्हाला तुमच्या अवती-भोवती अधिक चागल वातावरण निर्माण करणं शक्य आहे, जे सध्या आहे त्यापेक्षा अधिक चांगलं जीवन तुम्ही जगू शकता. हा विश्वास निर्माण करावा लागतो. मगच पुढे जाता येत.'

अशी आस, अशी आकाक्षा ज्याच्यात चटकन मूळ धरते त्या नवशिक्षित तरुणाच्या मनात आणखी काही वेगवेगळे गड निर्माण होतात कम्युनिटी एड अँड स्पान्सरशिप प्रोग्राम (कास्प) या सघटनेच्या माध्यमातून काही काळ एका झोपडीवजा वस्तीत काम करणाऱ्या एका कार्यकर्त्यानं सागितल, 'स्थैर्य आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी इथ लोकं काय वाट्टेल ते करतात. आपण झोपडपट्टीत राहतो याची लाज बाळगणारा एक बँक कर्मचारी कित्येक दिवस ब्लॉकमध्ये राहणाऱ्या एका मित्राचा पत्ता आपला 'निवास पत्ता' म्हणून पुढे करीत असे.'

अनेकदा या मानसिकतेतल्या झोपडीवासियाना झोपडपट्टीत राहण्याचे फायदे हवे असतात, पण यापायी त्याच्या तथाकथित प्रतिष्ठेत येणारी बाधा मात्र नको असते. इतरही अनेक विचित्र प्रकारच्या मानसिकता आढळतात. या सगळ्यातून बाहेर आणून एखाद्या व्यक्तीच्या मनात अधिक चागल्या जीवनशैलीची आस निर्माण करायची, आहे त्याच परिस्थितीतून मार्ग काढायला त्याना शिकवायच तर त्यासाठी हवेत व्यक्तिगत सबध. आणि असे सबध सहवेदनेपोटी, करुणेपोटी निर्माण झालेल्या प्रेरणेमुळे पण त्याच वेळी एक प्रकारच्या कर्तव्यबुद्धीन काम करणाऱ्या स्वयसेवी कार्यकर्त्याशिवाय अन्यत्र निर्माण झालेले सामान्यत दिसत नाहीत.

कोल्हापुरातल्या एका झोपडपट्टीत विद्यार्थी परिषदेच्या वतीन चालविलेल्या एका सस्कारकेंद्राच्या सदर्भात, प्रा. भारती ठाकूर यानी सांगितलेली एक हकीगत या सदर्भात, उल्लेखनीय आहे कोल्हापुरातल्या एका झोपडपट्टीत परिषदेची एक कार्यकर्ती आठवड्यातून पाच दिवस एक सस्कार केंद्रवजा शिकवणीचे क्लासेस घेत असे. मुख्यत: ७ वी पर्यंतची मुल तिथे यायची. बरेच जण तासभर खेळ, प्रार्थना असं आटोपून घरी जायचे, उरलेले अभ्यासाठी थांबायचे. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाचं शिक्षण घेणारी ही कार्यकर्ती त्याचा थोडाफार अभ्यासही घ्यायची प्रार्थनेनतर घरी परतणाऱ्या सगळ्यांना ती सागायची की घरी जाऊन देवापाशी दिवा वगैरे असेल तर त्याला नमस्कार करा, नतर आईवडिलाना नमस्कार करा आणि मगच जेवायला बसा

पाच-सहा महिन्यानतर एका सध्याकाळी तिला एक वेगळाच अनुभव आला. सपूर्ण वस्तीत दारूड्या, बेवडेबाज म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका मध्यमवयीन गृहस्थान पुढे होऊन, या कार्यकर्त्या विद्यार्थिनीचे अक्षरश: पाय धरले. म्हणाला, "तुम्ही रोज माझ्या मुलाला शिकविता की आई-बापाला नमस्कार करावा. ते लेकरू रोज माझे पाय धरायच. मी हातभट्टी रिचवून घरी यायच, नि हे शाणसुरतं लेकरू माजे पाय धराया यायच महिन्या-दोन महिन्यान वाटलं की आपले पाय धरण्यासारकं आपल्याकड काये ? मग हळूहळू ठरवल की आता हातभट्टी सोडायची तरीपण जमेना. आता दोन दिवस जाले, मी हातभट्टी न घेता राहिलोय हे सगळं तुमच्याबिगर जाल नसत."

व्यक्तिपरिवर्तनाची व त्यातून समाजपरिवर्तनाची या प्रकारची कामगिरी हा स्वयसेवी कार्याचा कणा आहे. अधिक चागल्या जीवनाची

---


स्वयसेवी सघटनांच्या कार्यास
हार्दिक शुभेच्छा !

प्रबोधन
PRABODHAN
विद्युतधारक

भारतातील अग्रगण्य कपॅसिटर उत्पादक :
सेवा इंजिनिअरींग वर्क्स प्रा. लि.
५६६/७ हिवरे रोड, सासवड, जि. पुणे

आकांक्षा निर्माण करण्यात, खोटया प्रतिष्ठेच्या कल्पनेतून निर्माण होणारे मनोगंड दूर करण्यात, न्याय्य हक्कासाठीची संघर्षाची प्रेरणा निर्माण करण्यात Inertia वर मात करून किमान प्रासंगिक स्वरूपाचा समूहभाव जागविण्यात स्वयंसेवी संस्था/संघटनाच खूप काही करू शकतात हे निर्विवाद आहे

पण याच्यापुढे, झोपडपट्ट्यांच्या प्रश्नाची गुतागुत सोडविण्यात स्वयंसेवी कामावर बऱ्याच मर्यादा येतात ही गोष्ट निःसंशय. स्वयंसेवा-वृत्ती ज्यातून कधीच हद्दपार झाली आहे ते राजकारण, अलीकडच्या काळात एकगठ्ठा मतासाठी झोपडपट्ट्यांचा होणारा उपयोग, त्यातूनच झोपडपट्ट्या तशाच रहाव्यात, नव्हे, वाढाव्यात यासाठी चालणारे हितसंबंधीयांचे प्रयत्न, त्यातून उद्भवणारा टोळी-संघर्ष (Gang-war) त्यातच जातीय प्रश्न कालवल्यानंतर होणारी स्फोटक परिस्थिती अशा या महाकाय खडकावर स्वयंसेवी कार्याचं तारू फुटण्याचीच शक्यता जास्त.

अशा स्थितीत झोपडपट्ट्यांच्या क्षेत्रात स्वयंसेवी कामाला काही भवितव्य आहे काय ? काही निश्चित भूमिका आहेत काय ? हे आणि असे अनेक प्रश्न निर्माण होतात.

या क्षेत्रातल्या स्वयंसेवी कामात दोन ठळक प्रवाह दिसतात. एक निम-राजकीय स्वरूपाचा, विधायक कार्याच्या वळणाने झोपडी-वासियामध्ये जागृती घडवून संघर्षशीलता आणि मुख्य म्हणजे विकासोन्मुखी मानस निर्माण करणारा. तर दुसरा अ-राजकीय स्वरूपाचा, निखळ विधायक मार्गाने सरकारी योजनांचा शंभर टक्के आधार घेऊन आणि पगारदार सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून सामूहिक विकासाकडे नेणारा. झोपडपट्टी जनता परिषदेचे वामनराव परब हे एका मार्गाचं प्रतिनिधित्व करतात तर जागतिक बँकेने पुरस्कारलेल्या, राज्य शासनानं राबविलेल्या झोपडीपट्टी श्रेणीवाढ योजनेच्या एक ज्येष्ठ अधिकारी प्रतिभा पानवलकर या दुसऱ्या प्रवाहाचं प्रतिनिधित्व करतात.

या दोघांशी झालेल्या गप्पामधला उल्लेखनीय भाग सोबत दिलाय. या प्रश्नाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणापासून ते कामाच्या प्रेरणापर्यंत अनेक प्रश्नाच्या उत्तरामधून या दोन्ही कामाचे पोत वेगळे आहेत, मिती वेगळ्या आहेत पण काही मूलभूत बाबी समान आहेत, हे सारं स्पष्ट होईल. दोघांशी झालेल्या मुलाखतीनंतर एक प्रश्न मनात आला की, या दोघांनीही झोपडपट्ट्यांचा प्रश्न या ना त्या स्वरूपात अस्तित्वात रहाणारच, हा प्रश्न निर्माण होणार नाही ही स्थिती जवळपास अशक्य आहे, हे गृहीत धरलं आहे.

ही वस्तुस्थितीची विदारक जाणीव म्हणायची की स्वयंसेवी कार्याच्या मर्यादेचं भान ?

## नियमित, सततचा संपर्क

वामनराव परब ! वय ६२. मूळचे कोकणातले. १९४२ नंतर काही काळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुंबई व धुळे जिल्ह्यात प्रचारक. १९५२ पासून जनसंघाचे कार्यकर्ते. आजमितीस झोपडपट्टी जनता परिषदेचे संस्थापक-अध्यक्ष या नात्याने संपूर्ण जबाबदारी सांभाळून भारतीय जनता पार्टीचं पूर्ण वेळ काम करतात. कामाठीपुरा हे वामनरावाचं कार्यक्षेत्र. तिथूनच काही काळ ते नगरसेवक म्हणूनही निवडून आले होते गोवामुक्तीपासून आगबोट दरवाढीपर्यंत वेगवेगळ्या प्रश्नासाठी वामनराव लढयात उतरले. १९६३ पासून झोपडपट्टी जनता परिषदेची स्थापना करून संघर्ष आणि विधायक कार्य अशा दोन्ही मार्गांनी वामनरावानी झोपडपट्टीवासियांच्या समस्या सोडविण्याचे आपले प्रयत्न सुरू ठेवले आहेत

वामनराव राजकारणात असले तरी त्याचा पिंड राजकारण्याचा नाही. प्रकृतीनं ते सच्चे विधायक कार्यकर्ते आहेत अलीकडे कामाठीपुऱ्यातून मुलुंडला राहायला आल्यानंतर १९८५ ची विधानसभेची निवडणूक त्यानी मुलुंड मतदारसंघातनच लढविली निवडणुकीत हरल्यानंतरही कुठल्याही प्रकारे केवळ निवडणूक-अभिमुख काम करण्याचा हव्यास न ठेवता त्यानी झोपडपट्ट्यामधून आपलं काम सुरू ठेवलं आहे.

१९६२-६३ च्या सुमारास वरळीच्या कस्तुरबा गांधी नगर झोपडपट्टीत, झोपडपट्ट्या उठविण्याच्या प्रश्नावरून आंदोलन झालं. पर्यायी जागा दिल्याशिवाय झोपड्या उठवू नयेत या मागणीसाठी चर्मकार समाजातले एक कार्यकर्ते लक्ष्मण केळकर बेमुदत उपोषणाला बसले होते. वामनराव त्याना भेटायला म्हणून गेले, आणि तिथूनच झोपडीवासीयांच्या समस्यांचा पाठपुरावा त्यानी सुरू केला, या प्रश्नानं त्यांच्या मनाचा ठाव घेतला. स्वतः लक्ष्मण केळकर, महादेव आव्हाड आणि रामलु शिंदमल्ला या त्रिनीच्या कार्यकर्त्यांच्या पाठबळावर वामनरावानी झोपडपट्टी जनता परिषदेची मुहूर्तमेढ रोवली.

कामाची सुरुवात मोठी पद्धतशीर झाली. वामनराव सांगत होते, "त्यावेळी संपूर्ण शहरभरात एकूण फक्त १४४ झोपडवस्त्या होत्या. त्यापैकी ३२ वस्त्यामधून आम्ही एक सर्वेक्षण घडवून आणले. सर्व प्रकारची अस्थिरता, आणि विकासाला अनुकूल अशा वातावरणाचा अभाव या आजही जाणवणाऱ्या दोन मुख्य समस्या त्याही काळात होत्या. पर्यायी जागा दिल्याशिवाय झोपड्या हालवू नयेत, पाडू नयेत व मूलभूत सोयी म्हणून पाण्याचे नळ, विजेची जोडणी इ. मिळणं हा झोपडवासियाचा हक्क आहे अशी भूमिका घेऊन आम्ही या भागात काम करायला सुरुवात केली."

**आज तुमच्या कामाची स्थिती नेमकी कशी आहे ?**

"एकेकाळी सुमारे १५०० झोपडीवस्त्यामध्ये आमचं बऱ्यापैकी संघटनात्मक काम होतं. त्यावेळी ६२ वस्त्यामधून बालवाड्या चालायच्या. शिवाय १२ ठिकाणी साक्षरतेचे वर्ग आणि जवळपास २५ वस्त्यामधून महिलांचे शिवणकाम किंवा तत्सम कामाचे वर्ग चालायचे. आज ही आकडेवारी काहीशी कमी झाली असली तरी संघटनात्मक कामाची चौकट जवळपास पूर्वीइतकीच मजबूत आहे. पूर्वी शब्दाचे पक्के कार्यकर्ते मिळत आता तेवढे भरवशाचे लोक मिळत नाहीत त्यामुळे अडचण होते, काम सातत्यानं टिकून चालविलं जात नाही. अनेकदा व्यक्तिशः मला लक्ष घालून सारख मागे लागावं लागतं

**तुमची कामाची पद्धत नेमकी कशी आहे ? विधायक उपक्रम आणि संघर्ष अशा दोन्ही आघाड्यांवर तुम्ही कशा पद्धतीनं काम करता ? आणि मुख्य म्हणजे भा. ज. प शी तुमचा घनिष्ट संबंध**

**असूनही इतर राजकारण्यांपेक्षा तुम्हाला लोक खरंच वेगळ मानतात?**

*एक तर असय की राजकारणी पुढाऱ्यापेक्षा आमचा संपर्क हा* जास्त नियमित, सातत्यपूर्वक आहे. आता एकदा हार्टचा त्रास सुरू झाल्यानंतर मी थोडी धावपळ कमी केली आहे अन्यथा कोणत्या महिन्यात कोणती झोपडपट्टी कव्हर करायची या विषयीचं माझ वर्षभराचं वेळापत्रक लागलेल असायच आता गेल्या ऑगस्टपासून आमच्या जनता परिषदेच्या रौप्यमहोत्सवाच काम सुरू झालय, त्यासाठी गेल्या ऑक्टोबर नोव्हेंबरात एकूण ३५० झोपडपट्टयातून मी स्वत जाऊन, भेटून आलो कामाच्या या पद्धतीमुळे मी आपोआप वेगळा समजला जातो म्हणजे अन्य राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांबरोबरीन माझी गणना केली जात नाही.

याच आणखी एक कारण म्हणजे आमच्या कामाच वेगळ स्वरूप दिवाळीत आम्ही झोपडीनिवासी आणि इतर, म्हणजे ब्लॉक मधून राहणारे, वगैरे, याच्यात स्नेहमीलनाचा, फराळाचा कार्यक्रम योजतो. सगळेजण आपापले डबे आणतात. ते सर्व एकत्र करून आम्ही सर्व उपस्थितामध्ये वाटून टाकतो आबेडकर जयती, शिवजयती या निमित्तान साफसफाई किंवा वेगवेगळचा स्पर्धा असे अनेक कार्यक्रम योजतो. या सगळयातून व्यक्तिगत स्तरावर आमचे सबध उभे राहतात. एकदा हे सबध निर्माण झाले की मग व्यसनमुक्ती, अधश्रद्धा हळूहळू दूर करण, बचतीच्या सवयी लावण, हे सगळ जमायला लागत थोडक्यात म्हणजे सघाच्या शाखेवर मिळालेल व्यक्तिगत सबधातून समुत्कर्षाचच बाळकडू इथेही उपयोगी पडत काही काही घरातन माझे इतके घनिष्ट सबध निर्माण झालेयत की लग्न असो, बारसं असो की बारावा, मी तिथे हवाच असतो.

**या सगळ्या झोपडपट्ट्यातूनच कार्यकर्ते मिळतात की बाहेरून इतर तुलनेन चांगल्या वस्त्यांमधून ?**

झोपडपट्टयातूनही मिळतात, नाही असं नाही. पण आमच्याकडे बाहेरून तिथे जाणारे कार्यकर्तेही मोठया प्रमाणावर आहेत. मी या सर्वांना सागत असतो की, आठवडयातल्या किमान तीन संध्याकाळी या कामासाठी द्या! एका संध्याकाळी काहीही काम वगैरे न घेता जा, नुसत गप्पा मारायला, भेटायला. त्याच्यात समरस व्हायला. एका दिवशी प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घ्या आणि आणखी एके दिवशी सगळयाची एक जनरल बैठक घ्या. त्यातनं अडचणी समजतील, त्या सोडवा, मगच विश्वास निर्माण होईल. गेल्या ऑगस्टमध्ये ३५० कार्यकर्त्यांचं एक प्रशिक्षण शिबिर आम्ही घेतल होत, त्यातन खूप चागला सच हाती लागला आहे.

**संघर्षाचे तुमचे मुद्दे कोणते आहेत? आणि सरकारच्या वेगवेगळया योजनांबद्दलच तुमचं मत? झोपडपट्टया निर्माणच होणार नाहीत यासाठी तुमची काही योजना आहे?**

मुबईत येणारे, खर तर सर्वच शहरातून येणारे लोढे रोखले जात नाहीत तोवर झोपडया या निर्माण होणारच. त्यातही आम्ही सरकारला एक सांगतो की तुम्ही मोकळया जागांवरची अतिक्रमणं रोखण्याची काही शास्त्रीय रचना निर्माण करा. मोकळया जागाचे फोटो काढून ठेवा चित्र बदलल तर अधिकाऱ्याना जबाबदार धरा पण हे कोणी करीत नाही

मोकळया जागा हडप करण्याच एक तत्र मुबईत विकसित झाल आहे त्याच एक रॅकेट आहे ते मोडून काढायला हवं. सरकारची श्रेणीवाढ योजना कागदावर खूप चागली वाटते, पण प्रत्यक्षात झोपडयाच्या री-सेलमुळे प्रश्न कायमच राहतो. गणना झालेल्या अधिकृत झोपडीची आजची किंमत पन्नास हजाराच्या वर आहे. त्यामुळे काळाबाजार होतो.

आमची मागणी आहे की, १९८० पर्यंत वसलेल्या सगळया झोपडया अधिकृत करा. लोकाना फोटो पासेस द्या प्रत्येक झोपडीत पाणी, वीज, स्वच्छतागृहे अशा सुविधा द्या. आणि मुख्य म्हणजे पर्यायी जागा दिल्याशिवाय झोपडया तोडू नका. झोपडी भुईसपाट होण्याची टागती तलवार माणसाला नको त्या गोष्टीना प्रवृत्त करते. हे थाबायला नको ?

## श्रेणीवाढ योजना

प्रतिभा पानवलकर! वय, अदमासे चाळीस. समाजकार्याच्या विषयात एम. ए. केल्यानतर १९७० पासून सलग पधरा वर्ष टाटा समाजविज्ञान सस्थेच्या नागरी व ग्रामीण समाज-विकास विभागात प्रपाठक (रीडर) म्हणून बाईंनी काम बघितल. स्वयंसेवी क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक डाव्या उजव्या-गटाशी त्याचा जवळचा संबध आला. जोडीला सशोधन सुरूच होत. पुढे १९८५ पासून महाराष्ट्र गृह निर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या 'झोपडपट्टी श्रेणी वाढ' योजने सदर्भात मुख्य समाजविकास-कक्ष अधिकारी म्हणून डेप्युटेशनवर चिकित्सापूर्ण पण अत्यत स्पष्ट विवेचन, नेमकेपणा आणि मुख्य म्हणजे सौजन्यशील, स्वागतशील स्वभाव, यामुळे बाईंशी चर्चा करणं हा तसा वेगळा लक्षात राहणारा अनुभव होता.

एखादी आदर्शवादी चौकट समोर ठेवून त्या विचाराने प्रेरित झालेल्या, वेगवेगळया ideological political groups चे कार्यकर्ते आणि समाजकार्य हे 'करिअर' करणारे पगारदार स्वयंसेवी कार्यकर्ते यातल्या फरकापासून चर्चेला सुरुवात झाली.

'आम्हाला कोणतीच Ideology नसते हे तुम्हाला कोणी सागितल? कोणत्याही प्रस्थापित राजकीय, आदर्शवादी विचाराशी बाधून न घेता काम करणं हीच आमची Ideology नाही का? त्यामुळे आमची स्वायत्तता शाबूत राहाते, फरपट होत नाही, उलट अधिक कसदार concrete समाधान लाभत' – इति प्रतिभाबाई. जागतिक बँकेच्या मदतीन सुरू असलेल्या या श्रेणीवाढ योजनेमागे आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता प्राप्त झालेला एक वेगळा, मानववादी, दृष्टिकोण आहे हे सागून बाई पुढे म्हणाल्या,

'ही आमची गृहनिर्माण योजना नाही हा निवारा प्रकल्प आहे. इथे फक्त किमान गोष्टी निश्चितपणे देण्याची कल्पना आहे. यातून सरकारची भूमिका ही फक्त सहायकाची राहिली आहे. आम्ही तर नव्या परिभाषेत अस म्हणतो की झोपडपट्टया हा काही प्रश्न नाहीच! हे तर निवाऱ्याच्या प्रश्नावरच उत्तर आहे.'

**ही तुमची श्रेणीवाढ योजना नेमकी आहे तरी काय ?**

श्रेणीवाढ म्हणजे Upgradation गणनाकृत मान्यताप्राप्त झोपडपट्ट्या आहे त्याच ठिकाणी विकसित करायच्या, किमान सुविधा निर्माण करायच्या, वातावरणाचा विकास होईल यासाठी सर्व ती मदत द्यायची व चागल्या living conditions मध्ये झोपडवासीयांना सुस्थिर जीवन जगायला मदत करायची हे आहे आमच्या योजनेच स्वरूप.'

'या मागच धोरण अस आहे की ज्या झोपडीवर तिथल्या रहिवाशानी किमान पधरा वीस हजार खर्च केले आहेत तिथून त्याना उठवून अन्यत्र वसविण्यापेक्षा तीच जागा, अधिकृतपणे त्याच्या मालकीची करून त्यांना राहण्यासाठी अधिक योग्य करण हे महत्वाच मानून तसा विचार करावा.'

'दरमहा १ रु. च्या नाममात्र भाडेपट्टीवर ही जागा लीज पद्धतीन आम्ही देत असतो. तसं पाहिलं तर बसल्याजागी अधिकृत झोपडीवासीयाना सर्व सुविधा देणारी अशी ही योजना आहे. आजमितीस सुमारे ५० झोपडपट्ट्यांतून ही योजना कार्यान्वित झाली आहे. इतकी फायद्याची योजना असूनसुद्धा ती राबविण हे तस कठीणच आहे!'

**का? म्हणजे विशेष अशा कोणत्या अडचणी येतात ?**

मानसिकता ही मोठी अडचण. चागली वस्ती म्हणजे बहुमजली इमारती अस आपल्याकडे मानतात. या मानसिकतेतून त्याना बाहेर काढून तयार करावं लागत. बरं, यात सर्व सुविधा आम्ही देतो त्या वाजवी किंमत घेऊन. मग लोकाना वाटत की, पाणी, वीज व इतर गोष्टीसाठी पैसे भरूनसुद्धा आम्ही शेवटी राहणार झोपडपट्टीतच काहीना वाटत की, आम्ही एक नाईलाजास्तव झोपडीत राहिलो, निदान पुढच्या पिढीला झोपडीत राहाव लागू नये असे अनेक complexes असतात. त्यातनं हे काम खूप कठीण बनत

**अशा स्थितीत एखाद्या वस्तीत एकमतानं या योजनेची स्वीकाराहंता निर्माण करण्यात स्वयंसेवी प्रकारचं खूप काम कराव लागत असेल त्यांबाबत काय ?**

प्रचड काम कराव लागत, एकेकाला स्वतत्रपणे, मग सगळ्याना एकत्रितपणे अस पटवून द्याव लागत. पण मुबईतल्या झोपडपट्ट्यातून गणेशोत्सवासारख्या उपक्रमातून तयार झालेली सामूहिक कृतीची एक तत्परता चांगल्यापैकी अनुभवाला येते. त्याची आम्हाला खूप मदत होते. शिवाय अराजकीय स्वरूपाचं मदत कार्य करणारेही छोट मोठे गट असतात. तेही मदत करतात. शिवाय आमची योजना तशी सर्वसामान्यांना परवडणारी आहे. मुबईतल्या झोपडपट्ट्यातून सरासरी दरमहा रु. ८०० उत्पन्न असणाराची बहुसंख्या आहे. त्यांच्या खिशाला हे परवडत.

**यात जे स्वयंसेवक कामाला मदत करतात, त्यांच्यात राजकारण कितपत असतं ? आणि तसं पाहिलं तर कोणत्या राजकीय गटाचा सर्वाधिक प्रभाव आहे ?**

राजकारण नक्कीच आड येत. पण बरेचदा स्थानिक स्वयंसेवी गट अशा विकासाच्या कामापुरते अ-राजकीय बनतात. त्या दृष्टीन ह्या कामाकडे पाहतात. मात्र निवडणुकीच्या वेळी जास्त त्रास होतो. या कामाचा मतदानाच्या वेळी फायदा व्हावा यासाठी सर्वजण प्रयत्नशील असतात. आम्ही सर्वांच ऐकून घेतो आणि योजनेच हित लक्षात घेऊन त्याप्रमाणे करतो. आणि राजकीय गटाच म्हणाल तर सर्वच गट सक्रिय असले तरी सपूर्ण शहराच जे राजकीय चित्र असतं त्याचच प्रतिबिंब झोपडीतून दिसत.

**या योजनेमुळे कोणाच्या हितसंबधावर गदा येत असेल ?**

मुख्यत्वे गुडाच्या झोपडपट्यांचं अधिकृत होण, अडचणी, दूर होऊन सर्व सुविधा मिळणं हे त्याच्या अवैध उत्पन्नावर गदा आणत. मग आम्हाला धमक्या मिळतात. आमच्या हेतूविषयी शका घेतली जाते. पण सपूर्ण यत्रणा आमच्या पाठीशी असल्याने आम्ही तस निवातपणे, अविचलितपणे काम करू शकतो.

**या क्षेत्रातल्या स्वायत्त किंवा पक्षसलग्न स्वयंसेवी संस्थांबद्दल तुमचं मत काय आहे ? त्यांची कशी काय मदत होते ?**

सामान्यत. या लोकाकडे टिपिकल अँटीएस्टॅब्लिशमेंट दृष्टिकोण असतो. हा दृष्टिकोण फारसा पोषक ठरत नाही. आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे या मडळीची 'झिरो अकौंटॅबिलिटी' यापैकी अनेकाच्या बाबतीत पैशाचे हिशोब हा परस्पर सोयीचा मामला बनतो. यामुळे तर काही संघटनाची विश्वासार्हता पूर्णपणे सपलेली दिसते. त्यातही अशा सघटनाच्या भाऊगर्दीमुळे डावउजव करणही जमत नाही.

कधी कधी तर यांचे, त्यांच्या कार्यकर्त्यांचे अहकार हा खूप तापदायक विषय ठरतो. लोकाशी असलेला आमचा थेट सपर्क याना आवडत नाही.

**तुम्हाला सध्याच्या या कामातल्या सरकारीपणाचा त्रास होत नाही ? म्हणजे तुम्ही अस हे वेगळ्या पद्धतीच जे स्वयंसेवी काम करता त्यातनं बावनकशी समाधान मिळत ?**

ही गोष्ट खरी आहे की सगळ्या गोष्टी सांभाळून सरकारी चौकटीत काम करताना आमच्यातली स्वयंसेवी वृत्ती कधी कधी मारली जाते. पण प्रतिकूल परिस्थिती असतानाही ती जिवंत ठेवण' त्यासाठीची धडपड हा एक आनदाचाच विषय आहे. मी सरकारी नोकर असले तरी ठराविक तास काम व पाच दिवसाचा आठवडा असे फायदे आम्ही कधीच घेतले नाहीत. सदैव कामाला तयार राहण्याचा Voluntary Instinct अजून शाबूत आहेच. □


## निलगिरीची शेती

**विनायक पाटील** : १५ रुपये

"निलगिरीच्या वनशेतीवर आधारित सहकारी प्रक्रिया प्रकल्प ही कृषी औद्योगिक क्षेत्रातील विनायकरावांची कामगिरी कायम लक्षात राहील." — यशवंतराव चव्हाण

**राजहंस प्रकाशन**, १०२५ सदाशिव पेठ, पुणे




## विनया खडपेकर

पनवेलच्या जवळ वाकडी या गावी ' शांतिवन ' ही स्वयंसेवी संस्था आहे. या संस्थेत कुष्ठरोग-निवारण समितीचे केंद्र आहे. भोवतालच्या खेड्यांतील कुष्ठरोग-पीडित येथे उपचारासाठी येतात. सध्या बहात्तर कुष्ठरुग्ण शांतिवनात रहातात. स्वतःच्या कुवतीनुसार संस्थेचे काम करतात. वेतन घेतात. कुष्ठरोग बरा होण्यासाठी उपचार करून घेतात. या स्वयंसेवी संस्थेचे पंधरावीस कार्यकर्ते येथेच रहातात. बरेच कार्यकर्ते अधूनमधून येऊन-जाऊन असतात. एकशेबावीस एकर जमीन असलेला शांतिवनाचा परिसर मोठा रम्य दिसतो. येथे भात-शेती होते. ऊस लावला आहे. अनेक प्रकारच्या भाज्या काढल्या जातात. कलमे लावली आहेत. निरनिराळी फुलझाडे, फळझाडे आहेत. भोवतालच्या खेड्यांमधली मुले-मुली नेहमी शांतिवनात येतात. शांतिवनाचे कार्यकर्ते त्यांना शेतीचे शिक्षण देतात. घरी नेण्यासाठी निरनिराळी नवनवी रोपे देतात. त्यांचा शांतिवनातील कुष्ठ-रुग्णांशी संवाद साधण्यासाठी प्रयत्न करतात.

कुष्ठरुग्णांवर उपचार आणि रोगमुक्त झालेल्यांचे पुनर्वसन सध्या शांतिवनातील मुख्य कार्य आहे. शांतिवनात वृद्धाश्रमाची थोडी सुरुवात झाली आहे. तो अजून वाढवायचा आहे. शिवाय येथे अनाथाश्रम, अपंगांची, आदिवासींची सोय असणारी केंद्रे सुरू करण्याचा विचारही कार्यकर्त्यांच्या मनात आहे.

शांतिवनात जाण्यासाठी पनवेलपासून नेरे या गावापर्यंत बस आहे. नेऱ्यापासून शांतिवनापर्यंत चालत जावे लागते. शांतिवन वाकडी गावात आहे.

कुष्ठरोगाचा थोडक्यात इतिहास-भूगोल असा आहे.

विशिष्ट जंतुसंसर्गामुळे आणि त्वचा व तांत्रिका ( मज्जातंतू ) यामध्ये उद्भवणाऱ्या चिरकाली ( दीर्घकालीन ) रोगाला ' कुष्ठरोग ', ' महारोग ' किंवा ' महाकुष्ठ ' म्हणतात

कुष्ठरोग फार प्राचीन काळापासून माहिती आहे. जगातल्या बहुतेक सर्व प्राचीन वाङ्मयात या रोगाचा उल्लेख आढळतो. इ. स. पू. चौथ्या शतकात ग्रीस देशात तो पूर्वेकडून आला असे मानतात. तेथून पुढे सुमारे १००० ते १५०० वर्षे तो युरोपभर पसरला. चौदाव्या शतकापासून तो युरोपीय देशातून कमी कमी होत गेला आणि आज तो त्या देशात नाममात्रच दिसतो.

सुश्रुतसंहितेत ' कुष्ठ ' नावाखाली या रोगाचे विस्तृत वर्णन केले आहे. आधुनिक ग्रंथात या रोगाचे जे वर्णन आहे यातील जंतूंचे वर्णन वगळल्यास सुश्रुतसंहितेतील वर्णन आजही संपूर्ण आहे. इतके स्पष्ट वर्णन इतर समकालीन वाङ्मयात इतरत्र कोठेही नाही.

जगामध्ये सुमारे एक कोटी कुष्ठरोगी आहेत. कुष्ठरोग उष्ण कटिबंधात अधिक प्रमाणात दिसतो. आफ्रिका, आशिया व दक्षिण अमेरिका या खंडांत त्याचा प्रादुर्भाव आहे. भारत, चीन, जपान आग्नेय आशियातील देश आणि पॅसिफिक महासागरातील बेटात कुष्ठ-रोगाचे प्रमाण फार आहे. भारताच्या पूर्व व दक्षिण भागात त्याचे प्रमाण अधिक, मध्य व पश्चिम भागात मध्यम आणि उत्तर व वायव्य भागात फार कमी आहे. भारतात एकूण पंचवीस लक्ष कुष्ठ रोगी असून त्यापैकी ३ ते ३·५ लक्ष कुष्ठ महाराष्ट्रात असावेत असा अंदाज करण्यात आला आहे.

कुष्ठरोग एका सूक्ष्म जंतुसंसर्गामुळे होतो. हा जंतू हान्सेन

नावाच्या नॉर्वेजियन शास्त्रज्ञाने १८७४ मध्ये शोधून काढला. त्या जतूला मायक्रोबॅक्टिरियमलेमी असे नाव असून तो क्षयरोगाच्या जतूच्याच वर्गातला आहे.

कुष्ठजतूची शरीराबाहेर वाढ करण्यात अद्याप यश आलेले नाही. तसेच या जतूचा ससर्ग होणारे इतर प्राणीही अजून उपलब्ध नाहीत. त्यामुळे या जतूच्या जीवनव्यापारासबधी विशेष ज्ञान अजून, झालेले नाही. ( सदर्भ : मराठी विश्वकोश खड ४. महाराष्ट्र राज्य साहित्य सस्कृती मडळ १९७६ ).

## नुसतं येऊन-जाऊन काम होत नाही

**' शांतिवन ' या संस्थेचे अध्यक्ष, माजी खासदार व भिवंडीतील एक प्रसिद्ध समाज-कार्यकर्ते श्री. भाऊसाहेब धामणकर याची या संस्थेसबधी अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने भेट घेतली असता ते म्हणाले '**

कुष्ठरोग निवारणाच्या कार्याची प्रेरणा. म. गाधीनी भारताला दिली अस मला वाटत. कोकणामध्ये एक परचुरेशास्त्री म्हणून होते. वैदिक होते त्याना कुष्ठरोग झाला ते हिमालयापर्यंत सर्व ठिकाणी फिरून आले. कुठेतरी देव भेटेल, आपल्या दुखण्याला आराम पडेल अशी त्याना आशा होती. पण तस काही झाल नाही शेवटी त्यानी ठरविल महात्मा गाधीकडे जायच म्हणून ते गाजीजीच्या आश्रमाच्या दाराशी येउन पडून राहिले. विव्हळत होते. कण्हत होते. म गाधी फिरण्यासाठी बाहेर पडले. त्यानी सहकाऱ्याला विचारल, ' कोण कण्हत आहे ? ' सहकारी म्हणाले, ' कोणी म्हातारे गृहस्थ, बहुधा कुष्ठरोगी आहेत ' गाधीजी म्हणाले, ' मग आपण काय करायच ?' सहकारी म्हणाले, ' आधी फिरून येऊ आणि काय करायच ते पाहू ' गाधीजी म्हणाले, ' तस नाही. आधी त्याची व्यवस्था करा. ' गाधी आणि सहकारी यानी परचुरेशास्त्रीना उचलून आश्रमात आणले. जखमा धुतल्या. पुढे अनेक वर्षे गाधीनी त्याची सेवा केली. म: गाधी जेव्हा राऊड टेबल कॉन्फरन्सला इग्लडला गेले तेव्हा तिकडून त्याची रोज केबल यायची, ' शास्त्रीजीची तब्येत कशी आहे ?' गाधीजींचे एक सहकारी श्री. मनोहर दिवाण म्हणून होते म. गाधी त्यांना म्हणाले, ' हे कुष्ठरोग्याच्या सेवेच काम आपल्याकडे परदेशी मिशनरी करीत आहेत. आपण त्याबद्दल उदासीन. हे चागल नाही. तुम्ही बाकीची सर्व कामे थाबवून हे काम हातात घ्या. ' श्री. दिवाण यानी वर्धा येथे दत्तपूर आश्रम स्थापन करून कुष्ठरोगनिवारणाच्या उपचाराच्या कार्याला सुरुवात केली. गाधीजीचे दुसरे सहकारी डॉक्टर श्री. शिवाजीराव पटवर्धन यानी स्वत ची डॉक्टरी सोडली. शिवाय ते व्यायामक्षेत्रात प्रथितयश होते. त्याच्या व्यायामशाळेतली मुल तेव्हा जर्मनीला जाऊन आली होती तेही काम त्यानी सोडल आणि उमरावती येथे कुष्ठधाम सुरू केल. त्यानतर वरोडा येथे बाबा आमटे यांचं काम सुरू झाल.

स्वातत्र्याच्या चळवळीत मी जेलमधे असताना व्यक्तिश माझा सपर्क कुष्ठरोगाशी आला. म. गाधीचे शिष्य श्री. अण्णासाहेब दास्ताने म्हणून होते ते आमच्याबरोबर तुरुगात होते आम्ही एकंदर साठ सत्तरजण होतो. एकेका खोलीत दोनतीनजण असायचे दास्ताने याना मात्र एका खोलीत एकटेच ठेवले होते. त्याची भाडी वेगळी असायची. कोणी त्याच्याकडे जात नसे, त्याच्याशी बोलत नसे मी जाऊन त्याना भेटायला लागलो. ससर्गाची भीती मनात असायची पण चळवळीतलाच एक माणूस असा सगळ्यापासून वेगळा टाकला जावा हे मनाला बरं वाटायच नाही दास्ताने याना माझ्या जाण्यान बरं वाटायच हा रोग केव्हा झाला, औषधे कोणती दिली जातात, हा रोग बरा होऊ शकतो, ससर्गजन्य तितका नसतो हे सगळं त्यानी मला सागितल. एकदर सात-आठ वर्ष त्यानी हे दुखण काढलं तेव्हा डॉक्टर औषध देत. पण जखमा धुणं हा प्रकार नव्हता. पुढे दास्ताने पूर्णपणे रोगमुक्त झाले स्वातत्र्यानतर साधारण १९५५ ते १९६० च्या दरम्यान महाराष्ट्र शासनाने श्री. दास्ताने याना लेप्रसी इरॅडिकेशन कमिटीचे चेअरमन केले. डॉ कपूर कमिटीचे सेक्रेटरी होते ठिकठिकाणी खेड्यापाड्यात फिरून कुष्ठरोगाची पाहणी करण, माहिती देण, उपचाराची दिशा दाखवण हे या कमिटीचे काम होते श्री दास्ताने महाराष्ट्रभर फिरत होते त्यांच्याबरोबर मीही फिरलो एकदा मी, आचार्य भिसे, आणि दास्ताने जीपने चाललो होतो एकदा जीप बद पडली आम्ही उतरलो. शेजारी एक बगली होती. अगणात काही मडळी पडली होती परदेशी सेविका त्यांच्या जखमा धूत होत्या. आम्ही चौकशी केली. त्या सेविकानी सागितलं या कुष्ठरोग्याना अल्सर झाले होते. त्या आदिवासीची सेवा करायला आल्या होत्या. कुष्ठरोगी आदिवासीना त्या ड्रेसिंग करीत होत्या. भिसे गुरुजीनी आपलं जीवन आदिवासीच्या सेवेला वाहिलेल. त्याना वाईट वाटल. ते म्हणाले, ' भाऊ, या भगिनी दुसऱ्या देशातून येऊन हे काम करतात. आणि आपण लक्ष घालीत नाही ' तेव्हापासून मी मनाशी खूणगाठ बाधली. आपण हे काम केव्हातरी करायचे. म्हणून मी एक प्रॉजेक्ट सरकारला दिला. भिवडीला गावाला लागूनच माझी दहा एकर जमीन आहे. त्या ठिकाणी विहीर आहे बगीचा आहे. ती जमीन कमिटीला देतो. त्या ठिकाणी कुष्ठरोग मदतीसाठी केंद्र उभे करू. निधी जमा करून देण्याची तयारी दाखविली, त्यावेळी मी बाबा आमटे, मनोहर दिवाण शिवाजीराव पटवर्धन याच्याकडे गेलो. काही दिवस राहिलो. भिवंडीत केंद्र सुरू करण्याची माझी इच्छा होती. पण सरकारने माझे प्रॉजेक्ट स्वीकारलं नाही. सरकारच मत अस की, रुग्णाला असं वेगळ काढण (*isolated*) नको, घरात राहूनच रुग्णावर उपाययोजना केली पाहिजे. माझी इच्छा अमलात आली नाही. पुढे मी राजकारणात शिरलो. दास्ताने पनवेलला आले. तेव्हा पनवेलच्या व्यापाऱ्यानी सांगितले की, आमच्या या आसपासच्या भागात कुष्ठरोगाचे प्रमाण फार आहे तुम्ही काही करणार असाल तर आम्ही मदत करू म्हणून गाधी परिवारातले अप्पासाहेब वेदग, प्रभू गुरुजी येथे आले ते आणि पनवेलचे व्यापारी यानी काम सुरू केले. प्रभू गुरुजी इथेच रहात. वेदग गुरुजी पनवेलहून येत. केंद्राची जबाबदारी अण्णासाहेब सहस्रबुद्धे याच्यावर होती. त्यानी झोपड्या बाधून घेतल्या. काम व्यवस्थित सुरू झालेसे वाटल्यावर चार-पाच वर्षांत त्यानी दुसऱ्या कामात लक्ष घातल. सरकारी-शेती, खादी यांची काम पहात काश्मिर ते कन्याकुमारी हिंडू लागले. वाकडीच्या या कुष्ठरोगनिवारण केंद्राच काम बद पडलं.

व्यापाऱ्यांच्या समितीनं आणखी पन्नास एकर जमीन घेतली. एवढ्या मोठ्या एकशेबावीस एकराच्या जमिनीत काम पूर्णपणे बंद पडलं. मग पनवेलची व्यापारी मंडळी बाबा आमटे यांच्याकडे गेली. बाबा आमटे यांनी अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांना सांगितलं की, पनवेल-जवळच वाकडीचं काम तुम्ही सुरू केलं आहे. त्याच ठिकाणी तुमची गरज आहे. बाकीची कामे सोडा. हेच काम करा. १९८० मधे अण्णासाहेब सहस्रबुद्धे आणि गोविंदराव शिंदे या केंद्रावर आले. ११ मार्च १९८० या दिवशी अण्णासाहेब सहस्रबुद्धे वारले. डॉ. केडिया यांनी काही दिवस जबाबदारी संभाळली. एक वर्षभर एस्. एम्. जोशी यांनी काम पाहिलं. पण त्यांच्या राजकारणाच्या जबाबदाऱ्यांत ते त्यांना जमेना. १९८० नंतरच्या राजकारणात आम्ही अपात्र ठरलो. पार्लमेंटमधून मी निवृत्त झालो, १९८१ मधे मी, प्रकाशभाई मोहाडीकर असे आणखी तीनचारजण या केंद्रावर आलो. तेव्हा सात-आठ रुग्ण होते. लोक नदीवर पाणी भरू द्यायचे नाहीत. आम्ही आमच्या जमिनीतच विहीर खोदली. विहिरीला पाणी लागलं. तेव्हा मी आणि पत्नी इथे आलो. विहिरीची पूजा केली. कामाला सुरुवात केली. त्यावेळी इथं एक झाड नव्हतं. एक पान नव्हतं. पूजेसाठी टहाळा दुसरीकडून आणला. आता सात वर्षांत सगळं किती फुललं आहे ते तुम्हाला दिसतंच आहे. नुसतं येऊन जाऊन काम होत नाही. सर्व लक्ष घातलं पाहिजे, म्हणून मी आणि पत्नी इथं रहायलाच आलो. माझ्या मुलांना माझं हे कार्य करणं मान्य आहे. सहा वर्षांत संस्थेच्या निधीच्या दृष्टीनं आम्ही खूप काम केलं आहे. आम्हाला केंद्रशासनाकडून वार्षिक अनुदान १ लाख ४० हजार रु. मिळते. महाराष्ट्र शासनाचे वार्षिक अनुदान साठ सत्तर हजार रुपये आहे. आमच्या संस्थेचा वार्षिक खर्च साडेचार लाख रुपये आहे. आमच्याकडे जे रुग्ण रहातात त्यांना आम्ही जेवण देतो. औषधपाणी करतो. शिवाय त्यांना मानधन देतो. त्यांच्या कुवतीनुसार ते इथं काम करीत असतात. घरातले लोक त्यांना घरात घेत नसले तरी यांचे पैसे घरात हवे असतात. मुलांच्या शाळेच्या खर्चासाठी, मुलींच्या लग्नासाठी घरातून त्यांच्याकडे पैशाची मागणी होते. सुरुवातीला तीन महिने आम्ही औषध देतो. वेतन देत नाही. नंतर वेतन सुरू होते. आमचा इथला मुख्य कार्यकर्ता भगवान म्हणून आहे. इथला पहिला रुग्ण तोच. त्याला आम्ही चारशे रुपये वेतन देतो. इथली सगळी व्यवस्था तो पहातो. शेती पहातो. आमच्याकडे एक डॉक्टर आहेत. एक फिजिओथेरपिस्ट आहेत. आणि आठ पॅरामेडिकल वर्कर्स आहेत. सगळ्यांना आम्ही वेतन देतो. पगारवाढ, भविष्यनिर्वाह निधी हेही हळूहळू बसवतोच आहोत. तरुण माणसं लग्न करतात. संसार थाटतात. त्यांना पगार द्यायलाच हवेत. स्वयंसेवी संस्था त्यांच्याशिवाय उभी राहू शकत नसते. भोवतालच्या दोनशे खेडयांत आमच्या संस्थेची आठ केंद्रे आहेत. प्रत्येक पॅरामेडिकल वर्करला गावे वाटून दिली आहेत. पॅरामेडिकल वर्कर्सना फक्त लेप्रसी ट्रेनिंग दिले जाते. वर्धा येथे गांधी लेप्रसी फौंडेशन आहे. एस्. एस्. सी. उत्तीर्ण झालेल्या मुलांना या फौंडेशनमधे एक वर्षाचे 'लेप्रसी इरॅडिकेशन' प्रशिक्षण दिले जाते. ती मुले पॅरामेडिकल वर्कर म्हणून काम करतात. ते घरोघरी जाऊन कुष्ठरोग्यांचा शोध घेतात. रोगाची माहिती देतात. उपचारांची माहिती देतात. उपचार करतात. पूर्वी आमचे हे पॅरामेडिकल वर्कर कोणाच्या घरी गेले की, लोक चिडायचे. म्हणायचे, 'आमची अब्रू घ्यायला आलात का ? आम्ही काय महारोगी आहोत का ?' कुष्ठ-रोगाचा पेशंट घरात असताना हे असं बोलायचे. पण आता परिस्थिती थोडी बदलली आहे. संशय वाटला तर कित्येकदा आई-वडील मुलाला आमच्या डॉक्टरकडे घेऊन येतात. चट्टे कशाचे आहेत ते पाहून घ्या असं सांगतात. लोकांची ही जागरूकता फार महत्त्वाची आहे, तरी अपेक्षेइतकी सुधारणा होत नाही. बऱ्या झालेल्या रुग्णांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कठीणच. आमच्याकडे धोंडू नावाचा कार्यकर्ता आहे. गावकऱ्यांनी त्याला अगदी डोक्यापासून पायापर्यंत मारला होता. कारण त्याला महारोग झाला. तो गावाबाहेर झोपडीत रहायचा आणि बायको त्याला भाकरी नेऊन द्यायची. तिच्यामुळे गावात हा रोग येईल असं गावकऱ्यांना वाटायचं म्हणून त्यालाच दगडधोंड्यांनी झोडपला. कोणीतरी आमच्याकडे पाठवला. बरा झाला. पण त्याला त्याच्या घरात घेत नाहीत. आमच्याकडेच पाण्याचं पंपिंगचं काम पहातो. तरी आता पर्यंत शंभर पेशन्ट घरी गेले आहेत. म्हणून पॅरामेडिकल वर्करचं काम महत्त्वाचं. त्यानुसार पेशन्ट स्वतःच्या घरात राहतो. ट्रीटमेन्ट घेतो. त्याची घरातली कामे शेती, वगैरेही करतो. या रोगासंबंधी अधिक संशोधन होऊन उपचार-पद्धतीही विकसित होते आहे. हाफकिन इन्स्टिटयूटमधे रीसर्च करणारे डॉ. देव म्हणून आहेत. त्यांनी कुष्ठ-रोगप्रतिबंधक लस तयार करण्यात यश मिळवले आहे. त्याचे प्रयोग सुरू केले आहेत. जो पेशंट असेल त्याच्या कुटुंबातल्या इतर लोकांना, शेजाऱ्यांना प्रतिबंधक लस टोचण्याचे काम काही ठिकाणी चालू झाले आहे.

## गावकऱ्यांशी जवळीक साधणे महत्त्वाचे

**पन्नाशीच्या आसपासचे श्री. गोविंदभाई शिंदे 'शांतिवन' या संस्थेचे कार्यवाह आहेत. अगदी लहानपणापासून ते सामाजिक कार्यात आहेत. उपजीविकेसाठी त्यांनी अन्य नोकरी केली नाही. संघटनेकडून मिळणाऱ्या अल्प मदतीतच ते साधेपणाने राहिले. त्यांनी सांगितले –**



श्री. प्रकाशभाई मोहाडीकर
कार्याध्यक्ष



श्री. गोविंद का. शिंदे
कार्यवाह

मी सर्वोदयाच्या आदोलनातला कार्यकर्ता भूदान–ग्रामदान या कार्यात होतो. त्यानंतर धुळे जिल्ह्यातल्या आदिवासी भागात कार्य करीत होतो. एका आदिवासी माणसाचा खून झाला. त्या निमित्ताने मी धुळ्याला गेलो. तेथील परिस्थिती लक्षात घेऊन दहा वर्षे आदिवासीमध्ये काम केले. त्यांना जागृत करून त्याची सघटना बनवून आपले प्रश्न स्वतः सोडविण्यासाठी त्यानी समर्थ व्हावे या भूमिकेतून आमचे कार्य चालले होते. श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे धुळ्यास नेहमी येत असत. अण्णासाहेबाचा माझ्यावर खूप प्रभाव होता. सार्वजनिक जीवनात येण्याची प्रेरणा मला त्याच्याकडून मिळाली. सर्वोदयाच्या आदोलनात मी त्याच्यामुळेच आलो. शहाद्यामधे आदिवासीच्या चळवळीत कार्य करीत असताना अण्णासाहेबाच सतत मार्गदर्शन मिळालं. एका ठिकाणी काम करीत असताना विशिष्ट मर्यादिपर्यंतच काम कराव, पुढचे कार्यकर्ते तयार झाले की, आपण क्षेत्र बदलाव अशी त्याची शिकवण. अण्णासाहेब मला म्हणत असत की, पनवेलच्या जवळ कुष्ठ निवारणाचे काम चालू होऊन अडल आहे, ते महत्त्वाच आहे. तिकडे काम करायला ये. म्हणून मी या कुष्ठरोग निवारणाच्या कामात आलो पनवेलमधे १९५२ मध्ये कुष्ठरोग निवारण समिती स्थापन झाली कुष्ठरोग्यासाठी दवाखाना सुरू झाला त्या काळी कुष्ठरोगासबंधी ज्या कल्पना रूढ होत्या त्या प्रमाणे स्वतत्र जमीन घ्यावी, तेथे कुष्ठरोग्याची वसती असावी असा विचार सुरू झाला पनवेलच्या जवळ जमीन असावी अस अण्णासाहेबाना वाटू लागल. १९६२ मधे सरकारने या सस्थेसाठी जमीन देऊ केली. ती एकदर बहात्तर एकर जमीन १९६५ पर्यंत ताब्यात आली. नतर १९७८ मधे आणखी पन्नास एकर जमीन सस्थेने विकत घेतली. तरी या काळात सस्थेच कार्य म्हणण्यासारख उभं राहिल नाही. ते का उभ राहिल नाही त्याची नेमकी कारण, इतिहास मी सागू शकत नाही. अण्णासाहेबाची तब्येत ठीक नव्हती योग्य कार्यकर्त्यांचे सहकार्य पाहिजे तेवढ मिळू शकल नाही अस साधारणपणे वाटतं.

१९८० मधे मी या ठिकाणी आलो आणि कामाला लागलो. आमच हे काम मानवतेच्या सेवेच, हिताच आहे हे भोवताच्या गावकऱ्यांना कळत होतं. पण त्यांच्या स्वास्थ्याला, स्वार्थाला धक्का पोहोचतो आहे अस वाटू लागल की, गावकरी बिघडतात. इथ येणाऱ्या कुष्ठरोग्यामुळे आपल्या गावात हा आजार फैलावेल अस त्याना वाटायच. रोगी नदीवर गेले, आमच्या कार्यकर्त्यांपैकी कोणी नदीवर गेलं तरी लोक दगड मारायचे. त्या लोकाना आम्ही कुष्ठरोगाबद्दल माहिती देत होतो. समजावण्याचा प्रयत्न करीत होतो. या भागात मोठ्या प्रमाणावर आग्री समाज आहे. त्याची गुर आमच्या जमिनीत मोकाट चरायची. आमच कार्य सुरू झाल्यावर ते चालण्यासारख नव्हतं यामुळे गुरं चारणारे लोक चिडले त्याच्याशी एकदम भाडण करून चालण्यासारख नव्हत आम्ही आधी थोड्या भागात लागवड सुरू केली, आणि लोकाना म्हटल या लागवडीच्या भागात गुर येऊ देऊ नका, बाकीच्या भागात चारा हळूहळू आमची कक्षा आम्ही वाढवत गेलो, एकीकडे आम्ही लोकाना सागत होतो, आमच हे काम गावच्या लोकाच्या कल्याणाच आहे, यामुळे गावातला कुष्ठरोग नाहीसा होणार आहे. त्याना ते थोड थोड पटायच, पण त्याची गुराची चरण्याची जागा कमी होत होती, त्यामुळे शेवटी मारामारीपर्यंत पाळी आलीच.

आम्ही पोलिसाची मदत घेतली. पोलिसानी आम्हाला सहकार्य दिल. त्यामुळे गावकरी दबले. इथे शे. का. पक्षाची जिल्हा परिषद आहे जि. प. अध्यक्ष श्री प्रभाकर पाटील आणि त्याचे सहकारी यांनी आम्हाला सहकार्य दिल. पण कार्य उभं रहायला एवढ्यानंच भागण्यासारखं नव्हत. गावकऱ्याशी जवळीक साधल्याशिवाय आपल कार्य खऱ्या अर्थाने रुजू शकत नाही याची जाणीव झाली. त्यामुळे कुष्ठरोग-निवारण एवढ मर्यादित काम न ठेवता आम्ही कार्यकर्त्यांनी गावातल्या लोकाशी सतत सपर्क ठेवायला सुरुवात केली. गावात बालवाडी सुरू केली. सरकारी योजनाचा फायदा त्याना कसा घेता येईल, त्याची अमलबजावणी कशी होईल यासाठी आम्ही प्रयत्न केला. मग गावकरी आम्हाला मदत करू लागले. यातून प्रबोधनाची सधी आम्हाला मिळाली प्रथम मी जेव्हा इथे आलो तेव्हा इथल्या कुष्ठरोग्यांची परिस्थिती फार वाईट होती. मुबईला जाऊन भीक मागायची किंवा इथल्या गाढी नदीत जीव द्यायचा एवढे दोनच पर्याय त्याच्यापुढे होते. गावातून रोगी बाहेर हाकलून दिला जायचा. आमच्या सस्थेचं काम सुरू झाल्यावर हे चित्र बदललं. हा रोग प्राथमिक अवस्थेत बरा होऊ शकतो, शका आल्यावर लगेच इथे औषधासाठी येण्यात आपला फायदा आहे या गोष्टी व्याख्यान देऊन, घरोघरी जाऊन स्लाइड शो करून आम्ही लोकाना पटविल्या. लोकामधे बदल झाला. पण मुळात लोकापर्यंत पोहोचण्यासाठी आम्हाला निरनिराळ्या वाटा शोधाव्या लागल्या

रीटगावाहून काशीबाई नावाची एक स्त्री आमच्याकडे औषध घ्यायला यायची खूप गप्पा मारायची. एके दिवशी आली ती बोललीच नाही गप्प ! मग मी विचारल, 'बाई आज बोलत का नाही ? ' तर म्हणाली, 'काय बोलायचं ? आमच्या गावावर सकट आल आहे. आमच्या गावात काही लोक शिरले आहेत. त्यानी गावातल्या तीन जणाना मारपीट केली. ते म्हणतात, 'आम्हाला दहा हजार रुपये हवेत तरच आम्ही मारायचे थाबू नाही तर घराबाहेर पडाल तर आम्ही तुम्हाला मारू ' मला हे विचित्र वाटल. मी म्हटल, 'मी तुमच्या गावात येतो.' आम्ही दोघतिघ त्या गावात गेलो ओळख कोणाची नव्हती. पण आम्ही एकदोघाना म्हटल, 'आम्ही तुमच्या शेजारच्या गावचे तुमच्यावर सकट आल म्हणून विचारपूस करायला आलो. आधी कोणी काही बोललं नाही. पण थोड बोलल्यावर पधरा मिनिटानतर तीनशे माणस जमली चौकशी केल्यावर कळल, या भागातली ही पद्धत आहे. मुबईतले गुंड इथे येतात आणि धाक दाखवून खडणी वसूल करतात. या गावानं दहा हजार रुपये त्याना देण नाकारल म्हणून मारपीट. मी गावकऱ्याना विचारलं, 'तुम्ही काय केलं ? ' गावकऱ्यांनी उत्तर दिल, 'आम्ही पोलिसाकडे तक्रार केली. नतर काँग्रेसवाल्यांकडे गेलो. तर काँग्रेसवाले म्हणाले, 'तुम्ही गुडाच्या वाटेला जाऊ नका. त्याच्याकडे पिस्तूल आहेत. तुम्ही समजून वागा.' मी पुन्हा विचारलं, 'आता तुम्ही काय ठरवल आहे?' गावकरी म्हणाले, 'आम्ही ठरवल पैसे द्यायचे नाहीत.' मी म्हणालो, हे तुम्ही चागल ठरवलं. पण भीती बाळगून घरात बसाल तर

परमेश्वरसुद्धा तुमच रक्षण करणार नाही. उद्या पन्नासजण मिळून पोलिस चौकीवर जा. सगळे मिळून गेलात की पोलिसला तुम्हाला जबाब द्यावाच लागेल.' पोलिसाशी कसं बोलायचं, काय बोलायच, पत्र काय द्यायचं हे मी त्याना समजावून सागितल. दुसऱ्या दिवशी ते सर्व मिळून पोलिसकडे गेले. आमच्या तक्रारीचं तुम्ही पुढ काय केल म्हणून पोलिसाना विचारू लागले काही सरकारी अधिकाऱ्याशी आमचा परिचय होता. त्या सरकारी अधिकाऱ्याना आम्ही गावच्या या तक्रारीकडे लक्ष घालायला सागितल. काहीतरी अॅक्शन गुडाविरुद्ध सुरू झाली. मग ते खाली आले. पाच हजार रुपये मागू लागले. नतर दोन हजार चालतील म्हणू लागले. पण गावकऱ्यानी काहीही दिल नाही गावचा प्रश्न सुटला. हा प्रश्न सुटताना सघटन झाल. आम्ही ठरवल पैसे द्यावयाचे नाही. मी गावकऱ्याना म्हटल, 'गुड बाहेरचे होते. तुमच नुकसान सरळ करीत होते. तुमच्या सघटनेपुढे त्याच काही चालल नाही. पण तुमच्या गावात, तुमच्यातच, तुमचे नुकसान करणारे शत्रू आहेत. एकी मजबूत ठेवून तुम्ही त्यानाही घालवल पाहिजे दारूच व्यसन जायला पाहिजे. जे गरीब लोक आहेत त्याना कायदेकानू समजावून सागितले पाहिजेत.'

या गावचे लोक नतर आमच्याकडे येऊ लागले आमच्या कुष्ठरोग निवारणाच्या कार्यात सहभागी होऊ लागले. कार्य किती प्रकारे करायचे आहे ते आम्हाला अनुभवातून समजू लागल कुष्ठरोगी पूर्ण बरा झाला की पुन: तो पूर्ववत त्याच्या कुटुबात, समाजात सामावला गेला पाहिजे हे आमचे उद्दिष्ट एकदा आमच्याकडे आलेली बाई पूर्ण बरी झाली. तिच्या घरी गेली, पण तिला कोणी घरात घेईना. तेव्हा आम्ही तीन-चार कार्यकर्ते तिच्या घरी गेलो. नवऱ्याने आम्हाला चागल चहापाणी केल. बोलला. बसला. नंतर डायझोनची बाटली घेऊन आला. आमच्या पुढे ठेवली आणि म्हणाला, 'ही बाई घरात आली तर आम्ही बाकीचे हे पिऊन मगच झोपू' बाई परत आमच्याकडे आली. पण त्यावेळी मी विचार केला, जे रुग्ण आमच्याकडे येतात त्यांच्या कुटुंबाशी आम्ही नित्य सबंध ठेवायला हवा. त्या शिवाय त्याच्या पुनर्वसनाच काम सोपं होणार नाही. जे रुग्ण आहेत त्याच्या कुटुबाला आम्ही मदत केली तर रोगमुक्त माणसाला परत घरात घ्यायला ते तयार होतील ह्याची शेती, मुलाची शिक्षणं याला मदत करायला हवी. आमचे जे लेप्रसी टेक्निशियन्स आहेत ते मग रुग्णाच्या कुटुबाकडे, कुटुबाच्या गरजाकडे लक्ष देऊ लागले.

या पाच-सहा वर्षांत पनवेलच्या आसपास कुष्ठरोगाच बरच निर्मूलन झाल आहे. आम्ही आलो तेव्हा २३४६ कुष्ठरोगी आम्हाला सापडले होते आता ११०० कुष्ठरोगी आहेत. बाकीचे बरे झाले.

याच शातिवनात आम्हाला आणखी काही करायचे आहे. वृद्धाश्रम सुरू झाला आहे. अपगासाठी, आदिवासीसाठीही काही करायच आहे. माझी पत्नी, माझी मुल, सगळ्याना माझ हे समाजकार्य आवडतं. माझे चार मुलगे नोकरीला आहेत. एक मुलगी शिकते आहे. दुसरी मुलगी शिक्षण सपवून इथेच माझ्याबरोबर काम करण्यासाठी आली आहे.

# या कामाची संधी मिळणं हे भाग्यच

**शान्तिवन या सस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रकाशभाई मोहाडीकर यांनी सत्तरी ओलाडली आहे *महाराष्ट्रात सानेगुरुजी कथामाला* त्यांनी सुरू केली १९३१ पासून ते सतत सार्वजनिक कार्यात आहेत. ते म्हणाले –**

साने गुरुजी म्हणजे माझ सर्वस्व. मी जे काही केलं ते साने गुरुजींच्या प्रेरणेनं अस मला वाटत.

१९५६ मधे मी दादरला सानेगुरुजी विद्यालयाची स्थापना केली. १९६० ते १९७७ पर्यंत मी त्या शाळेत मुख्याध्यापक होतो. नतर सेवानिवृत्त झालो. तरी साने गुरुजी विद्यालयातल्या मुलाची शिबिरे घेत होतो १९८० मधे शातिवनचे सेक्रेटरी गोविंदभाई शिंदे मला म्हणाले, 'यावर्षी शिबिर आमच्याकडे घ्या' एकशे सदोतीस मुलेमुली आणि पाच-सहा शिक्षक घेऊन मी शातिवनला आलो. १४. एप्रिल ते १७ एप्रिल शिबिर घेतलं. नेरे गावापर्यंत आम्ही बसने आलो. पुढचे अतर चालत या वाकणीच्या प्रकल्पावर आलो. तेव्हा एक मडप आमच्यासाठी घातला होता. त्याला पेढा असलेल छप्पर! पाणी नदीवरून आणाव लागे. चार-पाच कुष्ठरोगी होते. ते काम काम करायचे. मी पाहिल १९६२ पासून मिळालेली ही एवढी मोठी जमीन. जवळ नदीची सोय. तरीही इथ काम उभ राहू शकलं नाही! फक्त तीन पडक्या झोपड्या छप्पर नाही. त्याच क्षणी निर्णय घेतला. या ठिकाणी आपली दहा वर्षं घालवायची. मधूनमधून मी येथे


हार्दिक शुभेच्छा

## हंसराज आणि रूपारेल

**फॅन्सी क्लॉथ मर्चंट**

**स्टॉकिस्ट : बोकेलीन, निवाडा, हीरापन्ना शर्टिंग**

७/११, गरीवदास स्ट्रीट, घोली भुवन, ३ रा माळा,
वडगादी, मुंबई ४०० ००३

फोन नं. : ऑफिस : ३४४२१०
घर : ५११०९७३

जायला लागलो. १९८१ मधे कडक थडीत दुसर शिबिर आम्ही घेतलं. यावेळी विहीर खणायला सुरुवात केली. झाड लावायला, शेती करायला सुरुवात केली. कमिटीला सागितल, इथ शिबिराची मुल येणार तर त्याची चागली व्यवस्था हवी. नतर २८ मार्च १९८१ ला मला कमिटीमधे घेतल. डॉ. पी एम्. केडिया, के. के. मोदी, मावजीभाई शहा, एस्. एम्. जोशी तेव्हा कमेटीत होते मी सागितलं एक वर्ष माझ्याकडे पैसे उभे करण्याची जबाबदारी नको. संस्थेची घटना आम्ही थोडी बदलली.

१ मे ते १० मे १९८१ – मुबईच्या दहा शाळेतल्या अडीचशे विद्यार्थ्यांच दहा दिवसाच शिबिर मी घेतल. शिबीर घेण्यात श्री. हरिभाऊ दामले याची मला खूप मदत झाली. प्रवासखर्च मुलाकडून घेतला. पनवेलच्या व्यापाऱ्यानी मुलाचा जेवणखर्च केला. बौद्धिकासाठी मंत्री, पत्रकार, साहित्यिक बोलावले. मुलांनी रस्ता तयार केला. वर्तमानपत्रात गाजावाजा झाला. नतर मी मुबई मधल्या २०० मुख्याध्यापकाची बैठक घेतली. शिक्षणसचालक श्री. वि वि. चिपळूणकराना बोलावल. त्याना वाकडी प्रकल्पाच्या शिबिराची माहिती दिली. त्याच सभेत या ठिकाणी कुष्ठरोगी आहेत हे सांगून कुष्ठरोगाची माहिती दिली. शिबिराच्या वेळी जेवणाची व्यवस्था कुष्ठरोग्यापासून वेगळी असेल हे सागितलं, कारण कोणतीही सुधारणा एकदम होत नसते. उलट प्रतिक्रिया होण्याची शक्यता असते. ज्या शाळाना परवडत असेल त्यानी याव अस सागितल. सुतारकाम, शेती करू शकणाऱ्या कुष्ठरोग्याना दत्तपूर तपोवन येथून बोलवल. मुलीसाठी पक्का रोड बाधला, सडास बाधले स्वयपाकघर बाधले विहीर, नदीवरून पाण्याचे पप बसवले. शिबिराची व्यवस्था करण्याच्या निमित्ताने केंद्राची व्यवस्था करीत गेलो काही शाळानी शिबिरासाठी नावे आधी दिली. नतर मागे घेतली. तरी त्या वर्षी तेवीस शाळाची शिबिरे झाली प्रत्येक शिबिरात साधारण शभर विद्यार्थी आणि दहा शिक्षक होते. शिबिराबद्दलचे अनुभव सागताना शिक्षक म्हणाले, 'कुष्ठरोग्याबद्दलची घृणा नाहीशी झाली.' हे नुसत बोलण्यापुरत नव्हत, अशी आमची खात्री पटली. साधना विद्यालयाच्या विद्यार्थिनी आणि काही शिक्षक नारळीपौर्णिमेला रक्षाबधनासाठी आले. आम्हाला कार्यकर्त्यांना काहीच माहिती नव्हती. नदीच्या छातीभर पाण्यातून कुष्ठरोग्याना त्या राखी बाधायला गेल्या ते म्हणाले, 'आमच्या आईला, बहिणीना पण आमची आठवण नाही. या आल्या.'

दुसऱ्या वर्षी पावसाळ्यात आम्ही कुष्ठरुग्णानाच मुबईला आणल. ते अठ्ठावीसजण होते. चौदा शाळा रक्षाबधनाच्या सहभोजनाच्या कार्यक्रमाला तयार झाल्या सरमिसळ जेवणाच्या पगती केल्या. कुष्ठरुग्णाना समाज दूर ठेवतो त्यामुळे त्याच्या शरीरापेक्षा मनाला वेदना जास्त होतात. या मिसळण्याने त्याच्या मानसिक वेदना कमी होतात. शिवाय तरुण पिढीला कुष्ठरोगाच नेमक स्वरूप कळत. कार्य एकदा लोकाच्या परिचयाच झाल की, निधी जमा करण हे फार सोप असत. निरनिराळ्या कार्यक्रमातून कार्य लोकापुढे आणाव लागत. ११ मार्च हा अण्णासाहेब सहस्रबुद्धे याचा स्मृतिदिन. त्या दिवशी मित्रमेळावा घेतला पण नतर लक्षात आलं, हा दिवस गैरसोयीचा होतो तेव्हा दरवर्षी जानेवारीचा तिसरा रविवार आम्ही मित्रमेळव्यासाठी ठेवला १९८२ मध्ये पधरा बस भरून आल्या होत्या. १९८८ मध्ये पचवीस बस भरून माणसे मित्रमेळाव्यासाठी आली. सुधीर फडके, रामदास पाध्ये, करुणा देव, यशवत देव, आशा खाडिलकर, माधव गडकरी आमच्या मित्रमेळाव्यांना येऊन गेले. त्यामुळे या केंद्राची माहिती सगळ्याना झाली. आता आमच्याबद्दल भोवतालच्या लोकाना विश्वास दिसतो आज बहात्तर कुष्ठरोगी येथे राहतात तीस लाख रुपयाच्या इमारती उभ्या आहेत. कुष्ठरोग्यासाठी काम करायला मिळण हे मी माझ भाग्य समजतो.

मी अमळनेरचा म्हणजे साने गुरुजीच्या गावचा सानेगुरुजीचा सहवास मला लाभला होता. साने गुरुजी पधरा वर्षांचे असताना शाळेच्या सहलीला डोंगरावर गेले येताना शिक्षकानी मुल मोजली. तेव्हा एक मुलगा कमी. मुलगा तळ्यात बुडाला का कड्यावरून कोसळला, या कल्पनेने सगळी हवालदिल. डोगर उतरताना सगळ्यानी पाहिल. त्याच्यातला एक मुलगा तळ्याच्या काठावर महारोग्याच्या जखमा धुऊन चिध्या बांधीत होता. तो मुलगा पाडुरग सदाशिव साने. माझ्या लहानपणची ही एक आठवण आहे १९२५ ची गोष्ट मी दहा वर्षांचा होतो. वडीलाचे स्नेही मुठे म्हणून होते. त्याना कुष्ठरोग झाला. त्याच्या शरीरातून अळ्या बाहेर पडायच्या. माझे वडील आणि गाधीजीचे सहकारी केदारनाथजी या दोघानी त्याची सेवा केली. त्याच्या घरातल्या लोकानी त्याना दूर ठेवल होत. ते मरण पावले तेव्हा माझ्या वडिलानी त्याच प्रेत वाहून नेलं, हे मला आठवत. म्हणूनही मला या कार्याची तळमळ वाटत असू शकेल.

याच शातिवनात आम्हाला अजून चारपाच उपक्रम सुरू करायचे आहेत वृद्धासाठी वानप्रस्थाश्रम सुरू केलाच आहे. अनाथ मुलासाठी 'गोकुळ' हा प्रकल्प योजला आहे. अध-अपगाची सोय करायची आहे. आदिवासी मुलांना अजून सस्कृत शिकवायचे, त्याना लष्करी शिक्षण द्याव अस मनात आहे या सगळ्यासाठी आम्हाला निधी जमा करायचा आहे. कार्यकर्ते मिळवायचे आहेत

जर्मन लेप्रसी फौंडेशनने आमच्या संस्थेला एक लाख रुपयांचे अनुदान दिले इंग्लडच्या ऑक्सफाम संस्थेकडून शेतीसाठी मदत मिळाली

माझ्या पत्नीच माझ्या कार्यात मला पूर्ण सहकार्य असत. एवढच नाही तर माझे भाऊ, वहिनी, पुतणे हेसुद्धा केव्हाही माझ्याबरोबर असतात.

# उपचाराच्या जोडीने लोकशिक्षण हवं

**वैद्यकशास्त्राचा अभ्यास हा श्री ग ग. पेढारकर यांचा छद आहे. त्यांनी सचिवालयात नोकरी केली. सेवानिवृत्तीनतर आपल्या छदाच्या प्रत्यक्ष उपयोगाला सुरुवात केली. आज ते सत्तर वर्षांचे आहेत. त्यांचे म्हणणे :**

मी तसा एम्. बी. बी एस्. डॉक्टर नाही. सचिवालयात डेप्युटी सेक्रेटरी होतो. नोकरी करताना छद म्हणून वैद्यकीचा अभ्यास केला. सस्कृतची आवड खूप होती. त्यामुळे आयुर्वेद शिकलो. पस्तिशीनतर मॉडर्न मेडिसिनचा कोर्स केला. लेप्रसी कोर्स केला. सेवानिवृत्तीनंतर कोणत्या तरी समाजकार्यात पडण्याची इच्छा होती. आधी

जबाबदाऱ्या इतक्या होत्या की, समाजकार्य परवडण्यासारख नव्हत. भाऊ राष्ट्रसेवा दलात जाणारा होता. त्यामुळे समाजकार्य हे काही आम्हाला नवीन, वेगळ अस नव्हत कुष्ठरोग निवारणाच कार्य महत्त्वाच आहे असं मला वाटल. म्हणून सेवानिवृत्तीनतर या कार्यात मी आलो.

हे कार्य करताना सर्व्हे, एज्युकेशन ॲन्ड ट्रीटमेंट हे हातात हात घालून जाव लागत कुष्ठरोगाची लक्षण त्रासदायक नाहीत. त्यामुळे तो सहज लक्षात येत नाही थोडफार काही जाणवल तरी माणूस तिकडे लक्ष देत नाही. एकदा रोग वाढला की मग पुढे त्रास होतो. मुख्य म्हणजे सवेदना जाते. भाजलेल कळत नाही जखम झालेली कळत नाही त्यामुळे जखमा वाढत राहतात जखमा होऊ नयेत म्हणून पट्टया बाधाव्या लागतात नतर माणूस पूर्ण रोगमुक्त झाला. डी फॉर्मिटीज शरीरयष्टीच्या विकृती तशाच रहातात. म्हणून रोग प्राथमिक अवस्थेत असतानाच उपचार सुरू झाले तर फार उत्तम म्हणजे कोणतीही शारीरिक व्यगे येण्याची शक्यता नाही. प्राथमिक अवस्थेत तो कळावा यासाठी आम्ही सर्व्हे घेतो. पनवेल तालुक्यात आमची आठ केंद्रे आणि पन्नास उपकेंद्रे आहेत आमच्या पॅरामेडिकल वर्करचा चारजणाचा गट असतो. महिन्यातून दोन आठवडे सर्व्हेसाठी या पॅरामेडिकल वर्करने घराघरातून जायचे. माणूस शक्य तेवढा उघडा करून तपासणी करायची. प्रत्येक वर्करने एका महिन्यात एकशे पचवीस माणसे नोद करणे अपेक्षित आहे. लोक कुष्ठरोग लपवू पहातात कारण समाजाबाहेर फेकल जाण्याची भीती असते. ही भीती खरी असते कारण या रोगाबद्दल फार अज्ञान, चुकीच्या कल्पना समाजात रूढ आहेत. यासाठी शिक्षण हवे हा रोग तीव्र ससर्गजन्य नाही. शेकडा ऐशी माणसामध्ये रोगाविरुद्ध भगडण्याची प्रतिकारशक्ती निसर्गत च असते. कुष्ठरोगाचे दोन प्रकार आहेत. १) अल्पजतुक ( Pausibacillary ) २) बहुजतुक ( Multibacillary )

अल्पजतुक कुष्ठरोगाचा ससर्ग अगदी कमी प्रमाणात होतो. बहुजंतुक कुष्ठरोगाच्या ससर्गाची त्यामानाने अधिक शक्यता असते. दमट, उबदार हवेत हे जतू टिकून रहातात. औषध घेतल्यावर दोन आठवड्यात ते जतू कमी होतात छिन्नभिन्न होतात. They are no longer viable. हे सगळं सभा घेऊन स्लाइड शो मार्फत लोकाना शिकवण हा शिक्षणाचा भाग आहे कुष्ठरोग्याला घराबाहेर घालविण चुकीच आहे हे लोकाना पटवल पाहिजे. पुष्कळदा माणसाला घराबाहेर काढण्याच कारण कुष्ठरोग हे नसतच. दुसरच काहीतरी असत. आणि कुष्ठरोग हे त्याना एक निमित्त मिळत रोगाबद्दलच ज्ञान जितक वाढेल तितक उपचार करण सोप होत जाईल सध्या आम्ही जी वापरतो ती सगळी मॉडर्न मेडिसिन् आहेत आयुर्वेदाचा अभ्यास मी केला असल्यामुळे तुम्ही आयुर्वेदाच्या उपचारयोजनेबद्दल विचारता आहात. त्याच काय आहे, आयुर्वेदामध्ये या रोगाची लक्षण सागितली आहेत. औषध दिली आहेत. पण या औषधाचा हा प्रयोग, हा परिणाम असे रेकॉर्ड आपल्याकडे उपलब्ध नाही. मॉडर्न मेडिसिनचे सगळे निश्चित तपशीलवार रेकॉर्ड आहे त्यामुळे हीच उपचारपद्धती श्रेयस्कर आयुर्वेद उपचारात सशोध-

---


**तुमचा मुलगा शाळेत गैरहजर राहू लागला, एकांगी बनला, त्याच्या अवास्तव मागण्या वाढू लागल्या, त्याचे शैक्षणिक स्वाहित्य नाहीसे होऊ लागले, त्याचे घरांतील वर्तन विसंगत असेल तर....**

**तो मादक पदार्थाच्या आहारी गेला असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.**

**वेळीच सावध होऊन विचार करा.**

**कृतीही तुम्हालाच करावयाची आहे.**

**दारूबंदी (शिक्षण) संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबईद्वारा आवाहन.**

बरेच हवे तपशीलवार रेकॉर्ड हवे

शातिवनात रहाणाऱ्या काही रुग्णाची भेट घेतली. एकेका खोलीत दोनतीनजण रहात होते बहुतेकजण अल्पशिक्षित, अशिक्षित स्वतःची लहानशी शेती करणारे किंवा शेतमजूर होते. बरेचजण कुष्ठ-रोगी आहेत हे सहज कळत नव्हते

कुटुबातली माणसे अधूनमधून भेटतात. कुटुबातली माणसे आम्हाला घरात राहू देतील पण गाव फार वाईट असतो, गावातील माणसे आम्हाला घरात राहू देणार नाहीत असे बहुतेकाचे म्हणणे होते.

दोन-तीन कुष्ठरोग झालेली जोडपी शातिवनातच ससार करतात. एका नवऱ्याला कुष्ठरोग झाला म्हणून बायकोही रोग नसताना त्याच्याबरोबर शातिवनात येऊन राहिली आहे एका बाईने डोळयात पाणी आणून सागितले, 'अहो माझा मुलगा घरात राहू देत होता. पण दीर आणि जावेनीच मला बाहेर काढलं बघा.' एकाने तक्रार केली, 'इथे मला शिवणकाम, सुतारकाम शिकवत नाहीत शेतीचच काम करायला लावतात. मला टेलरिंग शिकायचय' स्वत.ला हे दुखणे झाल्याचे, कुटुबापासून दुरावल्याचे दु ख आणि शातिवनात आसरा मिळाल्याचा दिलासा हे प्रत्येकाच्या थोडयाथोडया बोलण्यातून कळत होते. त्याचे सगळयाचे दुःख एक असले तरी प्रत्येकाची कहाणी निश्चित वेगळी होती. परतु शिक्षणाच्या अभावामुळे शाब्दिक अभि-व्यक्ती खूप कमी होती. किंवा त्याना सोसाव्या लागलेल्या आघातामुळे अपुऱ्या ओळखीवर बोलण्यात मोकळेपणा येऊ शकत नव्हता. शातिवनचा पहिला रुग्ण भगवान याने तेवढी स्वतःची हकीगत तारीखवार फार व्यवस्थित सांगितली. भगवान तीस वर्षांचा असताना १९६६ मधे त्याला कुष्ठरोग झाला. पदरात बायको, दोन लहान मूल-एक मुलगा आणि मुलगी भगवानने आधी जळगावला रोगावर उपचार करविले. नतर वर्धा येथील कुष्ठरोग निवारण सस्थेत गेला. तेथे सात वर्षं राहिला. बरा झाला. १९७३ मधे घरी येऊन नोकरीला लागला. सहा वर्षे नोकरी केली. १९७९ मधे त्याने मुलीच्या लग्नासाठी प्रयत्न सुरू केले. नातेवाईकाना मुलगा पहायला सागितल. तोंडावर सगळे हो हो म्हणायचे, पण प्रत्यक्षात कोणी काही करीत नव्हत. भगवानच्या लक्षात आले, आपल्या रोगामुळे मुलाची लग्न होण कठीण. मग तो घरातून बाहेर पडला दत्तपूरच्या कुष्ठधामात गेला. मुलीच लग्न ठरल. पण मुलाकडच्या लोकानी ज़रा अडवून पाहिल दहा हजार रुपये हुडा मागितला. भगवानने बायकोला जमीन गहाण ठेवून पैसे उभे करायला सागितले. त्या पैशावर मुलीचे लग्न झाले गहाण पडलेली जमीन भगवान सोडवणार आहे. त्याच्या मुलाचेही लग्न झाले पण भगवान लग्नाला जाऊ शकला नाही. भगवान म्हणतो, 'समाज मला स्वीकारीत नाही.'

संस्थेचे कार्यकर्ते श्री. हरिभाऊ दामले यानी एका मुलीची हकीगत सागितली. जवळपास गावातली कुष्ठरोग झालेली ही तरुण मुलगी शातिवनमधे काही वर्षे राहिली अगदी पूर्ण बरी झाली. डॉक्टरानी बरी झाल्याचे सागितल्यावर अक्षरशः धावत घरी गेली. तिच्या घरी आई आणि भाऊ होते. ते आपल्याला घरात घेणार नाहीत अशी शंकाही तिच्या मनाला शिवली नव्हती पण त्यानी तिला घरात घेतल नाही. ती तशीच परत फिरली नाक्यावर इकडे तिकडे हिंडत राहिली. शातिवनमधे परत यायला तिला फार सकोच वाटत होता. पण सस्थेतल्या कार्यकर्त्यांना कोणीतरी ही बातमी सागितली. ते तिला परत घेऊन आले.

शातिवनातील कुष्ठ रोग निवरण या विधायक कार्यात येण्या मागची सर्व कार्यकर्त्यांची मूळ प्रेरणा महात्मा गाधीपाशी जाऊन पोहोचते निमित्त मात्र वेगवेगळे आहे. श्री धामणकराच्या जीवनात दास्ताने आले. त्यामुळे या कार्याकडे वळावेसे त्याना वाटले ते इच्छा स्वप्न त्यावेळी सफल झाले नाही. परतु ते स्वप्न विरूनही गेले नाही. राजकारणाच्या रणधुमाळीत मनाच्या कुठल्या तरी सादीकोपऱ्यात ते निपचित पडून राहिले. राजकारणातून बाहेर पडायला लागल्यावर ते स्वप्न पुन्हा वर आले. म्हणून पचाहत्तराव्या वर्षी ते शातिवनातल्या या कार्याकडे वळले असे आज वाटते. ठाणे, रायगड जिल्ह्यात त्याचा जनसपर्क बराच आहे त्याद्वारे होईल ती सर्व मदत ते शातिवनाच्या कार्यासाठी करू इच्छितात.

श्री. गोविंदभाई शिंदे हे श्री अण्णासाहेब सहस्रबुद्धे याच्यामुळे या कार्यासाठी आले कुष्ठ रोगनिवारणाचे मुख्य कार्य करण्यासाठी भोवतालच्या खेडयाशी सपर्क ठेवणे, त्यांचा विश्वास सपादन करणे गोविंदभाईंना फार आवश्यक वाटते. यामुळे ग्रामसुधारणा आणि कुष्ठरोगनिवारण हातात हात घालून जाणार अशी गोविंदभाईंच्या विचाराची दिशा दिसते श्री. प्रकाशभाई मोहाडीकर याचे प्रयत्न कुष्ठरोग निवारणाचे कार्य शहरातल्या आणि खेडगावातल्या तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आहेत. श्री. पेंढारकर वैद्यकीच्या आवडीने शातिवनात कार्यरत आहेत. श्री. शिर्के, फिजिओथेरपिस्ट चोगटे ही पचविशीतली तरुण मडळी स्वतत्रपणे आपल्या क्षेत्रात काही प्रयोग करा-यला मिळतील समाजकार्य सोईल ही कल्पना मनात घेऊन शातिवनात आली आहेत. या सर्वांच्या क्रियाशीलतेतून शातिवन आकार घेत आहे

१९६२ ते १९८० या काळात जमीन ताब्यात असूनही कुष्ठ-रोग निवारणाचे केद्र का उभे राहू शकले नाही याची व्यवस्थित माहिती कोणाकडूनही कळू शकली नाही. किंवा कार्यकर्त्यांनी यासबधी हेतुत मौन पाळले आहे जर हे कळले असते तर रचनात्मक कार्याच्या मार्गात येणाऱ्या अडथळयावर, अपप्रवृत्तीवर प्रकाश पडू शकला असता.

कार्यकर्त्यांमध्ये गटबाजी नाही. राजकारण नाही असे सर्व कार्य-कर्त्यांनी सागितले असेच वातावरण सातत्याने टिकविणे फार कौशल्याचे व जबाबदारीचे काम आहे. सस्था जसजशी वाढत जाते तसतशी अनेक व्यक्ती निरनिराळया उद्दिष्टाने तेथे शिरू लागतात. सस्थेचे संस्थान होऊ लागते. मूळ ध्येयापासून सस्था दूर जाण्याचा धोका सभवतो. कोणत्याही स्वयसेवी सस्थेतील ही आव्हाने शातिवनासमोर आहेतच. शिवाय त्यापेक्षा वेगळे आव्हान त्याच्यासमोर आहे. कुष्ठरोग निवार-णाचे कार्य हे इतर स्वयसेवी सस्थापेक्षा वेगळे आहे. जनतेला ते समजले, पटले तरी स्वतः त्यात सहभागी होणे हे इतर कार्यांच्या तुलनेत आणखी कठीण आहे म्हणूनच या कुष्ठरोगनिवारणकेंद्राभोवती इतर कार्यांची केंद्रे उभी करणे ही अधिक बिकट वाट आहे

'शातिवनचे' कार्यकर्ते अनुभवी आहेत. ही वाट ते पार करतील असे वाटते कारण आता शातिवनचे कार्य विकसनशील दिसते आहे.

# बुकोई-
# आंबेडकरवादी चळवळीचे नवे विधायक पाऊल

## गिरीश प्रभुणे

मार्च एप्रिलच्या उन्हाच्या झळा जाणवू लागल्या. पुण्यापासून भिगवणपर्यंत एम् फिफ्टी.वर आल्यामुळे काहीशी अवघडल्यासारखी स्थिती. भिगवणला बुकोईचे कार्यकर्ते जमा झालेले. त्यांच्या एका मित्रानं जीपची व्यवस्था केलेली होती.

सोलापूर रोड सोडून गाडी हळूहळू कच्च्या रस्त्यावरून जाऊ लागली, धुळीचे लोटच्या लोट अंगावर येऊ लागले. अधून मधून हिरवीगार ऊसाची शेते दिसत होती. मधेच उजाड राने लागत होती. काही ठिकाणी ज्वारीच्या मळण्या चाललेल्या दिसत होत्या. मधूनच ऊसाने भरलेले ट्रक्स, बैलगाड्या जाताना दिसत होत्या. रस्त्याच्या कडेला असलेल्या एका नंबरच्या दगडावर नजर गेली.

'बावडा १५'.

आणि मन:पटलावरची धूळ वावटळी-प्रमाणे उडाली.

हेच ते शहाजी पाटलांचं बावडा.


माळरानावर, उघड्यावर. बेवारशी झालेले हरिजन अन्नपाण्यावाचून रात्रंदिवस तळमळत होते. संपूर्ण तालुक्यात दहशतीचे वातावरण निर्माण झालेलं. ग्रामपंचायत निवडणुकीचं निमित्त झालं आणि आगडोंब उसळला. विधानसभेत रामभाऊ म्हाळगींनी प्रश्नांचा भडिमार करून शंकर बाजीरावांना ( माजी मंत्री ) सळो की पळो करून सोड-लेलं. 'नामांतराच्या' आधीचं हादरवून सोडणारं, पँथरचा उदय वेगाने करणारे प्रकरण. वालचंदनगरच्या संघ स्वयंसेवकांनी जीवावर उदार होऊन आपल्या या पीडित बांधवांना मदतीचा हात दिला होता. त्याच भागातून १५-१६ वर्षांनी आम्ही चाललो होतो. परिस्थितीत खूपच बदल झालेला. श्री. शंकर बाजीराव आता कुणीही नाहीत. राजकारणात आमदार, खासदार, मंत्रीपदा-वर जाऊन नंतर पराभूत झालेले. आता राजकारणात त्यांचे नावही नाही. त्यांचे बंधू शहाजी पाटील कैलासवासी झालेले. आणि रामभाऊ म्हाळगीही काळाच्या पडद्याआड गेलेले. त्याच भागातील अनेक खेड्यांत दलित वस्त्यावस्त्यांमधून बुकोईची सहकार चळवळ आपले मूळ धरू लागलीय.

पुण्याच्या शाळा-कॉलेजमध्ये एक आडदांड शरीराचा पण मनमिळाऊ म्हणून गाजलेला एम. इ. एस. महाविद्यालयात बहुतांशी ब्राह्मण मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये प्रिय असलेला; मुली आणि प्राध्यापकसुद्धा संकट-काळी याला आपला सहकारी मानत. लहान-पणी याचे वडील म्हणत याला माझ्याबरोबर गवंडीकामाला घेऊन जावे लागणार. हा मठ्ठ काय दिवे लावणार ... ?.

याची आई मात्र म्हणे, ' याला मी मोठ्ठा करणार. शिकवणार. '

शरिरानं वयापेक्षा मोठा असल्याने शाळेत असताना एकदा थोरल्या बहिणीबरोबर हॉस्पिटलमध्ये गेला असता एका पेशंटशी बोलताना याची ओळख करून देताना बहीण म्हणाली, ' हा माझा भाऊ, कॉलेजात असतो. '

त्या पेशंटला त्याचे खूप कौतुक वाटले पण हा अस्वस्थ झाला. पुढे त्या पेशंटचे शिरूर



टेक्सास गायकवाड
बुकोई – संस्थापक

वरून पत्र आल. या लहान वयात कॉलेजात आपण असल्याचा अभिमान वाटतो. आपण खूप मोठ्ठ होऊन समाजात काम कराल; असं हे पत्र. वाचताच तो खजिल झाला. दोन वर्षं याने एकाच इयत्तेत काढलेली. त्याच मन त्याला खाऊ लागल. त्यानं त्या शिरूरच्या हितचिंतकाला 'दगा श्रावण वाघ' त्याच नाव पत्र लिहून कळविलं की, मी कॉलेजात नसून नववीत आहे. दोन वर्षं एकाच वर्गात आहे. आपल पत्र आल. मी आता खूप अभ्यास करीन. कॉलेजात जाऊन मोठ्ठा होईन.'

दगा श्रावण वाघ याच पुन्हा पत्र आल कौतुकाचं पुढे तो नापास झाला नाही. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल हाच टेक्सास गायकवाड. दलित रंगभूमी, बुकोई, टास्क फिल्म्सचा संस्थापक.

महाविद्यालयात असतानाच पँथरच्या चळवळीशी सबंध आला. 'इंदापूर बावडा' प्रकरण नुकतच घडलेल. पँथरचा दरारा होता त्या काळात. सर्व दलित तरुण पँथरकडे आकर्षित होत असत. राम आठल्ये नावाच्या कार्यकर्त्यांने नामदेव ढसाळशी टेक्सासची ओळख करून दिली. नामदेव नावाचे एक वादळ त्या काळात होते. तो बोलू लागला की रक्त सळसळू लागायचं. दहशतीच्याविरुद्ध लढणारी तरुणाची जबरदस्त सघटना. जीवावर उदार होऊन आत्मसमर्पणाची तयारी ठेवून अनेकजण काम करीत होते. हा पण त्यात आला.

'मी भारावून गेलो होतो आदोलने ... मोर्चे ... भाषण यांनी भारलेले कार्यकर्ते आणि ... नेते. हॉटेलात भरपूर खाणारे. दारू पिणारे. सामान्य कार्यकर्ते मात्र उपाशीतापाशी वणवण हिंडत चळवळ उभारत. पँथरची गावोगाव उभारणी करीत. हळूहळू आम्हा सामान्य कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास झाला. ज्या हेतूसाठी आम्ही चळवळीत आलो तो हेतू साध्य होईना. मग मी प्राध्यापक विलास वाघ, अविनाश आबेडकर, राज ठाकूर आणि इतर अनेक कार्यकर्ते मिळून 'समाज परिवर्तन संस्था' काढली. एक एक खेडे निवडून परिवर्तनाद्वारे सामाजिक विकास करायचा ठरले. आम्ही खेड्यातून जाऊ लागलो. समाज विकासावर बोलू लागलो. लोक फार आशेने बघायचे. त्याच्या अपेक्षा खूप असायच्या. कमालीचे दारिद्र्य. अर्धपोटी राहून उन्हातान्हात राबणारा आमचा समाज आमच बोलण ऐकण्यासाठी जमायचा. बायाच्या अगावर ना पूर्ण कपडा. पुरुष काळवंडलेले. कशान तरी दबलेले वर्षानुवर्षांच्या गुलामीन पिचलेले आजारी मुल, उदास घर, वस्त्यावस्त्यातून आम्ही जायचो. आम्ही उत्तम कपडेलत्ते असणारी मुल आपल्या समाजाची परिस्थिती पाहून खजिल व्हायचो. दु:खी व्हायचो पुस्तकातील परिवर्तनाच्या भराऱ्या ऐकविण्यात काही अर्थ नाही अस वाटायच. कारण आमच्या बोलण्यान काहीच फरक पडत नसे. पुन्हा पुन्हा गेल्यानंतर लोक पुन्हा पुन्हा जमत असत. सर्व एकतर्फी व्यवहार होत असे. खरं पाहिलं तर आमची पात्रताच नव्हती हे काम करण्याची. मी खूप अस्वस्थ झालो. विलास वाघाना पत्र लिहून या सबधीची माझी मतं कळविली. केवळ वैचारिक भाषण देऊन समाजाच्या समस्या सुटणार नाहीत, याची मला जाणीव झाली. आणि यातूनच 'सास्कृतिक चळवळ' उभारण्याची गरज वाटू लागली.

मी जिथे राहत होतो, ती पुण्यातील सर्वात जुनी झोपडपट्टी 'पाडववाडी'. मोठी हरिजनाची वस्ती. त्याच ठिकाणी माझ्यावर सस्कार झाले. जेव्हा बाबासाहेब आबेडकर गेले तेव्हा मी लहान होतो. शाळेला सुट्टी मिळाली. मला फारस समजत नव्हत. मी घरी आलो. विठ्ठल रामजी कांबळे हा अशिक्षित कामगार त्याच्या घरी मटण शिजवत होता. तो दु:खाने व्याकुळ झाला. त्याने ते मटण रस्त्यावर फेकून दिले आणि मटण कापायच्या सुरीने तो आत्महत्या करून घेऊ लागला. बाबासाहेबाच्या जाण्यान सर्व वस्ती शोकाकुल झाली होती. याच कावळेनी आम्हाला त्रिशरणं पचशील शिकविले. रोज संध्याकाळी वदना झाल्यावर ते आम्हाला खडीसाखर देत असत. सारं वातावरण भारावून जात असे. मी त्याच्या जवळपास सारखा असायचा. इथेच श्री तात्यासाहेब बहुले हे काम करायचे. त्याची गायन पार्टी होती. ते बुद्धाची, बाबासाहेबाची गाणी म्हणत असत. वाचन चालत असे. बाबासाहेबाच्या कार्याची ओळख त्यातून होत असे. बी. सी. काबळे, राजानद गडपायले, भडारे याची व्याख्याने होत असत. स्वच्छतेची शिकवण पाडववाडीत घराघरातून होती.

लहानपणी आईवडिलाबरोबर मडईत गेलो होतो. तिथ मी गर्दीत मूठभर सुपाऱ्या चोरल्या आणि वडिलाना दिल्या. वडिलानी खूप मारल. अशा छोट्या छोट्या अनेक प्रसगानी माझ्या मनावर सस्कार होत गेले. आई उत्तम सुईण असल्यामुळे झोपडपट्टीतल्या गरीब स्त्रियाची सोडवणूक करीत असे. तिच्या कामसूपणाचा माझ्यावर सस्कार झाला.

डेक्कन जिमखाना भावे स्कूलमध्ये मी शिकत होतो. मध्यमवर्गीयाची मुल बहुताशी होती. श्रीराम पावसकर हे बारामतीचे गुरुजी मला होते. त्याची शिकवण्याची हातोटी फारच प्रभावी होती. त्यांनी स्वातंत्र्याचा इतिहास समरसून सागितला सारा वर्ग भारावून ऐकत असे. माझ्यावर त्याच विशेष प्रेम होत. आयुष्यभर लक्षात राहील असा काळ होता तो. पावसकर गुरुजी संघाचे होते.'

दलित रंगभूमीच्या नाटकाच्या निमित्ताने सारा महाराष्ट्र जवळून पहायला मिळाला. गरीब पिचलेले लोक आशेने भेटायला येत. सर्वांच्या अडचणी समजत. राखीव जागा असताना प्रचड बेकारी दिसे. शिक्षणाची खेडोपाडी सोय असताना अशिक्षित निरक्षर तरुण भेटत. अनेक गटात विभागलेले रिपब्लिकन पक्षाचे लोक भेटत असत. पँथरच्या छावण्या शहरातून होत्या. खेड्यात लोक या सर्वांना घाबरत असत. नाटकाच्या निमित्ताने हे सर्व पहायला मिळाल्यावर वाटू लागलं, हे बदलायला हव ... हे बदलायला हव ... नाटकामधून प्रबोधन होत होतं. पण ते अपुर वाटे. उपाशीपोटी बौद्धिक प्रबोधन काय कामाच ? अजून काही तरी करायला हव.

डॉक्टर बाबासाहेबाचा एक विचार सतत मनाला भुलवीत असे. 'माझ्या सात कोटी बाधवानी दरमहा एक एक रुपया दिला तर मी माझ्या बाधवासाठी उद्योगधदे निर्माण करीन. त्याना कुणाची गुलामी करावी लागणार नाही. स्वत:चा विकास त्याना करता येईल, स्वावलबी जीवन, आत्मविश्वासाने जगता येईल ...'

□

आजवर अनेक चळवळी झाल्या ..
अनेक नेते झाले...

आले गेले...

प्रामाणिकपणा राहिला नाही. सर्वत्र स्वार्थ बोकाळला. केवळ जयंती-पुण्यतिथी समारंभात भाषणं ठोकायची. मात्र व्यवहार उलटाच करायचा. यामुळे चळवळ अशी उरलीच नव्हती. आपण जर प्रामाणिक राहिलो तर समाजाचा विश्वास संपादन करून बाबासाहेबांची ही औद्योगीकरणाची कल्पना राबवू शकू..

पण आपला समाज हा असा संशयी, फाटाफूट, खच्ची करणारा ...

तरीही आपण हे काम करायचंच...

टेक्सास सांगत होता.

बोलण्याच्या ओघात बावड्याला बगल देऊन आम्ही पुढे आलो होतो.

□

## खोरोची

इंदापूर तालुक्यातील एक मागास गाव. नदीच्या काठावरचं हिरव्यागार झाडीत वसलेलं. नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा. बंधाऱ्यात भरपूर पाणी. प्रसन्न वातावरण. बौद्ध वस्तीच्या जवळ आल्यावर हा हिरवेपणा, प्रसन्नपणा कुठच्या कुठं गेला. तीच जुनाट बसकी घरं, तीच सर्वत्र धूळ. आम्हाला पाहताच सर्वजण जमले. धुळवड असल्यामुळे रंगानं माखले होते. चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता.

इथं बुकोईची, सहकाराची गंगा हळूहळू आकार घेऊ लागली आहे.

इंदापूर, वालचंदनगर, माळशिरस सर्व भागात साखर कारखाने, सहकारी सोसायट्या झालेल्या. सहकाराची गंगा या भागात येऊन खूप पाणी वाहून गेलं. त्याच्या आधाराने शेतकरी, मराठा समाजानं आपला विकास करून घेतला, पण दलित दलितच राहिला. उलट दोघांमधली दरी आणखीनच रुंदावली. अधूनमधून घडणाऱ्या अत्याचारांमुळे भीतीचे वातावरण मात्र सतत राहिले होते. ऊस बागायतीमुळे मजुरी मिळत असे. एरवी हा दुष्काळी भाग त्यामुळे पाण्यावाचून दलितांच्या जमिनी पडीकच राहिलेल्या. मजुरी कमी मिळे. त्यामुळे दारिद्र्य पाचवीलाच पुजलेलं.

खोरोचीची बौद्ध वस्ती चाळीस एक घरांची. प्रामुख्याने भोसले आडनावांची मंडळी. पुरुष मंडळी शिकलेली. सहा-सात शिक्षकच आहेत.

## याच हातांनी इतिहास घडवलाय

बुकोईचे कार्यकर्ते लक्ष्मणराव संभाजी भोसले साधारण पंचेचाळीस वयाचे. जाड भिंगांचा चष्मा, सतत हसरा चेहरा, बोलायला खूप लागते. पांढरी टोपी, पांढरा शर्ट, पायजमा असा वेश. लक्ष्मणराव निर्व्यसनी, दहावी पास झालेले. शिक्षणामुळे बाह्य जगाशी सतत संबंधित. खोरोची गावात तसे दारूचे प्रमाण अधिक असूनही वस्तीमध्ये मात्र कमी आहे.

लक्ष्मणरावांना शिक्षक व्हायचे होते. घरच्या परिस्थितीने शिक्षण सोडावे लागले. गवंड्यांच्या हाताखाली काम करू लागले. लक्ष्मणराव सांगत होते–

'शिकायची खूप इच्छा होती. पण शिक्षण सोडावं लागलं. गवंडीकाम करू लागलो. वीटभट्टीवर सर्व प्रकारची कामे केली. राबराबायचो. पण पैसा पुरत नसे. अनेक ठिकाणी कामं केली. गावात नेहमी काम मिळत नसे. वाटायचं हे असं कुठवर चालायचं. गावात पाणवठा एकच आहे पण दडपण जास्तच. शंभर एक एकर जमीन आहे, जमिनीला लागूनच आठमाही पाण्याचा कॅनॉल गेलेला आहे. पण आम्ही काहीही करू शकत नाही. पूर्वी आमच्या लोकांनी गावकीची कामं करायची नाकारली. गावच्या लोकांनी शेजारच्या 'मोखली' गावच्या लोकांना गावकीची कामं करायला बोलावलं. त्या गावच्या लोकांची नाव जमिनीवर लागली. आमच्या लोकांनी त्यांना पिटाळून लावले. खूप वर्षं वाद चालला होता. त्यावरून गावाशी तेढ निर्माण झाली. त्यातूनच जमिनीला पाणी असून ही जमीन पड राहिली. उन्हाळ्यात वीटभट्टीवर कामाला जायचं. पावसाळ्यात, हंगामात शेतीवर मजुरीला जायचं.

बुकोईच्या दादासाहेब गायकवाडांचं (टेक्सास) नाव ऐकत होतो. विजय शिंदे यांच्यामुळे ओळख झाली. त्यांनी दादांना गावात आणलं. गावात वस्तीवर बैठक झाली. सर्वांना त्यांनी विचारलं–

'काय करायचं ठरवलंय ...?'

आम्ही सारे चूपच होतो. काय बोलायचं हेच समजत नव्हतं. आजवर असं कुणी विचारलं नव्हतं. ते म्हणाले,

'आपण असं कुठवर जगायचं? जमिनी आहेत, पाणी आहे. शिकलेली माणसं आहेत. सरकार आपल्या पाठीशी आहे. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या अनेक पिढ्यांसाठी विचार मांडून ठेवलेत. फक्त एकत्र व्हा. संघटित व्हा. कामं करा. काहीतरी उद्योग सुरू करा. सहकारी चळवळीच्या माध्यमातून हे करायला हवं. किती दिवस दुसऱ्याची चाकरी करणार? गुलामी करणार? टिळकांनी जशी ब्रिटिशांना घालविण्यासाठी स्वातंत्र्यपूर्वकाळात स्वदेशीची



बुकोई सहकारी वीटभट्टी, खोरोची, इंदापूर

चळवळ सुरू केली, स्वदेशीचं शस्त्र उगारलं, त्याचा परिणाम लोकजागृतीसाठी झाला, आणि मोठ आदोलन उभ राहिलं. आपल्यावरचे अत्याचार निपटून काढायचे असतील तर पुन: एकदा ही नवी स्वदेशीची चळवळ उभारायला हवी. स्वावलबनाची चळवळ. बुकोईची चळवळ. दलितांनी दलितासाठी चालविलेली. गरिबानी गरिबासाठी उभारलेली वेगवेगळी उत्पादनं आपली आपण निर्माण करायची. त्या साठी गावोगावी ग्राहकभाडारे उभारायची. त्यासाठी सहकारी चळवळ वस्तीवस्तीपर्यंत न्यायची.'

सर्वजण गप्प बसून आश्चर्यांन ऐकत होते. कुणाच्याच तोडातून शब्द फुटत नव्हता. असं होईल ? असं होईल ? असं होईल... ? जो तो एकमेकाकडे तोड वासून बघत राहिला.

'आपल्याकडे काय कमी आहे...' हा देश आज जो सुजलाम् सुफलाम् बनलाय तो याच हातानी. हे कारखाने, उद्योगधदे सर्व याच हातानी बनलय. याच बाहूंतल्या बळाने हिंदुस्थानचा इतिहास घडविला गेलाय, आणि भविष्य लिहिल जाणार आहे. बोला ...... बोला ..'

'पर हे कसं होणार... कस होणार...?' एकजणानं प्रश्न टाकला.

'आणि काय करणार... ?'

'पैसा कुठून आणणारा... ?'

'माल खपवणार... कुठं... ?'

'घेणार कोण.. ?'

एक ना अनेक प्रश्न उभे राहिले. सर्वांनाच तोंड फुटल. प्रश्न विचारण्यात सर्वच पुढे. शका काढण्यात सर्वच जण पटाईत. पण प्रश्न नेमके आले होते काहीतरी करण्याचे प्रश्न होते. मार्ग शोधणार होते...

'तुम्हीच करायचय काम...!'

'तुम्हीच पैसे आणायचेत ... !'

'तुम्हीच खपवायचय सर्व ... !'

'तुम्हीच घ्यायचय विकत !'

– प्रकाश रोकडे म्हणाले...

सर्वजण एकमेकाकडे पाहात राहिले.

'आपण सर्वांची सहकारी सोसायटी स्थापन करायची. तुमची जमीन आहे नदीत पाणी आहे तुम्हाला वीटभट्टीवरची सर्व काम येतात तुम्हीच वीटभट्टी उभारायची. विकत घेणारे खूप आहेत. आपल्याच इतरत्रच्या लोकांना विटा लागतील ते विकत घेतील वीटभट्टीसाठी काम करायचं, मजुरी घ्यायची आणि वर नफाही घ्यायचा...'

सर्वांच्या डोक्यात प्रकाश पडला.

'पण याला पैसा खूप लागेल...'

'तुम्ही शेअर्स गोळा करा! सोसायटी झाल्यावर बँकेचे सहकार्य मिळेल, त्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करू...'

थोडयाच वेळात योजना आखली गेली. माती किती लागेल... साहित्य काय काय लागेल... कोळशाची खर किती लागेल... काम किती जणाना मिळेल...

सर्व योजना कागदावर आली. मी उभा राहिलो आणि गावकऱ्यातर्फे समाजातर्फे दादासाहेबाना म्हणालो.

'हे आता ठरल... पू. बाबासाहेबाची आण घेऊन आम्ही सागतो. आम्ही आता कामाला लागतो. आम्ही रात्रीचा दिवस करू पण ही योजना उभी करू. आम्ही सर्वजण आता जिथ काम करतो तिथ काम करूच शिवाय विटभट्टीचे पैसे विक्री होऊन येईपर्यंत विनावेतन सायंकाळी काम करू

पुण्यातून आलेल्या बुकोईच्या कार्यकर्त्यांना आनद झाला.

'हे मंजूर आहे. सर्वांना ...' टेक्सासनी विचारले.

'हो ऽऽ!' सर्वांचा एका सुरात आवाज आला.

'हे फार छान झालं. आता यश तुमचच आहे. बाबासाहेबाची पुण्याई आपणा सर्वांच्या पाठीशी आहे आता कुणीही मागे नाही सरायचं...'

जमीन होती पण नदीपासून, गावापासून खूपच लाब. वस्तीजवळच्या जमिनीची ग्रामपंचायतीकडे मागणी केली. थोडया खटपटीनंतर मिळाली एक हेक्टर जागा. आणि सर्वजण कामाला लागले. 'बुकोई सहकारी वीट भट्टी सस्था' निर्माण झाली. रजिस्ट्रेशन झालं आणि विटभट्टी आकाराला येऊ लागली. वीस सभासदाची सस्था झाली.

इजिन, पाईपलाईन आणली गेली. बँकेकडून सहकार्य घेऊन एका सकाळी छोटधाशा समारभाने भूमिपूजन करून कामाला सुरुवात केली. दिवसभर बाहेर काम करायच, सध्याकाळी वीटभट्टीवर यायच, पाळीपाळीने काम करायच. वीटभट्टी उभी राहू लागली. रात्रदिवस आम्ही काम केलं. ३५००० वीट उभी राहिली. सगळे कौतुक करित होते. आमचा ऊर अभिमानाने भरून आला. जे घडेल असं स्वप्नातसुद्धा वाटल नसत ते घडल होत.'

सहकार्याने चमत्कार घडवून आणला होता. वर्षानुवर्ष दुसऱ्याची जुलूमजबरदस्ती सहन करून जगणाऱ्याना स्वत:च्या शक्तीची कल्पना आली. स्वातंत्र्यानतर चाळीस वर्षांनी गुलामीच्या बेडया निखळून पडल्या. स्वसामर्थ्याच्या साक्षात्काराने बौद्धवस्ती फुलारून आली.

सध्याकाळी चावडीवर सर्वजण जमले. खूप वर्षांनी जयती शिवाय बुद्धवदना-त्रिशरण झाले. गाणी झाली. गप्पा गोष्टी झाल्या. त्याच बैठकीत नव्या योजना आखल्या गेल्या. सहकारी तत्त्वावर घरबाधणी उभारायचे ठरले खुज्या घरामुळे खुज रहायची सवय झालेली. आपल्यालाही मोठी हवेशीर घरं हवीत. लक्ष्मणराव भोसले, अर्जुनराव भोसले, महादेवराव भोसले याच्या श्रमाच चीज झालं. भजन, गाणी म्हणत सर्वजण रात्री स्वातत्र्याचा मुक्त श्वास घेत निवात झोपले. एका नव्या जबाबदारीच्या जाणिवेन.

आणि ...

सकाळी परसाकडला गेलेला वस्तीतला एकजण डबड टाकून ओरडत आला.

घात झाला ...

घात झाला ...

सर्व वस्ती खडबडून जागी झाली. एकेकजण घाईघाईने जागा झाला. लक्ष्मणरावाच्या पायातली शक्तीच निघून गेली. बायाच्या तोंडून अस्फुट हुदका बाहेर पडला. वीटभट्टीच्या त्या भागाला युद्धानतरच्या उद्ध्वस्ततेच स्वरूप आल होतं. रचलेल्या सर्व विटाचे तुकडे सर्वत्र पसरलेले होते भट्टी पेटवली नसल्यामुळे सर्व कच्च्या विटाचे तुकडे तुकडे झाले. आणि उभ रहाणाऱ्या स्वप्नाचेही तुकडे झाले. सहाशे फूट पाईपलाईनचे पुन: वापरता येणार नाहीत असे तुकडे झाले होते. नवजीवनाच्या सुरुवातीलाच काळी छाया पसरली. दुष्ट समाजकटकानी, जातीयवादी लोकानी सार उधळून लावल होतं. सहकारान उभं राहाणार श्रमिकाचं घरकुल जातीयवादी

प्रवृत्तीनं उध्वस्त केल गेल....

लक्ष्मणरावाच्या मनात ज्वालामुखी धुमसू लागला. हाताच्या मुठी वळल्या गेल्या. ताठ उभे राहून गावाकडे पहात तार-स्वरात ते ओरडले –

'कुणाच्या बापाची छाती आसंल त्यानं म्होरं यावं अस हिजड्यावानी लपून छपून काम करू नये ... आर आम्ही मेल्या आईचं दूध प्यालो नाय ...'

हळू हळू प्रत्येकाच्या मुखातून राग बाहेर पडू लागला. धुमसता लाव्हा रस जिव्हेवर आला. समाजद्रोह्याच्या शभर पिढयाचा उद्धार झाला बायाचा स्वर सर्वांत उच चढला

हळूहळू सूर्यप्रकाशात सर्व स्वच्छ दिसू लागल सर्व नुकसान झाल होत. इंदापूरला जाऊन पोलिसात तक्रार नोंदविण्यात आली पण तिथ नेहमीचाच अनुभव आला पोलिसाची दुरुत्तर आणि निष्क्रियता

सताप वाढत होता. भीतियुक्त वातावरण निर्माण झाल. एव्हापर्यंत साऱ्या पचक्रोशीत बातमी पसरली. दलित वस्त्यामधून चर्चा सुरू झाली. काहीस घबराटीच वातावरण निर्माण झाल तरुण वर्ग प्रतिकाराची तयारी करू लागला खोरोचीच वातावरण तंग बनलं. कोणत्याही क्षणी काहीही घडण्याची शक्यता होती. काही वर्षांपूर्वीचे 'बावडा' प्रकरण विस्मरणातून गेले नव्हते. पण त्यावेळी सर्वत्र अधारच होता. सघटन नव्हते. आता गोष्ट वेगळी होती. प्रतिकाराची ताकद निर्माण झाली होती. महाराष्ट्र धावून आला असता काडी ओढायचा अवकाश पेटून जायला वेळ लागणार नव्हता आता बावड्याची पुनरावृत्ती होणार नव्हती.

## एकाच कुटुंबाचे घटक

पुण्यात कार्यकर्ते गेले बुकोईच्या सर्वांना निरोप गेले. काय घडलय आणि त्याचे परिणाम काय घडणार या कल्पनेन सर्वजण गभीर बनले. बुकोईचे प्रकाश रोकडे, सुभाष रोकडे, विजय शिंदे, चिंतामण रोकडे, बहुले, काबळे टेक्सास गायकवाड असे पचवीस-तीसजण जमले. ग्रामीण पोलिस आयुक्त श्री भुजगराव मोहिते याच्याकडे गेले. घडलेली सर्व हकीकत त्याच्या कानावर घातली.

आणि सर्व सूत्रे तत्परतेने हलली. मा. मोहितेसाहेबानी परिस्थितीची पाहणी समक्ष केली. पोलिसाच्या गाड्या खोरोचीत आल्या. क्षणार्धात पोलिसानी सर्वत्र पहारे बसविले. झालेल्या घटनेचा पचनामा केला. वातावरण चिघळू नये म्हणून टेक्सास गायकवाड, प्रकाश रोकडे व इतर कार्यकर्ते दलित वस्तीतून घराघरातून गेले. सर्वांना धीर दिला समजावले. गावचे सरपच पोलिस पाटील सर्वत्र हिंडले. सर्व गाव एकत्र जमा झाला सर्वांच्यापुढे मोहितेसाहेबानी ताकीद दिली टेक्सास – रोकडे बंधूंनी लोकाना सामंजस्याचे आवाहन केले समाजकटकाना कडक शासन करण्याचे आवाहन केले. गावातील प्रतिष्ठित पुढे आले सर्वांनी झाल्या प्रकाराबद्दल सर्वांची क्षमा मागितली आणि असा प्रकार पुन: न घडू देण्याची हमी घेतली. आपल्याच समाजबाधवाना त्रास दिल्याबद्दल गावाला दूषणे दिली आणि झालेल नुकसान भरून द्यायची तयारी दर्शविली.

दलित ग्रामस्थाचे ऊर भरून आले भोसले उठून उभे राहिले, म्हणाले– 'आपण सर्व एकाच कुटुबाचे घटक आहोत. धाकट्या भावाने नुकसान केल तर मोठ्या भावाने रागावून कस चालेल ? आम्ही आजवर खूप भोगलय. आम्हाला आमच्या पायावर उभं रहायचय. आमचे आम्ही स्वावलबनाने उभे रहाणार आहोत. आपणा सर्वांचे साहाय्य असले तरच हे काम होणार आहे. भाडणाने काय साधणार ? नुकसानभरपाईची आम्हाला अपेक्षा नाही. आपले प्रेम हवे आहे. आम्ही हे सर्व पुन: उभ करू ... '

मोहितेसाहेबानी सर्वांना सहकार्याचे आवाहन केले. बुकोईच्या टेक्सास गायकवाड, रोकडे, काबळे याची मार्गदर्शनपर भाषण झाली. एक वणवा शात झाला. सर्वांनी निश्चिततेचे श्वास घेतले.

दोनचार दिवसांत सर्व विटाचे तुकडे एकत्र करण्यात आले आत्तापर्यंतची सर्व शिल्लक, श्रमदान वाया गेल होत तरी पुन. सर्वांनी कमरा कसल्या आणि महिन्याभरात पुन पहिल्यासारख्याच ४०,००० विटा तयार झाल्या आणि बघता बघता वीटभट्टी उभी राहिली. रात्रदिवसाच्या श्रमान सर्वजण थकले होते पैसा केव्हाच संपला होता. मधल्या प्रकारानतर बाहेरच्या मजुरीला जाताना मन कचरत होती. चार-चार दिवस उपास पडू लागले होते तरी प्रत्येकजण काम करीत होता. इकडून-तिकडून पैसा जमवून थोडं-थोडं धान्य आणल जात होतं. पुन. दोन दिवस अर्धपोटी राहून काम करीत होते.

आता भट्टी रचण्यापूर्वी कोळशाच्या खरीची गरज होती. आणि ती विकतच आणावी लागणार होती. त्याला दोन एक हजार रुपये लागणार होते आता सर्वांची शक्तीच सपली होती. सर्वजण थकले होते. बुकोईकडे तरी कुठ पैसा होता ? नोकऱ्या करून काम करणारे सर्वजण आत्तापर्यंत थोडीफार मदत उभी केली होती.

बुकोईच्या कार्यकर्त्यांची बैठक जमली. बुकोईचे केमिकल सल्लागार चिंचवडचे कार्यकर्ते मधुसूदन जोशी आणि तरुण भारतचे निवृत्त पत्रकार गो बा. बुधकर यानी या वेळी सहकार्याचा हात पुढे केला आणि खोरोचीकरानी परतफेडीच्या बोलीवरच ही मदत स्वीकारली.

अनेक अडचणीचे डोंगर पार करून अखेर खोरोचीकराची पहिली वीटभट्टी प्रज्वलित झाली !

मनामनात दीप फुलले... घराघरांत दीपावली आली. एका दूरच्या आडगावात... सहकाराने चमत्कार घडविला

अनादी काळापूर्वीपासून दबलेला अकूर खडकाला फोडून आकाशाकडे झेपावू लागला. चिखलाने भरलेले माखलेले बायाचे हात, चेहरे सुवर्णस्वप्नानी उजळले. सघशक्तीचं दर्शन होऊ लागल. दडपणाच, भयाच मळभ दूर झाल आणि मनामनातील सूर्य स्वयतेजाने चमकू लागले...

अथ्य दीपो भव......

---


# माधवाश्रम प्रा. लि.

राहण्याची उत्तम सोय

१८, पारेख स्ट्रीट, गिरगाव

मुंबई ४०० ००४

फोन : ३५ २७ ६४

३५ २७ ६५

अथ्थ दीपो भव......
अथ्थ दीपो भव......

□

आणि आजूबाजूच्या गावांतील २५० जणांची मिळून नवीन योजना आकाराला येऊ लागली. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी कुक्कुट पालन संस्था मर्यादित' स्थापन झाली. पंचायत समितीच्या सहाय्याने सहा दिवसांचा प्रशिक्षण वर्ग झाला. आजूबाजूच्या गावांतून जत्रेसारखे लोक आले. वीटभट्टी शेजारीच ५० X २० च्या दोन शेडस्‌ची उभारणी सुरू झाली. पाया भरणी झाली. N. C. D. C. च्या सहकार्याने हा प्रकल्प उभा रहातोय.

आणि याच्या आधारानेच इतर अनेक उद्योग आज आकार धरू पहात आहेत. दलितांनी आपले भावकीतले वाद मिटवून आपल्या विकासाचा मार्ग बुकोईच्या माध्यमातून शोधायला सुरुवात केलीय.

यासाठी लक्ष्मणराव भोसले आणि त्यांचे खोरोचीतले बांधव, महिला पुढे येत आहेत. गावातही खेळीमेळीचे वातावरण बनू लागले आहे. अडीअडचणींचा विचार त्यात होऊन कामाची आखणी करू लागले.

□

सायंकाळचे चार वाजायला आले होते. खोरोचीतून जाता जाता त्यांची वादग्रस्त जमीन पाहावी म्हणून आम्ही गेलो. डोंगर उतारावरची खालची जमीन. सर्वत्र कुसळी गवत माजलेलं. अगदी शेजारून छोटा पाण्याचा पाट (कॅनॉल) गेलेला. जमीन बरीचशी समतल. बरीचशी वाहून गेलेली. गावातली कुणाची तरी गुरं चरत होती. विहिरीला पाणी लागण्याची शक्यता होती. पूर्वीची भरपूर पाणी असलेली विहीर बुजून गेली होती. या माळरानाचे नदनवन होऊ शकते. टेक्सास गायकवाड म्हणाले–

'निमगावप्रमाणे (ग्रामायन प्रकल्प) या ठिकाणी काही होऊ शकेल का?... या सर्वांची सहकारी शेती करायची तयारी आहे.'

'अवश्य होईल. एकदा निमगाव म्हाळुंगीला सर्वांना घेऊन या म्हणजे काय होऊ शकते हे प्रत्यक्ष समजेल.' मी म्हणालो.

आम्ही गाडीत बसलो. सर्वांचे निरोप घेऊन आम्ही पुढे निघालो. धुळीचे लोट पुन: भरभरून येऊ लागले. लवकरच काळा गोरा हे



प्रकाशराव रोकडे

सर्व भेद संपून सर्वजणांचा रंग एकच झाला. धुळीने माखलेल्या एकमेकांच्या चेहऱ्याकडे बघत आम्ही हसत होतो.

टेक्सास गायकवाड बरोबर पुन: गप्पा सुरू झाल्या –

९१ साली डॉ. बाबासाहेबांची जन्मशताब्दी येते आहे. त्यावेळी या आर्थिक रचनेचे कार्य करावे असं मनात होतं. तोपर्यंत प्रसार करावा कार्यकर्ते तयार करावेत, प्रबोधन करावे असं मनात होतं. रंगभूमीचं क्षेत्र त्या दृष्टीनं अपुरं वाटू लागलं. सामाजिक समता आणायची असेल तर आर्थिक विषमता दूर होणं आवश्यक आहे. आर्थिक स्वावलंबनाखेरीज दलित समाज खऱ्या अर्थाने समर्थ होऊच शकणार नाही. या निर्णयावर मी आता आलो होतो. परंतु प्रत्यक्ष कृतीद्वारेच काम होऊ शकते. कार्यकर्ते तयार होऊ शकतात. म्हणून प्रत्यक्ष काही करायचं ठरवले. ९१ सालापर्यंत बरंच काही होऊ शकेल असं वाटलं.

दलित रंगभूमी प्रबोधनाचे कार्य करते. ते महत्त्वाचेच आहे. मनोरंजन हे दलित रंगभूमीचे उद्दिष्ट कधीच नव्हते. परंतु शंभर ऐकणारे कामाला लागतीलच असे नाही. रंगभूमीच्या काही मर्यादा आहेत. प्रत्यक्ष कृतीला प्राधान्य देणारी चळवळ असावी म्हणून विचार करू लागलो. महाराष्ट्रात खेड्यापाड्यांत रंगभूमीच्या कार्यकर्त्यांनी उपाशी राहून विनामोबदला कार्य-विचार पोहोचवले होते. राजकारणापासून अलिप्त राहून सांस्कृतिक चळवळीवर भर दिला. सर्वच राजकीय पक्षांच्या लोकांशी सलोख्याचे संबंध निर्माण झाले. राजकारणविरहित चळवळ उभी करायची ठरले. त्याचा फायदा सर्वांशी समान मैत्री होण्यात झाला. त्यामुळे वेगवेगळ्या गटांत विभागला गेलेला समाज एका चळवळीत येऊ शकत होता. हे बंधन सुरुवातीपासून पाळले.

महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांना पत्रे गेली.

७ मार्च रोजी (८६) पुण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सगळे एकत्र जमले. सर्वश्री. डॉ. बी. पी. साबळे, श्री. भालशंकर, मधू गायकवाड, अविचल धिवार, विलास कांबळे सुधाकर वाघमारे, दादासाहेब काकडे, जे. टी. रोकडे, जयंत जावळे, बहुले, अविनाश आंबेडकर, प्रकाश खुडे, या मुंबई, पुणे, सोलापूरच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मी माझे विचार मांडले. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची आठवण करून दिली. सर्वच जणांना ही कल्पना पसंत पडली. सर्वांनी उचलून धरली. डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यासमोर सर्वांनी या कार्याला वाहून घ्यायची प्रतिज्ञा घेतली. आणि बुकोईची 'बुधिस्ट कोऑपरेटिव्ह मुव्हमेंट ऑफ इंडिया' ची स्थापना झाली.

त्याच बैठकीत २११ रु. चे शेअर्स जमा करायचे ठरलं. आणि १४ एप्रिलपर्यंत २५००० रुपये जमा झाले. सर्वजण कामाला लागले.

पुण्याजवळ देहूजवळच्या चिखली गावी जागा खरेदी करायचे ठरवले. पहिले उत्पादन 'डिटर्जंट पावडर' चे करायचे आणि १४ एप्रिलला सर्व महाराष्ट्रभर त्याचे वितरण करायचे ठरले. सर्व जण एका नव्या विचाराने भारले. अविचल धिवार आणि सुधाकर वाघमारे यांनी ही जबाबदारी स्वीकारली. युद्धपातळीवर सर्वजण कामाला लागले, १४ एप्रिलला 'दिशा वॉशिंग पावडर' हे बुकोई उत्पादन येणार...

□

## चिखली

पिंपरी-चिंचवड महानगरीच्या लगतचे गाव. दलित चळवळीत नेहमीच अग्रणी राहिलेले गाव. धम्मपरिवर्तनापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला पहिला बुद्धविहार येथून जवळच देहूरोडला आहे.


त्यावेळी याच चिखलीचे बुद्धवासी एल. एम. रोकडे यांनी पुढाकार घेतला होता. फारफार वर्षापूर्वी या परिसरातील डोंगर दऱ्यातील, वनातील गुंफांमधून विहारांमधून कार्ल्याच्या, भाज्याच्या, गुंफांमधून, बुद्धानुयायांनी धम्म-घोषांनी दिशा दुमदुमवून सोडल्या होत्या. भगव्या वस्त्रातील बौद्ध यतींनी धम्म जागरण केले होते.

बुद्धं सरणं गच्छामि<br>
धम्मं सरणं गच्छामि<br>
संघं सरणं गच्छामि

हा संदेश दशदिशांना पोहोचवला होता. त्याच ऐतिहासिक पावन भूमीत सहकाराचा नारा देत बुकोईची मुहूर्तमेढ रोवली गेली.

हा एक शुभ योगायोगच होता.

श्री. राजाराम रोकडे यांनी अल्प दरात आपली जमीन बुकोईला दिली. त्यात बुद्धवासी चिंतामणी रोकडे यांचाही हिस्सा होता. त्यांना कल्पना न दिल्याने गैरसमजामुळे कार्याच्या सुरुवातीसच विरोधाचे विघ्न उपस्थित झाले. भूमिपूजनाच्या कामात अडथळा उभा राहिला. सर्व कार्यक्रम उधळला गेला. समारंभ भूमीला रणभूमीचे स्वरूप आले. उद्घाटक मंडळी निराश झाली. (प्रा. रतनलाल सोनग्रा आदी) चिंतामणी रोकडे यांना शांत करून त्यांना बुकोईची, त्या मागच्या सामाजिकतेची कल्पना दिल्यावर त्यांचा विरोध संपला. उलट त्यांनी आपली जमीन विनामूल्य देऊ केली. आणि वातावरण शांत झालं. परंतु या सर्व तणावामुळे चिंतामणी रोकडे यांच्यावर ताण पडला आणि त्याच रात्री हृदय-विकाराने त्यांचे देहावसान झाले. आणि पुनः वाद उफाळला. भावकीतल्या वादाने उग्र स्वरूप धारण केलं. अखेर टेक्सास गायकवाड चिखलीतल्या प्रकाश रोकडे या जिल्हापरिषदेत काम करणाऱ्या तरुण कार्य-कर्त्याकडे गेले. त्यांना सर्व कल्पना दिली आणि प्रकाश रोकडे रजा टाकून त्यांच्याबरो-बर चिखलीत आले. सुभाष रोकडे–ग्रामपंचा-यत सदस्य यांना घेऊन तिघेजण घरोघर गेले. जुन्या–नव्या सर्वांना त्यांनी समजावून एकत्रित बैठक घेतली. आणि हळूहळू वाताव-रण निवळले. प्रकाश रोकडे हे पूर्वीपासूनच चिखलीत सामाजिक काम करीत असत. समाज विकास संस्था स्थापून त्याद्वारे गणेशो-



सुभाष राव रोकडे

त्सव, आंबेडकर जयंती, व्यायामशाळा बाल-वाडी असे कार्यक्रम करीत असत. गावात एकी नांदण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले होते. साबण कारखान्याच्या उभारणीस अखेर सुरुवात झाली, अक्षरशः रात्रंदिवस काम करून २० × ४० ची मोठी शेड उभी राहिली. सर्व साहित्य आले, कच्चा माल आला. माल तयार करून पिशव्यांतून भरून पाठवायचा होता. मिश्रणाचा अनुभव नाही. पिशवीसाठी किती जाडीचा पॉलिथीनचा कागद वापरायचा हे माहीत नाही. सर्वजण उत्साहाने पिशवी काम करीत होते. तहानभूक विसरून चिखलीकरांनी या तरुणांना संपूर्ण सहकार्य केले.

आणि दि. १३ एप्रिल ८५च्या रात्री 'दिशा वॉशिंग पावडर'च्या ७००० पिशव्या तयार झाल्या! ट्रक, टेम्पोने त्या सर्व महाराष्ट्रातील प्रमुख ठिकाणी रवाना झाल्या. १४ एप्रिलच्या जयंतीच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी वितरणाची भांडारे उघडली गेली. ६ रु. पासून १० रु. पर्यंतच्या छोट्या पॅकमधून माल ठेवण्यात आला. प्रवरानगर, सोलापूर, नागपूर, मुंबई, पुणे, पिंपरी या ठिकाणी प्रमुख कार्यकर्ते गेले. शांताराम दिवे, तायडे, धिवार, बहुले, अविनाश आंबेडकर, प्रकाश खुडे, रोकडे, प्रकाश, सुभाष, सी. जे. रोकडे असे सर्वजण कामाला लागले होते. समारंभपूर्वक विक्री व्यवस्था करण्यात आली. माल सर्व ठिकाणी वेळेवर पोहोचला. दलित रंगभूमीचे कार्य-कर्तेही मदत करीत होते.

पण केवळ इच्छाशक्ती या कामी उपयोगी पडत नाही. व्यवहाराचे गणित जमावे लागते. बेरीज–गुणाकाराचे ठोकताळे चुकले. पावडरच्या पिशव्या कमी प्रतीच्या जाडीच्या वापरल्यामुळे बराचसा माल वाहतुकीतच फुटला. वितरणाच्या जागेवर बऱ्याच पिशव्या फुटल्या. प्रसिद्धीकडे दुर्लक्ष झाले. त्यामागील विचार लोकांपर्यंत पोहोचला नाही. जयंतीच्या कार्यक्रमाला लोटलेला जनसागर काय खरेदी करण्याच्या मनःस्थितीत असतो याचे गणित चुकलं आणि एका भव्य योजनेला ग्रहण लागलं. कार्यकर्त्यांना मनस्ताप झाला. अनेक ठिकाणचे पैसे वसुली वाचून रखडले–बुडाले. अनेक ठिकाणचा माल परत आला. लोकांच्या भावनांपर्यंत जाण्यात कमी पडल्यामुळे मोठे नुकसान झाले. प्रवरानगरचे पैसे मात्र सर्व आले.

प्रथमदर्शनीच कार्यकर्त्यांना धक्का बसला. सर्वच कार्यकर्ते हा धक्का सहन करू शकती-लच असे नाही. काहींच्या मनात आता याचं तंत्र आपल्याला समजलंय, आपण स्वतंत्र व्यवसाय करू, असा स्वार्थी विचार आला. आणि एका संध्याकाळी अविचल धिवार, सुधाकर वाघमारे सारखे कार्यकर्ते अर्ध्यातूनच उठून सर्व सोडून निघून गेले. चळवळ, बाबासाहेबांचे विचार, शपथा... सर्व विसरून सर्वजण गेले.

उरलेल्या सर्वांना एकत्र करून पुनः पुनर्रचना करून कामाला सुरुवात केली. साबण कारखान्याची जबाबदारी सुभाष रोकडे यांच्यावर आली.

बुकोईच्या सुरुवातीच्या काळातच हा आघात झाला तरी प्रकाश रोकडे, सुभाष रोकडे, गायकवाड या मंडळींनी नव्या उमेदीने कामाला सुरुवात केली. इंदापूर, हवेली, खेड, माळशिरस, पाटण या तालुक्यांतून ही चळवळ पोहोचली.

□

आता सायंकाळ झाली होती. टण्णू गाव जवळ आले होते. आम्ही सर्वजण खाली उतरलो. धुळीनं पूर्ण माखून गेलो होतो. साय-काळच्या सोनेरी केशरी किरणांच्या सौम्य प्रकाशात पाया खोदाईचे काम चालू होते. टण्णू गावातील जगताप मंडळी आपल्या भावी जीवनाची पाया उभारणी करीत होती. इतरत्र शेतात गवंड्यांच्या हाताखाली काम करून

चार-साडेचारला रोज या प्रकारे काम करून ते श्रमदानाने बांधकाम करतात.

बुकोईशी आपला सबध कसा आला हे सांगताना विठ्ठल भिमराव जगताप म्हणाले— मागच्या वर्षीच्या दुष्काळात खोरोचीचे, लक्ष्मणराव भोमले आपल्या गाईला घेऊन इथे जगायला आले होते एका शेतकऱ्याकडे. त्यावेळी सहज गप्पा मारता मारता माहिती मिळाली.

आजवर दलित चळवळी लई झाल्या. पर आमच्यासारख्या गरामिण भागातल्या समाजातल्याचा कायवी 'फायदा नाय झाला. या भागात एकच पक्ष. कांग्रेस. शेतकरी-मराठा बागाईत-मजुरी हाच मुख्य उद्योग. तरी बारीक सारीक दडपणाचे प्रसग असायचे

दलित पँथरच काम या भागात आहे. तिचा लोकाना आधारबी वाटतो पर आजवर पोटापाण्याचा प्रश्न कुणीबी कधीच हाती घेतला नाय. नोकऱ्या लावायला सुद्धा कार्य-कर्ते पैसे घ्यायचे. बाबासाहेबाच्या नावाला हे असे भ्रष्टाचारी लोक काळिमा फासतात. अशाच एका कार्यकर्त्याने गरिबाना पाचपन्नास हजाराना लुबाडलय आमच्या गावातील दोघाना एका अशाच कार्यकर्त्याने सैन्यात भरती होण्याकरता पैसे घेऊन फसवलय याच तालुक्यातला पुण्यात नोकरी करणारा कार्य-कर्ता आहे अशामुळे चळवळी बदनाम होतात बुकोईच्यामुळे आता आमचा उद्योग आम्हाला मिळणार आहे त्याच्या रजिस्ट्रेशनपासून सर्व कामे आम्हीच करतो. यापूर्वी पँथरन शजा-रच्या गागरगावच्या रस्त्याच्या प्रकरणी आदो-लन उभ केलं होत. गावकऱ्यांनी दलिताचा रस्ता अडवला होता. आम्ही गेलो होतो तहसीलदाराना घेराव घातला—मोर्चा नेला होता १५ दिवसाची शिक्षा झाली त्या आदोलनात येरवड्याला होतो आम्ही. या व्यतिरिक्त पँथरच्या अनेक आदोलनात आम्ही भाग घेतला. गावात जयती—पुण्यतिथी कार्य-क्रमातून सर्वजण एकत्रित येत असू. नरसिंग-पूर हे इथल मोठ गाव. तिथच माझं शिक्षण झालं इथल्या एका पाणीपुरवठा सस्थेत लिपटमन म्हणून मी काम करतो.'

'आता तुम्ही हे कसल बाधकाम करता आहात ... ?'

इथ आम्ही पशुखाद्य निर्मितीचा कारखाना उभारणार आहोत या भागात जर्सी गाईंचं प्रमाण जास्त आहे माळशिरस, इंदापूर, माढा या तिन्ही तालुक्यांत हे पशुखाद्य खपू शकेल' आमच्या गावातून २०० लिटर दूध जातं आम्ही सर्वांनी मिळून इथ पशुखाद्य निर्मिती करायचं ठरवलय. कुक्कुट पालनाच खाद्य पण यात निर्माण करणार आहोत. यासाठी 'भिमराव सहकारी पशुखाद्य निर्मिती सस्था. याच रजिस्ट्रेशन झालं असून मातग आणि आणि आम्ही असे सभासद आहोत. दलितानाच आम्ही यात काम देणार आहोत. खरी गरज-त्यानाच आहे या साठी जागा आम्ही देणगी दिली असून माझे वडील कोतवाल आहेत त्याच्या प्रयत्नाने दहा वर्षांपूर्वी वीस एकर जमीन आम्हाला मिळाली. एकाकडेच बैलजोडी साहित्य आहे आम्ही एकमेकाला कामात मदत करून शेती करतो. त्यामुळे आमचा हा प्रकल्प यशस्वी होईल. यशवत श्रावण, गोपाल विश्वनाथ, मारुती शकर, महादेव जयवत, रावसा भिमराव, सहदेव रगनाथ, गोपिनाथ, भारत भिमराव, असे यातले प्रमुख काम करणारे आहेत. आम्हीच सर्वजण बाधकाम करणार आहोत बँकेकडून उभारणी करणार आहोत खोरोचीहून वीट विकत आणणार आहोत.

## धार्मिक वृत्तीचे गाव

'गावातल्या लोकाचा सहभाग कशा प्रकारे आहे ?' या प्रश्नावर विठ्ठलराव म्हणाले. —

'गावात विरोध झाला पँथरच्या लोकानी विरोध केला. त्याच म्हणण बुकोई काही करणार नाही पण आमची श्रद्धा आहे. कारण आजवर कोणी काय केलय ? ज्याना काही करायच नसत तेच अस बोलतात. गेल्या वर्षी वृक्षारोपण कार्यक्रमास त्यानी विरोध केला परतु गावकरी आमच्या बाजू-चेच आहेत गावात एकच पाणवठा आहे गावात पूर्वीपासूनच दारूबदी आहे. गाव धार्मिक वृत्तीच असून आता सर्व समारभात आम्हाला स्थान आहे गावचे सरपच व्यकट-राव मोहिते याच्या प्रयत्नाने एकी नादत आहे आजवर आलेल्या अनुभवापेक्षा बुको-ईचा अनुभव वेगळा आहे आता आमच आदोलन आमच्यातील दुष्ट प्रवृत्तीविरुद्ध आहे गावात 'सहकारमहर्षी, शकरराव मोहिते पाटील ट्रस्ट' आहे त्याचा शेतीविकासाचा कार्यक्रम आहे. प्रतापसिह मोहिते पाटील यांनी आम्हाला सपूर्ण सहकार्य देऊ केले आहे. आम्हाला विश्वास वाटतो की बुकोईच्या माध्यमातून आम्ही आमचा विकास निश्चि-तच करू.'

हळूहळू दिशा अधारून आल्या. गर्द होत जाणाऱ्या अधारात त्या माळरानावर फुलणारे एक तेजस्वी स्वप्न सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होते. जेवणाचा आग्रह मोडून आम्ही भिगवणकडे परतू लागलो.

□

रात्रीच्या अधारातच भिगवण जवळ आले. पुणे सोलापूर रस्त्यावरचे एक महत्त्वाचे गाव. महत्त्वाची बाजारपेठ, हरिजनाची मोठी वस्ती. शेलार आणि काबळे आडनावाची मडळी. इथं साक्षरतेचं प्रमाण चागल आहे. सरकारी नोकरी करणारी मडळी अधिक काहीचे छोटे छोटे व्यवसाय, तरीही २५-३० तरुण बेकार आहेत वेगवेगळ्या आदोलनातून भाग घेतलेले, शिवसेनेत काम करणारे, इतर सर्वच राजकीय पक्षाशी सबध. इदापूरच्या शिंदेमुळे बुकोईशी संबंध झाला अशोक भोसले याचे वडील श्री. साहेबराव भोसले हे साठीचे गृहस्थ बुकोईचे मुख्य आधारस्तभ. पूर्वी वन-पाल होते आता निवृत्त, याचे मूळगाव डाळज. वडील घरच्या गरिबीमुळे मुबईत आले. अनेक नोकऱ्या करून ऑर्डनन्स फॅक्ट-रीत वॉचमन म्हणून लागले. ते धार्मिक वृत्तीचे होते. त्याना कोणतेच व्यसन नव्हते

चळवळीशी आपला संबध कसा आला हे सागताना साहेबराव म्हणाले —

'मी सरकारी नोकरीमुळे कोणत्याच चळ-वळीत यापूर्वी भाग घेतलेला नाही लहान-पणी वडिलाच्या बरोबर डॉ. बाबासाहेबाच्या बैठकीला जात असे बाबासाहेब बोलायचे पण ते काही समजायचे नाही पण माझे वडील मला जवळ घेऊन बसायचे. कधी कधी त्याच्या डोळचात पाणी यायच. माझ्या डोक्यावरून ते हात फिरवायचे. त्यावरून बाबासाहेब काहीतरी महत्त्वाचे बोलत आहेत अस वाटायच. मी सातवी पास झालो आणि फॉरेस्ट खात्यात नोकरीला लागलो. वडि-लाच्या धार्मिक सस्कारामुळे मी व्यसनापासून दूर राहिलो. नोकरीच्या काळात कोणत्याही चळवळीत भाग घेता आला नाही आणि

माझ्या तारुण्याच्या काळात दलित चळवळ भरकटलेलीच होती. बाबासाहेबांनंतर चळवळीतील प्राण गेला. ती निर्नायकी झाली. नेते वाढले. मोठे झाले. सामान्य सामान्यच राहिले. खुर्चीच्या राजकारणातच त्यांच्या कार्यकर्त्यांचा वेळ जाऊ लागला. एकजिनसीपणा गेला. नेत्यांच्या नावाने पक्ष ओळखले जाऊ लागले.

'संपूर्ण महाराष्ट्रभर इतर संस्थांचे जाळे विणले जात असताना आमच्या संस्था आपली प्रगती करू शकल्या नाहीत. बाबासाहेबांच्या अष्टावधानी गुणांपैकी कोणताच गुण आजच्या नेत्यांत नाही. अशा परिस्थितीत इच्छा असूनही मी कशातच रस घेतला नाही.'

'बुकोईशी कशामुळे संबंध आला? त्यात भाग घ्यावासा का वाटला?'

यावर भोसले म्हणाले– 'आमच्या समाजाच्या – बौद्ध समाजाच्या आर्थिक विकासाचा विचार बुकोईने प्रथमच मांडला. यापूर्वी चळवळीचा विचार या प्रकारे कुणी केला नाही. दुसऱ्यापुढे हात पसरणं आम्हाला चांगलं जमत असे. नोकऱ्यांसाठी, जागांसाठी राजकारणात सर्वत्र हात पसरलेले असत. आणि त्यातून एकात्मता येण्याऐवजी गैरसमजच वाढत गेले. एकीकडे आंदोलनं करायची, दुसरीकडे खुर्चीवर नजर ठेवून तडजोडी स्वीकारायच्या. त्यामुळे समाज थोडाही पुढं गेला नाही. डॉ. बाबासाहेबांनी आर्थिक विचार मांडला. त्याचा कुणी अभ्यास केला नाही. बुकोई आंबेडकरी विचारच मांडत आहे.'

'या मध्ये पुढे राजकारण येणारच. पैसा आणि सत्ता सहकारातून निर्माण होते. त्याच्याशी मुकाबला कसा करणार?' या माझ्या प्रश्नावर ते हसून म्हणाले–

'आम्ही सध्याच्या राजकारणाच्या पूर्ण विरोधी आहोत. ज्यांना हे करायचं आहे ते त्यांनी करावं. बुकोई राजकारण करणार नाही. राजकारणाने आजवर आमचे तुकडे झाले. जे नुकसान झालंय ते कधीही भरून येणार नाही. एकच पक्ष झाला तरच उपयोग. अनेक तुकड्यांचा आम्हाला काय उपयोग? आम्ही सहकाराला वाहून घेतलंय. उद्योगधंदे, शेती सहकारी पद्धतीनं करून आर्थिक संपन्नता आणायची आहे. तरुण बेकार राहिल्यामुळे वाईट मार्गाला जात. त्यांना काम द्यायचंय. मागासवर्गीयांनी आता स्वतःचा धंदा उभारूनच स्वतःचा विकास करायचा आहे.'

'आर्थिक उन्नती झाल्यावर राजकारणात पडणार का?' या प्रश्नावर ते ठामपणे म्हणाले –

'असं आहे. हजारो वर्षांच्या गुलामीमुळे आमच्यात अनेक दोष निर्माण झालेत. अंधश्रद्धा, अशिक्षितपणा, भावकीतली भांडणं, दारिद्र्य हे सर्व जायला खूप काळ लागणार आहे. बाबासाहेबांच्या अनेक विचारांचा अभ्यास अद्याप झालेला नाही. सहकारामुळे संघटन होईल. आर्थिक विकास होईल. शैक्षणिक विकास साधता येईल. सध्याच्या कायद्यातच इतकी सोय आहे की त्याचा पुरेपूर लाभ अद्याप आम्ही घेऊ शकत नाही. चांगले स्वयंभू राजकारण करायला आमचा विरोध नाही. राजकीय पक्षांची शाश्वती देता येत नाही. आम्हाला सामाजिक काम करायचे आहे.'

'हे काम चालू असताना काही महत्त्वाच्या विषयावर आंदोलनं उभी राहिली तर आपण काय कराल?'

'आंदोलने कितीही मोठी असोत, बाह्य कोणतेही कारण असो, आम्ही त्यात भाग घेणार नाही. आमचा वैचारिक पाठिंबा असेल, योग्य आंदोलनासच. आम्ही एक प्रकारच्या आंदोलनातच भाग घेतला आहे. हे तोडायचं नाही जोडायचं आंदोलन आहे.'

'या ठिकाणी आपण कोणता प्रकल्प उभारता आहात?' या प्रश्नावर साहेबराव म्हणाले–

'भिगवणला ७६ सभासदांची मिळून 'बुकोई प्लॅस्टिक को ऑपरेटिव्ह इंडस्ट्री मर्यादित' ही पॉलिथिनच्या पिशव्या बनविण्यासाठी सहकारी संस्था रजिस्टर केली आहे. ८०००/१०,००० रु. चे शेअर्स बँकेत जमा आहेत. ४ गुंठे जमीन मी देणगी दिली आहे. (बँकेत प्रपोजल दिले आहे.) यामध्ये सुरुवातीस २४ कामगार काम करू शकतील. बापू ज्ञानदेव कांबळे, दादाराम शेलार (ग्रामपंचायत सदस्य) हे त्यासाठी सतत झटत असतात.'

साहेबराव भोसले योजना समजावून सांगत होते. इमारत उभी रहात होती. भिगवणसारख्या ठिकाणी सातवी शिकलेले, वयाची साठी उलटल्यावरही न थकता काम करणारे


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

साहेबराव म्हणजे या चळवळीचं एक भूषणच आहेत.


□

पाटण ते कोयना मार्गावरचं निसर्गरम्य ठिकाण.

**गोजेगाव ...**

जवळच संपूर्ण महाराष्ट्र उजळवून टाकणारे प्रचंड कोयना धरण आहे. सह्याद्रीच्या कडे-कपारीचा परिसर. पावसाळ्यात झुळझुळ वहाणारे झरे. हिरवीगार झाडी. हळूहळू उघडे बोडके बनत चाललेले डोंगर. या भागातील खेड्या-पाड्यांतील किमान घरटी एकतरी व्यक्ती बाहेरगावी नोकरीसाठी आहे. पुण्या-मुंबईला. यात्रेला– आंबेडकर जयंतीला गावी यायचं हा रिवाज. अशाच पुण्याच्या एका कार्यक्रमाला पाटणच्या कार्यकर्त्यांच्या भेटी झाल्या. आपल्याकडेही असा कार्यक्रम करावा या आग्रहाने एकदा टेक्सास गायकवाड, प्रकाश आणि सुभाष रोकडे, एन. एस. मगदे, पी. एस शीलवंत पाटणला गेले. निसरे गावी बैठक झाली. तिथे पोलिसपाटील आणि सवाखंडे गुरुजी यांनी बुकोईची कल्पना उचलून धरली. सहकाराची गंगा पाटण तालुक्यात गावोगावी न्यायची, पाटणच्या मागासवर्गीयांचा विकास करायचा ठरले.

गावोगावी, वस्तीवस्तीला बैठका होऊ लागल्या. बुकोईची कल्पना सांगितली जाऊ लागली. सवाखंडे गुरुजी, वीर, मगदे, अशोक देवकांत, भोये, शीलवंत यांनी सारा पाटण तालुका पिंजून काढला. १०० एक गावी बैठका झाल्या. गीतगायनातून बुकोईचे विचार लोकांपर्यंत जाऊ लागले. यावर्षीच्या जयंतीच्या कार्यक्रमांना एक नवीनच रंगत आली. नेहमीच्या एकसुरी भाषणाऐवजी नवे विचार, नव्या दिशा मिळाल्या. तरुण मंडळा-मधून उत्साह संचारला. वऱ्हाडातल्या अंबे जवळगे गावचे श्री. हनुमंत साबळे हे पाटणला नोकरीला होते. त्यांनी यामध्ये पुढाकार घेतला. गावोगावी सगळ्यांबरोबर ते गेले. कधीही कोणत्याच चळवळीत भाग न घेणाऱ्यांनी यात भाग घेतला. सध्याच्या बजबजपुरीला कंटा-ळलेल्या वयोवृद्ध मंडळींनीसुद्धा निराशा झटकून बैठकांतून भाग घेतला. निवडणुका नसताना अशा प्रकारच्या सभा या भागात



शांताराम आप्पाजी दिवे

प्रथमच झाल्या. कोणताही राजकीय पक्षाचा पुढारी इतक्या कडेकपारीतल्या गावी गेला नव्हता. सारा तालुका ढवळून निघाला. इतर राजकारणातील मंडळीत खळबळ माजली. काहींनी विघ्न आणायचा प्रयत्न केला. पण नव्या विचारानं भारलेल्या तरुणांनी राज-कारणी लोकांचं राजकारण बाजूला सारलं. शेअर्स गोळा करायला सुरुवात झाली. रात्रं-दिवसाच्या परिश्रमाने ५०० जणांचे शेअर्स ३५०००। – रु. चे जमा झाले. गोजेगावच्या श्री. माने यांनी ५ एकर जमीन देणगी देऊन या कार्यक्रमास मोठाच हातभार लावला आणि कामाचा चांगला शुभारंभ झाला.

'बुकोई इलेक्ट्रानिक सहकारी संस्था मर्या-दित (रजि.)' पाटण हा हिंदुस्थानातला पहिला सहकारी तत्त्वावरच इलेक्ट्रॉनिक्स उद्योग उभा राहू लागला. पाटण सारख्या कडेकपारीच्या मागास भागात मागास-वर्गीयांनी विकासासाठी कटिबद्ध व्हायचे वचन घेतले.

पुण्यातून 'मिटकॉन'च्या श्री. रानडे यांनी पूर्ण सहकार्य दिले. इतर अधिकाऱ्यांनी सहकार्य केले. पाटणला सहा दिवसांचे एक प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. सर्वत्र उत्साह संचारला. संपूर्ण तालुका ढवळून निघाला. शंभर जणांनी यात भाग घेतला. शेअर्स जमा करण्याचे काम अद्याप चालू आहे. काही महिन्यांत कारखान्याच्या उभारणीस व उत्पादनास सुरुवात होईल. भविष्यात इलेक्ट्रॉनिक्सच्या शालेय साधनांना भरपूर मागणी असल्याने बुकोईच्या या उद्योगास यशाची खात्री आहे. याच धर्तीवर त्याच परिसरात बुकोई औद्योगिक संकुलाची कल्पना आहे. या कारखान्याची इतर उत्पादने गावो-गावी महिला मंडळांच्या द्वारा बनविण्याची कल्पना असून त्याद्वारे अनेक महिलांना घर-बसल्या उद्योग मिळणार आहे.

□

पिंपरी–चिंचवड औद्योगिक परिसर. महा-राष्ट्राची आणि हिंदुस्थानची शान असणारे अनेक उद्योग या परिसरात आहेत. कलकत्ता, मुंबई पाठोपाठ झोपडपट्ट्यांचे शहर म्हणूनही ज्याचा उल्लेख करावा अशी ही वाढणारी महानगरी. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कामधंद्यासाठी सतत येणारे माणसांचे लोंढे, रोज नव्या वस्त्या, नव्या झोपडपट्ट्या येथे उभारल्या जात असतात. यातील राहणारे रहिवासी बहुसंख्य मागासवर्गीय असतात. हे छोट्या मोठ्या जमिनीचे मालक असतात. वर्षानुवर्षं हमाली–मजुरी–रोजंदारीवर काम करून आशेने जगत असतात. दहा बाय दहाच्या झोपड्यांमधून दोन, चार–चार कुटुंबं राहत असतात. बाहेर काम करून अनेकजण झोपड-पट्टीच्या परिसरात भजी, पावभाजी, अंडी, मासळी, लाकडाचे, चिंध्या-कागदाचे, प्लॅस्टिक भंगार मालाचे उद्योग करत असतात. याच्या जोडीला उघडी वाहणारी तुडुंब भरलेली गटारं आणि दारू पिऊन गोंधळ करणारी मंडळी हे सर्व ठिकाणचं दृश्य इथेही आहेच. अशा या परिस्थितीत आयुष्य कंठणारी माणसं आपल्या गावाशी अतूट धाग्याने संबंध जोडून असतात. त्यांच्यात विकासाची, सहकार्याची कल्पना बुकोईनं रुजविण्यास सुरुवात केली. गावोगावाहून शहराकडे येणारे माणसांचे लोंढे आपआपल्या गावीच त्यांना उद्योगधंदे मिळाले तर थांबतील. या कल्पनेनं बुकोई शहरातून खेड्याकडे अशा कल्पनेनं काम करू लागली.

दिशा वॉशिंग पावडरचे काम पहात अस-तानाच आपापल्या गावी बुकोईच्या कामाची आखणी करू लागले. पिंपरी–चिंचवड वाहन व्यवहार खात्यात काम करणारे श्री. शांताराम दिवे हे एक तरुण कार्यकर्ते. दलित रंगभूमी आणि नंतर बुकोईचे कार्य करू लागले. कोणत्याही प्रकारची आर्थिक प्राप्तीची अपेक्षा न करता उरलेला वेळ बुकोईला देणारे,

'दिशाचे' पुडे इकडून तिकडे पोहचविण्या-पासून सर्व काम मनापासून करणारे शाताराम दिवे. मावळ भागात आपल्या जन्मगावी काम करू लागले. तळेगाव दाभाडे येथे विठ्ठल काळेबाग, जगताप गुरुजी, एम. डी थोरात, खरात, सिद्धार्थ घोडके, रमेश कडलक या कार्यकत्यींच्या सहकार्याने कामाला सुरुवात झाली 'बुकोई को-ऑपरेटिव्ह इजिनियरिंग वर्क्स मर्यादित' या सस्थेची स्थापना झाली. १५० सभासदाचे १०,००० शेअर्स रूपाने जमा झाले.मोक्याच्या जागीआखणी करून लवकरच त्याठिकाणी कामाची सुरुवात होत आहे कुक्कुटपालनाचे पिंजरे बनवून त्याची विक्री याशिवाय पिपरीच्या किशोर पप्स या उद्योगाचे श्री. भाईसाहेब देसाई यांनी या उद्योगाला आपल्या कारखान्याची मोठी ऑर्डर दिली असल्याने त्याला सुरुवातीस स्थैर्य प्राप्त होण्यास मदत होणार आहे. याच परिसरात कामशेत येथे 'बुकोई सहकारी चिक्की भडार' या सहकारी ग्राहक भाडाराची उभारणी चालू आहे. श्री. अशोक साळवे, आणि श्री. रमेश कडलक यानी त्या भागातील सत्तर एक कुटुबाची ही सस्था उभारली आहे

बुकोईचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. देवराम भवर गुरुजी हे बुकोईच्या सर्व कार्यकर्त्यां-मध्ये सामजस्य निर्माण करीत असतात. लोकाच्या मनाची तयारी करून चळवळीत त्याना सामील करून घेणे, सहकारावरील त्याची निष्ठा वाढविणे याकडे त्याचे अधिक लक्ष असते. बुकोईसबधी बोलताना श्री देवराम भंवर गुरुजी म्हणाले,


'या चळवळीत कोणतेही राजकारण नाही. लोकाच्या आर्थिक विकासाचे हे कार्य आहे सहकाराने स्वत बरोबरच समाजाची प्रगती करायची. इतरत्र सहकारी चळवळ बदनाम झाली आहे. पण इथ तस होणार नाही. कारण या ठिकाणी आम्ही काही वैचारिक भूमिका घेऊन चाललो आहोत आबेडकरवाद ही आमची वैचारिक शिदोरी आहे.'

'आबेडकरी चळवळ सध्याची आणि बुकोई यात काय फरक आहे ? कारण आबेडकरी चळवळीतील प्रत्येक गट आबेडकरवादच माडत असतो. बुकोई अस वेगळं काय सागते?' या प्रश्नावर भवर गुरुजी म्हणाले, 'आजची आबेडकरी चळवळ ही राजकारणाच्या अगानेच चालणारी आहे. आबेडकरानी समाजाच्या सर्वांगाचा विचार केला पण सध्या त्यापैकी फक्त राजकारणाचाच विचार केला जातो. त्यातही नेतृत्वासाठी भाडाभाडी. बुकोई पायाभूत आर्थिक विकासावर भर देणारी चळवळ आहे. सामान्य माणसाच्या दु:खाशी भिडणारी, माणसाचा कायापालट करणारी, माणसाला स्वावलबी बनविणारी ही चळवळ आहे.'

### करता करता शिकायचे

आजच्या आबेडकरी चळवळीच्या फाटा-फुटीचे कारण सागताना भवर गुरुजी म्हणाले, 'गेली २५ वर्षे मी शिक्षणाचे काम करीत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष चळवळीत जरी भाग घेतला नसला तरी घडणाऱ्या सर्व घटनाकडे स्वतत्रपणे पहात आलो आहे. त्यावर विचार


With Best Compliments From



**M/s. J. D. PANSE**

**Decorators & Painters**

1152 Sadashiv Peth, Pune 411 030
Phone : Office – 444365

With Best Compliments From :

**THA. Dungarshi Liladhar**


**THA. Lavji Liladhar**

Gadipat, Tepestry and Grey, Cloth Merchant

Mangaldas Mkt, 5th Lane, Shop No. 43, A/44,
Bombay 400 002

Phone : 25 45 34

करीत आलो आहे. चळवळीत नसूनही चळवळीच्या जवळ होतो. दलित चळवळ ही मीपणातून, अहंकारातून फुटली. नेतृत्वासाठी भांडणे झाली. तात्त्विक वादाशी काही संबंध नाही. बुकोईची आत्ताशी कुठं सुरुवात आहे. त्यामुळे इतक्यातच सर्व बाबींबाबत बोलता येणार नाही. आत्तापर्यंत हे कोणी केलं नाही. यातल्या अडचणी आम्हाला नवीन आहेत. या सहकार चळवळीत शिस्तीला आणि वेळेला फार महत्त्व आहे. त्याचा अभाव आमच्यात आहे. आम्हाला कोणताही निर्णय चटकन् हवा असतो नाहीतर आम्ही तापतो, संतापतो. संयमाने घ्यायला शिकायला हवं. भ्रष्टाचार हा फक्त आमच्यापुरताच मर्यादित रोग नसून तो आता सर्व पातळीवर झाला आहे. अडवणूक केवळ दलितांचीच होत नसून सर्वांचीच होते. त्यामुळे केवळ जातीच्या चष्म्यातून न बघता या सर्वांशी सामना करावा लागेल. त्यासाठी संयम, शिस्त आणि वक्तशीरपणा हवा आहे. आज कार्य करीत असताना आम्हाला जसा भरघोस पाठिंबा समाजाच्या सर्व थरांतून मिळतोय तसाच अंतर्गत विरोधही सहन करावा लागतोय. सहाय्य करणाऱ्यांचे सहाय्य एकदम न घेता संयमाने पारखूनच घ्यायला हवं. तसेच विरोधामागची भूमिका समजून घेवून मगच मुकाबला करायला हवा. कार्यपद्धतीबाबत हळूहळू विचार होत आहे. केवळ पुस्तकी विचारावर बुकोईचे कार्य उभे राहणार नाही. कारण दलित बौद्ध समाजाच्या अडचणी इतरांपेक्षा खूपच वेगळ्या आहेत. हजारो वर्षांच्या गुलामीमुळे जे दुर्गुण चिकटलेले आहेत ते एकदम जाणार नाहीत. त्यामुळे करता करता शिकायचे आणि शिकता शिकता करायचे हीच आमची कार्यपद्धती. यापूर्वी समाजानं दलित चळवळीला भरपूर पैसा दिला, त्याचं पुढं काय झालं ? हे कधी कुणी कुणाला विचारलं नाही किंवा कुणी सांगितलं नाही. आजबरच्या अनुभवांमुळे लोकांचा पुढाऱ्यांवरचा विश्वास उडालेला आहे. प्रथम विश्वास संपादन करायला हवा. बुकोई हे पैसे खायचं प्रकरण आहे असं कार्यकर्त्यांना आणि लोकांना वाटता उपयोगी नाही. व्यवहार चोख हवा. तसा धाकही हवा. काही प्रकल्प उभारून ते यशस्वी करून दाखवायला हवेत. त्यासाठी कार्यकर्त्यांची निवड काळजीपूर्वक व्हायला हवी. राजकारण-विरहित, निर्व्यसनी,



**शंकर विक्रम तायडे**

निष्कलंक कार्यकर्त्यांनाच आम्ही प्राधान्य देतो. त्यातूनच काही धक्का देणाऱ्या घटना घडत असतात. मूळचेच भ्रष्टाचारी कार्यकर्ते यात घुसू पहात असतात. त्यांच्यावर कठोरपणाने कार्यवाही करावी लागते. बुकोई ही संघर्षविरहित बुद्ध मार्गाने जाणारी क्रांती आहे. यात मानव्याचा विचार आहे. डॉ. आंबेडकरांनी आमच्या हातात शस्त्रांच्याऐवजी विचारशास्त्र दिले आहे. त्यामागे खूप अर्थ आहे. '

' मानव्याचा विचार म्हणजे मानवाचा. मग यात सर्व समाज येऊ शकतो असं तुम्हाला म्हणायचं आहे का ? सर्व जातीचे अगदी सवर्ण सुद्धा ? ' या प्रश्नावर गुरुजी तत्परतेने म्हणाले. ' आमच्या विचारांशी ज्यांचे विचार जुळतात, जे समाजाचा, राष्ट्राचा, समतेचा विचार करतात, सर्वांना बरोबर घेऊन जाऊ इच्छितात असे सर्वजण बुकोईत येऊ शकतात. परंतु समाज–समाज म्हणजे काय ? आज या प्रकारे काम करण्याची गरज जास्त करून कोणाला आहे ? मागासवर्गीयांनाच अशा प्रकारची गरज आहे. सरकारच्या अनेक सवलती, अनेक संस्थांच्या देणग्यांचा पाऊस, राखीव जागांची खिरापत वाटली जाते, अशी चर्चा नेहमी लोक करतात. पण मग या पावसाचे शिंतोडे सुद्धा कोणाच्या अंगावर उडलेले दिसत नाहीत. खिरापत वाटण्याआधीच कुठं गडप होते समजत नाही आणि स्वातंत्र्यानंतर एवढ्या योजना सुधारणा मागासवर्गीयांसाठी आखल्या गेल्या तर मग खेड्यातून सर्वस्व सोडून निव्वळ वस्त्रानिशी निर्वासित बनून मुलाबाळांना घेऊन रस्तोरस्ती दलित का येताहेत ? याचाच अर्थ प्रत्यक्षात असं काही घडतच नाही. या भयानक प्रश्नांशी आम्हाला सामना करायचा आहे. '

' दलित म्हटले तर विविध जाती आहेत आणि बुद्धिस्ट म्हटले तर फक्त बौद्ध आले. आणि बौद्ध म्हणजे सध्यातरी महार जातीचेच लोक बौद्ध आहेत. इतर दलित यात मोडत नाहीत. अशा बौद्धेतर दलितांचा विचार कसा करणार ? ' या प्रश्नावर भंवर गुरुजी ठामपणे म्हणाले,

' डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण समाजाचा विचार केलाय. बौद्धधर्म, केवळ महार जातीचाच किंवा दलितांचा नव्हे तर सवर्णांचा सुद्धा त्यांनी विचार केला. बौद्धधर्म या संस्कृतीचाच अविभाज्य भाग आहे. इथल्या मातीतूनच, कणाकणातूनच तो निर्माण झालाय. इथल्या हवेशी, निसर्गाशी, गंगा, यमुना, कावेरी, सिंधू, हिमालय, सह्याद्री यांच्याशी त्यांचं नातं आहे. तो या संस्कृतीलाच मातृस्थानी मानतो. हिंदू समाजाशी कायमचे वैर बाबासाहेबांना मान्य नव्हते. त्यांच्याशी सहोदराचेच आमचे नाते आहे. मुस्लिम, ख्रिश्चन आणि बौद्ध यांच्यात मुलभूत फरक हाच आहे. रिडल्स – नामांतरासारखे वाद ज्या वेळी निर्माण होतात त्या वेळी हिंदू-मुस्लिम, हिंदू-ख्रिश्चन, या प्रश्नांप्रमाणे त्याच्याकडे पाहू नये. डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म नाकारला याचा अर्थ संस्कृती नाकारली असा होत नाही. अंधश्रद्धा, वर्णव्यवस्था, जातीयवादीवृत्ती, यांचा त्याग केलेल्या कोणाही हिंदू दलित सवर्णांना बौद्धांची भीती वाटण्याचे कारणच काय ? खरं तर बौद्ध-बौद्धेतर दलित असा भेद कृपया करू नये. '

'श्री देवराम भंवर गुरुजींच्या वडिलांनी आपली स्वतःची दोन एकर जमीन सहकारी कुक्कुट पालनासाठी देणगी दिली आहे. सध्याचं शिक्षण कुचकामी असून चौथीच्या पुढे धंदेशिक्षणच द्यावे असे यांना वाटते. जातीचा आग्रह सरकारच धरतं, त्यामुळे जाती नष्ट होत नाहीतं. मुलाला शाळेत घालताना केवळ (भारतीय) एवढंच लिहावं. त्याची जात लिहू नये असं त्यांना वाटतं. बौरला कुक्कुट

पालनाचं केंद्र उभारण्याच्या कामी ते मग्न आहेत. भंवर गुरुजी हे प्रसिद्ध शाहीर वामन दादा करडक यांना गुरुस्थानी मानतात. स्वतः उत्तम सामाजिक कवी आहेत.

□

हळू हळू बुकोईची सहकारी चळवळ आकार घेऊ लागली. 'दिशा' च्या निमित्ताने एकत्र येऊ लागलेल्या कार्यकर्त्यांपैकी श्री. शंकरराव तायडे. हे मोरवाडीतले. मुंबई–पुणे रस्त्याजवळच्या मोरवाडीत यांचा शिलाईचा उद्योग आहे. शिलाईचे दुकान हे येथील बुकोईच्या कार्यकर्त्यांचे विरंगुळ्याचे ठिकाण. सतत कार्यकर्त्यांनी गजबजलेले. शंकरराव तिथेच रहातात. त्यामुळे कार्यकर्त्यांचा कौटुंबिक जिव्हाळ्यानं पाहुणचार होत असतो. तायडे गरवारे नायलॉन्समध्ये पूर्वी काम करीत असत. संपाचा फटका त्यांना बसला आणि नोकरी गेल्यावर शिलाईचा उद्योग सुरू केला. या भागात 'धम्मदीप मंडळा' तर्फे त्यांनी सामाजिक कामास सुरुवात केली. सुभाष रोकडे यांच्यामुळे बुकोईशी परिचय झाला. त्यासंबंधी बोलताना तायडे म्हणाले, बुकोई एक अभिनव चळवळ आहे. गाव सोडून जगायला आलेल्या दलित माणसांना नवजीवन देणारी चळवळ आहे. तशा घरबांधणी सोसायटया आजवर झाल्या. पण व्यवसाय देणारी ही चळवळ प्रथमच सुरू झाली. याचं वैशिष्टच म्हणजे ही चळवळ आम्हाला आमच्या गावीच उद्योग देत आहे. त्यामुळे शहराकडे येणारा लोंढा काही प्रमाणात थोपवला जाणार आहे. गावांचा विकास होणार आहे. मात्र या साठी सरकारने सोयी आणि सवलती उपलब्ध करून द्यायला हव्यात. आज छोटया छोटया कारणांसाठी मुंबई-पुण्याला लोकांना यावं लागतं.'

'तुमच्याकडे बुकोईच्या कोणत्या प्रकल्पाचं काम आहे?' या प्रश्नावर तायडे म्हणाले. 'मी बुकोई प्रिंटिंग प्रेसचा चेअरमन आहे. या छापखान्यासाठी श्री. प्रकाश रोकडे प्रवर्तक यांनी खूप परिश्रम घेतले. आम्ही १००० रु. देणारे २३ सभासद एकत्र आणून संस्था रजिस्टर केली. रुपीनगर येथे त्यासाठी श्री. विठ्ठलराव गवळी यांनी जागा दिली आहे, श्री. गवळी हे धामणगावचे कार्यकर्ते असून रुपी नगरमध्ये त्यांनी बुकोईचं कार्य वाढविलं आहे.

'या छापखान्याचं उद्दिष्ट काय आहे?' या प्रश्नावर तायडे म्हणाले, 'या धंद्याला या भागात खूप वाव आहे. त्यामुळे साताठ जणांना काम मिळेल. शिवाय बुकोई आणि आंबेडकरी चळवळीचे विचार देणारे एक मुखपत्र पाक्षिक सुरू करायचा विचार आहे. ज्यामुळे चळवळीत एक सुसूत्रता येईल.'

६ डिसेंबर १९८७ ला किशोर पंप्स या कारखान्याचे श्री. भाईसाहेब देसाईंच्या हस्ते प्रेसचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी श्री. दिगंबर वाघमारे यांनी परिश्रम घेतले. प्राधिकरणातील नालंदा मित्र मंडळातील श्री. वसंत धर्मा वाघ यांनी पिंपरी येथील बुकोईच्या जिल्हाअधिवेशनापासून कामाला सुरुवात केली. टेल्कोतील कामगारांच्या त्यांनी बुकोईच्या कार्यासाठी बैठका घेऊन २११ रु. प्रमाणे सोप फॅक्टरी साठी भाग भांडवल उभारले. त्यांचे वडील कै. दादासाहेब गायकवाड यांचे सहकारी होते. त्यांना समाजकार्याची शिकवण बालपणापासूनच मिळाली. त्यांनी आता छापखान्याची जबाबदारी उचलली आहे. श्री. तुपलोंढे, प्रताप गायकवाड, किसन खंडेराव, शांताराम देठे, शंकर भोसले या कार्यकर्त्यांनी हा प्रकल्प उभारण्यासाठी परिश्रम घेतले. तायडे यांच्याबरोबरीने काम करणाऱ्या या कार्यकर्त्यांमुळे लवकरच या भागात एक आदर्श काम उभे राहिले.

प्रकाश रोकडे – सुभाष रोकडे यांनी बुकोईच्या पिंपरी-चिंचवड परिसरातील कार्याला सुरुवात केली. चिखली गावातील माळी मराठा वाद हा खूप जुना वाद. या दोन तरुणांनी कौशल्याने निवडणुकीच्या निमित्ताने हा वाद मिटविला. गावात शांतता प्रस्थापित करण्यासाठी दलितांचे सहकार्य घेऊन माळी-



'किशोर पंप्स'चे – **श्री. भाईसाहेब देसाई**
बुकोई मुद्रण व्यवसायाचे उद्घाटन करताना.

मराठा मंडळींनी पिढ्यान् पिढ्यांचे वाद संपवून टाकले आणि दक्षता कमिटीचे अध्यक्षपद सुभाषराव रोकडे या जनरल वॉर्डातून आलेल्या लोकप्रिय दलित तरुणास मिळाले.

'अनिखिला फॅब्रिकेटर्स'ची अकरा वर्षांची नोकरी टाळेबंदीमुळे गेली. फंड वगैरे काही मिळाले नाही. याच कंपनीत मी दत्ता सामंतची युनियन आणली. कामगार पुढारपण केलं पण कशाचाच काही उपयोग झाला नाही. आधीच्याच गरिबीच्या स्थितीत आणखी संकट उभं राहिलं. घर तरी चालायला हवं. प्रपंच मोठा. बायको मजुरीला जायची. अशातच बुकोईचं काम करू लागलो. साबण कारखान्याची जबाबदारी माझ्यावर आली. प्रकाश रोकडे, चिंतामण रोकडे आणि टेक्सास गायकवाड यांच्या सहकार्याने मी काम करू लागलो.'

सुभाषरावांनी धनाची कोणतीही अपेक्षा न ठेवता साबण कारखान्यात सर्व प्रकारची कामे केली. महिलांनी मोफत कामे केली, बेरोजगारांना अल्पवेतन दिलं, सुनील पितळे, संजय फुलपगार हे मिश्रणाचे काम करीत असत.

रोज काम झाल्यावर पुण्यात सायंकाळी 'सहार' हॉटेलवर आम्ही सर्व जण विचार करायला जमत असू. अडीअडचणींचा विचार होई. कमिशनर, कलेक्टर यांना भेटायचे ठरे. पत्रं लिहिली जात. 'सहार' हॉटेल हेच आमचे कार्यालय होते. पैशाच्या कमतरतेमुळे 'दिशा'चे उत्पादन थांबवावे लागले. आता आमचे केमिकल सल्लागार आणि संघाचे कार्यकर्ते श्री. मधुसूदन जोशी यांच्या सहकार्याने प्रकल्प अहवाल तयार केला; पण झालेल्या कामावर तो आधारित असल्याकारणाने त्यात १६,००० रु. ची तूट दिसत होती. ती दिसल्यामुळे बँकेने अहवाल नामंजूर केला. तोच अहवाल फायद्याचा दिसला असता तर आज एक मोठी योजना आकाराला आली असती. जोशींचा तसा आग्रह होता. सुभाषराव अनुभव सांगत होते.

साबण कारखाना बंद झाला, आता पुन्हा सुरू करण्याकरिता जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. पूर्वीच्या चुका पुन्हा होऊ नयेत म्हणून काळजी घेतली जात आहे. मधुसूदन



चिंतामण गं. रोकडे

जोशी हे स्वतः वेगवेगळ्या पद्धतींनी सहकार्य करीत आहेत.

□

इंद्रायणीच्या एका तीरावर 'चिखली' तर पलीकडे 'मोई'. मोई खेड तालुक्यातील एक गाव. त्या गावातील श्री. चिंतामण गंगाराम उर्फ सी. जी. रोकडे. मध्यमवयीन, स्थूलप्रकृतीचे, गोल चेहऱ्याचे, मागे केस वळलेले, शांत, हळू हळू बोलणारे रोकडे बुकोईचे खेड तालुक्याचे संघटक आहेत. सध्या पिअरलेस इन्शुरन्स कंपनीचे सब-ऑर्गनायझर आहेत.

आपल्या घरच्या परिस्थितीबद्दल बोलताना ते म्हणतात, घरची परिस्थिती बेताचीच. थोडी-फार जमीन. दीड एकर बागायत. अलीकडे विहीर इंजिन बसवून केली आहे. वडील अशिक्षित. एकत्र कुटुंब. आम्ही घरीच शेती करायचो. मी एस. एस. सी. झालो. कामधंदा करून शिकलो. लहानपणापासून छापखान्यात कंपोझिटरचे काम शिकलो आणि पुण्याच्या नामवंत छापखान्यांत कामे केली. दत्ताजी कुलकर्णीच्या क्लासमधून बाहेरून अकरावी झालो. किर्लोस्कर प्रेसमध्ये काही काळ काम केल्यावर किर्लोस्कर ऑईलमध्ये कामाला लागलो. दूधवाल्यांबरोबर सकाळी डबा येई. वडील पहाटेचे २ मैल चालत येऊन दूधवाल्याकडे डबा देत असत. तोच दोन्ही वेळा खायचा. किर्लोस्करमध्ये मला हळूहळू प्रमोशन मिळत गेले. तिथलं वातावरण चांगलं होतं. माझं काम चोख असे पण काहीजण माझ्या कामासंबंधी खोटेच रिपोर्ट करीत असत. चौकशी केल्यावर त्या चुका दुसऱ्यांच्याच निघत असत. ८४ ला पिअरलेसची एजन्सी घेतली. एका वर्षात ५३००० कलेक्शन केल्यामुळे पियरलेसनं दूरदर्शनसंच भेट दिला. पुढे ८५ ला स्वेच्छेने किर्लोस्करमधून निवृत्ती स्वीकारली. एक लाख रुपये मिळाले. बडोदा बँकेत ठेवले. तिथलेच आमचे एक कार्यकर्ते श्री. भागवत भालशंकर यांनी मला बुकोईची कल्पना दिली आणि मी लगेचच साबण कारखान्याचे भाग घेतले. यापूर्वी टेक्सास गायकवाड यांचे नुसतं नाव ऐकून होतो.

## रमाई मेणबत्ती

बुकोईचे काम कसे सुरू केलेत? या प्रश्नावर सी. जी. म्हणाले, 'सुभाष आणि प्रकाश रोकडे यांच्यामुळे मी खेड तालुक्यात काम सुरू केले. समाजाला आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभं करण्याचं स्वप्न माझ्या मतांशी जुळणारं होतं. त्यामुळे मी या चळवळीत खेचलो गेलो. माझे मित्र श्री. मन्सूर शेख, श्री. नाईकनवरे आणि मी कुरोळी गावी बसून यावर विचार केला आणि ३० गावच्या परिचितांना पत्रं लिहिली. चाकणला त्यांची बैठक झाली, त्यानंतर तालुक्यातील १०० गावांतील लोकांशी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष संपर्क साधून पुन्हा एक बैठक बोलावली. या बैठकीला ७० गावांहून १५० लोक उपस्थित होते. श्री टेक्सास गायकवाड, सुभाष, प्रकाश रोकडे यांनी या बैठकीस मार्गदर्शन केले. कोणते उद्योग करावेत याविषयी लोकांनी अनेक सूचना केल्या. खडू, मेणबत्ती, बर्फ, तेल गिरणी इत्यादी त्यांचे प्रकल्प, अहवाल तयार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली, पण अहवाल तयार होऊ शकला नाही. आम्ही अहवाल बनविला त्यात सुरुवातीला एका गटासाठी मेणबत्तीचा उद्योग निवडला. त्यासंबंधीची माहिती गोळा करून मेणबत्त्या तयार करण्याचे तंत्र समजून घेतले आणि कोल्हापूरहून वेगवेगळ्या आकाराचे साचे मी स्वखर्चाने घेऊन आलो आणि 'बुकोई को-ऑपरेटिव्ह कँडल वर्क्स, देवाची आळंदी' या नावाने संस्था तयार केली, ३४००/- रु. भाग भांडवल जमा झाले. या सर्व घटना ऑक्टोबरमधल्या. ६ डिसेंबर ८६ ला वितरण करायचे ठरले. त्यामुळे आम्ही कामाला लागलो. बाबासाहेबांच्या पुतळ्याजवळ मेणबत्ती लावायची प्रथा असल्यामुळे खपाच्या दृष्टीने आणि उत्पादनाच्या दृष्टीने तो दिवस

महत्त्वाचा होता.

मेणासाठी लायसेन्स लागते. ते मिळविण्यासाठी अर्ज केला. यासाठी बराच काळ लागणार असल्यामुळे बाजारातून मेण आणून काम चालू करण्यासाठी चौदा रुपये किलोने १०० कि. मेण काळया बाजारातून खरेदी केले.

मेणबत्तीसाठी काहीतरी नाव हवे...

आमच्या समाजाला मातृस्थानी असणाऱ्या, समईप्रमाणे ज्यानी तेवून शातपणे आपले जीवन बाबासाहेबासाठी प्रकाशित केले आणि प्रकाश दिला त्या रमाईंचे नाव निवडले.

'रमाई मेणबत्ती'......

त्याचे रेखाचित्रच तयार करून घेतले.

देवाच्या आळंदीत, ज्ञानेश्वर माऊलीच्या सान्निध्यात, समाज मदिराच्या शेजारच्या खोलीत आमचा छोटासा कारखाना उभारला गेला. मी, मन्सूर शेख, दिवे आणि आळंदीचा कैलास रधवे असे चौघे कामाला लागलो. पूर्वानुभव काहीही नाही. फक्त महत्त्वाकाक्षा, मनात उल्हास आणि प्रचड इच्छाशक्ती या जोरावर सतत पंधरा दिवस रात्रदिवस काम करून आम्ही माल बनविलेला. पहाटे चार पर्यंत आम्ही आळीपाळीने काम करीत असू. या काळात आम्ही घराकडे फिरकत सुद्धा नव्हतो. कैलास रधवे आमची चहापाणी, भोजनाची व्यवस्था करीत असे. आमच्या या खटपटीला यश आलं, विविध आकारांच्या मेणबत्त्याचे पुडे तयार झाले.

६ डिसेंबर ८६. सर्वत्र उत्साही वातावरण. पिंपरीत, पुणे, नागपूरसाठी गठ्ठे बाधून कार्यकर्त्यांसोबत रवाना झाले. पिंपरीत बाबासाहेबाच्या पुतळयासमोर सुशोभित मडप उभारला गेला. कार्यकर्ते उत्साहाने राबत होते. पिंपरी-चिंचवडचे महापौर, ज्ञानेश्वर लाडगे आणि स्थायी समितीचे अध्यक्ष बाबासाहेब तापकीर आणि बुकोईचे मॅनेजिंग ट्रस्टी प्रकाश रोकडे याच्या अध्यक्षतेखाली 'रमाई' मेणबत्तीचे पहिले वितरण झाले.

सर्व कार्यकर्त्यांचे ऊर भरून आले. पुतळयाजवळ पहिली मेणबत्ती प्रज्वलित झाली.

विक्री सुरू झाली. लोकानी रांग लावली. पहिल्या उत्पादनाची विक्री झपाटयान झाली. केवळ तीन तासात माल संपला.

३४७ रु. रोख आले!

सर्वांचेच चेहरे उत्साहाने ओसडत होते डॉ. बाबासाहेबाच्या पुतळयासमोर असख्य मेणबत्त्या तेवत होत्या आणि कार्यकर्त्यांच्या मनामनातले दीप प्रज्वलित होत होते......

पुण्यातही असाच कार्यक्रम झाला. उपमहापौर अली सोमजी याच्या हस्ते आणि दादासाहेब काकडे याच्या अध्यक्षतेखाली वितरणाचा कार्यक्रम झाला.

नागपूर, मुबई, नगर, महाड सर्व ठिकाणी विक्री धडाक्यानं झाली. पैसे जमा झाले. दुकानदारानी सुद्धा माल खपवला. आमचे श्रम आणि इच्छा सार्थकी लागल्या.

नेहमीच काळयाबाजारातून मेण आणून तयार करणे परवडणारे नव्हते म्हणून लायसेन्सच्या मागे लागायचे ठरले. राज्याचे अर्थमत्री सुशीलकुमार शिंदे याना मंत्रालयात समक्ष भेटून, चर्चा करून अर्ज दिला. श्री. टेक्सास गायकवाड बरोबर होते मत्र्यानी शेरा मारून आपल्या सचिवाकडे कार्यवाहीसाठी पाठविला ..

आणि आजपर्यंत अनेक वेळा आठवण करूनही त्यासबधी काहीच होऊ शकले नाही. सरकारी कोटा मिळू शकला नाही. जून ८६ ला सरकारने नव्याने कोटा द्यायचे बद केले.

काळया बाजाराने मेण घेतले तर पावती मिळत नाही आणि सरकारी ऑडिटला अडचण येणार म्हणून अखेर नाइलाजाने उत्पादन बद करावे लागले.

खप असताना .....
पैसे मिळत असूनही......
कार्यकर्ते उत्साहात असूनही......
शासनाच्या लालफितीमुळे... ..
एक उद्योग बद ठेवावा लागला......

हळहळण्याव्यतिरिक्त कार्यकर्ते काय करणार?

या सर्व उद्योगात सी जी. रोकडे तन–मन–धनाने राबले.

□

सी. जी रोकडे बोलत होते. 'बुकोई तर्फे निरनिराळे उद्योग सुरू करायचे होते. वेगवेगळया ठिकाणाहून लोक आम्हाला येऊन भेटायचे. असेच एकदा श्री यशवत साळवे आमच्याकडे आले. म्हणाले, शिरूर तालुक्यातील केंदूर येथे चुनखडीचा फार मोठा साठा आपल्या लोकाच्या जमिनीत आहे गेली अनेक वर्षे या उद्योगात मुसलमान मडळीची मक्तेदारी असून अत्यत स्वस्त दराने जमिनी कराराने घेऊन ते चुनखडीची विक्री करतात. या धद्यात फायदा आहे. आपण करण्यासारखा आहे.'

केंदूर कायम दुष्काळी भागातील गाव. पिण्याच्या पाण्याचे सुद्धा दुर्भिक्ष्य. सर्वत्र उघडे डोंगर. वाहून गेलेल्या जमिनी. कुठच हिरवी झाडी नाही. खुरटी झुडप नजरेस पडतील न पडतील अशी तुरळक. या भागातील दलित फार पूर्वीपासूनच मुबईला काम धंद्यासाठी गेलेले. सुप्रसिद्ध कवी आणि पँथर नेते नामदेव ढसाळ या गावचेच.

ढसाळ मडळीच्या जमिनीतच हे साठे आहेत. मुबईतल्या लोकाना करारापोटी किरकोळ रक्कम देऊन, कित्येक वर्षे फसवणूक चाललेली. या भागातील लोक रोजगार हमी योजनेवर कामाला जातात. गेल्या वर्षी पत. प्रधान राजीव गाधी दुष्काळी कामाची पहाणी करण्याकरता या भागात येऊन गेले. मोठा समारभ होऊन गेलेला. एक दिवसाची अचानक आलेली दिवाळी लोकानी पाहिली. पुन: दुष्काळ. आहे त्याच ठिकाणी लोकाची स्थिती आहे. तशीच आपल्या गावी आपल्या देशाचा सर्वात मोठा नेता येणार म्हणजे आपल्या कर्मातला दुष्काळ कायमचा जाणार अस समजणारे निराश झाले अस हे केंदूर.

बुकोईचे सर्व प्रमुख कार्यकर्ते, केमिकल सल्लागार श्री मधुसूदन जोशी याच्यासह केंदूरला पोहोचले. पाढरे ढीगच्या ढीग सर्वत्र लागलेले. ट्रक भरून पुण्याकडे चाललेले.

सर्वांशी चर्चा करून बुकोईची कल्पना देण्यात आली. लोकानी मनापासून स्वागत केले. प्लॉट कराराने घ्यायचे ठरले. आळंदीचे भाऊसाहेब थोरात; शेख, नाईकनवरे हे पण आले होते

श्रीमती राधाबाई जोतीबा ढसाळ या वृद्ध महिलेशी करार झाला. बुकोईच्या वतीने सुभाषराव रोकडेंनी सही केली.

२५ जानेवारी ८७ ला एका समारंभाने चुनखडीउत्पादनास सुरुवात झाली. रगभूमीच्या 'भिमाई' गाडीने सर्वजण आले होते. श्रीमती ढसाळबाईंना साडी-चोळी भेट देण्यात आली. त्यादिवशी श्री टेक्सास गायकवाड याचे हस्ते कुदळ मारून शुभारभ

झाला अविनाश आवेडकर अध्यक्षस्थानी होते. राधाबाईंना कराराव्यतिरिक्त हजेरी लावून पगार दिला जाई. मुलीच्या बाळतपणातही मदत करण्यात आली.

मधुसूदन जोशीनी लॅब रिपोर्ट आणला. ८९ टक्के कॅल्शियमचे प्रमाण म्हणजे उत्तमच. कामाला सुरुवात झाली सर्व कामगार मागासवर्गीयच. आठवडचाला पगार ठरला. बुकोईकडे पैसा नव्हता. सी. बी. रोकडे म्हणाले, 'मला व्याज नको. बँकेत पडून रहाणार. त्या ऐवजी इथ वापरू जसजसे विक्रीचे पैसे येतील तसतसे माझे द्या.' या काळात १०० ट्रक माल निघाला. सर्वात मोठे व्यापारी पुण्यातील आढाव हे आहेत. ३०० रु ला एक ट्रक ठरला. १४ फऱ्याचा १ ट्रक ड्रायव्हर एका ट्रकात १८ फऱ्या माल भरायचे – आढाव मात्र १४ फऱ्याचेच पैसे देत असत. शिवाय ३०० रु ऐवजी २७० रु. मिळत. फॉरेस्ट खात्यातील लोकाना जे पैसे द्यावे लागत (लाच ? ) ते कापून घेत. सरकारी रॉयल्टीचा प्रश्न त्यातूनच उद्भवला. आम्ही त्यासाठी अर्ज केला परंतु हे सर्व आधीच व्हायला हवे होते शिवाय स्थानिक मडळीनी पैशाच्या मोबदल्याइतके काम न करून फसवणूक केली. सहकारी सस्था आहे, मिळेल तेवढे घ्या नऊ माणसे काम करायची पण चार माणसाचे सुद्धा काम होत नसे एकाच समाजातले असूनही फसवणूक. खर्चाच्या मानाने माल कमी निघे. अशा अनेक अडचणीमुळे आढावाकडे माल पाठविणे बद केले. ८० ट्रक माल आज तयार आहे लवकरच या मालाची अन्यत्र विक्री करणार आहेत. ३०००० ते ३५००० रु. अडकलेले आहेत ते मोकळे होतील. या ठिकाणी सनला फॅक्टरी काढायची कल्पना आहे.'

'या काळात मी सकाळी ९ पासून रात्री ९ वाजेपर्यंत राबत असे. दुष्काळात तीस लोकाना रोजगार मिळाला हेच मानसिक समाधान ८ महिने सर्व व्यवहार मी सभाळला. माझ्या शिलकेतून खर्च केला. बायकोची समजूत काढावी लागली. बँकेचे व्याजही बुडले तरी आपले पैसे परत मिळतील शिवाय समाजासाठी आपण काम केलय. फायदा जरी झाला नाही तरी तोटा होणार नाही याची खात्री आहे.

श्री. सी. जी रोकडे यानी सामाजिक कामात आपली आयुष्याची अर्धी पुजी खर्च केली. आता तरीही ते बुकोईच काम करीत असून स्वतःचा 'आर के प्लॅस्टिक' या नावाचा कारखाना त्यानी चिखलीत सुरू केलाय. चप्पल स्लिपर, बूट तयार करण्याचा उद्योग. यामुळे त्याना आता रमाई मेणबत्ती आणि चुनखडी या उद्योगाकडे लक्ष देता येईल.

सामाजिक विचारान भारलेली सामान्य माणसेही दानशूर आणि कष्टाळू आहेत. सर्व समाजाच सहाय्य योग्य वेळी अशाना मिळालं तर फार मोठा सामाजिक बदल घडून येईल. समाज या प्रयत्नाकडे सामाजिक जाणिवेच्या दृष्टिकोणातून पहात नाही. हेच सर्वात मोठं दु ख आहे

□

बुकोई. अशा रीतीने अनेक अडचणीमधून स्वतःच स्वत चे दोष दूर सारत, मार्ग काढीत जाणारी चळवळ अपयशाने खचून न जाता, उमेदीने, आत्मविश्वासाने नव्या नव्या योजना कार्यान्वित करणारी सस्था आणि तिचे कार्यकर्ते. आज अनेक ठिकाणी, घरबाधणी, कुक्कुट पालन, पशुखाद्य, वीटभट्टी, इलेक्ट्रॉनिक्स, प्लॅस्टिक्स, इजिनियरिंग, महिला औद्योगिक सस्था, शिलाई उद्योग, नर्सरी, सहकारी शेती, पाणी पुरवठा, उपसा जल सिंचन योजना अशा प्रकारे पुणे-सातारा, सोलापूर जिल्ह्याच्या बरोबरच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात, कोकण-मराठवाडा भागातही कामास सुरुवात होत आहे.

सहकाराचा...

स्वावलबनाचा...

अत्थ दीपो भवचा आत्मोन्नती करणारा सदेश दलित वस्त्यावस्त्यामधून पोहोचू लागला आहे.

पुण्यातील पाडववाडीतली स्वत ची जागा, टेक्सास गायकवाड याच्या मातोश्री श्रीमती शाताबाई गायकवाड यानी बुकोईला देणगी दिली आहे. तिथे झोपडपट्टीतल्या महिलासाठी 'महिला औद्योगिक सहकारी सस्था' स्थापन झाली असून सौ सुलोचना भोसले आणि कुमुदिनी खुटे यानी प्रयत्न करून पन्नास कुटुबातील महिलाना एकत्र आणून कामास सुरुवात केली आहे. याच भागातील तात्यासाहेब बहुले यानी 'तथागत सहकारी गृहरचना सस्था' स्थापन केली असून सर्वजण दरमहा बँकेत भाग भांडवल जमा करीत असतात

□

भोर ...

पुण्यापासून एकदीड तासाचे अतरावर असणाऱ्या भागात अनेक ठिकाणी बुकोईच्या कामास सुरुवात झाली आहे.

असेच हे 'वरवे' गाव.

जयतीच्या निमित्ताने एकत्र येता येता 'बुकोईची' चळवळ गावात आली. सर्व महिला म्हणाल्या, 'या पुरुषाचाच ईचार पयला केला जातो आमालाबी कायतरी उद्योग हवाय. कुठवर ह्यो आसं चालायच ?'

महिलाच्या व्यथेला वाचा फुटली सर्वच कार्यकर्त्याच्या मागे सावलीप्रमाणे राहून ज्योतीप्रमाणे प्रकाश देणाऱ्या महिलानी एकत्र येऊन समाजाला उद्योगप्रधान करायच ठरवल आता सर्वत्र शाळा असल्यामुळे कमीत कमी चौथीपर्यंत शिक्षण हे होतच असत. काहीची जीवनाची स्वप्नं पाहाता पाहाता विझून गेलेली अशा सर्व चाळीस एक महिला एकत्र आल्या. त्याचा पचायतसमिती मार्फत एन. आर. इ पी. अतर्गत एक शिलाईचा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. सर्व महिलानी प्रशिक्षणाच्या काळात घरची जबाबदारी साभाळून प्रशिक्षण घेतले या महिलापैकी २५ महिलाना शिलाई मशीन्स देण्यात आली पचवीस कुटुबाना घरबसल्या रोजगार मिळाला. पण गाव लहान मूळचा एक टेलर होताच. आता पचवीस झाले एवढ काम इथ कुठलं मिळणार ?...

मग महिलाची सहकारी सोसायटी स्थापन करण्यात आली तयार कपडचाना सध्या मदी आहे. शिवाय त्यात स्पर्धा मोठी. तरीही त्यात उतरायच ठरलय. या शिवाय पुण्यातील किर्लोस्कर-किशोर पंप्स सारख्या कारखान्यातील कामगाराचे गणवेश, तसेच शाळाचे गणवेश करण्याचे काम मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी रमेश काबळे हे कार्यकर्ते पुण्यात प्रयत्न करीत असतात. वरवे सारख्या गावी आज पंचवीस-चाळीस महिलाना या उद्योगामुळे काम मिळाले. महिलाची सहकारी चळवळ मूळ धरू लागलीय. आजूबाजूच्या खेडचातूनही अन्य प्रकारचे उद्योग सुरू करावेत अशी स्त्रियाची

मागणी होत आहे. स्त्रिया त्यासाठी पुढ येत आहेत.

वस्त्याजवळच नदीच्या काठावरची ३॥ एकर जमीन बुकोईच्या एका हितचिंतकाने अशा प्रकारच्या आपल्या महिला भगिनींना उद्योग निर्मिण्यासाठी देणगी दिली आहे. एक हजार फुटांवर नदी वहातेय. एक हजार फूट पाईप लाईन इंजिनची व्यवस्था झाली तर या ठिकाणी उत्तम प्रकारचे आर्थिक उत्पन्न सुरू होईल या ठिकाणी आंबा, डाळिंब, सत्रे, मोसंबी, व इतर फळझाडाची रोपवाटिका बनविण्याची योजना असून डाळिंबीचा एक उद्योग या ठिकाणी करण्यात येणार आहे त्यामुळे या सर्व प्रयत्नात वीसेक महिलांना रोजगार मिळणार असून हा प्रकल्प लवकरच आकाराला येत आहे. या प्रकल्पाकडे श्री. रमेश काबळे आणि काबळे गुरुजी लक्ष घालत असतात. रमेश काबळे हे रहायला दापोडीत. दहा बाय दहा खोलीत त्याचा प्रपच. कामाला स्वारगेटजवळ इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात. तिथे काम करून शिवाय घरी अगावर काम आणतात. हे करीत असतानाच शनिवारी रविवारी गावी जातात महिलाच्या बैठका घेऊन त्याच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करतात. गावीच जाऊन रहायचा त्यांचा विचार आहे. त्याशिवाय या कामास मोठी चालना मिळू शकणार नाही. रोज पुण्यातून येऊन जाऊन करायचे. त्यामुळे रोज सध्याकाळी या उद्योगाकडे समक्ष लक्ष देता येऊन कामाला अधिक गती मिळेल

□

बुकोईचा विस्तार वटवृक्षाप्रमाणे वाढतोय. एका गावातून दुसऱ्या गावात. नातेसबधातून, जयतीच्या कार्यक्रमामधून प्रसार होत असतो. पुण्याच्या झोपडपट्टीतून प्रसार होत असल्यामुळे तिथून आपआपल्या गावी हा विचार पोहोचू लागलाय महाराष्ट्रात 'महारवतन' जमिनी मोठ्या प्रमाणात आहेत. त्याचे अनेक प्रश्न आहेत आज या वतनी जमिनीबरोबरच मातग-रामोशी-भटके विमुक्ताचे-भूमिहीनाचे अनेक प्रकारचे प्रश्न, समस्या आहेत. बुकोई सहकाराच्या माध्यमातून शेती-उद्योग अशा दोन्ही पद्धतीने मागासवर्गीयांच्यातील नैराश्य, दारिद्र्य, बेकारी नष्ट करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्या दृष्टीने आज अनेक ठिकाणी असे प्रयत्न चालू आहेत.

इदापूर तालुक्यात आकोले गावी सहकारी उपसा जलसिंचन योजना लवकरच कार्यान्वित होत आहे.

'चादज' या गावी ५१ एकरावर रामोशी समाजाचा सहकारी शेतीचा प्रकल्प योजनाबद्ध होत आहे नातेपुते येथे श्री. सुभानराव काबळे यानी 'सहकारी पेपर मिल' ची उभारणी सुरू केली आहे.

सोलापूरात कीर्तीपाल गायकवाड यानी अनेकाना एकत्र करून सहकारी तत्वावर शालेय साहित्य निर्मिती केंद्र स्थापन केले आहे. उत्पादन सुरू केले आहे पुण्यात हडपसर येथे श्री. बाळासाहेब आल्हाट यानी चाळीस जणाची सहकारी सस्था स्थापून ॲल्युमिनियम फर्निचर तयार करण्याची योजना आखली आहे त्यासाठी आल्हाट यानी स्वतःची जागा देऊ केली आहे. एम जी. सोनवणे हे या सर्व कामात सहकार्य करीत असतात

या प्रकारे उद्योग उभे रहात आहेत. त्याच्यात सुसूत्रता यावी यासाठी महिन्यातून एकदा विभागवार सर्वजण जमत असतात. परतु अद्याप मध्यवर्ती कार्यालय नसल्यामुळे स्टेशनजवळच्या 'सहार' हॉटेलचा कार्यालय म्हणून उपयोग होतो. इथच सर्वजण जमतात विचारविनिमय करतात. कामाला लागतात. जवळच सर्व शासकीय कार्यालये आहेत. भेटी गाठी होतात. अर्ज पत्रे देता येतात.

टेक्सास गायकवाड, प्रकाश रोकडे, सुभाष रोकडे, चितामण रोकडे, रमेश काबळे, प्रकाश खुडे, अविनाश आबेडकर असे जमतात अकरासाडे अकराची वेळ ही धावपळीची वेळ. पण 'सहार' मधली ही वेळ बुकोईची. कोपऱ्यातल्या एका टेबलावर कुठल्यातरी खेड्यातल्या दलित वस्तीच्या कायापालटाची योजना आकाराला येत असते...

□

भिगवणवरून परतायला खूपच उशीर झाला. रात्रीचे नऊ वाजले होते. मार्च महिना असूनही गारठा चागलाच होता. प्रकाश आणि सुभाष रोकडे एका गाडीवर व टेक्सास आणि मी एका गाडीवर. गप्पांचे विषय संपत नव्हते. रस्ता आणि वेळ खूप होता टेक्सास बोलत होता.

'आज आमचा समाज खूप शिकलाय. मोठमोठ्या पदावर एक-एकजण आहेत. डॉक्टर झालेत वकील, प्राध्यापक, उद्योगपती खासदार, मत्री सर्व काही आज मिळतय, पण खंत एकच आहे. सर्वजण बाबासाहेबांच्या विचाराना विसरलेत समाजाला विसरलेत. सर्वजण पैशाच्यामागे लागलेत. स्वतःवर अन्याय झाला की जातीची ढाल पुढे करायची. एरवी अन्याय, अत्याचार-पीडितासाठी काही करायचे नाव नाही. आश्वासनं खूप देत असतात. स्वतःची कार, बगला, स्टेटस, गोरी बायको, पप्पा-मम्मी म्हणणारी मुलं याच्यातच रमणारी. घरात उची फर्निचर आणि कोपऱ्यात शोभेच्या वस्तूमध्ये भगवान बुद्धाची मूर्ती. बाबासाहेबाचा शोभिवत फोटो. एवढच यांच प्रेम ! काहीजणाना ही दोन प्रतीकसुद्धा जवळ बाळगायला लाज वाटते हे आमच्यातले सनातनी. ब्राह्मण्यान ग्रासलेले, समाजाचच रक्त पिऊन मोठे झालेले. अशाचा सताप येतो. समाजऋण, सामाजिकता, याचा लवलेशही याच्यात नसतो. याच्याकडे पँथर, आर. पी. आय, बुकोई, दलित रगभूमीचे कार्यकर्ते आलेले याना आवडत नाहीत. हे मोठ्या समारभाला येत नाहीत. याना जयतीच्या गर्दीची चीड असते. आपल्या आईबापांना विसरलेली ही औलाद समाजऋण काय मान्य करणार ? अशाच अधिकाऱ्याने एक रोटरी लायन सारखा क्लब स्थापन करायचा ठरविला होता. मी त्यावेळी त्याना म्हणालो, डॉ. आबेडकरानी ठरवल असत तर ज्ञानाच्या बळावर परदेशात राहून कोट्यवधी डॉलर त्यानी कमवले असते त्या पैशाच्या बळावर त्याच्या घराण्याच्या पुढच्या कित्येक पिढ्या फॉरेनमध्ये सुखान नादल्या असत्या. पण त्यानी तस केल नाही. त्याच्या त्यागावरच आज तुम्ही-आम्ही आहोत.

ब्राह्मणाचा सर्व द्वेष करतात. पण जरा निरीक्षण केलत तर अस दिसून येईल की परिस्थितीनुरूप हा समाज बदलत गेला. केवळ बौद्धिक बळावर हा समाज टिकून आहे. विद्येसाठी कोणत्याही प्रकारच्या हालअपेष्टा सहन करायला हा तयार असतो. या समाजात अनेक दुर्गुण आहेत पण त्याच्या सामाजिक त्यागाला तोड नाही. सतकाळात मी शिरत नाही. पण अलीकडच्या काळात एकापेक्षा एक अशी मोठी माणसे झालेली दिसतात.

दारिद्र्य, अवहेलना सोसूनही त्याच्या त्यागात सामाजिकतेत कुठ उणेपणा दिसत नाही. अनेक समाजसेवक त्याच्यात निर्माण झालेत. असख्य शिक्षक आहेत. महाराष्ट्र बँक ही अशाच ब्राह्मणाच्या सहकार्यातून आकाराला आली. किर्लोस्कर, पारखे, वैद्य अशासारख्या अनेकांना बँकेचा उपयोगं झाला. उद्योगपती निर्माण झाले. त्यानी ब्राह्मण समाजाला प्राधान्य दिल हात दिला सरकारी अवहेलनेच्या काळात या अशा खाजगी उद्योगानी, सस्थानी ब्राह्मण समाजाला जगवल. कोणतेही राजकीय बदल होऊ देत. त्याना कुणीही हात लावू शकणार नाही. केवळ ब्राह्मणाना शिव्या देऊन आपण मोठे कार्यकर्ते आहोत हे सिद्ध होणार नाही. या समाजाचा आजचा अभ्यास केला तर सर्व सामाजिक क्षेत्रात, वैचारिक क्षेत्रात, चळवळीतून तो आघाडीवर आहे.

'आज बुकोई उभी करताना हे सर्व डोळ्यासमोर आहे. द्वेषावर उभारलेल्या चळवळीना क्षणिक यश आणि प्रसिद्धी लाभते. अल्पकाळचा लाभ पदरात पडतो पण हे कुठवर चालायच ? म्हणून बुकोईची स्थापना केली. विधायक रचनात्मक कार्याशिवाय दलित समाजाची उन्नती होणे कठीण आहे. यापूर्वी कोणी प्रयत्न केल्याचे ऐकिवात नाही. स्वतत्ररीत्या खूप झाले. सामूहिक अर्थाने बुकोई बहुधा प्रथमच. महाराष्ट्रभर पँथरचे बोर्ड लागले, चळवळी झाल्या. पँथरमुळे आमच्या समाजाला एक नवा आत्मविश्वास मिळाला. जातीयवादी लोकांना धाक वाटू लागला. पण त्याचे रूपातर सामाजिक सुधारणासाठी झाल नाही. बुकोई ही नुसते फलक लावून संपणार काम नाही. उभं राहिल्यावरही त्याचे परिश्रम सपत नाहीत. दगड मारायला हजारो लोक जमा होतात. मात्र दगड उचलायला एखादाच येतो. आमची प्रसिद्धिमाध्यमं दगड मारणाऱ्यालाच प्रसिद्धी देतात. त्यामुळे कार्यकर्ते चटकन तिकडे आकर्षित होतात. बुकोई सारख्या ठिकाणी एक एक कार्यकर्ता मिळायला परिश्रम पडतात.'

### भेदांच्या पलीकडला समाज

बुकोईच्या अर्थवादासबधी बोलताना टेक्सास गायकवाड म्हणाले, 'आबेडकरवाद हाच आमच्या अर्थवादाचा पाया आहे आपल्या देशात मार्क्सचा विचार माडणारे दलाल खूप आहेत. सतत सप करून भाडवलदाराची चर्चा करून चार-दोन रुपये वाढविले की याचे काम झाले. सहकारी चळवळीत योग्य पद्धतीने कार्य केलं तर कामगार-मालक हा भेद, ही दरी सपून जाते. कर्मचारीच सभासद असल्यामुळे स्वत बरोबरच जनकल्याण साधले जाते. बाबासाहेबाच्या प्रत्येक कृतीत आणि प्रत्येक विचारात समाजाचा विचार आणि राष्ट्रवाद ओतप्रोत भरलेला आहे. रशिया, फ्रान्स किंवा अन्य ठिकाणी आज जशा रक्तरजित क्रात्या झाल्या, तशी क्राती करणं बाबासाहेबाना सहज शक्य होत. जीवावर उदार होणारा लाखोचा जनसमुदाय होता. पैसा पुरवणारे होते. परतु तशा प्रकारची क्राती त्याना अजिबात अभिप्रेत नव्हती सामाजिक परिवर्तनावर त्याचा विश्वास होता. महाड-नाशिकच्या सत्याग्रह संग्रामानतरही हिंदू समाज आपली भूमिका बदलत नाही, हे पाहिल्यावर ते सतापले. तरी तो सात्त्विक सताप होता. धर्मत्याग करताना त्यानी धर्मपरिवर्तन केले. या सस्कृतीशी नाते सागणारा बौद्ध धर्म स्वीकारला. या सर्वांमागे सपूर्ण समाजाचा, दलितेतर समाजाचाही विचार होता. राष्ट्रवादाचा विचार होता. सर्व भेदाच्या पलीकडचा समाज त्याना अभिप्रेत होता. त्यामुळे आबेडकरी विचार हा शुद्ध भारतीय विचार आहे आणि बुकोईच्या अर्थवादाचा तोच पाया आहे.'

'सध्याची भ्रष्टाचाराची समस्या इतकी खोलवर मुरली आहे की अशा परिस्थितीत बुकोई आपला मार्ग कसा काढणार ?' या प्रश्नांवर टेक्सासनी गाडीचा वेग कमी केला आणि त्याचा आवाज उंचावला 'एक तर ही सहकारी चळवळ आहे. तिला स्वत ची अशी हिशोबाची पद्धत आहे. कायदे आहेत. त्याच ऑडिट होत असत. अडाणी माणस कायद्याला घाबरतात. शहाणी माणसं अब्रूला जपतात. परतु अशा ही परिस्थितीत लोकांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन एखादा स्वार्थी कार्यकर्ता आपल्या गरीब बाधवाना लुटण्याचा प्रयत्न करतो. असं लक्षात आल्यावर त्याला अद्दल घडविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. दलित चळवळीतले हे पहिलेच उदाहरण असेल. आमच्यातलाच एक कार्यकर्ता शिंदे यानी गरीब बाधवाना फसविले आहे असे अनेकानी आमच्याकडे लेखी तक्रारी करून कळविले. त्याची चौकशी करून त्याला अनेकवार सूचना करूनही त्याने धाक-दडपशाहीचा अवलंब केला. अशा कार्यकर्त्याची चळवळीने, समाजाने बिलकुल गय करू नये.'

पेट्रोल भरण्यासाठी आम्ही पेट्रोलपपावर थाबलो. थोडे पाय मोकळे झाल्यावर आम्ही पुण्याकडे निघालो. टेक्सास आपणहूनच म्हणाला, 'महाराष्ट्राबाहेरही आता बुकोईचा विचार जाऊ लागला आहे. डॉ. बाबासाहेबांची चळवळ महाराष्ट्राबाहेर इतर जातीत पसरलेली आहे. सर्व प्रकारच्या जातीचे कार्यकर्ते आहेत. महाराष्ट्रात बाबासाहेब ज्या जातीत जन्मले, त्या जातीपुरतेच कार्य मर्यादित झाले. याच कारण त्या जातीतली तथाकथित नेते मडळी पढरपूरच्या बडव्यासारखे बडवेगिरी करण्याचा प्रयत्न करतात आणि म्हणून विशिष्ट जातीपुरते चित्र महाराष्ट्र दिसते हा नेतृत्वाचा वाद आहे. जर का हे चित्र बदलायचे असेल तर महारेतराच्यातील लायक दलित समाजातील माणसाच्या हाती दलित चळवळीच नेतृत्व द्यायला हव. त्यासाठी तशा कार्यकर्त्यांना सधी द्यायला हवी. मागे एकदा मा. दत्तोपंत ठेंगडी याच्या बरोबर चर्चेचा योग आला होता. त्यावेळी त्यांनी बाबासाहेबाचा एक विचार सागितला. बाबासाहेब म्हणाले होते. 'महाराष्ट्रात महार समाज दलितात जास्त आहे. तो बहुसख्याकाच्या वृत्तीने इतर मागास जातींवर अन्याय करू पहातोय अस दिसू लागल तर मी महाराच्या विरुद्ध त्याच्या बाजूने उभा राहीन.' या बाबासाहेबाच्या विचाराचा त्यांना मानणाऱ्यानी विचार करावा. आणि दलित चळवळीला व्यापक रूप द्याव. आबेडकरी चळवळीत इतर मागास, भटके, विमुक्ताना भरपूर प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याची गरज आहे.

'रिडल्स सबंधी बोलायचं झाल तर सर्व दलित चळवळ एक झाल्यासारखी दिसते. याप्रकरणी प्रतिकाचा किंवा अस्मितेच्या भावनाचा गैरवापर करण्यात आला जी माणस 'रिडल्स' प्रकरणी विरोधी भूमिकेतून मोर्चे काढत होती ती समाजाच्या भावना भडकविण्यासाठी त्याचा वापर करताना दिसत

होती. आपल नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी हे सर्व राजकारण होत. मराठा महासघानं कोणती सामाजिक चळवळ उभारली आहे ? कोणत सामाजिक कार्य हाती घेतलं आहे ? त्यांचे नेते श्री. शशिकात पवार यांनी या बाबतीत संपूर्ण हिंदू समाजाचा, त्यातील सामाजिक स्थित्यतराचा, डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचा, चळवळीचा अभ्यास न करताच भावना भडकविणारी विधानं केली. बाळासाहेब ठाकरे यानी प्रथम आपल्या वडिलाच्याच ग्रंथांची होळी करणे आवश्यक आहे. गेल्या हजारो वर्षांतील अत्याचाराकडे नजर टाकल्यावर 'तेव्हा कुठ गेला होता तुझा धर्म' असा प्रश्न याना विचारावासा वाटतो. दुखावलेल्या समाजाला जवळ करण्याऐवजी त्यात दुफळी माजवून स्वतःच्या राजकारणाची पोळी भाजणाऱ्या या राजकारणी मंडळीचा हा प्रकार निंद्य आहे. आणि तो दलित चळवळीतल्या नेत्यानी सयमाने हाणून पाडला. त्यावेळी हिंदुसमाजही दलित चळवळीच्या बाजूने उभा राहिला, हे दृश्य खूपच चागले आहे. बुकोईच्या बाबतीत बोलायचे झाले तर आम्हाला समाजात दुही माजवायची नसून एकोपा निर्माण करायचा आहे. अशा प्रकारे हजारो वर्षे जरी मोर्चे काढले, निवडणुका लढविल्या तरी समाजात काही बदल होणार नाही म्हणून आबेडकरी विचाराच्या आधारानेच मूलभूत सामाजिक सुधारणा घडवून आणायला हव्यात. हिंदू समाजही आता सुधारू लागला आहे. त्याचाही विचार आणि भान ठेवायला हवे. सपूर्ण दलित समाज आर्थिक, सामाजिक, आणि सास्कृतिकदृष्ट्या बलशाली करण्यासाठी सहकार–सघटन–सयम आणि त्यागाची आवश्यकता आहे. तो 'निर्माण करण्याकरता प्रयत्न चालू आहेत.

आज खासदार विखे पाटील अशा सारख्याचा आम्हाला काही प्रमाणात उपयोग होत आहे. मा. दत्तोपत ठेंगडी सारखे विचारवंत आमच्या प्रयत्नाचे कौतुक करतात. मत्री श्री सुशीलकुमार शिंदे याचे आम्हाला सर्व प्रकारचे सहकार्य असते. सर्वश्री दिलीप नागरकट्टी, मधुसूदन जोशी, तरुण भारतचे गोपाळराव बुधकर, किशोर पंप्सचे भाईसाहेब देसाई, प्रल्हाद जाधव, कार्पोरेटर अशोक कदम, सखाराम डोळस, मिटकॉनचे रानडे, दिलीप रायसोनी, शाताराम दिवेकर, शेरूबाबा इराणी, प्रतापराव बोर्डे, माझ्या सासूबाई कुसुमताई आडकर यांची मैत्रीण वसुधाबाई गोडबोले. असे असंख्य मान्यवर सतत बुकोईला सहकार्य करीत असतात. कोणतीही अपेक्षा न करता ही मडळी सहकार्य करतात. '

'बुकोई दलित चळवळीला एक नवी दिशा देत आहे असं म्हणत असतानाही बुकोईचे प्रकल्प अजून आकाराला येत नाहीत, किंवा काहीसे अपयशी होताहेत अस वाटत नाही का ? ' या प्रश्नावर टेक्सास किंचित शात झाला आणि म्हणाला, 'आम्ही काही फार मोठ करीत आहोत असा आमचा दावा मुळीच नाही. आमच्यातच आमच्या अपयशाची बीज असतात. त्यात भावकीतले, कार्यकर्त्यांतले वाद हे मुख्य कारण असतं. परतु बुकोईतल्या प्रकल्पाच्या बाबतीत अस झालेल नाही कुठे नियोजन चुकल, कुठे घाई झाली, कुठे सामाजिक अत्याचार आड आला. कुठे शासनाची धोरण, लालफितीमुळे कामे रेंगाळली शिवाय आमची आत्ताशी कुठे सुरुवात आहे. शिकत शिकत आम्ही सुधारणा करीत आहोत. कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खचेल अस अपयश आम्हांला आलंय असं वाटत नाही. उलट कामाला गतीच येत आहे, आकार यायला वेळ लागेल.'

पुण अजून लाबच होत विषय चालूच होते. मध्येच टेक्सासमधला कलाकार जागा झाला. गार प्रसन्न वाऱ्यात अधाऱ्या शात रस्त्यावर भरधाव जात असताना तो मुकेश-मन्नाडे-हेमंतकुमाराची गाणी अधूनमधून ऐकवत होता

ऐ मेरे प्यारे वतन ...... तुझपे दिल कुर्बां ...
या दिलकी सुनो ये दुनियावालो......

रात्रीच्या अंधारात वेगाने जात असताना हळूहळू पहाट होत आली होती. गर्द झाडीमधून पक्ष्याचा चिवचिवाट मन प्रसन्न करीत होता. क्षितिजावर केशरी-भगवी सोनेरी प्रभा उमटू लागली होती मनात एक प्रकारची असीम कार्यप्रवण शातता भरून आली होती.

सगणक युगात प्रवेश करायचा तर सर्व आघाड्यावर सपूर्ण माहिती, साधने याच्या तयारीनिशी वेगाने कार्य करायला हवे. देशप्रेमाने समाजप्रेमाने कणनूकण भरून गतिमान व्हायला हवा... स्वयप्रकाशी व्हायला हवा.

काही दिवसापूर्वीचा एक प्रसंग मला आठवला ग्रामायनच्या निमगाव म्हाळुगीच्या सहकारी शेतीवरच्या कार्यक्रमाला डॉ. आबेडकराचे नातू प्रकाशराव आले होते. त्यावेळी ते म्हणाले, ' याप्रमाणे दलित कार्यकर्त्यांनी एक-एक गाव निवडून आज खेड्यापाड्यांतून असे पाय रोवून झोकून कार्य केलं तर सामाजिक क्राती होऊन समर्थ भारताचं, समर्थ दलित समाजाच बाबासाहेबाच स्वप्न लवकरच साकार झालेल दिसेल... '

आणि आज खरोखरच अनेक ठिकाणी दलित वस्त्यामधून असे अकूर, तणारे-धुमारे फुटून बाहेर येत आहेत. भविष्यात तयाचा वेलू गगनावेरी गेलेला असेल. आणि आबेडकरी चळवळीने एक नवे रूप धारण केलेले असेल रचनात्मक सामाजिक क्रातीचे ! □

---


**मावळी खेड्यातील स्वयंरोजगार प्रकल्प**

# प्रबोधन दुग्धालय

**पुणेभर घरपोच दूधपिशवी पुरवितो.**

**चक्का, – श्रीखंड – मागणीप्रमाणे पुरवितो.**

**संपर्क : *प्रा. राम डिंबळे*,**

**१९०१७, नवी पेठ, शास्त्री मार्ग, पुणे ३०**


---

# गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानचा कोकण विकासामधील सहभाग

## संजय कोचरेकर

भारतात व महाराष्ट्रात विपुल पर्जन्य-मानाचे काही भाग्यवान भूप्रदेश आहेत त्यात कोकणचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागेल. पश्चिमेची सुमारे सहाशे किलोमीटरची विस्तीर्ण किनारपट्टी आणि ५००० मि. मि. पर्जन्यमानामुळे महाराष्ट्रातील एकूण जल-संपत्तीपैकी ४० टक्के जलसंपत्ती असणाऱ्या या भूप्रदेशात पावसाळा जातो न जातो तोच पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे.

एकेकाळचा दाट वनश्रीने आच्छादलेला, फळाफुलांनी डवरलेला समृद्ध कोकण आज अक्षरशः उजाड होण्याच्या मार्गावर आहे. हे होण्याचे कारण जसे कोकण-विकासासाठी राबविलेले चुकीचे नियोजन आहे, तसेच येथील माणूसही.

कोकणातला माणूस वर्षानुवर्षे कोकण सोडून मुंबई व अन्यत्र स्थलांतरित होत आहे. स्थलांतरित झालेली ही माणसे कोकणात परत येण्याचे नाकारतात. परिणामी कोकणातील चैतन्य हरवले आहे. सद्यःस्थितीत कोकणातील कोणत्याही घरात डोकावून पाहिल्यास काय दिसेल, घरात एखादा वृद्ध किंवा एखादीच वृद्धा, तरुण स्त्री, छोटी मुले एवढाच काय तो परिवार आणि त्या परिवाराला उदरनिर्वाहाचं साधन काय तर चाकरमान्यांची दर महिन्याला येणारी एखादी मनिऑर्डर. आज ती मनि-ऑर्डर मिळणेसुद्धा मुष्कील झाले आहे. कारण चाकरमान्याच्या पगारात त्याला स्वतःला जगणे अशक्य झाले आहे तर तो कोकणातील बायकामुलांना तरी पैसे कसे पाठवील ?

कोकणातील निसर्गासोबतच कोकणच्या माणसांचीही अधोगती होत आहे. ही क्रिया आजची नसून ब्रिटिश भारतात आल्यापासून घडत आहे व ते अद्यापही कोणी थांबवायचा प्रयत्न केलेला दिसत नाही. सरकारची तर कोकणाकडे पाहण्याची भूमिका निव्वळ बघ्याची आहे आणि कोकणी माणूस तर कोकणात काही प्रगती होऊ शकणार नाही, यावर ठाम आहे.

यातून मार्ग काढून कोकणची प्रगती साधणे तसे फारसे कठीण नाही. अर्थात त्यासाठी सरकारी कार्यक्रम लोकांच्या सहकार्याने हाताळणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची गरज आहे.

सुदैवाने कोकणात आज अनेक सेवाभावी संस्था कोकणविकास कार्यात महत्त्वपूर्ण सह-योग देत आहेत. ' गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठान ' ही त्यांपैकीच एक. आज सामाजिक आर्थिक अंगाने वाटचाल करीत असलेल्या गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानचा प्रारंभ सांस्कृतिक कार्या-पासून झाला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पिंगुळी गावातील वास्तव्य करून असलेल्या ठाकर या भटक्या जमातीकडे चित्रकथी आणि कळसूत्री बाहुल्यांच्या खेळाचा संपन्न वारसा आहे.

गेल्या काही वर्षांत कोकणातील माणसे पोटापाण्याच्या शोधार्थ देशोधडीला लागली. त्यातून ही जमातही वाचू शकली नाही परि-णामी एके काळची ही कला व त्यावर उप-जीविका करणारी जमातही अस्तंगत होण्याच्या मार्गाला लागली. या कलेचे पुनरुज्जीवन व व संगोपन करून नव्या काळाला अनुरूप असा काही नवा संदर्भ या कलेला द्यावा या हेतूने गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानने या कलेचे संगोपन, संवर्धन व पुनरुज्जीवनाचे कार्य स्वीकारले आहे.

### पिंगुळीची लोककला--चित्रकथी

पिंगुळी परिसरातील ठाकर जमातीने व्रतस्थपणे जोपासलेल्या या कलेचा परिचय वाचकास खचितच आवडेल. पिंगुळीची लोक-कला महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्याही सांस्कृतिक इतिहासातील एक सुवर्णपान आहे. शिवकालीन समाजात संतसंप्रदायाची उज्ज्वल परंपरा घरोघरी पोहोचविण्याचे महत्कार्य या लोककलेने समर्थपणे पार पाडले. आज काळाचे संदर्भ बदललेले आहेत तरीही या लोककलेचे महत्त्व थोडेसुद्धा कमी झालेले नाही, तर ही लोककला ग्रामीण भागात प्रसार व प्रचाराचे दृकश्राव्य माध्यम म्हणून समर्थ-पणे कार्य करीत आहे. गोकुळ प्रकल्प प्रति-ष्ठानने आजवर या माध्यमातून अनेक प्रश्न खेड्यातील माणसापर्यंत पोहोचविले आहेत.

महाराष्ट्राचा हा मौलिक ठेवा अगदीच उपेक्षित राहिला नसून गेल्या दहा वर्षांत अधून मधून सातत्याने प्रकाशात येत आहे. प्रथम मुंबई येथे निवडक ठिकाणी ( एन.सी. पी.ए., साहित्य मंदिर, छबिलदास इ. ) नमुनेवजा प्रयोगातून तिचा बोलबाला झाला. त्यानंतर महाराष्ट्र सरकारच्या कॅलेंडरवर येथील चित्रे झळकली. पुढे लागोपाठ टेलि-व्हीजन व फिल्म डिव्हिजनच्या माहितीपटा-द्वारे ती देशात सर्वत्र प्रदर्शित झाली. श्री. मणी कौल यांनी बनविलेली ' चित्रकथी ' या लघु-पटास आंतरराष्ट्रीय पारितोषिक मिळाले तेव्हा परदेशात सुद्धा या कला पोहोचल्या. त्याचबरोबर डॉ. सेटमल, प्रो. हेलस्टीन इत्यादी विदेशी संशोधकांनी त्यावर निबंध लिहून या लोककलेचे महत्त्व व स्वतंत्रता

सिद्ध केली आहे.

या कलेच्या सर्वांगीण विकासाबरोबरच या या कलेवर उपजीविका करणाऱ्या ठाकर या जमातीचे पुनर्वसन करण्याचेही उद्दिष्ट होते. गेल्या दहा वर्षांत या सस्थेने बरेच कार्य केले आहे. प्रसिद्धीबरोबरच थोडाफार आर्थिक लाभही या कलाप्रकाराच्या लोककलावतास होत आहे

येथील कला आणि कलाकाराचे प्रश्न ही सस्था विविध संदर्भात माडत आहे. त्यातून सगीत नाटक अकादमीचा एक वर्षाचा प्रशिक्षण वर्ग येथे झाला.

*अखिल भारतीय हस्तशिल्प* बोर्डाने चर्म-चित्राच्या निर्मितीबाबत योजना राबवली. तरुण लोककलावताची उपक्रमशीलता वाढविण्यासाठी भारत सरकार ( शिक्षण खाते ) याजकडून पुरस्कार मिळाला. दोन बालकलाकारांस राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती व एका ज्येष्ठ कलाकारास राष्ट्रीय फेलोशिप मिळाली आहे. आज या कलेच्या सगोपन व पुनरुज्जीवनासाठी महाराष्ट्र सरकारचे कलासचालनालय मदत करते आहे. हे सहाय्य जरी विविधागी असले तरी त्यातून लोककलावताचे मूलभूत प्रश्न सुटलेले नाहीत त्यापैकी काही प्रश्न असे आहेत १) जुन्या कलाकाराचा चरितार्थ २) कलाप्रकाराचे सगोपन व पुनरुज्जीवन ३) कलासाधनाचे संगोपन, प्रदर्शन व निर्मिती ४) एकूण कलाप्रकारांची मौलिकता दाखवून देणारे दृक्‌श्राव्य माध्यम.

वरील प्रश्नाचा सस्था सतत पाठपुरावा करीत आहे सरकारने या प्रश्नाची दखल न घेतल्यास महाराष्ट्राचा हा सास्कृतिक वारसा काळाआड जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## कुवे येथील आश्रमशाळा

भटक्या-विमुक्त जाती–जमातीचा मोठा समाज आपल्या महाराष्ट्रात विखुरलेला आहे. कोकणही याला अपवाद नाही. गोंधळी, सरोदे, गोसावी, जोशी, वडार, ठाकर इ. अनेक भटक्या जमाती कोकणात आजही त्याचे पारंपरिक भटके जीवन जगत आहेत या जमातीना ना घर, ना गाव कुठेतरी पालं ठोकायची आणि परंपरागत व्यवसाय करीत या गावातून दुसऱ्या गावात भटकत फिरायचे. खरे तर आमच्या अत्याधुनिक जगात अनेक उपजीविकेची साधने उपलब्ध असताना त्याना भटके जीवन जगायला लागावे, हे आपणास लाच्छनास्पद आहे. सरकार भटक्या व विमुक्त जमातीतील लोकासाठी अनेक योजना राबवीत असते. भटक्या विमुक्त जाती जमातीतील मुलासाठी निवासी आश्रमशाळा हा त्या योजनेतील एक भाग.

कुवे येथील आश्रमशाळा सुरू होण्यापूर्वी १९७३ सालापासून लाजे व मडणगड येथे अशा आश्रमशाळा चालू होत्या. परतु काही कारणास्तव या आश्रमशाळेच्या सचालकाना त्या बद कराव्या लागल्या. १९८१ सालात तर या आश्रमशाळा पूर्णपणे बद पडल्या व अनेक मुलाना शिक्षणाची पुढची दारे बद झाली. तेंव्हा स्थानिक कार्यकर्त्यांनी ही गोष्ट *सस्थेच्या अध्यक्षाच्या कानावर घातली*

सस्थेच्या विकास कार्यक्रमात दुर्बल घटकाचे पुनर्वसन हे उद्दिष्ट असल्याने सस्थेने आश्रमशाळेची जबाबदारी स्वीकारली. त्यानुसार सस्थेने कुवे ता. लाजा येथे आश्रमशाळा चालविलेली आहे. या शाळेत १ ली ते १० पर्यंतची मुले शिक्षण घेत आहेत यात प्रामुख्याने भटक्या व विमुक्त जाती–जमातीची मुले आहेत या शाळेत शालेय शिक्षणाबरोबरच शेती, नर्सरी, ग्रामीण उद्योग, ग्रामीण तत्रज्ञान इत्यादींची जोड देत आहे. शाळेतून शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना नोकरीच्या शोधार्थ गाव सोडून जाव लागू नये, त्याना स्थानिक पातळीवरच उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध व्हावे, हा यामागील सस्थेचा दृष्टिकोण आहे.

शिक्षणदानाप्रमाणेच स्थानिक तरुणास स्थानिक भागातच व्यवसाय उपलब्ध व्हावा यासाठी सस्था व्यावसायिक मार्गदर्शन व स्वयरोजगाराची उपलब्धता करून देत आहे.

या सर्वच कार्यक्रमाना फुटकळ प्रयत्न म्हणत आहे. कारण गोकुळ प्रतिष्ठानची मूळ सकल्पना 'गावचे गोकुळ करणे' ही आहे. गावाचे गोकुळ म्हणजेच गाव नियोजन करणे होय

खेड्यात–पर्यायाने देशात समृद्धी आणावयाची झाल्यास खेडेगावची विस्कळित झालेली घडी पुन्हा बसविणे भाग आहे त्यासाठी प्रत्येक गावाचे सर्वंकष नियोजन आवश्यक ठरते. आजचे दुर्लक्षित खेडे पुन्हा स्वावलबी करावयाचे झाल्यास खेडेगावाच्या मूलस्रोतापासूनच सुरुवात केली पाहिजे.

गेली दहा वर्षे संस्था या ना त्या तऱ्हेने खेड्याच्या नियोजनाचा सर्वांगीण अभ्यास करीत आहे. आजवरच्या अभ्यासातून सस्था गावनियोजन करण्याबाबत ठाम भूमिका घेत आहे.

अर्थात भारतात लक्षावधी खेडी आहेत. व त्या सर्वच खेड्यांचे नियोजन करणे केवळ अशक्य आहे, असेच वाटेल परतु गोकुळ प्रतिष्ठानने रत्नागिरी जिल्ह्यातील पाणलोट क्रमाक डब्ल्यू एफ. ६५ मधील ४० गावाचे गावनियोजन करून महाराष्ट्रात एका आदर्श ग्रामनियोजन संस्थेची (ॲग्रोव्हील ) उभारणी केली आहे

रत्नागिरी जिल्ह्यातील पाणलोट क्रमाक डब्लू. एफ. ६५ मधील मौजे. विल्ये. ता. जि. रत्नागिरी येथे महाराष्ट्रातील पहिलीच *तात्रिक व शास्त्रीय पायावरील योजना सन* १९८२ पासून राबविली जात आहे. सदरच्या योजनेच्या अमलबजावणीचे काम व योजना बनविण्याचे काम गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानने एक राष्ट्रीय काम समजून स्वत.च्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून हाती घेतले आहे त्यानुसार चाळीस गावाचे 'विकास आराखडे' व गावनियोजनाचे कार्य सदर संस्था करीत आहे.

गाव नियोजन सस्थेच्या उभारणीतील अनेक हेतूपैकी एक प्रमुख हेतू म्हणजे गाव विकासासाठी सुयोग्य तत्रज्ञानाची जोड मिळवून देणे. त्यादृष्टीने सस्थेने या परिसरात आवश्यक त्या ग्रामीण तत्रज्ञानाच्या पूर्णवेळ अशकालीन सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचप्रमाणे शेतीविषयक आधुनिक तत्राचा वापर तळागाळातील लोकाप्रत पोहोचविण्यासाठी एका विभागाची उभारणी करण्यात आली आहे. त्यात शेती व फलोद्यान तज्ज्ञाचा समावेश आहे. शास्त्रशुद्ध पद्धतीने शेतीची आखणी, फलोद्यान करण्याबाबत मार्गदर्शन व शेती सामग्रीची उपलब्धता व उपयोग करण्याचे सहकार्य दिले जात आहे. फळबागासाठी तसेच वनीकरणासाठी जमिनीची योग्यता, पाण्याची आवश्यकता, झाडाच्या रोपाची निवड, रोपे तयार करणे, झाडाचे

सगोपन व सरंक्षण तसेच फळावरील प्रक्रिया व विक्रीबाबतचे मोलाचे सहाय्य व सहकार्य सस्था करीत आहे

शेतीविकासाबरोबर सुयोग्य तंत्रज्ञानाचे ग्रामीण विज्ञान केंद्र सस्थेने स्थापन केले आहे या केंद्रावर ग्रामोपयोगी विविध तंत्रज्ञानाचा प्रात्यक्षिक व प्रशिक्षण कार्यक्रम गावनियोजन सस्था आखत आहे त्यासाठी देशातील विविध संशोधन सस्था L. B. R. I., N. R. D. C., N. B. O. संस्था सहकार्य करीत आहेत

वरील सर्व विभागांची कामे गावनियोजन संस्था, 'गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठान'च्या वतीने करणार आहे. त्याचप्रमाणे निरनिराळया प्रकल्पाना ना नफा ना तोटा तत्त्वावर सेवा उपलब्ध करून देणार आहे

### कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण


ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना पूर्णवेळ व अर्ध वेळ समाज कार्यकर्त्यांची खूपच गरज भासत असते. व त्यासाठी ग्रामीण कार्यकर्त्यांनी प्रशिक्षण व कृतिसत्राद्वारे कार्यकर्त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते.

सस्थेच्या विकास कार्यक्रमात गावनियोजन सस्थेचे उद्दिष्ट असल्याने सस्थेस अनेक कार्यकर्ते आवश्यक असतात. आजवरच्या सेवाभावी सस्था यासाठी पदव्युत्तर अथवा पदविका धारण करणारे कार्यकर्ते नोकरीस ठेवत. गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानने मात्र ग्रामीण पातळीवरच कार्यकर्ते निर्माण करावयाचे ठरविले व त्यासाठी अनेक शिबिरे व कृतिसत्रे घेतली. त्यासाठी देशभरातील अनेक सस्थाचे मार्गदर्शन व सहकार्य घेतले आहे.

दि १९ नोव्हेंबर १९८५ ते ३० नोव्हेंबर ८५ या कालावधीत डेव्हलपमेंट ग्रुपचे अध्यक्ष डॉ. मधुसुदन साठे आणि त्या सस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री. ना. रा. पराजपे यानी पधरा दिवसाचे कृतिसत्र बोडचे येथे आयोजित केले होते. या कृतिसत्रात डॉ साठे यानी या प्रकल्पाची, सर्वांगीण विकासाची गाठ पाणी, माणूस आणि जमीन याच्या विकासासाठी कशी घातली आहे व गावाचे अशा तऱ्हेने नियोजन झाल्यास रोजगार हमी योजनेशी कशी सागड घालता येते, सामान्य माणसाला कसा लाभ मिळू शकतो, इंचइंच जमीन लागवडीखाली कोणत्या प्रकारे आणता येईल, याबाबतची सविस्तर माहिती विशद करून सागितली. फक्त पावसाचे पाणी काही प्रमाणात अडविले व त्याचा सुयोग्य वापर केला तरीही या कोकणचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल यावर संस्थेने चालविलेल्या प्रयत्नाचे त्यानी कौतुक केले. त्याचप्रमाणे दि. २२, २३, २४ जानेवारी ८६ या कालावधीत निवडक ग्रामीण कार्यकर्त्यांचा प्रशिक्षण मेळावा आयोजित केला होता या मेळाव्याचे उद्घाटन २२ जानेवारी रोजी सस्थेचे विश्वस्त श्री रहात युसूफ यांच्या हस्ते झाले. या प्रशिक्षण वर्गात भाग घेण्यासाठी निवडक अशी विल्ये परिसरातील बोडये, नारसिंगे, राई, मेढे, आगवे तरबळ ओरी खालगाव, देउड आणि लाजूळ या दहा गावांतून होतकरू तरुण कार्यकर्ते आले होते. या तीन दिवसांत एकूण पाच सत्रात अनेक विषय चर्चिले गेले. व्यक्तिविकासाबरोबर परिसरविकास, जमीन, पाणी व मनुष्य याचा सक्षम वापर, परिसराची भौगोलिक माहिती, गाव पातळीवर राबवण्यासारख्या योजनाची माहिती हे त्यापैकी काही.

या कृतिसत्राच्या समारोपाच्या सभेत कार्यकर्त्यांसाठी दहा महिन्याचे on the job training आयोजित करण्याचे जाहीर केले. ग्रामीण कार्यकर्त्यानि समाजाचे नेतृत्व करावे हाही एक विचार या शिबिरामागे होता. त्यादृष्टीने सस्थेने १० मे ते १८ मे ८६ या कालावधीत ग्रामीण युवक नेतृत्व शिबिराचे


Good Wishes From :



**Kishore Flour Mill**

**1537, Sadashiv Peth,**
**Tilak Road,**
**Pune 411 030**

**'फिनिक्स' म्हणजे**

**उत्तमोत्तम इंग्रजी-मराठी ग्रंथाचा छांदिष्ठ शिकारी!**

**फिनिक्स लायब्ररी**
सदाशिव पोस्टासमोर
पुणे ४११०३०

आयोजन केले होते.

या शिबिरात अगदी कमी शिकलेल्या युवकानाही समजेल अशा सोप्या सोप्या भाषेत पुढील गोष्टी समजावून देण्यात आल्या. शेतकी विकासाच्या संकल्पना, वैचारिक प्रबोधन, भिंती पत्रके तयार करणे, स्वतंत्र प्रोजेक्ट तयार करणे इ. बाबीचा त्यात समावेश होता. याच शिबिरात कृषि विज्ञान केंद्र शिरगाव यानी भाग घेऊन तरुणाना शेतीची नवनवीन तत्रे आत्मसात केल्यास शेतीचा आधुनिकतेने विकास कसा साधता येईल, याची प्रात्यक्षिके व स्लाईड शो दाखवून पटवून दिले.

कोकणात बुद्धी आहे. पण ती इतरत्र गहाण पडली आहे. ती जर मुक्त झाली तर हेच उपजत ज्ञान असलेले सवेदनशील युवक विकासाची चळवळ घराघरांतून पोचवू शकतील असे संस्थेस वाटते.

### संगणन शास्त्र

ग्रामीण विकास साधण्यासाठी सगणन शास्त्राचा सुयोग्य वापर करणे गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानला महत्त्वाचे वाटते. त्या दृष्टीने संस्थेने संगणन शास्त्राच्या अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्यासाठी कॉम्प्युटर अॅकेडमी कार्यान्वित केली आहे.

आज आपल्या देशात सगणक कर्मचाऱ्यांची मोठीच गरज निर्माण झाली आहे. सध्या सुमारे ४००० लघूत्तम सगणक वापराविना पडून आहेत. व त्याच्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. ही गरज भरून काढण्यासाठी येत्या काही वर्षात मोठ्या प्रमाणावर संगणक कर्मचारी निर्माण करावे लागतील. सध्या तरी सगणक शहरी भागात औद्योगीकरण व इतर कारणासाठी वापरला जात असला तरी पुढील काळात शेतीसाठीही सगणकाचा उपयोग करावा लागेल. अर्थात त्यासाठी ग्रामीण भागातही सगणक शास्त्राचे अध्ययावत प्रशिक्षण द्यावे लागेल असे सस्थेस वाटते.

रत्नागिरीतील कॉम्प्युटर अॅकेडमी हे त्या दृष्टीने उचललेले एक पाउल आहे. विकासाच्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या कोकणात गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठान या सस्थेचे कार्यकर्ते गेली अनेक वर्षे लोकजागृतीचे काम करीत आहेत. सस्थेच्या कार्याची ओळख करून देण्यासाठी व ग्रामीण विकासाच्या विचाराची देवाण-घेवाण करण्यासाठी स्वत.चे पत्रक हवे असे संस्थेला वाटले व त्यातूनच 'अभियान सिंधुगिरी' ह्या मुखपत्राची सुरुवात झाली.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन हजार गावाचे सपूर्ण आराखडे तयार करणे म्हणजेच 'अभियान सिंधुगिरी'. आपल्या देशाचे नियोजन जे केंद्रीय पातळीवर होते, ते राज्य स्तरावर व जिल्हा स्तरावर पोचावे अशी सकल्पना आहे खेड्याची विकासयोजना ही भारताची विकासयोजना व्हायला हवी. ही केवळ कोकणविकासाची हाक नसून सबध भारत देशाची आहे 'अभियान सिंधुगिरी' हा जसा रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विकासासबधी विचार आहे. तसाच तो सागर आणि सह्याद्री याच्या मधल्या भागाचाही विचार आहे. एवढेच नव्हे तर काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या विकासाचाही तो विचार आहे.

आज 'अभियान सिंधुगिरी' हे मासिक विकास पत्रकारितेतील मराठीतील एकमेव मासिक आहे. आजवर या मासिकास महाराष्ट्र शासनाचे विकासवार्ता पुरस्कार लागोपाठ दोनदा प्राप्त झाले आहेत.

अभियान सिंधुगिरीची चळवळ देशभर पसरविण्याची सस्थेची महत्त्वाकांक्षा आहे. □


आयुर्वेद रसशाळा पुणे उत्पादन

## रसदंती (दंतमंजन)

**दातांच्या पूर्ण आरोग्यासाठी सर्वत्र मिळते.**

**आयुर्वेद रसशाळा**
**२५ कर्वे रोड, पुणे ४११००४**

इंद्रधनुच्या सप्तरंगाची उधळण
अधिक खुलविणारा ........

## शॅशिन

**टी. व्ही. बूस्टर**

- उत्तम चित्र
- सुस्पष्ट आवाज
- मजबूत, आकर्षक, सुबक बाधणी
- कृष्णधवल व रंगीत दोन्हीसाठी
- तीन मॉडेल्स मध्ये उपलब्ध

**कौशिक एन्टरप्राईजेस**
१३।३८, भरतकुंज सोसायटी,
सीडीएस्एस्जवळ, एरंडवणा, पुणे ३८
फोन : ३८८८५

# तिसऱ्या जगतातील भारतासारख्या देशात राजकीय पक्षांची बांधणी कशी हवी?

**प्रा. आशा राजवाडे**

राजकीय पक्षांची मागास देशात काय भूमिका असावी याचा विचार क्रमप्राप्त ठरतो. अगोदर आपण हे पाहिलेच आहे की, काही अजाण आत्मे, बूर्ज्वावर्गाचे मेंबर निर्व्याजपणे सतत सांगत असतात की, मागास देशात खंबीर हाताने केलेली सत्ता, किंवा दुसऱ्या शब्दात हुकूमशाही ही आवश्यकताच आहे. आणि या दृष्टिकोणातून पक्षाला लोकांवर लक्ष ठेवण्याचे काम देण्यात येते. पक्ष पोलिसांचा व सत्तेचा हस्तक बनतो आणि लोकांवर पूर्ण नियंत्रण ठेवतो. अर्थात त्याचा हेतू, राज्यकारभात लोकांनी पूर्ण सक्रिय वाटा उचलावा हा नसून, आज्ञाधारकपणा व शिस्त याच गोष्टी सरकारला अभिप्रेत आहेत हे त्यांना समजावून सांगणे हा असतो. ती सुपरिचित हुकूमशाही, जी एक ऐतिहासिक गरज आहे असं तिचे समर्थक समजतात व स्वातंत्र्याच्या उदयाला आवश्यक असा तो उषःकालच आहे असं मानतात. ती हुकूमशाही म्हणजे बूर्ज्वा वर्गाच्या, प्रथम लोकांना बरोबर घेऊन व नंतर त्यांच्याविरुद्ध राज्यकारभार करण्याच्या निर्णयाची प्रत्यक्ष निशाणीच आहे. हळूहळू पक्षाचे हेरगिरी करणाऱ्या संस्थेत रूपांतर होत जाते. याचा अर्थ एवढाच की, सरकारचे स्व-संरक्षणात्मक पवित्रे वाढत आहेत. तो आकारहीन, सूत्रहीन, जनसमाज म्हणजे एक आंधळी शक्तीच होय. काही करून, एक तर गूढवादाच्या जोरावर अथवा पोलिसांच्या भीतीच्या जोरावर त्यांना स्वतःच्या नियंत्रणात ठेवणे ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट. पक्ष म्हणजे राजकीय दाब मोजण्याचे यंत्र व हेरगिरीचे साधन बनते. क्रांतिकारकाचे हेरात रूपांतर होते. खेड्यांविरुद्ध उघडण्यात आलेल्या शिक्षेच्या मोहिमेचा तो हस्तक बनतो. ज्या थोड्याबहुत रूपाला आलेले विरोधी पक्ष असतील ते दहशत, मारहाण, दगडफेक यांच्या साह्याने नेस्तनाबूत केले जातात. विरोधी पक्षकार्यकर्त्यांना, स्वतःच्या घरांना आगी लावलेल्या, नुसत्या पहाव्या लागतात. पोलिस चिथावण्या देऊ लागतात. या सर्व परिस्थितीत, पक्षाला आता कोणतेही आव्हान असू शकणार नाही, याबद्दल तुमची खात्री असू द्या. इतकेच नव्हे तर सरकारी शिक्कामोर्तब झालेल्या

उमेदवाराला ९९·९९ टक्के मते पडतात. आम्ही असेही म्हणतो की, आफ्रिकेमध्ये अनेक देशातील सरकारे याच पद्धतीने वागतात. लोकानी राज्यकारभाराचा अधिकाधिक वाटा उचलावा, आणि नफेखोर, शिष्ट, बूर्ज्वावर्गाचा बीमोड व्हावा असं साहजिकच लोकशाहीवादी व पुरोगामी विचारसरणीच्या विरोधी पक्षाना वाटत असते, त्यांना दंडुक्याच्या साह्याने व पुढे तुरुंगवास देऊन प्रथम निःशब्द केले जाते व नंतर तर त्यांना कुठे तरी लपूनछपूनच जगाव लागत

आफ्रिकेच्या अनेक भागातील राजकीय पक्ष आपले महत्त्व अवास्तव वाढवून बसलेले असतात. पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर लोक मेंढरासारखे गरीब होऊन बसतात व जरूर तर त्यानी चालवलेल्या सरकारवर स्तुतीचा वर्षाव करतात. पण संध्याकाळ झाली म्हणजे रस्त्यात, खेड्यापासून दूरवर कुठे तरी, नदीच्या काठावरील कॉफी गृहातून, लोकाची दारूण निराशा, वेदना व क्रोध बाहेर पडल्याशिवाय राहात नाहीत. ( आकाशात ढग जमू लागलेले असतात ) पक्ष, असतोषाच्या, विरोधाच्या सुराचे स्वागत करण्याऐवजी, कल्पनाची, विचाराची मुक्त देवाण-घेवाण हेच पक्षकार्याचे मुख्य उद्दिष्ट समजण्याऐवजी, स्वतःच एका जाड पडद्याप्रमाणे मधे उभा राहतो व प्राचीनकाळाकडे घेऊन जाते – अतर्विवाहाच्या काळाकडे. आणि जेव्हा असा अविचार दिसतो तेव्हा क्रोधापेक्षाही शरमेची भावना अधिक जागृत होते काय हे वैचारिक दारिद्र्य ! काय हा अधमपणा ! हे सत्ताधारी फार मोठे दगाबाज आहेत कारण ते सर्वांत प्रबल शत्रूला आपला देश विकतात केंद्रसत्तेचे जमातीकरण होते, प्रादेशिक ग्रहाना वाढवले जाते व विभाजनाच्या वृत्तीलाही. सर्व विकेंद्रीकरणाच्या प्रवृत्ती साहजिकच परत वर येतात व राष्ट्र मोडून पडते, त्याचे तुकडे तुकडे होतात. एके काळी आफ्रिकन एकतेचे वाहन करणारा व प्रत्यक्षात स्वतःच्या कुटुंबाच्या हितात दग असणारा नेता एक दिवशी उठतो आणि पाहतो तर त्याला चारी बाजूनी पाचसात जमातीनी घेरलेले असते. त्या प्रत्येक जमातीला आपल्या जमातीचे राजदूत, मत्री इ. सर्व पदाधिकारी हवे असतात, वस्तुस्थितीची, स्वत.च्या जबाबदारीची जाणीव नसलेला, मूर्ख व तिरस्करणीय असा हा नेता त्याच्या (राष्ट्रविरोधक) दगाबाजीवर टीका करतो. ( अशा तऱ्हेने जमातीय राजकारण सुरू होते, राष्ट्र बाजूलाच राहते ).

आम्ही आत्तापर्यंत अनेकदा आपले लक्ष नेत्याच्या हानिकारक सामर्थ्याकडे वेधले आहे याचे कारण अनेक विभागातून पक्षाची रचना एखाद्या टोळीप्रमाणे असते. सर्वात बेडर व्यक्ती टोळीची प्रमुख. असा

**"ज्या देशाला, इतिहासाने आपल्याला घातलेले प्रश्न सोडवायचे असतात, त्यांच्याजवळ अत्यंत नेकीचा राजकीय पक्ष असणे आवश्यक असते . . ."**

**'रेचेड ऑफ दि अर्थ' या फ्रांझ फॅनॉ यांच्या गाजलेल्या पुस्तकाचा प्रा. आशा राजवाडे ( इंग्रजीच्या प्राध्यापिका, अमरावती ) यांनी पूर्ण अनुवाद केला आहे; त्यातील एका प्रकरणातील हा काही भाग.**

कोणताही विचार उमटूच देत नाही. पक्षनेते हे साजंट अथवा मेजरप्रमाणे (उद्दामपणे) वागू लागू लागतात, लोकाना त्याच्या 'शांत राहण्याच्या' कर्तव्याची सारखी जाणीव देत हाच पक्ष पूर्वी स्वतःला लोकाचा सेवक म्हणवून घेत असे, लोकाच्या सर्व इच्छाना प्रकट करण्याची आपली जबाबदारी आहे असं मानत असे. ज्या क्षणी वसाहती सत्ता राज्यकारभार त्याच्या हातात सोपवतो, त्याक्षणी लोकाना त्याच्या मागासलेपणात परत धाडून देण्याच्या मागे लागतो. राष्ट्रीय एकतेच्या प्रश्नावरसुद्धा पक्ष अनेक चुका करतो. उदा, हा राष्ट्रीय पक्ष वाशिक भेदावर आधारलेला पक्ष असल्याप्रमाणे ( वशग्रहानी ) वागू लागतो. खरं तर एका जमातीचच एका पक्षात रूपातर झालेल आपल्याला दिसतं. हा पक्ष स्वतःच गर्जना करून सागत असतो की तो राष्ट्रीय पक्ष आहे, सर्व लोकाचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष आहे पण यातून मात्र, वाशिक हुकूमशाही स्थापण्याची त्याची कारवाई सुरू असते आता बूर्ज्वा हुकूमशाहीचा उदय आपल्याला दिसत नाही, तर, जमातीय हुकूमशाहीचा. मत्री, कॅबिनेटचे सभासद, राजकीय दूत, इतकेच काय स्थानिक कमिशनरसुद्धा एका विशिष्ट वाशिक समूहातून निवडले जातात. कधी कधी तर ते नेत्याच्या कुटुंबातलेच असतात. हे सत्तेचे कौटुंबिक एकीकरण, आपल्याला फार माणूस जेव्हा सत्तेवर येतो तेव्हा लोक आपापसात बोलताना, थोडयाशा कौतुकाच्या सुरात असं सागू लागतात की हा पाहुणाच्याच्या मनात भीती उत्पन्न करतो. हे सर्व धोके टाळण्याकरता रात्रदिवस डोळयात तेल घालून राहावयास पाहिजे हा लढा पक्षनेत्याच्या हातातले खेळणे न बनावे याकरता आहे 'लीडर' हा शब्द ( नेता हा शब्दही ) 'पुढे नेणे' अशा अर्थाच्या धातूपासून आला आहे. पण त्याचे फ्रेंच भाषातर बरेचदा हाकलणे अससुद्धा होते. असा हा मेंढपाळ–लोकाना वळवून नेणारा–आज अस्तित्वात नाही. लोक काही आता 'कळप' नाहीत व त्याना वळवण्याची मुळीच गरज नाही. जर नेता मला पुढे नेणार असेल तर मला त्याला हेही सागायचे आहे की, मी त्याला रस्ता दाखवतो आहे, राष्ट्रावर कुणा एकाची अधिसत्ता आम्हाला चालायला नको आहे ज्यावेळी नेते आजारी पडतात त्या त्या वेळी सरकारी गोटात केवढी घबराट निर्माण होते ते आम्ही अनेकदा पाहिले आहे. त्याना एका प्रश्नाने हादरवून सोडले असते की याच्यानतर कोण ? जर हा नाहीसा झाला तर देशाच काय होईल ? सत्ताधारी वर्ग, ज्यानी सर्व अस्मिता नेत्याच्या पायी वाहिलेली असते, जबाबदारीची जाणीव नसलेले, कशाचेही भान नसलेले, आणि स्वतःच्या चैनीच्यापलीकडे पाहात

नसणारे, सुखासीन आयुष्य, कॉकटेल पार्ट्या, सरकारी पैशावर इकडे तिकडे प्रवास, आणि विविध योजनातून त्याना होणारा अर्थलाभ, असा जीवनक्रम असणाऱ्या या लोकाच्या मनात केव्हा तरी आपल्या देशाच्या तात्त्विक, आत्मिक दारिद्र्याचे भूत डोकावल्याशिवाय राहात नाही. (पण तें तेवढ्यापुरतेच )

ज्या देशाला, इतिहासाने आपल्याला घातलेले प्रश्न खरोखरच सोडवायचे असतात व आपल्या देशातील केवळ शहराचाच नव्हे तर बुद्धीचा विकास घडवून आणायचा असतो, त्याच्याजवळ अत्यत नेकीचा राजकीय पक्ष असणे आवश्यक असते. सरकारच्या हातातील पक्ष हे एक साधन नाही. उलट ते लोकाच्या हातातील (स्व-आविष्काराचे) साधन आहे त्यानी सरकारची दिशा ठरवायची आहे. सरकारी प्रतिनिधी व काही मोठेमोठे लोक एकत्र भेटण्याचे पक्ष हे व्यासपीठ नाही. अनेकदा हे राजकीय वर्तुळ, म्हणजे केवळ राजधानीत कायम वसती करून राहिलेल्या काही पक्षसभासदांचेच असते. मागासलेल्या देशात, पक्षाच्या मुख्य कार्यकर्त्यांनी राजधानीला, जणू काही तिथे प्लेग पसरला आहे, अशा तऱ्हेने टाळले पाहिजे. काही अपवाद सोडले तर त्यानी खेडोपाडीच राहिले पाहिजे. शहरात सर्व कार्यांचे केंद्रीकरण होते ते टाळलेच पाहिजे. अगोदरच बेसुमार वाढलेल्या या शहरात राहण्याकरता पक्षाच्या शिस्तीची वगैरे कोणतीही सबब पुढे करता कामा नये तसे पाहिले तर इतर नऊदशांश लोकाच्या मानाने शहराचा कितीतरी पटीने (जास्त) विकास झालेला असतो. पक्षाचे जास्तीतजास्त विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. मृतवत् (निश्चेष्ट) असलेल्या विभागाना जिवत करण्याचा तो एकच मार्ग आहे. किंवा जे विभाग अजून जिवतपणाच्या, जागृतीच्या बिंदूपर्यंत आलेलेच नाहीत त्याना जाग करण्याचाही.

## राजधानी : राक्षसी महानगरी

प्रत्यक्षात, प्रत्येक विभागातून पक्षाचा एकतरी नेता राहील ज्याचे राजकीय वर्तुळाशी सबध असतील, पण तो कधीही त्या विभागाचा मुख्य म्हणून नेमला जायला नको. त्याला काहीही प्रत्यक्ष अधिकार नको. विभागीय कार्यकर्ता म्हणजे जास्तीतजास्त अधिकार असलेला (admn.) अधिकारी असं मुळीच नव्हे. आपल्या पदाच्याजोरावर त्याला नैसर्गिकतः काहीही अधिकार मिळायला नको. लोकाच्या दृष्टीने, पक्ष हे अधिकाराचे केद्र नाही, उलट लोकानी आपले अधिकार व्यक्त करण्याचे, तसेच आपल्या इच्छा, आकाक्षा व्यक्त करण्याचे एक साधन आहे. इथे अधिकार, सत्ता याबद्दल जितका कमी गोंधळ असेल तितका पक्ष मार्गदर्शनाच्या कामात अग्रेसर राहील आणि लोकाना त्याबद्दल अधिक विश्वास वाटेल. जर का पक्ष सरकारमधे मिसळला गेला तर, पक्षात क्रातिकारक असणारी म्हणजे स्वार्थासाठी सर्वांत जवळचा रस्ता घेणारी सरकारात अधिकाराची जागा घेऊन बसणारी व्यक्ती होईल. हा सोपान वरवर चढत जायचे, अधिकाधिक महत्त्वाच्या जागा घ्यायच्या व थोडक्यात आपले करिअर सुरक्षित ठेवायचे.

मागासलेल्या देशात, अशा प्रकारे खेडोपाडी पक्षाची केंद्रस्थाने उघडली गेली तर ज्यायोगे शहराकडे लोकाची बेसुमार गर्दी होते व जड होऊन शहरे कोसळायच्या बेतात येतात ती (शहरीकरणाची) प्रक्रिया पूर्ण थाबते. ज्या देशाला खरोखरच प्रगती करावयाची आहे, त्याच्याकरिता, सुरुवातीपासूनच, स्वातत्र्यानतर लगेच, ठिकठिकाणी विभागीय कचेऱ्या उघडल्या पाहिजेत, लोकाना जाग केलं पाहिजे, त्याच्यात क्रातीची फुकर घातली पाहिजे, त्याच्या जाणिवा हालवून सोडल्या पाहिजेत, हे सगळं केलच पाहिजे. नाहीतर होत काय, सरकारी अधिकारी व पक्षकार्यकर्ते नेत्याभोवती कोंडाळं करून बसतात. सरकारी सेवा प्रतिदिनी वाढत जातात, कारण खरोखरंच त्याची आवश्यकता निर्माण झालेली असते अस नाही तर नित्य नव्या नातेवाईकांना आणि जहाल पक्षसभासदानाही नवीन कुरणे द्यावीच लागतात. त्याना सरकार-दरबारी स्वत ला प्रवेश मिळवून घेण्याची दुर्दम्य इच्छा असते. प्रत्येक नागरिकाचे स्वप्न काय तर राजधानीत प्रवेश. आणि वाटल्या जाणाऱ्या मिष्टान्नात वाटा. गावे ओस पडू लागतात, बहुसंख्याक लोक-ज्यांना नेता उरलेलाच नसतो, त्याना काय कराव कुठे जावं हे कळत नाही. अडाणी, कुणाच पाठबळ, नसलेले, असे आपल्या ओस पडलेल्या शेताकडे पाठी फिरवतात व शहराच्या उपनरात येऊन एकच गर्दी करतात. आणि प्रोलेटरिएटची सख्या बेसुमार वाढवून ठेवतात. देशाच्या दुसऱ्या सघर्षाचा क्षण आता फारसा दूर नसतो. तो टाळण्याकरता आम्हाला असं वाटत की अगदी वेगळ्या प्रकारच धोरण नियोजन, आखायला हवं देशातील सर्वांत मागासलेल्या भागाला, आतल्या भागाला, जास्तीत जास्त सवलती आणि लाभ दिले गेले पाहिजेत. पुन्हा सरकारने राजधानी सोडून दुसऱ्या कोणत्या जागी आपला दरबार भरवायलासुद्धा काहीच हरकत नाही. राजधानी भोवतालचे आकर्षणाचे वलयच नाहीसे केले पाहिजे व दूरवरच्या कान्याकोपऱ्यातल्या लोकाना हे जाणवल पाहिजे की सरकार त्याच आहे. त्यांच्याकरता राबतं आहे. या कल्पनेने ब्राझीलच्या सरकारने ब्राझिलिया स्थापण्याचा प्रयत्न केला रिओ डी जानीरो जणू मृत झाले. तो ब्राझिलियन लोकाचा एक अपमानच होता. पण दुर्दैवाने, ब्राझिलिया ही एकासारखीच दुसरी राजधानी झाली. पहिल्यासारखीच राक्षसी, महानगरी, फायदा म्हणायला एकच झाला की जगलामधून थेटपर्यंत रस्ता तयार केला गेला.

खरोखर, दुसरी राजधानी करण्याला विरोधी असं फारस कारण दिसत नाही. सरकार सर्वच्या सर्व एखाद्या मागास प्रदेशात नेण्याससुद्धा काहीच हरकत नाही. अविकसित देशाची राजधानी ही कल्पनाच मुळी व्यापारी असून वसाहती राज्याचा वारसा आहे. पण आपण या देशाचे नागरिक आहोत. ( सत्ताधारी नव्हे ) आणि म्हणून लोकाशी जास्तीत जास्त संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण राष्ट्रीय धोरण आखले पाहिजे. दुसऱ्या शब्दात हे लोकाच्या हिताकरता असणारे लोकाचे धोरण राहील. ज्या लोकानी देशाच्या स्वातत्र्याकरता कितीतरी हाल काढले आहेत, त्याच्याशी सबध तोडून चालणारच नाही. हे राष्ट्र उभ करण्याकरता, चांगल करण्याकरता हे लोक जीवापाड खपले आहेत..

आमच्या अधिकाऱ्यानी आणि तत्रज्ञानी स्वत.ला नकाशे, रूपरेखा, आकडेवारी यांच्या ढिगाऱ्यात पुरून घेता कामा नये. त्याची जागा लोकाच्या हृदयस्थानी असली पाहिजे. ज्या ज्या वेळी कुठे

आतल्या भागात जाण्याची भाषा निघते, त्यावेळी त्यानी तडकून चालणार नाही. आपल्या नवऱ्याना खेड्यातील बदली चुकवता आली नाही म्हणून त्याना बायका घटस्फोटाची धमकी देत आहेत, असं दृश्य दिसता कामा नये. या सगळ्याकरता राजकीय गोटाने मागासप्रदेशाला विशेष सन्मानाने वागवले पाहिजे. एकूण राष्ट्राच्या आयुष्यात, राजधानी या विषयाला फार थोडे महत्त्व दिले पाहिजे. वास्तविक ही राजधानी व तिथले कृत्रिम जीवन म्हणजे राष्ट्रपुरुषाच्या शरीरावरील एक नैसर्गिक ( रोगट ) अशी परपेशी वाढ आहे.

इथे पक्षाची रचना अशी केली पाहिजे की, केवळ लोकाशी सबंध असले म्हणजे झाले, अशी तृप्तीची भावना यायला नको. उलट, पक्ष हा लोकाचा एक प्रत्यक्ष आविष्कार असला पाहिजे. सरकारी *आज्ञा लोकांपर्यंत पोचवण्याच पक्ष हे माध्यम नसून, लोकाच्या इच्छाच,* हक्कांचं ते जिवंत प्रतीक आहे व अढळ सरक्षकसुद्धा. पक्षाची अशा प्रकारची बाधणी करायची असेल तर आपण पाश्चिमात्य, बूर्ज्वा, तुच्छतादर्शक वृत्ती, जी लोक स्वतः राज्यकारभार करू शकत नाहीत असं समजते, ती सोडून दिली पाहिजे. खरं तर, अनुभवावरून असं दिसतं की, *लोकाना सर्व गुंतागुंतीचे प्रश्नसुद्धा चागल्या तऱ्हेने समजतात* अल्जेरियन क्रातीचा सर्वाधिक लाभ हा की तिने अल्जेरियन बुद्धिवताना लोकाच्या जवळून संपर्कात आणले, त्याना त्यामुळे या लोकाच्या अफाट दारिद्र्याचे जसे दर्शन झाले तसेच, त्याच्या जाग्या होणाऱ्या जाणिवेचे, प्रगतीच्या प्रेरणेचेही जवळून दर्शन झाले. या अशिक्षित, अर्धपोटी अल्जेरियन लोकानी, सर्व स्त्रीपुरुषानी, जे शतकानुशतके अंधारात गाडलेले होते, त्यानी रणगाडे, विमाने, नापाम बॉंब, इतकच काय मानसिक युद्धतंत्राविरुद्ध सुद्धा लढा दिला आणि कमाल म्हणजे भ्रष्टाचार, ब्रेनवॉशिंग, दगाबाजी, आणि जनरल बेलोनीज याच्या राष्ट्रीय सैन्याविरुद्ध सुद्धा लढा दिला. यांनी, त्याच्यात लेचेपेचे, डगमगणारे लोक असूनही आणि उद्याचे हुकूमशहा असूनही टिकाव धरला. आणि ते असा टिकाव धरू शकले कारण या सात वर्षांच्या लढ्याने त्याना एका नव्याच विलक्षण विश्वाचे मार्ग दाखवले. त्याच्या स्वप्नातसुद्धा हे विश्व त्यानी कधी पाहिले नव्हते. पर्वतपठारात, भूमीखाली आज याचे दारूगोळ्याचे कारखाने धडधडत आहेत प्रत्येक पातळीवर लोकाच्या त्रिसमित्या काम करीत आहेत, स्थानिक नियोजनमडळ मोठ्या जमीनदारीचा प्रश्न हाताळत आहेत, आणि उद्याच्या अल्जेरियाच चित्र रेखत आहेत. एखादा मनुष्य प्रश्न समजावून घेण्याचे नाकारील, पण समित्या व मडळे तर प्रत्येक गोष्ट अत्यत शीघ्रगतीने समजावून घेत आहेत. हे तर उघड आहे की, फार कठीण, महाविद्यालयात वापरली जाणारी, अर्थशास्त्राची व कायद्याची परिभाषा जर तुम्ही वापरू लागाल तर लोकाना वरून कुणीतरी त्याच्यावर कारभार करायला पाहिजे हे तेव्हाच पटेल. पण रोजची व्यवहाराची भाषा जर तुम्ही वापरली, एकूण गोंधळ पसरवण्याची जर तुमची इच्छा नसली, लोकाना बरोबर घेऊन पळण्याची जर तुमची इच्छा असली तर हेही तुम्हाला समजेलच की लोकाना सर्व पटकन समजते, ते सगळे बारकावे भराभर शिकतात. जर का बुद्धिवादी केवळ तात्रिक परिभाषेला चिकटून राहत असतील तर निष्कर्ष एवढाच की, त्याना लोकाना अज्ञानातच ठेवायच आहे. या भाषेचं मुख्य काम काय ? बोलणाऱ्याची लोकाना फसवण्याची इच्छा लपवून ठेवणे, त्याना डावलण्याची इच्छा लपवून ठेवणे. दुर्बोध भाषेचा वापर म्हणजे तिच्या पाठीमागे असणाऱ्या पिळवणुकीच्या अर्थशास्त्रावर एक पडदा. लोकाचा स्वराज्याचा हक्क व त्याची मालमत्ता दोन्ही एकाचवेळी त्याच्याजवळून हिरावून घेतली जातात. जर लोकाना समजल पाहिजे अशी तुम्हाला तळमळ असेल तर प्रत्येक गोष्ट लोकाना समजावून सागता येते. आपल्याला त्याची गरज नाही असं तुम्हाला वाटत असेल आणि लोकाना अधिक गरीब करण्याकरता अस्तित्वात आलेल्या मर्यादित कंपन्याच्या कारभारात हे लोक उगीचच उडथळा निर्माण करतात असं जर तुम्हाला वाटत असेल तर प्रश्नाच स्वरूप अगदी उघड आहे.

जर तुम्हाला असं वाटत असेल की, लोकाना सामील न करून घेताही तुम्हाला देशाचा कारभार चालवता येतो, जर तुम्हाला असं वाटत असेल की त्याच्या केवळ अस्तित्वानेसुद्धा या खेळाचा विचका होतो आहे. एकतर ते त्याचा वेग मदावतात किंवा आपल्या अडाणीपणाने सर्व बिघडवून टाकतात, तर मग मुळीच विचार करू नका. लोकांना ( तुम्ही ) दूरच ठेवलं पाहिजे. आता वस्तुस्थिती अशी आहे की, *कारभारात लोकाना समाविष्ट केल्यानतर वेग मंदावला तर नाहीच उलट वाढतो.* आम्हा अल्जेरियन लोकाना, आमच्या स्वातत्र्य लढ्याच्या काळात, अनेक प्रश्न हाताळण्याच भाग्य लाभलं. काही खेडे विभागात तर, आमच्या राजकीय सैनिकी नेत्यांना कितीतरी अशा प्रश्नाना तोंड द्याव लागल, ज्याचे उपाय केवळ क्रांतिकारक होते. *त्यातली काही उदाहरणे आपण पाहू*

१९५६-५७ या काळात फ्रेंच वसाहती सत्तेने काही विभाग निषिद्ध म्हणून ठरवले होते. तेथील लोकांच्या हालचालींवर अनेक निर्बंध घालण्यात आले होते. तिथले शेतकरी, सरळ शहराना जाऊन आपल्याला लागणाऱ्या वस्तू आणू शकत नव्हते. या काळात अर्थातच दुकानदारानी भरमसाट नफे कमावले. चहा, कॉफी, साखर, तबाखू, मीठ इ. सर्व वस्तूच्या किमती बेसुमार वाढल्या. काळाबाजार पण होऊ लागला. जे शेतकरी पैशाच्या स्वरूपात किमती देऊ शकत नव्हते, त्यानी आपली पिके गहाण टाकली. दुसऱ्या शब्दात, जमीनच गहाण टाकली, त्यानतरच्या अवस्थेत वाडवडिलापासून आलेल्या जमिनी ते त्या दुकानदाराकरता कसू लागले. ज्या क्षणी ( राजकीय ) जिल्हाधिकाऱ्याच्या लक्षात ही स्थिती किती धोकादायक आहे असं आल, तेव्हा त्यानी तावडतोब कारवाई केली. त्यानी रेशनची पद्धती सुरू केली. दुकानदाराला शहरातील काही ठराविक ठोक व्यापाऱ्याकडूनच माल खरेदी करावा लागे व मालाबरोबर किंमतीचा तक्ता येई. गावी आल्याबरोबर सर्वप्रथम या दुकानदाराला अधिकाऱ्याकडून किंमतीचा तक्ता दाखवून, आपल्या नफ्याचे प्रमाण निश्चित करून घ्यावे लागे. कोणकोणत्या किंमतीला विविध वस्तू विकायच्या ते ठरवून घ्यावे लागे पण अर्थातच, लवकरच या ( छोट्या ) दुकानदाराला नवीन युक्ती सुचली. तीनचार दिवस उलटले की, आपल्याजवळील माल संपला असं तो जाहीर करत असे आणि हळूच चोरून काळ्याबाजारात तो आपल्याजवळील माल विकू लागे राजकीय-सैनिकी सत्ता त्याच्याशी खूप कडकपणे वागली खूप कडक शिक्षा दिल्या जात होत्या व जमा झालेला दंड खेड्याच्या कल्याणनिधीत जमा होई

किंवा सार्वजनिक उपयोगाच्या गोष्टी त्यातून केल्या जात. काही वेळा, काही कामाकरता ते दुकानच बद ठेवण्याचाही निर्णय घेतला जाई. जर परत काळाबाजार सुरू झाला तर सर्व दुकान सरकारजमा केले जाई. एका निवडलेल्या समितीच्या हाती ते सोपवले जाई व ती समिति पूर्वीच्या मालकाला काही ठराविक मासिक रक्कम देई.

**कालचे मालक आज मजूर**

हे अनुभव लक्षात घेऊन, अर्थशास्त्राचे मूलभूत नियम जनतेला समजावून दिले जात होते. भाडवल जमा करणे ही एक पुस्तकी बाब न राहता, प्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट झाली एवढेच नव्हे तर जीवन-प्रणाली सुद्धा झाली. लोकाना हे समजून चुकलं की एकदा माणूस व्यापारात असला की अधिकाधिक श्रीमंत होऊ शकतो, आपला व्यापार वाढवू शकतो मग शेतकरी हळूच हेही सांगू लागले की भरमसाट व्याजाने दुकानदार त्यांना रकमा कर्जाऊ कशा देतो, काही जण सागू लागले की त्याने त्यांच्या जमिनीच ताब्यात घेतल्या आणि कालचे मालक आजचे मजूर बनले. जसजस लोकाना जास्त कळू लागतं तस ते चौफेर बारीक लक्ष ठेवतात, आणि मग हेही त्यांना कळत की सरते शेवटी सगळ काही त्याच्यावरच अवलबून आहे. त्याचा स्वत चा उद्धार त्याच्या सघटनात आहे, स्वत.चे खरे कल्याण कशात आहे ते समजून घेण्यात आहे. स्वतःचे शत्रू कोण आहेत ते पण समजून घेण्यात आहे. लोकाना हेही कळतं की सपत्ती श्रमातून निर्माण होत नाही, तर सुसघटित व सुरक्षित अशा लूटमारीचे ते फळ आहे. मग श्रीमत लोक हे माननीय राहत नाहीत, ते मासभक्षक जनावरापेक्षा कोल्हे, लाडगे,

---

# फ्रांझ फॅनॉ

फ्राझ फॅनॉचा जन्म १९२६ साली फ्रेंच अॅन्टिलसमध्ये झाला आणि तो १९६१ मध्ये अमेरिकेत वॉशिग्टनमधील एका हॉस्पिटल-मध्ये मृत्यू पावला. अवघे छत्तीस वर्षांचे आयुष्य त्याला लाभले त्याच्या हयातीत तीन आणि त्याच्या मृत्यूनतर एक अशी चार पुस्तके प्रकाशित झाली. चारही पुस्तके मूळ फ्रेंचमधून इग्रजीत अनुवादित झालेली प्रसिद्ध आहेत. ' रेचेड ऑफ द अर्थ ' ( इग्रजी अनुवादाचे नाव ) हे त्याचे पुस्तक. तो मृत्यु-शय्येवर असताना प्रकाशित झाले आणि ते बरेच गाजले. विख्यात फ्रेंच तत्त्वज्ञ लेखक ज्याँ पॉल सार्त्र याची या पुस्तकाला प्रस्तावना आहे. या पुस्तकात केवळ काळ्या आफ्रिकेच्या गुलामगिरीचा नव्हे तर तिसऱ्या जगातील वसाहतवादाचा विचार फॅनॉने केलेला आहे. त्यामुळे तिसऱ्या जगातील राजकीय-सामाजिक चळवळीचा विचार करणाऱ्यानी नजरेखालून घातले पाहिजे असे ते पुस्तक आहे फॅनॉची एक निग्रो, एक मानसतज्ज्ञ, एक क्रातिकारक, एक विचारवंत अशी अनेक नात्यानी या पुस्तकामधून ओळख होते. फ्रेंच अॅन्टिलसमध्ये जन्मलेला फॅनॉ अल्जेरियाच्या लढ्यात सामील होतो, आफ्रिकेच्या वतीने बोलतो आणि ज्या भूमीचा त्याने तिरस्कार केला, त्या अमेरिकन भूमीत तो मृत्यू पावतो. अल्जेरियात त्याचे सन्मानाने दफन होते. तो कोणत्याही एका देशाचा नागरिक नव्हता तर गुलामाला जशी स्वत.ची हक्काची जागा नसते तशी एकतर त्याला नव्हती. मात्र गुलामगिरीच्या बेड्या झुगारून देणाऱ्याचे सारे विश्व हेच घर असते. युरोपच्या, अमेरिकेच्या वसाहतवादाखाली अस्मिता गमावून बसलेल्या तिसऱ्या जगाचे नागरिकत्व त्याला आपोआपच मिळाले आहे. आपल्या काळ्या त्वचेशी तो मरेपर्यंत प्रामाणिक राहिला. शिक्षण आणि वैयक्तिक गुणवत्ता याच्या सामर्थ्याने वर्णभेदाची तटबदी ओलाडता येईल असे त्याला आरभी वाटत असे. फ्रेंच लष्करात भरती झाल्यानतर युरोपात लढत असताना त्याला जाणीव झाली की फ्रेंच लोकाच्या दृष्टीने तो केवळ एक निग्रो आहे निग्रो म्हणजे क्षुद्र मनुष्य.

त्याला ल्युकेमिया झाला होता. आयुष्याच्या शेवटच्या दिवशी सकाळी तो झोपेतून उठला तेव्हा बायकोला म्हणाला : रात्री त्यानी मला वॉशिग मशिनमध्ये टाकले होते. त्याला डबल न्यूमोनिया झाला होता. परंतु त्याचे हे बोलणे तापातल्या भ्रमाचे नव्हते. त्याला कधीही गोरे व्हायचे नव्हते. युरोप आणि अमेरिका, वसाहतवादी, भांडवलवादी समाजाचा आणि शोषक मनोवृत्तीच्या मनुष्याचा आदर्श त्याने आपल्यापुढे ठेवलेला नव्हता वशवाद, वसाहतवाद आणि भाडवलवाद या तिहेरी शोषणयत्रणेशी तो आयुष्यभर झगडत होता निग्रो म्हणून अपमानित होत असतानाच त्याने उच्च शिक्षण घेतले, फ्रेंच स्त्रीशी लग्न केले. अल्जेरियातील ब्लिडा-जॉइनव्हिले हॉस्पिटलमध्ये मानस-चिकित्साविभागाचा प्रमुख म्हणून त्याची नियुक्ती झाली.

' ब्लॅक स्कीन, व्हाइट मास्क्स ' मध्ये त्याने काळ्या माणसाच्या मनातील अपराधगडाचे वर्णन केले आहे. मुलांना सागितल्या जाणाऱ्या गोष्टीमध्येदेखील काळा माणूस दुष्ट शक्तीचे प्रतीक असे काळी माणसे आपल्या काळेपणातून मुक्त होण्याची आणि गोरे बनण्याची आस बाळगत. गोऱ्याची भाषा, गोऱ्याच्या रीती याचे अनुकरण करण्यात धन्यता मानत. काळ्या त्वचेवर गोरे मुखवटे चढवण्याचा प्रयत्न करीत. सुटकेसाठी जारीने प्रयत्न केले जातात, पण वाटा बंद असतात. निग्रोला अदृश्य व्हायचे असते, पण ते केवळ स्वप्नातच शक्य असते. गोरा मुखवटा हाही एक भ्रम ठरतो. अल्जेरियन युद्ध सुरू झाल्यानंतर त्याच्या मनाची शकले झाली. हॉस्पिटलमधले आपले अधिकारपद न सोडता त्याने वर्षभर क्रातिकारकांना सहाय्य केले. आपल्या घरी आणि हॉस्पिटलमध्ये त्याना त्याने आश्रय दिला. दहशतवाद्याना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी घेतली. दुसरीकडे दहशतवाद्याचा छळ करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याची सेवा-शुश्रूषाही त्याला करावी लागे. त्याने हॉस्पिटलमधल्या आपल्या पदाचा राजीनामा दिला. फ्रान्सशी असलेले नाते तोडले आणि उघडपणे स्वत ला अल्जेरियन म्हणून घोषित केले. आपल्या राजीनामा-पत्रात तो म्हणतो ' जवळ जवळ तीन वर्षे मी या देशाच्या आणि त्यातील लोकाच्या सेवेला वाहिली मी माझ्या

गिधाडे याच्यापेक्षा फारसे वेगळे वाटत नाहीत. (लोकाच्या रक्तात स्वत:ला माखून घेणाऱ्या ) आता जिल्हाधिकाऱ्याना असं फर्मान काढावच लागत की, कोणीही कोणासाठीही राबणार नाही. हे तत्त्वच वास्तविक अल्जेरियन क्रातीचे मूलभूत सूत्र होऊन बसलेले आहे जे शेतकरी आजपर्यंत शेतमजूर लावीत होते, त्याना आता जमिनीचा काही हिस्सा या मजुराला देणे भाग पडले आहे. व जमीन कसेल त्याची झाली आहे.

फ्रेंचाचे अनेक हल्ले झाले, अमर्याद बॉबफेक झाली, खते इ मिळणे दुरापास्त झाले तरीही शेतीचे उत्पन्न मात्र तिपटीने वाढले आहे. आणि सुगीच्या वेळी ज्यानी धान्य मोजून मापून घेतले त्याना या चमत्काराचे स्पष्टीकरण हवे होते. त्यांच्या हे लक्षात आलंय की कामाची सकल्पना वाटते तितकी सोपी नाही· गुलामगिरी व काम याचे व्यस्त प्रमाण आहे व उत्तम काम, स्वातंत्र्य, निर्भयता, जबाबदारीची जाणीव व मानसिक जाणीव या सर्व गोष्टी गृहीत धरते. (त्याशिवाय कार्यक्षमता विकास पावू शकत नाही )

ज्या ज्या विभागात हे नावीन्यपूर्ण प्रयोग आम्ही करू शकलो आहोत, ज्या ठिकाणी क्राती-मूल्यानी माणसाचा पुनर्जन्म झालेला नवा माणस घडताना आम्ही पाहिला आहे, शेतकऱ्यानी आणखीही एक विचार सहज आत्मसात केला आहे. एखाद्या कामात तुम्ही जितका विचार– बुद्धी ओताल तितका त्यापासून तुम्हाला अधिक आनद मिळेल. आम्ही लोकाना हे समजावून सागू शकलो आहोत की, काम म्हणजे केवळ शारीरिक शक्तीचे बहि:सारण नव्हे, किंवा काही

## तिसऱ्या जगताने स्वत:ची मूल्ये शोधली पाहिजेत ....

प्रयत्नात आणि कष्टात कोणतीही कसूर ठेवली नाही. चागल्या जगाच्या उदयाच्या आशेने मी माझे सारे काम करीत होतो परतु एखाद्या माणसाच्या निव्वळ उत्साहामुळे आणि त्यागामुळे काय साधले जाते, जर दैनदिन वास्तव खोटेपणाने, भित्रेपणाने आणि मनुष्यद्वेषाने भरलेले असेल तर ! ... इथले अरब स्वत:च्या देशात परके झालेले आहेत. व्यक्तित्व हरवलेल्या अवस्थेत ते जगताहेत. एक पद्धतशीर अमानवीकरण इथे चाललेले आहे... कायद्याचा अभाव, विषमता आणि मनुष्याचे हत्यासत्र या गोष्टी कायदेशीर ठरवल्या जात असताना मूल्यांच्या प्रतिष्ठापनेला कार्य अर्थ ?

मनुष्याच्या गरजाची पूर्ती करणाऱ्या संस्थाची उभारणी करणे हे समाजरचनेचे उद्दिष्ट असले पाहिजे. जो समाज आपल्या सदस्याना निराशेच्या गर्तेकडे ढकलतो तो समाज बदलणे अपरिहार्य ठरते.

फ्रेंच मनुष्याला लिहिलेल्या पत्रात फॅनॉचा स्वर कर्कश झालेला आहे. तो म्हणतो : मला माझा आवाज कर्कश झालेला हवाय तो मधुर असायला नकोच आहे .. मी मनुष्याविषयी आणि त्याच्या नकाराविषयी बोलतो आहे. मनुष्याच्या दिवसेदिवस सडत चाललेल्या स्थितीविषयी, त्याच्या भयंकर अपयशाविषयी.

सिमोन द बीव्हच्या 'फोर्स ऑफ सर्कमस्टन्स' मध्ये फॅनॉच्या अखेरच्या काळातील भेटीचे वर्णन आहे. तो सार्त्रला भेटायला आला तेव्हा कसा अखड बोलत होता. त्याची सुऱ्याच्या धारेसारखी लखलखीत बुद्धिमत्ता, अत्यत उत्कटता, तीव्र विनोदक्षमता. तो मुद्दे माडत होता. विनोद करीत होता, प्रश्न विचारीत होता, गोष्टी सागत होता... सिमोनने लिहिले आहे. : तो एक निराळाच माणूस होता. निरोप घेताना जेव्हा मी त्याचा तप्त हात हातात घेतला तेव्हा त्याला आतून भाजून काढणाऱ्या जाणिवेलाच मी स्पर्श करत आहे असे मला वाटले ... त्याच्या सहवासात असताना आयुष्य म्हणजे शोकात्म धाडस आहे असे वाटायचे. भयंकर पण अत्यत मूल्यवान ..

घानामध्ये त्याची अल्जेरियन सरकारचा राजदूत म्हणून नेमणूक झाली होती. तेथे तो आजारी पडला. टयूनीसला परतल्यावर त्याचे वजन घटलेले पाहून त्याच्या बायकोने जबरदस्तीने त्याला स्पेशालिस्टकडे नेले. त्याला ल्युकेमिया झाल्याचे निदान डॉक्टरानी केले त्यापूर्वी त्याला एकदा पळवून नेण्याचा प्रयत्न झाला होता आणि १९५९ मध्ये अल्जेरिया-मोरोक्को सरहद्दीवर तो सुरुग उडून गभीर जखमी झाला होता पुष्कळदा त्याला वाटायचे आपला शेवटचा क्षण आलाय कधीकधी तो आपला आजार साफ विसरून जायचा आणि योजनामागून योजना आखायचा. जणू अनेक वर्षे त्याला जगायचे आहे अल्जेरियाप्रमाणे आफ्रिकेच्या मुक्तीचेही त्याने स्वप्न पाहिले. एकात्म आफ्रिकेचा त्याला ध्यास लागला होता.

'पृथ्वीवरचे नरकवासी' (रेचेड ऑफ द अर्थ) या पुस्तकात वसाहतवादाची अतिशय सखोल अशी चिकित्सा फॅनॉने केलेली आहे. तिसऱ्या जगातील गुलामगिरीचा सर्वांगीण विचार येथे आढळतो. 'तिसरे जग हे नवे जग आहे आणि कालच्या जगातली मूल्ये त्याने मागे टाकली पाहिजेत. स्वत ची मूल्ये शोधली पाहिजेत, स्वत ची जीवनप्रणाली शोधली पाहिजे.' वसाहतवादाच्या उच्चाटनासाठी आवश्यक अशी हिंसा, वसाहती लढा, राजकीय पक्ष, नेटिवाची सस्कृती, राष्ट्रवाद, कामगार आणि शेतकरी याचा क्रातीतील सहभाग या विविध विषयाची चर्चा फॅनॉने या ग्रथात केलेली आहे. सार्त्रने प्रस्तावनेत म्हटले आहे त्याच्या आवाजात तिसऱ्या जगाला स्वत:चा शोध लागतो आणि ते स्वत.शी सवाद करू लागते ... फॅनॉ मोठ्याने बोलतो, आम्हा युरोपियाना त्याचा आवाज ऐकू येतो आहे... आपल्या आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका येथील बाधवाना फॅनॉ समजावून सागतो आहे की सर्व ठिकाणी एकाच वेळी क्रातिकारक समाजवाद जाणला पाहिजे. अन्यथा आपले पूर्वीचे शासक मात केल्याशिवाय राहणार नाहीत. तो काहीही लपवीत नाही, दोष किंवा विसवाद किंवा तो गूढ निर्माण करीत नाही. फॅनॉचे विचार स्पष्ट आहेत. कारण त्याची वसाहती जगाविषयीची जाणीव नेमकी आहे.

**– वसंत आबाजी डहाके**

अवयव व काही स्नायू याची हालचाल नव्हे, कामात मन ओतावं लागत, जीव लावावा लागतो, स्नायूपेक्षा आणि घामापेक्षा ते अधिक महत्त्वाचं आहे. तसेच नव-अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या दिशाही आम्हाला बदलाव्या लागल्या. आतापर्यंत निर्यातीकडे व शहरी बाजारपेठेकडेच दृष्टी लावून येथील उद्योगधदे बसलेले होते. आता लोकांच्या गरजा भागवण्याकरता व राष्ट्रीय मुक्ती सैन्याकरता आम्ही उत्पादन करू लागलो आहोत. लॅटिल्सच उत्पादन चौपट झालं आहे, कोळसा पण उत्पन्न होऊ लागला आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे भाज्या व कोळसा पाठवले जातात, तर दक्षिणेकडून उत्तरेकडे मास पाठविले जाते. एफ्. एल्. एन. ने या व्यापाराची आखणी करून दिली. त्यानीच माल-वाहतुकीचीही व्यवस्था केली. मोठमोठ्या पश्चिमी विद्यापीठाकडून आलेले तज्ञ व विशेषज्ञ आमच्याजवळ मुळीच नव्हते. अर्थातच इथल्या लोकाच जीवनमान सुधारल. त्याचे दररोजच अन्नाच प्रमाण ३,२०० उष्णाकापर्यंत गेल. आतापर्यंत हे कधीच घडलं नव्हत. लोक या विजयाच्या आनदावर केवळ संतुष्ट राहायला तयार नव्हते. ते स्वतःला अनेक मूलभूत प्रश्न विचारू लागले. उदा. मुक्तिलढ्याच्या अगोदर काही भागानी सत्रे ही गोष्ट पाहिली सुद्धा नव्हती आणि त्याच वेळी हजारो टन सत्री बाहेर निर्यात मात्र होत होती, असं का? तसच द्राक्ष ही सुद्धा अल्जेरियन लोकाना अपरिचित होती, तर युरोपीय मात्र त्यावर ताव मारीत होते, अस का? आज, कोणकोणत्या गोष्टी आपल्या आहेत आणि आपल्याला मिळाल्याच पाहिजेत याबद्दल लोकाच्या कल्पना अगदी स्पष्ट झाल्या आहेत त्याना आज हे माहीत आहे की या जमिनीचे एकमेव मालक ते आहेत, खनिज संपत्तीचेही मालक ते आहेत एफ्. एल्. एन् मालकी हक्कावर कोणतेही आक्रमण का सहन करून घेत नाही वा कोणत्याही प्रकारच्या तात्त्विक, तडजोडीला का तयार नाही,. हे जर अजूनही 'काही व्यक्तीच्या' लक्षात येत नसेल तर त्याना सर्वांना आठवण करून द्यावी लागेल की अल्जेरियन लोक हे प्रौढ, सूज्ञ लोक आहेत, जबाबदार आणि जबाबदारीची जाणीव असणारे. थोडक्यात, ते शेतीवाडी बाळगून असलेले लोक आहेत

आम्ही हे अल्जेरियाचे उदाहरण घेतले आहे ते आत्मगौरव करण्याकरता घेतले नाही, तर लोकाच्या जाणिवा जागृत करण्यात मुक्तिलढ्याने केवढे महत्त्वाचे काम केले आहे ते दाखवण्याकरता. काही दुसरे लोक वेगळ्या वाटानी याच निर्णयापर्यंत येऊन पोचले आहेत. आम्हाला हे नक्की माहीत आहे की, अल्जेरियात दोन शक्तीचा सामना अटळ होता. पण दुसऱ्या देशात, राजकीय प्रक्रियेतून व पक्षाच्या योग्य नेतृत्वातून, त्यानी लोकाना याच निर्णयापर्यंत आणून सोडले आहे अल्जेरियात लोक त्यांच्यासमोर जे प्रश्न निर्माण होतात त्याचा मुकाबला करण्यास समर्थ आहेत. मागास देशात, अनुभव अस सागतो की, तीनशे लोकानी एखादी योजना आखून ती अमलात आणायच ठरवल हे मुळीच महत्त्वाच नाही, उलट, सर्व लोक योजनात भाग घेतात व कितीही वेळ लागला तरी त्या अमलात आल्याच पाहिजे अस ठरवतात. (हे महत्त्वाच आहे) जो काळ लोकांना सर्व समजावून सागण्यात, एखाद्या यःकश्चित् कामगाराला 'माणूस' म्हणून वागवण्यात खर्च होतो, तो काळ, योजनेच्या प्रत्यक्ष (शीघ्र) कारवाईत केव्हाच भरून निघतो. लोकाना आपण कुठे जातो आहोत आणि का ते कळलच पाहिजे. राजकीय पुढाऱ्याना हे विसरून चालणार नाही की, जोवर लोक-जागृती होत नाही, लोक अंधारात चाचपडत, ठेचकाळत राहतात, तोवर भविष्याची दारे बंदच राहतात. आम्हा आफ्रिकन नेत्याना, लोकाच्या स्थितीची पूर्ण कल्पना असलीच पाहिजे. आणि ही विचाराची स्पष्टता तर्कवादातून निर्माण झाली पाहिजे. सगळे लोक काही कुठल्या एका क्षणी जागृत व्हायचे नाहीत, लोकाचा राष्ट्र उभारणीतला वाटा हा सुद्धा प्रारंभालाच किती मोठा आहे ते कळू शकणार नाही. प्रथम दळणवळण, वाहतूक या सोयी प्राथमिक अवस्थेत आहेत म्हणून व दुसरे कालपरिमाण म्हणजे हे वर्ष, हा युगीचा ऋतू हे राहणार नसून साऱ्या जगाचे होणार आहे आणि तिसरे लोकाच्या मनात वसाहती सत्तेने रुजवलेला निराशावाद अजून पुष्कळच प्रबल आहे. पण आपण हेही लक्षात घेतलेच पाहिजे की, परकीय सत्तेने, अनेक वर्षे प्रत्यक्ष आणि मानसिक सत्ता लोकावर चालवून, त्याच्या मनात जे अनेक दौर्बल्यगड निर्माण केले आहेत, त्याच्यावर त्यानी विजय मिळवणे ही पहिली गरज आहे. त्याशिवाय कोणतेही सरकार काहीही करू शकणार नाही. वसाहती सत्तेखाली कशा प्रकारे काम चालत होते ते आपण पाहू. परकीय वसाहतवादी नेहमी तक्रार करीत राही की, कामगार फार सावकाश काम करतो आजही काही स्वतंत्र झालेल्या देशातही सत्ताधारी लोक हीच तक्रार करतात. वसाहत-वाद्याला नेटिव्ह गतिमान, उत्साही असा हवा होता. कुठल्यातरी चमत्कृतिपूर्ण युक्तिवादाच्या जोरावर जो तुमच्या वास्तवात पडदा निर्माण करतो, त्याला नेटिव्हला हे समजावून सागायचं होत की तो ज्या जमिनीवर घाम गाळतो आहे ती (वसाहतवाद्याची) त्याची आहे, ज्या खाणीत आपलं आयुष्य मातीमोल करतो आहे तीसुद्धा वसाहत-वाद्याचीच आहे या सर्व वेळी वसाहतवाद्याला या गोष्टीचा विसर पडत होता की या गुलामाच्या मरण-वेदनांतून तो स्वतः श्रीमंत होत होता. खर तर अप्रत्यक्षपणे तो या नेटिव्हला असंच सागत होता की, 'तू स्वतः मर, म्हणजे मी श्रीमंत होईन,' पण आज आपण अगदी वेगळ्या प्रकारे वागायला पाहिजे. (हे उघड आहे.) जर राष्ट्रीय उत्पन्नात आपल्याला काही वाढ घडवून आणायची असेल तर आपण लोकांना म्हणू शकत नाही की 'तुम्ही मरा, जेणे करून राष्ट्र श्रीमंत होईल.' जर राष्ट्रीय संपत्तीत आपल्यात वाढ घडवून आणायची असेल तर आणि काही निरुपयोगी अथवा हानिकारक सुद्धा वस्तूची आयात थाबवायची असेल तर, शेतकी उत्पन्न वाढवायच असेल तर निरक्षरता नाहीशी करायची असेल तर, आपण काय करतो आहोत ते सर्व लोकाना समजावून सागितलंच पाहिजे. लोककल्याणाच काम हे लोकाच असलच पाहिजे. याकरता अगदी तळापर्यंत सर्व माहिती असणाऱ्या, अनेक केंद्राची स्थापना होणे आवश्यक आहे अनेकदा अशा सस्था केवळ शहर विभागात जन्माला येतात. राजधानीत येतात. स्त्रियाचे युनियन, तरुण लोकाचे युनियन' ट्रेड युनियन इत्यादी. पण याच्या कार्यालयातून खरोखर काय चालू आहे हे जर पाहण्याची आपण तसदी घेतली, ज्या ठिकाणी विविध अहवाल रचून ठेवलेले हवे त्या आतल्या खोलीपर्यंत जर जाऊन तुम्ही पाहिले तर तिथल्या अधाराने, रिकाम्या पडलेल्या ओसपणामुळे व थापेबाजीमुळे तुम्हाला धक्काच बसेल. प्रत्येक गोष्टीला पाया हवाच. अर्थ, आयुष्य, रस

पुरवणाऱ्या पेशी हव्याच. लोकाना एकत्र भेटण्याची, चर्चा करण्याची, प्रस्ताव माडण्याची. सूचना देण्याघेण्याची सर्व सोय उपलब्ध हवी, लोकाना बोलण्याचे, स्वत.ची मते प्रगट करण्याचे, नवीन कल्पना माडण्याचे स्वातंत्र्य हवे. पक्षाच्या समित्याच्या बैठकी, उपसमित्याच्या बैठकी हे जवळजवळ धार्मिक गाभीर्याचे विधी आहेत. ज्या ठिकाणी माणसाला वाचा-श्रवण-स्वातंत्र्य दिले जाते असे ते खास प्रसंग आहेत. प्रत्येक सभेच्या योगाने मेंदू अधिक तल्लख होतो, कार्यक्षम होतो. डोळ्याला अधिक विशाल निसर्ग समाजचित्र दिसू लागते व त्या सर्वांचे माणसाच्या प्रतिष्ठेशी काय नाते आहे ते समजू लागते.

## हिरवे कुरण खेळाचे मैदान

कोणत्याही मागास देशातील, मोठ्या सख्येत असणारी तरुण मडळी सरकारकरता नेहमीच काही प्रश्न निर्माण करते व ते अत्यत नाजूकपणे हाताळले जायला पाहिजेत. छोट्या छोट्या गावातून राहणारे हे तरुण, बहुतेकदा रिकामे व अशिक्षित असतात आणि विविध अपप्रभावाना बळी पडतात. या मागास देशातील तरुणाना औद्योगिक राष्ट्रे आपली सर्व चैनविलासाची साधने दाखवून वश करून घेतात. साधारणतः एखाद्या समाजाची बौद्धिक व आर्थिक वाढ, व तो समाज देऊ करीत असलेल्या विविध सुखसाधनाचा स्तर याच्यात एक सामंजस्य असते पण या ठिकाणी मात्र मागास देशातील लोकाना चटक लागते ती भाडवलशाही विकसित देशातील चैन विलासाची – रहस्य कादंबऱ्या, स्लॉटमशीन्स, कामुक चित्रे व फोटो, अश्लीलवाङ्मय अश्लील चित्रपट आणि सर्वांत अधिक महत्त्वाचे म्हणजे मद्यपान-पाश्चिमात्य देशामध्ये, कौटुबिक (वर्तुळ) वातावरण, शिक्षण, आणि एकूण उचावलेले जीवनमान यामुळे साहजिकच माणसाला, या विविध भोगविलासाच्या हानीपासून सरक्षण मिळत असते. पण आफ्रिकन देशात, जिथे बौद्धिक वाढीची विषमता आहे, दोन जगाच्या एकीकरणाने जिथे जुन्या रूढीना धक्के दिलेले आहेत आणि एकूण अवती-भोवतीच्या विश्वाच्या आकलनाला उलटसुलट करून टाकले आहे, साहजिकच इथे आफ्रिकनाची तरुण-मृदू, सवेदनाक्षम मन त्याच्यावर पाश्चात्त्य सस्कृती हे जे सतत हल्ले चढवीत असते त्याच्या माऱ्याखालीच असतात. अशा हल्लघाच्याविरुद्ध त्याचे कुटुब त्याना स्थैर्य व सुरक्षितता काहीच देऊ शकत नाही.

अशा वातावरणात एक स्थैर्यकारक घटक बनणे हे सरकारचे कर्तव्य आहे. मागास देशातील युवक संघटक अनेकदा त्याची भूमिका विकसित देशातील युवकसघटकापेक्षा वेगळी नाही असं समजतात ही त्यांची चूक होते. ते मनाला खबीर करण्याची, शरीर बळकट करण्याची भाषा बोलतात, एकूण खिलाडू वृत्ती वाढवण्याची भाषा करतात त्यानी या कल्पनाचा जरा खोल विचार करावा अशी आमची सूचना आहे. मागास देशातील तरुण हे सर्वप्रथम रिकामे असतात, त्याच्यासाठी काही तरी काम शोधून दिलच पाहिजे आणि या कारणाकरता युवकसघटक हे श्रममत्रीविभागाशी सलग्न असले पाहिजेत. हा श्रम मत्रीविभाग ही इथली एक मूलभूत गरज आहेच. तो नियोजनमत्री विभागासह काम करीत असतो. तीही इथली एक गरजच असते. इथल्या तरुणाना खेळाच्या जिमखान्यावर पाठवायला नको तर शेतात आणि शाळात पाठवायला हवे, स्टेडियम हे इथले शहरातले प्रदर्शनीय बाधकाम असता कामा नये, तर केवळ शेताच्या मधे असणारी हिरवी कुरणे म्हणजेच खेळ-मैदान जे या लोकानी निर्माण केल पाहिजे जोपासल पाहिजे आणि राष्ट्राला दिल पाहिजे. भाडवलशाही देशाची खेळाबद्दलची जी कल्पना आहे. ती मागास देशातील खेळाच्या कल्पनेपेक्षा मूलतःच वेगळी आहे. आफ्रिकन राजकीय पुढाऱ्यासमोर खेळाडू निर्माण करण्याचे मुख्य कार्य नाही, तर ज्याच्या जाणिवा विकसित झाल्या आहेत अशी माणस निर्माण करण्याच कार्य आहे. ही माणस खेळ खेळत असतीलही. जर का विविध खेळाना राष्ट्रजीवनाशी साधून टाकल नाही- राष्ट्रउभारणीकडे वळवून घेतल नाही, आणि राष्ट्र-जाणिवा जागृत न करता आपण खेळाडूच निर्माण करत बसला तर लवकरच इथे बाजारी वृत्तीचे व व्यापारी वृत्तीचे साम्राज्य माजलेले आढळेल. खेळ हा काही केवळ शहरी वर्गाकरता असणारा एक छंद नाही. आपल्यासमोरील सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे, प्रतिक्षणी आपल्या भोवती काय घडते आहे त्याचा शोध घेणे काहीतरी अपवादात्मक जे आहे त्याचा उदोउदो आपण करायला नको, तसेच वीरनायकाची निर्मितीही करायला नको ( तो ही एक प्रकारचा नेताच होय.) आपल्याला लोकाना वर आणायचं आहे, त्याची मनं विकसित करावयाची आहेत, त्याना बदलायच आहे त्याचं माणसात रूपातर करायचं आहे

---

## माणूस

**मालकी व तत्सबधित इतर तपशिलाचे निवेदन**

( अधिनियम ४ व नियम ८ अन्वये )

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | पुणे |
| २) | प्रकाशन काळ | : | वर्षातून चार विशेषाक |
| ३) | मुद्रक, प्रकाशक, सपादक | : | श्री. ग. माजगावकर |
| | नाव व पत्ता | : | १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० |
| ४) | नागरिकत्त्व | : | भारतीय |
| ५) | प्रकाशन सस्थेचे नाव व | : | राजहस प्रकाशन |
| | तिच्या मालकाचे नाव व पत्ता | : | श्री. ग. माजगावकर<br>दिलीप माजगावकर<br>१०२५ सदाशिव पेठ,<br>पुणे ४११०३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

एप्रिल १९८८

प्रकाशकाची सही

**श्री. ग. माजगावकर**

---

पुन्हा एकदा आमच्या आवडीच्या विषयाकडे आम्ही वळलो-त्याचा ध्यासच आम्हाला लागलेला आहे आणि सर्व आफ्रिकन पुढाऱ्याना तो लागावा अशी आमची इच्छा आहे तो म्हणजे प्रकाशमान, बुद्धिमान होण्याची नितांत आवश्यकता. कारण हे कामही ऐतिहासिक अंधारा-पासून पूर्णतः मुक्त आणि वेगळे आहे, प्रकाशित आहे. मागास देशात आपण एखाद्या जबाबदारीच्या जागी असणं, याचा अर्थ असा की, शेवटी सर्व काही जनसामान्यांच्या प्रशिक्षणावर, जागृतीवर अवलंबून आहे याची पुरेपूर जाणीव असण, त्याच्या विचाराची पातळी वाढवणे त्याना राजकीय दृष्टया सज्ञान करणे यावर सगळ अवलंबून आहे. हे माहीत असण. खरं तर, अनेकदा आपण अक्षम्यपणे असा वरवरचा विचार करतो की,लोकाना राजकीयदृष्टया सज्ञान करणे म्हणजे मधून मधून त्याच्यासमोर राजकीय भाषणबाजी करणे, राजकीय बौद्धिक घेणे, आपल्याला असं वाटत की पुढाऱ्याने किंवा त्याच्या कोणी हस्तकाने भारदस्त, पल्लेदार आवाजात, महत्त्वाच्या वर्तमान घटना सांगितल्या म्हणजे लोकाना राजकीय शिक्षण देण्याचे त्याचे कर्तव्य संपले पण राजकीय शिक्षण म्हणजे त्याची मनं मुक्त करणे, त्याना जागे करणे, त्याच्या बुद्धीला वर येऊ देणे; ज्याला सिझेएरने ' आत्म्याची निर्मिती करणे ' अस म्हटल आहे. एक राजकीय भाषण देण्याने हे शिक्षण होत नाही. त्याचा अर्थ असा की, न कटाळता, न दमता सतत लोकाना हे सागण्याचा प्रयत्न करणे की सर्व काही ( भविष्य ) त्यांच्यावर अवलंबून आहे. आम्ही जिथल्या तिथेच राहिलो तर तेही त्याच्यामुळेच व भराभर पुढे गेलो तेही त्याच्यामुळेच. महत्तेची उर्जा या नावाची काहीही चीज अस्तित्वात नाही. असा एकही महान नेता नाही जो गोवर्धनाप्रमाणे सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊ शकेल. ही महत्ता-उर्जा म्हणजे स्वतः लोकच आणि जादूचे हातही लोकाचेच आहेत. हे सर्व प्रत्यक्षात आणण्याकरता, लोकाना खरोखरच प्रेरित करण्याकरता, आम्ही पुन्हा असे ठासून सागतो की, जास्तीतजास्त विकेंद्रीकरण करण्याची आवश्यकता आहे खालून वर व वरून खाली सतत संचालन सुरू राहिले पाहिजे. केवळ तत्त्वाकरता तत्त्व म्हणून नव्हे तर खरोखरच त्याशिवाय दुसरा तरणोपाय नाही. म्हणून तळा-पासून काही शक्तीप्रवाह वर वाहू लागतात आणि शिखराला त्याचे गतितत्त्व दाखवून देतात, मगच तर्कद्वंद्वाच्या योगाने पुढे झेप घेणे शक्य होते. ह्याही बाबतीत आम्ही अल्जेरियन लोकानी भराभर सगळी परिस्थिती समजून घेतली. कारण अधिकारपदी असणाऱ्या कोणत्याही सभासदाला स्वत कडे. लोकाच्या तारणाची जबाबदारी घेता आलेली नाही. साधेसुधे लोक, त्याच्या पलटणी इथे लढा देत आहेत आणि त्याना हेही माहित आहे की, या त्याच्या खडतर लढ्याशिवाय शिखर कोसळून पडणार आहे; तसेच तळाशी असणाऱ्याना हेही माहित आहे की, शिखराशिवाय, नेतृत्वाशिवाय पाया दुभंगल्याशिवाय राहणार नाही. एकच गोंधळ माजेल. या शिखराचे सारे सामर्थ्य लोक लढ्याला तयार आहेत्या एका गोष्टीमुळे आहे. खरोखर, लोक या कळसाची निर्मिती ( स्वतःसाठी ) करीत असतात, कळस लोकाना चालवून घेत नसतो.

लोकाना हे माहीत असलच पाहिजे की, सरकार व पक्ष हे त्याच्या सेवेकरता आहेत. जे काही लायक आहेत असे लोक, दुसऱ्या शब्दात स्वतःच्या प्रतिष्ठची जाणीव असणारे लोक, या गोष्टी कधीच विसरत नाहीत. वसाहती सत्तेच्या काळात लोकाना हे सागण्यात आलं होतं की त्यानी आपल्या प्राणाचं मोलसुद्धा द्यायला तयार असलं पाहिजे, जेणे करून प्रतिष्ठा विजयी होईल आफ्रिकन लोकाच्या हे तात्काळ लक्षात आले की, प्रतिष्ठा व सार्वभौमता म्हणजे एकचा प्रतिष्ठेने राहणारे स्वतत्र लोक म्हणजेच सार्वभौम लोक. तेव्हा आफ्रिकन लोक पोरकट आहेत किंवा निर्बुद्ध आहेत अस म्हणण्यात काही अर्थ नाही. एखाद्या सरकारला वा पक्षाला त्याच्या लायकीप्रमाणे लोक मिळत असतात व आज ना उद्या, लोकानाही त्याच्या योग्यते-प्रमाणे सरकार मिळत असते

काही विभागात आलेला प्रत्यक्ष अनुभवही हेच सागतो. काही सभामधून, क्रातीकारक, तेजस्वी,ओजस्वी सूत्रबद्ध छापील वाक्ये फेकीत असतात. ज्यात उत्स्फूर्तता आणि एक वरवरची सिंप्लीफाईड एक-संधतेची प्रक्रिया दिसते : अशी ही वाक्ये, अनेकदा लोकाची मने जिंकतात. ज्यावेळी अशा प्रकारच्या भाषेच्या आतषबाजीवर जगणारा मिलिटंट आपल्याला भेटतो तेव्हा त्याची भूमिका किती चूक आहे हे त्याला सागण अगत्याच आहे. त्याला जबाबदारी पेलण्यास तयार करायला हव. त्याच्या विशिष्ट विचारधारेच्या आधारानेच त्याला हे पटवून द्यायला हवे की, अशाप्रकारे अती सोपे केलेले युक्तिवाद हे धोकादायक, माणूसकी नसलेले इतकेच नव्हे तर शेवटी अत्यत निष्फळ ठरणारे असे आहेत.

## वैयक्तिक व राष्ट्रीय

पुढारी *किंवा अनुयायी कोणीच सत्याला अडवून* ठेवू शकत नाहीत. आपापल्या स्थानिक मर्यादेत सत्याचा शोध घेणे ही एक सामूहिक क्रिया असते. काही लोकाचा अनुभव संपन्न असतो, त्याचे विचार भराभर मुद्दे निवडून घेतात, आणि पूर्वीसुद्धा अनेक तार्किक दुवे जोडण्याचे काम त्यानी तल्लखपणाने केलेले असते. पण इतर सामान्य लोकाची पायमली करून वेगाने पुढे जाण्याचे त्यानी टाळले पाहिजे कारण आपण स्वीकारलेला निर्णय वा धोरणच तेव्हाच यशस्वी पणाने राबवता येते जेव्हा सारे लोक अशेष, त्याच्यात सहभागी झालेले आहेत. या परिस्थितीतून तेव्हा कुणालाच सुटून पलायन करता येत नाही. प्रत्येकजणाची हत्या होईल, किंवा प्रत्येकाल हाल-अपेष्टा सोसाव्या लागतील. राष्ट्राच्या रचना कार्यक्रमात, प्रत्येकजण अर्धपोटी राहील किंवा आर्थिक मदीने आलेल्या दुष्परिणामाना तोड देईल. सामूहिक लढ्याच्या पाठीमागे सामूहिक जबाबदारी आलीच-तळापासून वरपर्यंत या सर्व कल्याणाच्या कार्यात, प्रत्येकालाच मोल मोजले पाहिजे. कोणाचेच हात स्वच्छ राहता कामा नयेत. इथे केवळ निरीक्षक आणि निष्पाप कोणीच नाहीत. आम्हा सर्वांचे हात मलीन झालेले आहेत. आम्ही आमच्या देशाच्या कर्दमात ते माखून काढतो आहोत, तसेच आमच्या मेंदूतील प्रचड भयाण ओसपणातही दूर उभा असलेला प्रत्येक निरीक्षक एकतर दगाबाज आहे किंवा भित्रा आहे.

जे लढ्याचे नेतृत्व करीत आहेत, त्याचे आपल्यामागे लोक आहेत की नाहीत हे पाहण्याचे कर्तव्य आहे. ही बांधिलकी म्हणजेच जाणीव, म्हणजेच आपल्या कार्याच्या महत्त्वाची समज. थोडक्यात, ही

एक वैचारिक भूमिका आहे, कितीही अंकुरात्मक असली तरी आपण लोकांना ढोलताशाच्या जोरावर गोळा करायचे नाही किंवा भावनांच्या भरात लोटून द्यावयाचे नाही. जिथे लोकामधून क्रांतीचे नेते निर्माण झाले आहेत व त्यांनी स्वातंत्र्य आणले आहे, अशा अविकसित देशात लोक या इतिहासाच्या रगमचावर वावरताता दिसतात. आम्ही हे पुन्हा सांगतो की, राष्ट्रीय बूर्ज्वा व एक विशेष लाभ भोक्त्यावर्गांच्या निर्मितीला आपण कसून विरोध केलाच पाहिजे. लोकाना राजकीय शिक्षण द्यायचे म्हणजे 'सपूर्ण देश' ही प्रत्येक नागरिकासाठी एक वास्तवता होईल याची काळजी घेणे. राष्ट्राचा इतिहास म्हणजे प्रत्येकाच्या वैयक्तिक अनुभवाचा भाग होईल असे शिक्षण दिल पाहिजे. आफ्रिकन साहित्यिकाच्या दसऱ्या मेळाव्यात बोलताना, अध्यक्ष सेको टूरे यानी दिलेला सदेश महत्त्वाचा आहे. विचाराच्या प्रांतात, माणूस हा सर्व सृष्टीचा मेंदू समजला जाऊ शकेल, पण प्रत्यक्षात जिथे प्रत्येक कृतीचे काही प्रत्यक्ष व मानसिक परिणाम असतात. तिथे भोवतालचे जग हेच मनुष्याचा मेंदू असते. कारण इथेच तुम्हाला सर्व सकल्पनाचा विचारांचा समुच्चय सापडणार असतो, विकासाचे, वाढीचे मार्ग सापडणार असतात, आपल्या शारीरिक शक्तींना वाट सापडणार असते. ( या शक्तींना माणसाच्या बुद्धीचीही जोड दिलेली असेलच ) वैयक्तिक अनुभव हा राष्ट्रीय असतो, निदान राष्ट्रीय जीवनातील एक दुवा तर निश्चितच असतो, व वैयक्तिकतेच्या मर्यादा ओलाडतो. आणि आपल्या राष्ट्राच्या सदर्भातील तसेच जगाच्या सदर्भातील सत्य शोधून काढतो. जसे मुक्तीलढ्यावेळी प्रत्येक सैनिक राष्ट्राचे भवितव्य आपल्या ओंजळीत धरून पुढे जात होता, तसेच आताही, राष्ट्रउभारणीच्या काळातही प्रत्येक नागरिकाने आपल्या प्रत्येक दैनदिन कृतीचे सदर्भ राष्ट्रजीवनाशी जोडायला शिकलेच पाहिजे. तसेच या इथे, आज, पूर्ण विकसित, प्रगत मनुष्य साकार होईल, झालाच पाहिजे ही खूणगाठही आपल्या मनाशी बांधली पाहिजे. जर एखाद्या नदीवर पूल बाधण्याने तो बाधणाऱ्या लोकाच्या जाणीवात काहीच फरक पडणार नसेल तर तो पूल न बांधलेलाच बरा. लोकाना जाऊ दे एकतर नदी पोहूच वा बोटीनें पार करून हा पूल त्याच्यासाठी कुठून तरी 'वरून' सोडण्यात येणार नाही. काही दैवी चमत्कार म्हणून तो सामाजिक नपथ्यावर येता कामा नये. तो लोकाच्या स्नायूतून, त्याच्या मेंदूतून ( त्याच्या श्रमातून, जाणीवेतूनच ) निर्माण झाला पाहिजे. त्याकरता आपल्याला तंत्रज्ञ, यत्रज्ञ नक्कीच लागतील, एखादे वेळी ते परकीयसुद्धा असण्याची शक्यता आहे. पण स्थानिक पक्षकार्यकर्त्यांनी बाधकामाच्या जागी हजर राहणे आवश्यक आहे या सर्व नव्या प्रयोगाना, कल्पनाना आपल्या बौद्धिक वाळवटाना नागरून काढून, आपण रुजवलेच पाहिजे. तरच 'पूल बाधणे' या क्रियेचा संपूर्ण अर्थ लोकाना उमगेल. त्या कामातील आपल्या वाट्याची आणि जबाबदारीची जाणीव होईल. याप्रकारे आणि केवळ याच प्रकारे, प्रत्येक गोष्ट ( करणे ) शक्य होईल.

### सैनिकी-असैनिकी सेवा

स्वतःला एतद्देशीय, राष्ट्रीय सरकार म्हणवून घेणाऱ्या सरकारने पूर्ण देशाची जबाबदारी उचललीच पाहिजे व मागास देशात तरुण लोक या देशाचा एक महत्त्वाचा भाग असतात. त्यांच्या जाणिवेची पातळी उचावलीच पाहिजे, त्याना योग्य ते ज्ञान करून दिलेच पाहिजे. जर का त्याना योग्य ते मार्गदर्शन झाले असते व राष्ट्रकार्यात त्याना सामावून घेण्याचे काम यूथ फेडरेशन्सनी केले असते तर लॅटिन अमेरिकन देशात आज जो अधार पसरलेला दिसतोय किंवा त्याच्या भविष्याला धोका निर्माण झालेला दिसतो आहे तो दिसला नसता. सैन्य हे काही नेहमीच युद्धशिक्षणाचं केंद्र नसते, अनेकदा ते नागरी व राजकीय शिक्षणाचे केंद्रसुद्धा बनू शकते. व स्वतत्र राष्ट्राचा सैनिक हा पोटार्थी सैनिक नसून एक नागरिकही असतो, जो शस्त्राच्या सहाय्याने आपल्या राष्ट्राचे रक्षण करीत असतो. यासाठीच या सैनिकाला, आपण राष्ट्राची सेवा करतो आहोत, या किंवा त्या सेनाधिकाऱ्याची नव्हे, हे माहीत असणे अत्यंत आवश्यक आहे. या सैनिकी व अ-सैनिकी सेवाचा उपयोग एकूण लोकाच्या आकलनाचा दर्जा उचावण्याकरता आपण करून घेतला पाहिजे. तसेच देशाचे निर्जमाणीकर करून, त्याला एकसध करण्याकरताही अविकसित देशात, स्त्रीपुरुषाना कार्यप्रवण करण्याचे सर्व प्रयत्न झालेच पाहिजेत. याठिकाणी स्त्रीपेक्षा पुरुषाना अधिक महत्त्वाचे समजणाऱ्या त्या जुन्या इनामदारी परपराचा धोकाही टाळला पाहिजे. स्त्रियाना पुरुषांच्या बरोबरीचेच लेखण्यात येईल, आणि ही समानता केवळ कागदावर– घटनेत राहणार नाही, तर रोजच्या आयुष्यात दिसेल, शाळातून, कारखान्यातून तसेच लोकसभेतही. पाश्चिमात्य देशात सैनिकाना बरॅकीतून डाबून ठेवण्यात येते याचा अर्थ ती एक योग्य पद्धती आहे असा नाही, जवानाचे सैनिकीकरण झालेच पाहिजे अस

---


## ऊर्जा प्रश्न - आशा उद्याच्या

**प्रि. खं. कुलकर्णी : २५ रुपये**

श्री. कुलकर्णी यांनी या पुस्तकात ऊर्जेच्या प्रश्नासबधी माहिती आपल्या देशाच्या संदर्भात दिली आहे आणि तिच्या वापरासंबधी सर्वांची जबाबदारी काय आहे याविषयी चांगले विचार माडले आहेत. निरतर मिळणाऱ्या ऊर्जेच्या उपयोगासाठी माणसाचे काय प्रयत्न चालू आहेत आणि भावी काळात त्याची दिशा काय राहील याचेही चागले दर्शन मिळते सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही सर्व शास्त्रीय माहिती व आकडेवारी, किचकट न करता, सुलभ भाषेत सांगितली आहे विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य वाचकांना, ऊर्जेची आजची समस्या, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याविषयी सोपी परतु मूलभूत माहिती या पुस्तकाद्वारे होईल, असे वाटते.

वि. ग. भिडे
कुलगुरू, पुणे विद्यापीठ


**राजहंस प्रकाशन,**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे


---

नाही. राष्ट्रसेवा ही कोणत्याही प्रकारची राहील सैनिकी अथवा अ-सैनिकी. प्रत्येक लायक माणूस, कोणत्याहिक्षणी, आपल्या राष्ट्रीय व सामाजिक स्वातंत्र्याकरता शस्त्र धरायला व सैन्यात आपली जागा घ्यायला सज्ज राहील हेच अधिक होईल. ( राष्ट्राचे रक्षण हा प्रत्येकाचा हक्क नाही का ? )

हे जवानांचे बळ उपयोगात आणून मोठ्या प्रमाणावरील स्वरूपाची कामे हाती घेता येतील. वास्तविक योजना लोकांपर्यंत कानाकोपऱ्यात नेऊन पोचवण्याचा तो एक उत्तम उपाय आहे, आणि लोकांनाही त्यामुळे आपल्या देशाच्या निकडीच्या गरजा काय आहेत याची कल्पना येते. याच वेळा सैन्य निष्क्रीय राहिल्याने अस्वस्थ होऊन एके दिवशी राजकीय दबाव गटात रूपांतरित होणार नाही. व सरकारला धमक्या देणार नाही याचीही खबरदारी घेतली पाहिजे न जे दिवाणखान्यात आयुष्य काढणारे सेनाधिकारी असतात ते बराच काळ सरकारी विभागाच्या दालनात फिरल्याने हळूहळू लष्करी जाहीरनाम्याची स्वप्ने पाहू लागतात. हे टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे लष्कराला राजकीय शिकवण देणे व त्यांचे राष्ट्रीय बाण्याच्या व्यक्तीत रूपांतर करणे याच वेळी सैन्य वाढवणे हे दुसरे तितकेच महत्वाचे काम आहे. युद्धाच्या प्रसंगी सर्वच राष्ट्रे लढयात सामील होती. म्हणून लष्करात काही प्रोफेशनल सैनिक असण्याची जरूर नाही आणि अधिकारी तर नाममात्र असावेत. याचे मुख्य कारण असे की हे अधिकारी बहुधा उच्च विद्याकेंद्रातून आलेले असतात व इतरत्र ते अधिक उपयोगी सेवा बजावू शकतात. एक अभियंता देशाला एका अधिकाऱ्यापेक्षा हजारपटीने अधिक आवश्यक आहे व दुसरे कारण असे की जमातवादी वृत्ती आपल्याला मुळातच नाहीशी करायची आहे. आपण हे अगोदरच पाहिले की राष्ट्रवाद ता भव्य व विशाल गान, ज्याने लोकांना परकियांविरुद्ध एकत्र आणले असते ते ज्या क्षणी स्वातंत्र्य मिळते त्या क्षणी तुटते त्याचे सूर कमी होता होता ऐकू येईनासे होतात. राष्ट्रवाद हा एखादे राजकीय तत्त्व नाही वा कार्यक्रमही नाही. जर तुम्हाला खरोखरच तुमच्या देशाने मागे पाऊल टाकू नये वाटत असेल निदान तुमच्यासमोरच्या अडचणी व अनिश्चितता दूर व्हाव्या असं वाटत असेल तर राष्ट्रप्रेमाचे रूपांतर तावडतोब राजकीय व सामाजिक जाणीवात होईल अशी पावले तुम्ही उचललीच पाहिजेत. राष्ट्र म्हणजे या क्षणी काय असते ? क्रांतीच्या नेत्यांनी आखलेल्या कार्यक्रमातील रूपरेषा जी लोकांनी अमाप उत्साहाने व प्रामाणिकपणे स्वीकारलेली असते. आता राष्ट्राचे प्रयत्न सतत लोकांच्या आकलनाच्या एकूण पातळीशी संबंध ठेवून असले पाहिजेत. भूक, दारिद्र्य, अडाणीपणा, जाणीवेचा अभाव या सर्वाविरुद्धची युद्धरेषा सर्व स्त्री-पुरुषांनी सतत आपल्या स्नायूत व मनात वागवली पाहिजे. (त्याचा कधीही विसर पडू देता कामा नये.) सर्व लोकांना आत्तापर्यंतच्या दुःशक्तिनी अन्यायाने भूतकाळातील सर्व बौद्धिक संपत्तीपासून

महात्मा गांधी



दूर ठेवलेले असते. त्या सामाजिक अन्यायावर मात करण्याची लोकांना प्रचंड इच्छा असते. त्यांच्या इच्छाशक्तीचा आणि कामाचा उपयोगही राष्ट्राने करून घेतलाच पाहिजे. तसेच, सगळ्याच मागास लोकांच्या इच्छाशक्तीचासुद्धा सर्व मागासलेले लोक आपल्या एका पातळीमुळे एकत्रित सामूहिक प्रयत्न करायला तयार असतात. ( उदा. तिसरे जग ही संकल्पना) त्यांचे सर्वांचे भवितव्य एकच असते. तिसऱ्या जगाला राजा बदाउन याच्या विवाहसमारंभात, अथवा सत्तेवर असणाऱ्या इटालीयन वर्गाच्या विविध अनैतिक प्रकरणात काहीच रस नसतो. अर्जेंटियन लोकांनी काय प्रयोग चालवले आहेत त्यांची किंवा वर्मीज लोक त्यांच्या देशातील निरक्षरता घालवण्याकरता काय करीत आहेत किंवा त्यांच्या नेत्यांच्या हुकूमशाही वृत्तीला कसा पायबंद लावीत आहेत, त्याची माहिती आम्हाला हवी असते. या गोष्टी आम्हाला आत्मविश्वास देतात धडे देतात, व आमची कार्यक्षमता दहापटीने वाढवतात आमच्या मते ज्या सरकारला आपल्या लोकांना पूर्ण राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य द्यायचे आहे. त्यांच्यासाठी निश्चित् कार्यक्रम आवश्यकच आहे, आर्थिक कार्यक्रम हवा आणि संपत्तीच्या वाटणीबद्दल तसेच सामाजिक संबंधाबद्दलही काही निश्चत तत्त्वे हवीत.

### लोकांकरता, लोकाकडून

थोडक्यात म्हणजे माणूस आणि त्याचे भवितव्य या दोहोबद्दल सखोल विचार झालेला हवा. याचाच अर्थ असा की, कोणताही लोकानुनयाचा (मार्ग) फॉम्युला अथवा पूर्वीच्या सत्तेशी केलेले कोणतेही करार, आमच्या आजच्या (पुरोगामी) कार्यक्रमाची जागा घेऊ शकत नाहीत. हे नवे लोक, सुरुवातीला जरी अनुन्मिलित असले तरी हळूहळू या कार्यक्रमाकडून क्रांतीकारक अपेक्षा करू लागतात. आफ्रिकन लोक किंवा सर्वच मागास लोक, फार शीध्र गतीने सामाजिक आणि राजकीय जाणिवा आत्मसात करतात. यातला धोका केव्हा असतो तर, राष्ट्रीय आत्मभावनेच्या अगोदर जेव्हा त्यांच्या सामाजिक जाणिवा विकसित होतात तेव्हा. असं जर झालं तर, मागास देशात, सामाजिक न्यायाकरता, समतेकरता, खूप जोरदार मागण्या पुढे येतात आणि त्या विचित्र नात्याने, अगदी संकुचित, प्राथमिक, जमातवादाशी जांडलेल्या आढळतात. हे मागासलोक भुकेल्या प्राण्याप्रमाणे वागतात, आणि याचाच अर्थ असा की, जे आफ्रिकन राष्ट्रात, ते आज मजा करीत आहेत, त्यांच्यासाठी कठीण काळ आलेला आहे. त्यांचे सरकार आपली सत्ता त्रिकालाबाधित निश्चित काळापर्यंत चालवू शकणार नाही. जो बूर्झ्वावर्ग, लोकांना अन्नाच्या ऐवजी राष्ट्रवाद वाटतो, तो आपल्या कर्तव्यात चुकला आहे. आणि साहजिकच त्याच्या घसरगुंडीला सुरुवात होते. जर राष्ट्रवाद पुरेसा समजावून सांगितला नाही, त्याला सामाजिक व राजकीय ज्ञानाने प्रगल्भ केला नाही, थोडक्यात त्याला मानवतावादाची जोड मिळाली नाही, तर हा राष्ट्र-

---

## आणि 'दांडीयात्रा १९८८'



वाद आपल्याला एका कोंडीत नेतो. ( असंच म्हणावं लागेल. ) अविकसित देशातील बूर्ज्वावर्ग राष्ट्रीय जाणिवेला एका तात्त्विक सांगाड्यात बंदिस्त करतो. जेव्हा, सर्व स्त्री-पुरुषांना जागे केलं जातं, सज्ञान केलं जातं, काही सघन कार्यात समाविष्ट केलं जातं, तेव्हाच या जाणिवेला काही अर्थ, काही आकार प्राप्त होतो. आणि मग ध्वज व ज्या ठिकाणी सरकारचे अधिष्ठान असते तो प्रासाद, राष्ट्राची प्रतिके राहात नाहीत. लोकांची मनं, स्पंदन, जाणिवा हे त्या राष्ट्राचे जिवंत अविष्कार होतात. सारे राष्ट्र या झगमगणाऱ्या (पण) रिकाम्या शिपापासून मागे परतते, आणि वळते खेड्यांकडे. ही लोकांची सुसंगत, अर्थपूर्ण व अत्यंत ऐतिहासिक स्वरुपाची कृती असते. राष्ट्रीय भवितव्याची सामूहिक जाणीव म्हणजेच आपला जबाबदारीचा ऐतिहासिक स्वीकार. असे जर घडले नाही तर, इथे केवळ अराजक, दडपशाही, जमातींचे पुनरागमन व फुटीर वृत्ती यांचा एकच गदारोळ माजेल. राष्ट्रीय सत्तेला खरोखरच राष्ट्रीय व्हायचे असेल तर तिने लोकांकरता व लोकांकडून राज्य केले पाहिजे, (अतिवंचिताकडून आणि अतिवंचिताकरता) लोकांच्या इच्छाशक्तीची जागा कोणताही नेता घेऊ शकत नाही मग तो कितीही लोकप्रिय असो, आणि राष्ट्रीय सरकारने, आपल्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या अगोदर, साऱ्या नागरिकांना त्यांची प्रतिष्ठा परत दिली पाहिजे, त्यांच्या मनात मानवतेच्या कल्पना रुजवल्या पाहिजेत, त्यांच्या डोळ्यांना माणुसकीची हृद्य दृश्ये दिसली पाहिजेत. आणि एका मानवतावादी – कारण तिथे माणूस प्रतिष्ठेने व सार्वभौमसत्तेने राहातो आहे – अशा विश्वाचे मार्ग त्यांच्यासमोर उघडे केले पाहिजेत. □

---

**प्रिय वाचक,**

या मागील प्रजासत्ताकदिन विशेषांकात ( माणूस : २६ जानेवारी १९८८ ) प्रकट केल्याप्रमाणे हा स्वयंसेवी चळवळ विशेषांक ( क्र. १ ) प्रसिद्ध होत आहे. दुसरा अंक मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध होईल.

दोन अंकांऐवजी एकच थोडा मोठा अंक काढावा असा विचार मध्यंतरी बळावला होता. परंतु मजकूर इतका वाढला की, हा विचार सोडून द्यावा लागला.

प्रकल्पांची माहिती आणि या चळवळीमागील विचार – तात्त्विक बैठक असे या विषयाचे सरळ दोन भाग पडतात. यापैकी या पहिल्या विशेषांकात मुख्य भर प्रकल्प परिचयांवर दिलेला आहे. पुढच्या अंकात तात्त्विक चर्चेचे प्रमाण थोडे अधिक आहे.

प्रकल्प परिचय देतानाही एक दृष्टिकोन बाळगलेला आहे. तो म्हणजे, जे प्रकल्प अतिशय प्रसिद्ध आहेत. ( उदा. देवलांचा म्हैसाळ प्रकल्प, अण्णासाहेब हजारे यांचे राळेगण शिंदी येथील काम ) त्यांची पुन्हा माहिती देण्याऐवजी अगदी नवीन व आजवर अपरिचित असलेल्या प्रकल्पांची ओळख वाचकांना करून द्यावी. या दृष्टीने या अंकातील सर्वच प्रकल्प वाचकांना नवीन वाटतील असा विश्वास आहे.

आगामी स्वयंसेवी चळवळ विशेषांक दोनमध्ये स्वयंसेवी चळवळीसमोर असणारे काही प्रश्न, काही धोके, तात्त्विक भूमिका यांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ GRANTA या अमेरिकन त्रैमासिकाच्या ताज्या अंकात The Development Game या नावाचा एक अतिशय फर्मास लेख प्रसिद्ध झाला आहे. औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांना तिसऱ्या जगातील देशांवर राजकीय गुलामगिरी लादणे आता आवश्यक वाटत नाही. ते परवडेनासेही झाले आहे. कारण गुलामगिरी कायम ठेवण्यासाठी पैसा व सैन्य खूप लागते आणि शिवाय वाईटपणा येतो. त्याऐवजी ठिकठिकाणी स्वयंसेवी, सरकारी किंवा निमसरकारी विकासकामांना वरवरची आर्थिक मदत देऊन आपले वर्चस्व ठेवणे अधिक स्वस्त व सोईस्कर वाटते. मदत देण्यामागील हेतू पूर्वीप्रमाणेच आपल्या पक्क्या मालाला सुरक्षित बाजारपेठ मिळवणे हाच असतो – असा या लेखातील प्रतिपादनाचा एकूण सूर आहे. स्वयंसेवी संस्थांतून कार्य करणाऱ्यांना हा लेख उद्बोधक वाटेल. म्हणून त्याचे भाषांतर येत्या स्वयंसेवी चळवळ विशेषांक दोनमध्ये देण्याचे ठरविले आहे.

या क्षेत्राशी संबंधित अशा काही नामवंतांकडे एक प्रश्नावली पाठविली होती. त्यातून एक परिसंवादच उभा राहिला. तोही या दुसऱ्या अंकात समाविष्ट आहे.

स्वयंसेवी चळवळीचे महत्त्व हळूहळू वाढत आहे. तिला अधिक चालना मिळावी व वैचारिक स्पष्टताही यावी म्हणून या दोन विशेषांकांचा उपक्रम 'माणूस' ने योजला. तो कसा वाटला हे आपण आवश्य कळवावे ही विनंती.

**– अविनाश कोल्हे**



MANOOS ( Marathi Weekly ) (Licensed to post without prepayment of postage No. 11) Regd. No. PNC-W 28


१. स्वयंसेवी संस्था / चळवळ यांची व्याख्या काय ?

२. 'विकास' या संकल्पनेमध्ये केवळ भौतिक विकास अभिप्रेत आहे की त्याहून आणखी काही अभिप्रेत आहे ?

३. स्वयंसेवी चळवळीचा वैचारिक पाया काय असावा ?

४. स्वयंसेवी चळवळ विकासाचे पर्यायी मॉडेल होऊ शकते का ?

५. देशरचनेचा स्वयंसेवी चळवळीचा कार्यक्रम काय असू शकतो ?

६. अशा संस्थांची संख्या आणि प्रभाव कसा वाढवता येईल ?

७. स्वयंसेवी संस्थांचे एक समान व्यासपीठ असावे का ? त्याची रचना कशी असावी ?

८. सर्व संस्थांचा मिळून एक किमान कार्यक्रम असू शकतो का ? कोणता ?

९. स्वयंसेवी चळवळीचा आर्थिक पाया कसा असावा ?

१०. स्वयंसेवी संस्थांनी परकीय मदत स्वीकारावी का ?

११. या चळवळीमध्ये व्यावसायिकतेचा अंश [ Professionalism ]. कसा निर्माण करता येईल ?

१२. स्वयंसेवी संस्थांचे सरकारी यंत्रणेशी संबंध कसे असावेत ?

१३. स्वयंसेवी संस्थांचे राजकीय पक्षांशी संबंध कसे असावेत ?

## या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधणारा परिसंवाद

# माणूस

**आगामी स्वयंसेवी चळवळ विशेषांक दोनमध्ये नामवंतांचा सहभाग**

**विशेषांक प्रसिद्धी मे १९८८ ( तिसरा आठवडा )**